पुण्य नगरी

# जिल्हास्तरीय समितीमार्फत होणार नॉन क्रिमिलेअरची पडताळणी

**नाशिक :** इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मुंबई यांच्याकडील ४ डिसेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. या समितीमार्फत नॉन क्रिमिलेअर पडताळणी करण्यात येणार असल्याचे जिल्हास्तरीय नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र पडताळणी उपसमिती, नाशिकचे सदस्य सचिव तथा निवासी उपजिल्हाधिकारी रोहितकुमार राजपूत यांनी दिली आहे.



राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, तसेच शासन सेवेतील सरळ सेवा कोट्यातील पद भरतीसाठी आरक्षणाची टक्केवारी निश्चित करण्यात आलेल्या खुल्या प्रवर्गातील महिला, आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील उमेदवार, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गामध्ये आरक्षणाचा लाभ घेणारे मराठा समाजातील उमेदवार आदींनी समक्ष प्राधिकाऱ्यामार्फत देण्यात आलेल्या नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र देण्यात येते.

सक्षम प्राधिकारी यांनी वितरीत केलेल्या नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राबात त्रयस्थ व्यक्तीचा आक्षेप असल्यास हे आक्षेप ते संबंधित नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र वितरीत करणारे सक्षम प्राधिकारी, तसेच जिल्हाधिकारी (गृह शाखा) कार्यालयात नोंदवू शकतात.

असे आक्षेप घेणाऱ्या त्रयस्थ व्यक्तीस चौकशीसाठी सक्षम प्राधिकारी, तसेच जिल्हास्तरीय समितीसमोर हजर राहून आवश्यक तो पुरावा सादर करणे बंधनकारक राहील, असेही निवासी उपजिल्हाधिकारी राजपूत यांनी म्हटले आहे.

पुण्य नगरी
नाशिक

# रिंगरोडच्या वारंवार बदलणाऱ्या अलाइनमेंटबाबत शेतकरी साशंक!

## आर्थिक गैरव्यवहार होत असल्याचा आरोप, थेट खरेदी योजनेसाठी ५ फेब्रुवारीची मुदत

**नाशिक :** कुंभमेळ्यात वाहतूक कोंडी टाळण्यासाठी शहराच्या बाह्य भागातून सुमारे ६५ किलोमीटर लांबीचा रिंगरोड करण्याचा प्रस्ताव आहे. या प्रकल्पामुळे शहरासह जिल्ह्याच्या विकासाला गती मिळणार असली, तरी रिंगरोडच्या अलाइनमेंटमध्ये वारंवार बदल करून काहींच्या फायद्यासाठी निर्णय घेत कोट्यवधींचा अपहार केला जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. दरम्यान, शेतकऱ्यांनी ५ फेब्रुवारीच्या थेट खरेदी योजनेअंतर्गत जमीन दिल्यास त्यांना २५ टक्के अधिक मोबदला दिला जाणार आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रस्तावित करण्यात आलेल्या नाशिक बाह्य रिंगरोड प्रकल्पाबाबत शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता वाढताना दिसत आहे. प्रारंभी तीव्र विरोध करणारे अनेक जमीनमालक आता हळूहळू सकारात्मक भूमिका घेत असले तरी रिंगरोडची सध्याची अलाइनमेंट अधिक नुकसानकारक ठरत असल्याने ती बदलण्यात यावी, अशी ठाम मागणीही केली जात आहे. पूर्वीची अलाइनमेंट बदलून त्यात कोट्यवधींचा गैरव्यवहार केला असल्याचा आरोपही शेतकऱ्यांनी केला आहे.

आडगाव शिवारात याआधी ग्रीन झोनमधून ६० मीटर रुंदीच्या रिंगरोडची अलाइनमेंट निश्चित करण्यात आली होती. त्या वेळी संबंधित जमीनमालकांना टीडीआरच्या स्वरूपात मोबदला देण्यात आला. मात्र, त्यानंतर पुन्हा अलाइनमेंट बदलण्यात आल्याने शेतकऱ्यांचे नुकसान वाढल्याचा दावा केला जात आहे. विंचूर गवळी, सय्यद पिंप्री, देवळाली, विल्होळी, बेळगाव ढगा, दरी-मातोरी, जलालपूर चांदशी आणि गोवर्धन या गावांमध्येही अलाइनमेंट बदलून प्रभावशाली घटकांच्या सोयीने रस्ता नेण्यात आल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.



### थेट खरेदीची डेडलाइन!

थेट खरेदीसाठी ५ फेब्रुवारीपर्यंत भूसंपादनासाठी संमती देणाऱ्या शेतकऱ्यांना पाचपट मोबदला देण्यात येईल. त्यानंतर संमती दिल्यास सुमारे २५ टक्के नुकसान सहन करावे लागेल, अशी स्पष्ट डेडलाइन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी जाहीर केली आहे. त्यावर अलाइनमेंटमुळे होणारे अतिरिक्त नुकसान टाळण्यासाठी जुनी किंवा कमी नुकसानकारक अलाइनमेंट कायम ठेवावी, अशी मागणी करत शेतकरी जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घेत आहेत.

### गोवर्धन ग्रामस्थांची जिल्हाधिकाऱ्यांशी भेट

1. गोवर्धन ही पेसा कायद्यांतर्गत येणारी ग्रामपंचायत असून, सध्याची अलाइनमेंट काही नागरिकांच्या घरांवरून तसेच शेतीतून जात आहे. त्यामुळे काही शेतकरी पूर्णतः भूमिहीन होण्याची भीती व्यक्त करत आहेत.

2. गोवर्धनच्या ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन बदललेली अलाइनमेंट पुन्हा सुधारून कमी नुकसानकारक मार्गाने रस्ता उभारावा, अशी मागणी केली. त्यावर, आपण केवळ भूसंपादन प्रक्रियेपुरते जबाबदार असून, रस्त्याची अलाइनमेंट आणि प्रत्यक्ष उभारणीची जबाबदारी एमएसआरडीसीकडे आहे.

3. शेतकऱ्यांनी एमएसआरडीसीच्या मुंबईतील राज्यस्तरीय कार्यालयाकडे तक्रार करावी, तेथेच याबाबत दिलासा मिळू शकतो, असा सल्ला यावर जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी दिला.

पुण्य नगरी

# महापौर, उपमहापौर पदासाठी शनिवारी विशेष महासभा

**मालेगाव :** महापालिकेच्या निवडणुकीनंतर महापौर, उपमहापौर निवडीसाठी शनिवारी (दि.७) विशेष महासभेचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर मालेगावी सत्ता स्थापनेसाठी राजकीय पक्षांकडून सावधगिरी बाळगली जात असून, आता महापौर निवडीची तारीख निश्चित झाली असून महापौर व उपमहापौर पदासाठी एकूण ६ अर्जांची विक्री झाली आहे. यात मालेगाव सेक्युलर फ्रंटने हे सर्व अर्ज नेल्याची माहिती मनपा प्रशासनाने दिल्याने फ्रंटतर्फे सत्ता स्थापनेला गती आली आहे.

मालेगाव महापालिकेच्या २१ प्रभागांतून ८४ सदस्य निवडून आले असून, इस्लाम या स्थानिक पार्टीने काँग्रेसच्या मदतीने बहुमताचे संख्याबळ जुळविले आहे. त्यामुळे इस्लाम पार्टीचा महापौर होणार असल्याचे जवळपास निश्चित मानले जात असले तरी खबरदारी म्हणून इस्लाम पार्टीचे नगरसेवक अज्ञात स्थळी असल्याचे समजते. महापालिकेत इस्लाम पार्टीचे ३५, समाजवादी ५, एमआयएम २१, शिवसेना १८, काँग्रेस ३ तर भाजप २ असे बलाबल आहे. मालेगाव सेक्युलर फ्रंटमधील समाजवादी आणि इस्लाम पार्टीचे ४० आणि काँग्रेस व भाजपाने मिळून केलेल्या गठबंधनानंतर त्यांचे ५ असे एकूण ४५ संख्याबळ पूर्ण झाले आहे. त्यामुळे त्यांच्या सत्तेचा मार्ग मोकळा झाला असल्याचे समजते. तरी येत्या आठवडा भरात यात काय राजकीय समीकरणे बदलतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### अर्ज घेण्यासाठी उद्याची मुदत

महापौर व उपमहापौर पद अर्ज खरेदीसाठी उद्या मंगळवार (दि.३) पर्यंत मुदत आहे. सकाळी अकरा ते दुपारी एक या वेळेत अर्ज मनपात उपलब्ध करुन देण्यात आले आहे. या मुदतीनंतर नामनिर्देशन पत्रांचे वाटप बंद करण्यात येणार आहे. मंगळवार (दि.३) रोजी दुपारी दोन वाजेपर्यंत अर्ज दाखल करण्यात येणार आहे.

### महापौरपदी शेख नसरीन निश्चित

इस्लाम पार्टीतर्फे महापौर पदासाठी ४ अर्ज हे माजी आमदार आसिफ शेख यांच्या वहिनी शेख नसरीन खालीद हाजी यांच्या नावाने नेण्यात आले आहेत. त्यामुळे शेख नसरीन यांचे नाव महापौरपदी निश्चित झाल्याचे खात्रीशीर वृत्त आहे. याशिवाय उपमहापौर पदासाठी समाजवादी पार्टीतर्फे २ अर्ज हे शान-ए-हिंद यांच्या नावावर नेण्यात आले आहेत. त्यामुळे उपमहापौर पदी शान-ए-हिंद यांचे नाव देखील निश्चित झाल्याचे दिसून येत आहे.

Nashik Edition
Feb 02, 2026 Page No. 05
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# अवैध उत्खननाची विशेष पथकाकडून चौकशी करा

**आम्ही मालेगावकर विधायक संघर्ष समितीतर्फे राज्यपालांना साकडे**

**मालेगाव :** तालुक्यातील सवंदगाव, दरेगाव, सायने आणि दसाने शिवारात अवैधरित्या मुरूम आणि दगड उत्खनन केले जात आहे. तसेच या भागात खडी क्रशर सुरू आहेत. याबाबत अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी वेळोवेळी लेखी व तोंडी तक्रार महसूल व वन विभाग यांच्या स्थानिक कार्यालयांमध्ये केलेल्या आहेत. परंतु तक्रार केल्यावर तात्पुरती जुजबी कारवाई करून पुन्हा दोन-तीन दिवसात अवैध मुरूम आणि दगड उत्खनन मोठ्या प्रमाणावर सुरू होते. पर्यावरणाचे नियम डावलून खडी क्रशर चालवले जात आहेत. परिणामी, अवैध उत्खननाची विशेष तपास पथक (एस.आय. टी.) नेमून चौकशी करावी, अशी मागणी राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्याकडे 'आम्ही मालेगावकर संघर्ष समिती'चे निखील पवार यांनी केली आहे.

## या आहेत मागण्या

तालुक्यातील मुरूम, दगड चोरीची सखोल चौकशी करण्यासाठी नाशिक जिल्ह्याबाहेरील विशेष तपास पथक (एस.आय.टी.) नेमून किती ब्रास मुरूम, दगड चोरी झाला याचे सर्वेक्षण करून त्याचा शासकीय बाजार मूल्य व त्यावर दंड व्याजासह रक्कम निश्चित करून त्या झालेल्या शासकीय मालमत्तेच्या नुकसानाची वनरक्षक, वनपाल, वनपरिक्षेत्र अधिकारी मालेगाव व तलाठी, मंडळ अधिकारी, तहसीलदार मालेगाव यांच्यावर जबाबदारी निश्चित करून वसुली केली जावी. या ठिकाणी मुरूम, दगड उत्खनन होऊ नये यासाठी वन, महसूल व पोलीस प्रशासन यांचे संयुक्त पथक स्थापन करून कठोर कारवाई करावी. गौण खनिज माफियांवर फौजदारी गुन्हे दाखल व्हावेत, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली होती.

तालुक्यातील सवंदगाव, दरेगाव, सायने आणि दसाने शिवारात अवैध मुरूम उत्खननाबाबत विधिमंडळात देखील तारांकित प्रश्नाद्वारे आवाज उठवला गेला, परंतु त्यावर प्रशासनाने गांभीर्याने कोणतीही दखल घेतली नाही. तालुक्यातील या भागात वन विभागाची जमीन असून तिच्या लगत महसूल प्रशासनाच्या नियंत्रणाखालील जमीन आहे. या ठिकाणी मोठ्याप्रमाणात ब्रास मुरूम उत्खनन करून डंपर ट्रक व ट्रॅक्टरद्वारे वाहतूक केली जाते. याकडे अधिकारी दुर्लक्ष करतात. याबाबत विचारणा केली तर महसूल विभाग वन विभागाकडे आणि वन विभाग महसूल विभागाकडे ढकली निर्देश करून स्वतःची जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न करीत असल्याचे समजते.

पुण्य नगरी

# रेल्वेच्या विशेष गाड्यांना चार वर्षांची मुदतवाढ!

पुण्य नगरी शु | भ | वा | र्ता

## जळगाव, नाशिकहून पुण्याकडे जाणाऱ्यांना दिलासा

**नाशिक :** जळगाव व नाशिक जिल्ह्यातील मध्य रेल्वेच्या भुसावळ स्थानकावरून उत्तर भारतातून पुणे, तसेच दक्षिणेकडे काही विशेष रेल्वे गाड्या धावतात. प्रवाशांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेता त्यापैकी काही गाड्यांना चार वर्षांची मुदतवाढ देण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. त्यामुळे पुण्याकडे जाणाऱ्या या दोन्ही जिल्ह्यातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

०२१३२ जबलपूर आणि पुणे स्थानकांदरम्यान (परतीसह- ०२१३१) धावणारी विशेष गाडी सामान्यतः साप्ताहिक सेवा म्हणून चालवली जाते. ती जबलपूरहून दुपारी ०१.५० वाजता वेळी सुटते आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ०६.२५ वाजता पुण्याला पोहोचते. सुमारे १६ तास ३५ मिनिटांत सुमारे १०४४ किलोमीटरचे अंतर कापते. या विशेष गाडीला इटारसी, जळगाव, भुसावळ, मनमाड, कोपरगाव, अहिल्यानगर आणि दौंड स्थानकांवर थांबा देण्यात आला आहे. जबलपूर-पुणे व पुणे-जबलपूर या विशेष रेल्वे गाड्या पूर्वी एक मार्च २०२६ पर्यंत होत्या. त्या आता २९ डिसेंबर २०३० पर्यंत धावणार आहेत. तिच्या परतीचा प्रवास ३० डिसेंबर २०३० पर्यंत करण्यात आला आहे.



जबलपूर आणि कोईम्बतूर जंक्शन दरम्यान धावणारी एक साप्ताहिक सुपरफास्ट विशेष रेल्वे गाडी आहे. जी शुक्रवारी ११.५० वाजता जबलपूरहून सुटते आणि तिसऱ्या दिवशी दुपारी २.३० वाजता कोईम्बतूरला पोहोचते. या प्रवासात ती २५१८ किमी अंतर कापते. इटारसी, भुसावळ, नाशिकरोड, पनवेल, रत्नागिरी, मडगाव, मंगळूर या प्रमुख स्थानकांवर थांबते. ०२१९८ जबलपूर-कोईम्बतूर (परतीसह- ०२१९७) साप्ताहिक विशेष गाडी पूर्वी ६ मार्च २०२६ होती. ती आता २७ डिसेंबर २०३० पर्यंत धावणार आहे. तिच्या परतीचा प्रवास ३० डिसेंबर २०३० पर्यंत करण्यात आला आहे. याबाबतची अद्ययावत माहिती जाणून घेण्यासाठी प्रवाशांनी भारतीय रेल्वेच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन मध्य रेल्वेच्या भुसावळ मंडळ कार्यालयाने केले आहे.

पुण्य नगरी

# सिंहस्थ कामांमध्ये त्रुटी आढळल्यास कारवाई

## कुंभमेळामंत्री गिरीश महाजन यांचा अधिकाऱ्यांना इशारा



**नाशिक :** नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ महाकुंभमेळा यशस्वी होण्यासाठी सर्व यंत्रणांनी ही संधी समजून जबाबदारीने काम करावे. कुंभमेळ्यासाठी सुरू असलेली विकासकामे गुणवत्तापूर्ण, दर्जेदार तसेच विहित कालमर्यादेत पूर्ण होण्यासाठी प्रत्येक यंत्रणेने 'ॲक्शन मोड'मध्ये कामे करावीत, असे स्पष्ट निर्देश देत कामांमध्ये त्रुटी आढळून आल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करत कारवाई करण्याचा इशारा जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी दिला आहे.

कुंभमेळा प्राधिकरणाच्या वतीने आयोजित गुणवत्ता नियंत्रण प्रशिक्षण कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, नाशिक मनपा आयुक्त मनीषा खत्री यांच्यासह विविध अंमलबजावणी यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. नाशिकमधील रामकुंड तसेच त्र्यंबकेश्वर येथील जागा मर्यादित असून, त्या तुलनेत भाविकांची संख्या चार ते पाच पटीने वाढणार असल्याने गर्दी व्यवस्थापनासह पायाभूत सुविधांचे सखोल व शिस्तबद्ध नियोजन होणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कुंभमेळ्यासाठी उपलब्ध निधीचा कोणत्याही प्रकारे अपव्यय होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश देत या दृष्टिकोनातून सर्व यंत्रणांनी आणि प्रत्येक अधिकाऱ्याने जबाबदारीने कामे करावीत, असे मंत्री महाजन यांनी स्पष्ट केले.

रस्ते, काँक्रिटीकरण, गोदावरी स्वच्छता तसेच मलनिस्सारण प्रकल्पांच्या कामांमुळे नागरिकांना काही प्रमाणात तात्पुरती गैरसोय होऊ शकते; मात्र ही सर्व कामे गुणवत्तापूर्ण व्हावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले. कामांमध्ये त्रुटी आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्याचा इशाराही ना. महाजन यांनी दिला. कार्यशाळेत बोलताना विभागीय आयुक्त तथा कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष प्रवीण गेडाम यांनी गुणवत्ता नियंत्रण हे नियोजन आणि अंमलबजावणीचा अविभाज्य भाग असल्याचे नमूद केले.

### गुणवत्तेसाठी थर्ड पार्टी यंत्रणा

■ कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनी नाशिकमधील पावसाळ्याचा विचार करून कामांचे नियोजन करण्याची आवश्यकता अधोरेखित केली. गुणवत्ता तपासणी, देखरेख तसेच थर्ड पार्टी गुणवत्ता हमी यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यशाळेत आयआयटी मुंबईचे डॉ. धर्मवीर सिंह, विकास ठाकर तसेच अविनाश आठवले व वैभव भोसले, पियुष पाटील यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

### रामकुंड परिसरात पाहणी

1. ना. महाजन यांनी शनिवारी सकाळी रामकुंड परिसरातील कामांची पाहणी केली. यावेळी महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांनी त्यांना कामांची माहिती दिली.
2. रामकुंड परिसरातील वस्त्रांतर गृह पाडल्यानंतर येथील मोकळी झालेली जागा, [illegible] सुरू असलेल्या पायऱ्यांची कामे, रामकुंड वाहनतळाच्या भागातील बांधकामे, रामकुंडाकडे येणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाच्या घाटाचे रुंदीकरण, भाजी मंडईजवळ सुरू असलेले रॅम्पची कामे यांची पाहणी केली.
3. रामकुंडाच्या उत्तरेला असलेल्या टपऱ्यांचे अतिक्रमण काढल्यानंतर येथील व्यावसायिकांशीही त्यांनी भेट घेतली. यावेळी व्यावसायिकांनी आमच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याचे सांगितले. ना. महाजन यांनी त्यांचे म्हणणे ऐकून तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.

Nashik Edition
Feb 01, 2026 Page No. 04
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# णमोकार तीर्थ महोत्सवासाठी सुरक्षिततेची सर्वतोपरी दक्षता

## विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी घेतला आढावा



**नाशिक :** मालसाणे (ता. चांदवड) येथे होणाऱ्या णमोकार महोत्सवासाठी सर्व प्रशासकीय विभागांनी सुरक्षिततेची सर्वतोपरी दक्षता बाळगावी, अशा सूचना विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिल्या आहेत.

डॉ. गेडाम यांनी शनिवारी (दि. ३१) णमोकार तीर्थ येथे भेट देत पाहणी केल्यानंतर आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता अरुंधती शर्मा, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे, निवासी उपजिल्हाधिकारी रोहितकुमार राजपूत, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मुकेश ठाकूर, उपविभागीय अधिकारी कैलास कडलग, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. बाळू पाटील, चांदवडचे माजी नगराध्यक्ष भूषण कासलीवाल आदी उपस्थित होते. दरम्यान, जिल्हाधिकारी प्रसाद यांनी णमोकार तीर्थ येथे जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध विकास कामांची माहिती दिली. तत्पूर्वी विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी हेलिपॅड, वाहनतळ, मुख्य मंडप, पाणीपुरवठा व स्वच्छता आदी कामांची पाहणी करून आढावा घेतला. यावेळी णमोकार तीर्थ समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

### नियमितपणे स्वच्छता

विभागीय आयुक्त डॉ. गेडाम म्हणाले की, णमोकार महोत्सवासाठी मोठ्या संख्येने भाविक येतील. त्यांच्यासाठी शासनस्तरावरून आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. महोत्सव सुरू होण्यापूर्वी त्यांची चाचणी करून घ्यावी. महोत्सव परिसरात नियमितपणे स्वच्छता राहील, याची दक्षता घ्यावी. घनकचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावावी. अग्नी प्रतिबंधक उपाययोजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, असेही आयुक्त डॉ. गेडाम यांनी सांगितले.

Nashik Edition
Feb 01, 2026 Page No. 03
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# कुंभमेळ्यांचे परिपूर्ण दस्तऐवजीकरण करावे!

## केंद्रीय मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांचे आढावा बैठकीत निर्देश

**नाशिक** : नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी होणारा सिंहस्थ कुंभमेळा हा मोठा सांस्कृतिक ठेवा आहे. त्याचे परिपूर्ण दस्तऐवजीकरण करावे, असे निर्देश देत रामकाल पथ प्रकल्प साकारताना स्थानिक वास्तूकलेशी सुसंगत रचना करावी. तसेच रंगसंगतीच्या माध्यमातून भाविकांना रामायण काळाची माहिती होईल, असे नियोजन करण्याची सूचना केंद्रीय सांस्कृतिक व पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी दिली.

केंद्रीय मंत्री शेखावत यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात शनिवारी (दि. ३१) सिंहस्थ कुंभमेळा पायाभूत सुविधा व तयारी कामकाजाची आढावा बैठक पार पडली. यावेळी राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, महापालिका आयुक्त मनीषा खत्री,



सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता अरुंधती शर्मा, कार्यकारी अभियंता नवनाथ सोनवणे, पर्यटन विकास महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक जगदीश चव्हाण, पुरातत्त्व विभागाचे सहायक संचालक अमोल गोटे आदी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, कुंभमेळा आयुक्त सिंह, मनपा आयुक्त खत्री यांनी सिंहस्थ कुंभमेळ्यानिमित्त सुरू असलेली विकासकामे, साधुग्राम, त्र्यंबकेश्वर येथील दर्शनपथ, रामकालपथ, भूसंपादन, बाधितांचे पुनर्वसन याविषयी सविस्तर माहिती दिली.

### अशा आहेत सूचना

१ मंत्री शेखावत म्हणाले, कुंभमेळ्यानिमित्त देश- विदेशातून भाविक येतील. त्यांच्यासाठीच्या पायाभूत सुविधा वेळेत पूर्ण कराव्यात.

२ सिंहस्थ कालावधीत मोबाइल नेटवर्क सुरळीत राहण्यासाठी आतापासूनच उपाययोजना कराव्यात. रामकाल पथसह उर्वरित विकास कामांसाठीचे प्रस्ताव राज्य शासनाच्या माध्यमातून तातडीने सादर करावे.

३ त्र्यंबकेश्वर येथील विकास कामांचा समावेश असलेला परिपूर्ण आणि सर्वसमावेशक आराखडा सादर करावा. भाविकांसाठी हेल्पलाइन सुविधा कार्यान्वित करावी, आदी सूचना त्यांनी दिल्या.

दै.पुढारी

दि.२ फेब्रुवारी,२०२६

पुढारी

# नांदूर गोदाघाट मद्यपींचा अड्डा

## अयोध्येच्या धर्तीवर गोदाकाठ मद्यमुक्त करण्याची मागणी

**नाशिकरोड : प्रफुल्ल पवार**

येथील नांदूर मानसरातवरील गोदाघाट परिसर सध्या मद्यपींच्या अड्ड्यात रूपांतरित झाल्यामुळे गोदावरी नदीच्या पावित्र्याला व संवर्धनाला मोठा धोका निर्माण झाला आहे. पवित्र असणाऱ्या गोदावरीच्या काठावर खुलेआम मद्यपान, असभ्य वर्तन व गैरकृत्ये वाढल्यामुळे नागरिक, साधू-महंत तसेच भाविकांत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. अयोध्येच्या धर्तीवर गोदाकाठ पूर्णपणे मद्यमुक्त करण्याची मागणी केली जात आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून या गोदाघाटावर मद्यपींचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. काही जण चारचाकी व दुचाकी वाहने उभी करून सर्रास मद्यपान करीत असल्याचे चित्र आहे. याला नागरिकांनी विरोध केला असता मद्यपी आक्रमक होत, कोणाचेही ऐकणार नाही असे धमकावत असल्याच्या तक्रारी स्थानिकांनी केल्या आहेत.

सिंहस्थ कुंभमेळा काही दिवसांवर येऊन ठेपलेला असताना या ठिकाणी भाविकांच्या स्नानासाठी व्यवस्था करण्यात येणार आहे. अशा प्रकारच्या गैरकृत्यांमुळे नाशिकची धार्मिक व सांस्कृतिक ओळख मलीन होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. देश-विदेशातून लाखो भाविक कुंभमेळ्यासाठी नाशिकमध्ये येणार असून, गोदाकाठावरील हे विदारक चित्र शहराच्या प्रतिमेला धक्का देणारे ठरेल. त्यामुळे प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करत मद्यपींवर कठोर कारवाई करावी, गोदाकाठालगत दारू विक्रेत्यांवर निर्बंध आणावेत, अशी मागणी नागरिक करीत आहेत. गोदावरी संवर्धन व संरक्षणाबाबत प्रशासनाची उदासीनता स्पष्टपणे दिसत आहे. 'हेच का गोदावरी संवर्धन?' असा संतप्त प्रश्न केला जात आहे.




नाशिकरोड : गोदाघाटावर ड्रेनेजच्या पाण्यामुळे प्रदूषित झालेली गोदावरी. दुसऱ्या छायाचित्रात मद्यपींनी मद्यपान करून फेकलेल्या बाटल्या.

> या गैरकृत्यांबाबत आम्ही पोलिसांना पत्र देणार आहे. गोदाघाट परिसर स्वच्छ व सुरक्षित ठेवण्यासाठी स्वतः लक्ष घालणार आहोत.
>
> **- सुनीता भोजने, नगरसेविका**

### गोदावरी प्रदूषित

गोदावरी नदीत मोठ्या प्रमाणात ड्रेनेजचे पाणी सोडले जात असल्यामुळे पाण्यावर फेस निर्माण होत आहे. त्यामुळे पाण्याला दुर्गंधी येत असून, नदीकाठच्या गावात आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होत आहेत. हे प्रदूषण डोळ्यांनी दिसण्यासारखे असून, तातडीने उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

> आम्ही दररोज स्वच्छता करत असताना या ठिकाणी मोठ्या प्रमाणात मद्याच्या बाटल्या आढळतात. त्या आम्ही रोज साफ करतो. गोदावरी प्रदूषणाबाबत प्रशासनाने गांभीर्याने विचार करावा.
>
> **- बाळू जगताप,** स्वच्छता मुकादम

> येत्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी गोदावरीचे संवर्धन व प्रदूषणमुक्तीसाठी मोठे प्रयत्न सुरू आहेत. अयोध्येच्या धर्तीवर येथेही मद्यबंदी करावी. गैरकृत्य करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी.
>
> **- भक्तिचरणदास महाराज,** दिगंबर आखाडा

My Nashik Edition
Feb 02, 2026 Page No. 04
Powered by: erelego.com

# पुढारी

# कुंभसाठी तरतुदीचा अभाव : बच्छाव, कुंभसाठी भरपूर निधी : महाजन

• निधीची तरतूद केली जात नसल्याचा कुंभमेळामंत्र्यांचा दावा

नाशिक : पुढारी वृत्तसेवा

अवघ्या काही महिन्यांवर नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ-कुंभमेळ्यासाठी रविवारी (दि. १) सादर करण्यात आलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात कुठलीही तरतूद केली नसल्याने नाशिककरांकडून निराशेचा सूर व्यक्त केला जात आहे. दुसरीकडे अर्थसंकल्पात कुंभमेळ्यासाठी तरतूद केली जात नसल्याचा दावा कुंभमेळामंत्री गिरीश महाजन यांनी केला आहे.

२०२७ मध्ये सिंहस्थ सुरू होणार असला तरी, ऑक्टोबर २०२६ मध्ये सिंहस्थाचे ध्वजारोहण केले जाणार असल्याने सिंहस्थास अवघे काही महिने शिल्लक आहेत. असे असताना, सिंहस्थ कामांसाठी मंजूर केलेला निधी पाहता, अर्थसंकल्पातून विशेषी भरीव तरतूद करून, विकासकामांना गती दिली जाईल, असे अपेक्षित होते. मात्र, सिंहस्थ-कुंभमेळ्याचा नामोल्लेखही अर्थसंकल्पात केला गेला नाही. गेल्या प्रयागराज येथील कुंभमेळ्यासाठी



तरतुदीचे सर्व पाहता, नाशिक-त्र्यंबकेश्वर येथील सिंहस्थात कोट्यवधी संख्येने भाविक उपस्थित राहण्याचा अंदाज आहे. त्यादृष्टीने केंद्र आणि राज्य सरकारने विविध योजनांची आखणी केली असून, सद्यस्थितीत सुमारे ३० हजार कोटींची कामे सुरू असल्याचा दावा केला जात आहे. सिंहस्थासाठी तयार करण्यात आलेल्या विकास आराखड्यात केंद्र आणि राज्य सरकारकडून निधीची उपलब्धता करून दिली जाते. सध्या रेल्वेच्या पायाभूत सुविधा, रस्तेबांधणी, विमानतळ, रिंगरोड, सांडपाणी प्रक्रिया केंद्र, त्र्यंबकेश्वरमध्ये प्रसाद योजनेअंतर्गत तीर्थक्षेत्र, घाट आदी कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, त्यातील काही कामे प्रगतिपथावर आहेत.

## 'टेम्पल टाउन'मध्येही नाशिक दुर्लक्षित

देशातील टीयर-२ आणि टीयर-३ या शहरांमध्ये तब्बल '२० टेम्पल टाउन' विकसित केले जाणार आहेत. यासाठी ५००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. टेम्पल टाउनसाठी मंदिरांच्या शहरांवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. नाशिक हे मंदिरांचे शहर आहे. मात्र, अशातही 'टेम्पल टाउन' उपक्रमात नाशिकला दुर्लक्ष करण्यात आले आहे. या २० शहरांमध्ये नाशिकचा समावेश नसल्याने, नाशिककरांच्या वाट्याला काहीच आले नसल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे.



## अर्थसंकल्पातून नाशिकला अपेक्षा

- देशात तीन नवे आणि आयुर्वेद विद्यालये सुरू करण्याबाबतची घोषणा करण्यात आली आहे. त्यातील एक योग किंवा आयुर्वेद विद्यालय नाशिक-त्र्यंबक येथे व्हावे, यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.
- मुंबई-पुणे-हैदराबाद असे ७ हायस्पीड कॉरिडॉर निर्माण करण्यात येणार असून, याचा नाशिकला फायदा होणार आहे.
- सुरत ते आसाम असा 'डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर' हा नाशिक-सुरत-पुणे परिसरातील कृषी माल वाहतुकीसाठी उत्तम पर्याय म्हणून समोर येईल.



"कुंभमेळ्याच्या निधीसाठी अर्थसंकल्पात तरतूद केली जात नाही. सिंहस्थ कामासाठी आवश्यकतेनुसार त्या-त्या विभागाकडून निधी दिला जात आहे. संबंधित खात्यांकडून मागणीनुसार निधी मिळत आहे. प्रत्यक्ष गेल्या पावलातच निधी प्राप्त होत आहे.

- गिरीश महाजन, कुंभमेळामंत्री



"दर बारा वर्षांनी होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतुदीची तसेच घोषणांची अपेक्षा होती. मात्र, कुठलीही घोषणा यात केली गेली नाही.

- डॉ. शोभा बच्छाव, खासदार

My Nashik Edition
Feb 02, 2026 Page No. 01
Powered by: erelego.com

पुढारी

# जागतिक नकाशावरील महाराष्ट्राचा मानबिंदू : नांदूरमध्यमेश्वर अभयारण्य

■ जागतिक पाणथळ दिन विशेष

निफाड : किशोर सोमवंशी

नांदूरमध्यमेश्वर हे केवळ एक पाणथळ किंवा जलाशय नसून, ती निसर्गाची जिवंत प्रयोगशाळा आहे. निफाड तालुक्यात गोदावरी आणि कादवा संगमावरील हे अभयारण्य पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरले आहे. १९०७ ते १९११ दरम्यान सिंचनासाठी बांधलेल्या धरणाच्या बांधामुळे येथे वर्षानुवर्षे गाळ साचत गेला. परिणामी उथळ पाणथळ जागा, गवताळ बेटे आणि दलदल निर्माण होऊन ही समृद्ध परिसंस्था विकसित झाली. याचे नैसर्गिक महत्त्व ओळखून १९८६ मध्ये याला 'वन्यजीव अभयारण्य' घोषित केले. जागतिक महत्त्वाच्या पाणथळ जागांचा 'रामसर' दर्जा मिळा



आहे. नांदूरमध्यमेश्वरमधील २०० हून अधिक पक्ष्यांच्या प्रजाती, २४ प्रकारचे मासे, १२ सस्तन प्राणी, ४२ फुलपाखरांच्या प्रजाती आणि ५३५ हून अधिक वनस्पतींच्या प्रजातींमुळे २१ जून २०१९ ला 'रामसर' स्थळाचा दर्जा मिळाला. हे मानांकन मिळवणारे राज्यातील पहिलेच स्थळ ठरल्याने नाशिकच्या वैभवात जागतिक स्तरावर भर पडली.

रामसर कराराच्या ९ जागतिक निकषांपैकी अनेक निकष हे अभयारण्य पूर्ण करते. येथे हिवाळ्यात २० हजारांहून अधिक, तर कधीकधी ८० हजारांहून अधिक जलपक्षी आढळतात, जे जागतिक जैवविविधतेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. नाशिक वन्यजीव विभागाकडून येथे पाणथळ व्यवस्थापन राबविले जाते. यात जलविज्ञान व्यवस्थापनांतर्गत पक्ष्यांच्या हंगामात पाण्याच्या संतुलनासाठी पाटबंधारे विभागाशी समन्वय साधत पाणी पातळी राखली जाते. जलपर्णी आणि आक्रमक वनस्पतींचा निर्मूलन पद्धतीने उच्चाटन केले जाते. केवळ जाळे [illegible] नाही, तर ती वन्यजीवांसाठी 'सहजीवन' करण्यासाठी येथील संवर्धन आणि स्थानिक ग्रामस्थांचा सहभाग घेतला जातो. पक्षी कोठून येतात हे अभ्यासण्यासाठी 'रिंगिंग' आणि 'सॅटेलाइट टॅगिंग' सारखे प्रयोगही येथे होत आहेत. स्थानिक तरुणांना 'इको-गाइड' म्हणून प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध केल्या आहेत. याशिवाय जागतिक तापमान आणि नदी प्रदूषण नियंत्रणासाठी भविष्यात येथे 'स्वयंचलित हवामान केंद्र' आणि 'जैविक केंद्र' स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू आहे. थोडक्यात, नांदूरमध्यमेश्वर हे केवळ पर्यटनस्थळ नसून ते निसर्गाचे 'फिल्ट्रेशन युनिट' आहे. त्याचे संरक्षण करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.

> नांदूरमध्यमेश्वर हे केवळ एक अभयारण्य नसून ती निसर्गाची स्वयंचलित यंत्रणा आहे. या पाणथळ जागेमुळे भूगर्भातील पाणीपातळी वाढण्यास मदत होते. शिवाय हजारो किलोमीटरचा प्रवास करून येणाऱ्या पाहुण्या पक्ष्यांना हे हक्काचे घर मिळते. या जागतिक वारशाचे संवर्धन करणे, हे केवळ वनविभागाचे कर्तव्य नसून ती प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे.
>
> -हिरालाल चौधरी, वन परिक्षेत्र अधिकारी, नांदूरमध्यमेश्वर वन्यजीव, नाशिक

पुढारी

# अलाइनमेंट बदलण्याच्या अटीवर जमीन देण्यास शेतकरी तयार

## बाह्य रिंगरोड : जिल्हा प्रशासनाचा नकार, शेतकऱ्यांना करावी लागणार मुंबई वारी

नाशिक : पुढारी वृत्तसेवा

[illegible]

[illegible]

### गोवर्धनचे ग्रामस्थ जिल्हाधिकाऱ्यांच्या भेटीला

[illegible]

### ५ फेब्रुवारीपर्यंत पाचपट मोबदला

[illegible]

[illegible]

[illegible]

पुढारी

# कामांत त्रुटी आढळल्यास कारवाईस मागे-पुढे पाहणार नाही!

## जलसंपदामंत्री महाजन यांचा इशारा, गुणवत्तापूर्ण कामांसाठी 'ॲक्शन मोड'मध्ये या

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

गुणवत्तेशी कोणतीही तडजोड न करता दर्जेदार पद्धतीने कामे पूर्ण झाली पाहिजेत. विकासकामे करताना त्रुटी आढळल्यास शासन जबाबदारी निश्चित करत आवश्यक ती कारवाई करण्यास मागे-पुढे पाहणार नाही, असा इशारा जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी दिला.

नाशिक - त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणातर्फे आयोजित गुणवत्ता नियंत्रण प्रशिक्षण कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, मनपा आयुक्त मनीषा खत्री उपस्थित होते. मंत्री महाजन म्हणाले की, प्रयागराज कुंभमेळ्याचा अनुभव लक्षात घेता, नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे जागेची मर्यादा आहेत. रामतीर्थ तसेच त्र्यंबकला मर्यादित जागा असून, भाविकांची



नाशिक : गुणवत्ता प्रशिक्षण कार्यशाळेत बोलताना मंत्री गिरीश महाजन व दुसऱ्या छायाचित्रात अधिकारी.

संख्या चार ते पाचपट वाढणार आहे. त्यामुळे गर्दी व्यवस्थापनासह पायाभूत सुविधांचे शिस्तबद्ध नियोजन आवश्यक आहे. रस्ते, काँक्रिटीकरण, गोदावरी स्वच्छता तसेच मलनिस्सारण प्रकल्पामुळे नागरिकांनी गैरसोय होऊ शकते. गुणवत्ता नियंत्रण प्रशिक्षण कार्यशाळा ही दिशादर्शक व मोलाची ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी गुणवत्ता नियंत्रण हे नियोजन आणि अंमलबजावणीचा भाग असल्याचे नमूद केले. कुंभमेळ्याच्या आयोजनासाठी तांत्रिक मानकांचे काटेकोर पालन, सातत्यपूर्ण देखरेख तसेच यंत्रणांतील समन्वय अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. पावसामुळे कामांच्या गुणवत्तेवर परिणाम करणार नाही, यासाठी अभियांत्रिकी नियोजन, साहित्य निवड व वेळापत्रक सुसंगत असावे, असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यशाळेत आयआयटी मुंबईचे डॉ. धर्मवीर सिंह यांनी बिटुमिनस तसेच काँक्रिट रस्त्यांच्या बांधकामातील महत्त्वाच्या तांत्रिक बाबी, लवचिक व कठीण रस्त्यांचे निकषाबाबत मार्गदर्शन केले. विकास ठाकर यांनी नागरी पायाभूत सुविधा समन्वय, पावसाळी पाणी व्यवस्थापन, कामांची गुणवत्ता व नियंत्रणेविषयी माहिती दिली. तृतीय-पक्ष गुणवत्ता नियंत्रण संस्थेचे अविनाश आठवले व वैभव भोसले यांनी आयएसओ मानकानुसार तपासणी, निरीक्षण व अहवाल प्रक्रियेचे सादरीकरण केले. देवळाली कॅन्टोन्मेंट बोर्डाचे पीयूष पाटील यांनी विविध परवानग्या व ना हरकत प्रमाणपत्र प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले.

पुढारी

# विभागांनी सुरक्षिततेची दक्षता घ्यावी

## आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम : णमोकार तीर्थ महोत्सव हेलिपॅड, वाहनतळ, मंडप, पाणी व स्वच्छता कामांची पाहणी

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

णमोकार महोत्सवासाठी सर्व प्रशासकीय विभागांनी सुरक्षिततेची सर्वतोपरी दक्षता बाळगावी, अशा सूचना विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिल्या.

विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी शनिवारी (दि. ३१) णमोकार तीर्थ येथे भेट देत पाहणी केली. त्यानंतर घेतलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता अरुंधती शर्मा, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे, निवासी उपजिल्हाधिकारी रोहितकुमार राजपूत, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मुकेश ठाकूर, उपविभागीय अधिकारी कैलास कडलग, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. बाळू पाटील, चांदवडचे माजी नगराध्यक्ष भूषण कासलीवाल उपस्थित होते. विभागीय आयुक्त डॉ. गेडाम म्हणाले की, णमोकार महोत्सवासाठी मोठ्या संख्येने भाविक येतील. त्यांच्यासाठी शासनस्तरावरून आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. महोत्सव सुरू होण्यापूर्वी त्यांची चाचणी करून घ्यावी. महोत्सव परिसरात नियमित स्वच्छता राहील याची दक्षता घ्यावी. घनकचऱ्याची विल्हेवाट योग्य पद्धतीने लावावी. अग्नी प्रतिबंधक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असेही आयुक्त डॉ. गेडाम यांनी सांगितले.



नाशिक : मालसाणे (ता. चांदवड) येथे णमोकार तीर्थक्षेत्रस्थळी आढावा बैठकीत बोलताना आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम. समवेत जिल्हाधिकारी आयुष प्रसाद.

जिल्हाधिकारी प्रसाद यांनी णमोकार तीर्थ येथे जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध विकासकामांची माहिती दिली. तत्पूर्वी विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी हेलिपॅड, वाहनतळ, मुख्य मंडप, पाणीपुरवठा व स्वच्छता या कामांची पाहणी करीत आढावा घेतला. यावेळी णमोकार तीर्थ समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

Nashik Edition
Feb 01, 2026 Page No. 04
Powered by: erelego.com

पुढारी

# सांस्कृतिक महत्त्व, उपयोगिता लक्षात घेत जबाबदारी पार पाडा

## आयुक्त शेखर सिंह : कुंभमेळा ध्वजस्तंभ व पताका रचना आढावा बैठक

नाशिक : पुढारी वृत्तसेवा

धार्मिक पावित्र्य, सांस्कृतिक महत्त्व व दीर्घकालीन उपयोगिता लक्षात घेऊन जबाबदाऱ्या वेळेत व समन्वयाने पार पाडण्याचे निर्देश कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी बैठकीत उपस्थित अधिकाऱ्यांना दिले.

आगामी नाशिक - त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर ध्वजस्तंभ व पताका यांच्या रचना व उभारणीबाबत आढावा व नियोजन बैठक नुकतीच स्मार्ट सिटी मिशन कार्यालयात पार पडली. बैठकीत नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे कुंभमेळा काळात उभारण्यात येणाऱ्या ध्वजस्तंभ व पताकांच्या नियोजन, स्थापत्य रचना, साहित्य निवड, उंचीचे निकष, धार्मिक व सांस्कृतिक प्रतीकात्मकता तसेच कामकाजाचे नियोजन यांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

**नाशिक - त्र्यंबकेश्वरला सारखेच ध्वजस्तंभ**

ध्वजस्तंभ हे केवळ भौतिक संरचना नसून, श्रद्धा, सांस्कृतिक वारसा व सामाजिक एकतेचे प्रतीक असल्याने त्यांची रचना व उभारणी अत्यंत संवेदनशीलतेने व जबाबदारीने करावी, असे यावेळी अधोरेखित करण्यात आले. नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे एकसमान रचना राहील यासाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने काम करण्याचे निर्देश देण्यात आले.

**अशी असेल ध्वजस्तंभ रचना**

ध्वजस्तंभ मजबूत व टिकाऊ पायाभरणीसह उभारण्यात येणार असून, कोणत्याही प्रकारचे संरचनात्मक नुकसान होऊ नये, याची काळजी घेतली जाणार आहे. कुंभमेळ्याच्या पौराणिक महत्त्वाशी निगडित प्रतीकात्मक कोरीव काम, विशेषतः समुद्रमंथनाशी संबंधित संदर्भ, ध्वजस्तंभांवर समाविष्ट करण्यात येणार आहेत. बैठकीत ध्वजस्तंभांची उंची ५१ फूट व ३१ फूट अशी असणार असून, त्यांची पायाभरणी अनुक्रमे ९ फूट व ८ इंच विर्ज्येची असेल. ध्वजस्तंभाचा पाया साधा ठेवण्यात येईल, सजावटीचे व प्रतीकात्मक काम स्तंभावर करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

**बैठकीस यांची उपस्थिती**

बैठकीस नाशिक महानगरपालिकेच्या आयुक्त मनीषा खत्री, शहर अभियंता संजय अग्रवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल पाटील, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता स्नेहल पगारे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता अविनाश देवरे, सहायक अभियंता अमोल कोंडे, नाशिक महानगरपालिकेचे उपअभियंता समीर रकटे, नगररचना विभागाचे उपअभियंता ए. बी. राऊत, कलाकार व शिल्पकार प्रमोद कांबळे, पुरोहित संघाचे अध्यक्ष चंद्रशेखर पंचाक्षरी, रामानंदाचार्य दक्षिणपीठाचे सचिव प्रवीण ठाकूर, गंगा गोदावरी पुरोहित संघाचे उपाध्यक्ष दिलीप शुक्ल, पुरोहित संघ त्र्यंबकेश्वरचे अध्यक्ष मनोज थेटे, सचिव श्रीपाद अकोलकर व खजिनदार सुयोग देवकुटे उपस्थित होते.



नाशिक : कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर स्मार्ट सिटी कार्यालयात झालेल्या ध्वजस्तंभ नियोजन व आढावा बैठकीत बोलताना आयुक्त शेखर सिंह शेजारी महापालिका आयुक्त मनीषा खत्री व उपस्थित अधिकारी.

### पताका रचनेची जबाबदारी पुरोहित संघांवर

नाशिक व त्र्यंबकेश्वर येथील पुरोहित संघांनी ध्वजस्तंभांसाठी आध्यात्मिक व धार्मिक रचनात्मक घटक सादर केले. हे घटक स्थापत्य रचनेत समाविष्ट करण्यात येणार आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने दोन्ही पुरोहित संघांशी चर्चा करत अंतिम आराखडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. पताकांची रचना संबंधित पुरोहित संघांकडूनच करण्यात येईल, असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

Nashik Edition
Feb 01, 2026 Page No. 04
Powered by: erelego.com

पुढारी

# सिंहस्थ कुंभमेळ्याचे परिपूर्ण दस्तऐवजीकरण करावे

## केंद्रीय मंत्री गजेंद्रसिंह शेखावत, जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक



नाशिक : कुंभमेळ्यासंदर्भात आढावा बैठकीत केंद्रीय मंत्री गजेंद्रसिंह शेखावत. समवेत विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, मनपा आयुक्त मनीषा खत्री आदी.

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी होणारा सिंहस्थ कुंभमेळा हा सांस्कृतिक ठेवा आहे. त्याचे परिपूर्ण दस्तऐवजीकरण करावे, असे निर्देश केंद्रीय सांस्कृतिक व पर्यटनमंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी दिले.

केंद्रीय मंत्री शेखावत यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहामध्ये नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा पायाभूत सुविधा व कामकाजाबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, मनपा आयुक्त मनीषा खत्री, बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता अरुंधती शर्मा, कार्यकारी अभियंता नवनाथ सोनवणे, पर्यटन विकास महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक जगदीश चव्हाण, पुरातत्त्व विभागाचे सहायक संचालक अमोल गोटे उपस्थित होते. केंद्रीय मंत्री शेखावत म्हणाले की, कुंभमेळ्याचे मोठे आध्यात्मिक महत्त्व आहे. त्याचे प्रतिबिंब रामकाल पथमध्ये उमटले पाहिजे. रामकाल पथ साकारताना वास्तू कलेशी सुसंगत रचना करावी. रंगसंगतीच्या माध्यमातून भाविकांना रामायण काळाची माहिती होईल, असे नियोजन करावे. त्यासाठी चित्रकला शाखेच्या स्थानिक विद्यार्थ्यांची मदत घ्यावी. कुंभमेळ्याचे नियोजन करताना महिला, तरुणांसह समाजातील विविध घटकांचा सहभाग घ्यावा. कुंभमेळ्यानिमित्त तैनात अधिकारी व कर्मचाऱ्यांची कार्यशाळा घ्यावी. त्यात त्यांना कुंभमेळ्याचे महत्त्व याविषयीची माहिती द्यावी.

कुंभमेळ्यानिमित्त देश - विदेशातून भाविक येतील. त्यांच्यासाठीच्या पायाभूत सोयीसुविधा वेळेत पूर्ण कराव्यात. या काळातील मोबाइल नेटवर्क सुरळीत राहण्यासाठी आतापासूनच उपाययोजना कराव्यात. रामकाल पथसह उर्वरित विकास कामांसाठीचा प्रस्ताव शासनाच्या माध्यमातून तातडीने सादर करावा. त्र्यंबकेश्वरच्या विकासकामांचा समावेश असलेला परिपूर्ण आणि सर्वसमावेशक आराखडा सादर करावा. गर्दी व्यवस्थापनाचे सूक्ष्म नियोजन करावे. भाविकांच्या सोयीसाठी ठिकठिकाणी पाणी उपलब्ध होईल, असे नियोजन करावे. भाविकांसाठी हेल्पलाइन सुविधा कार्यान्वित करावी. नाशिकला जिल्ह्यात धार्मिक, ऐतिहासिक पर्यटनाला मोठी संधी आहे. त्यादृष्टीने ब्रँडिंग करावे. नाशिक, त्र्यंबकेश्वर हवाई दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध होऊ शकतात का याची पडताळणी करावी, अशाही सूचना शेखावत यांनी केल्या.


Powered by: erelego.com

पुढारी

# पायाभूत सुविधांसाठी ३९० कोटींच्या कामांना मंजुरी

- कुंभमेळ्याच्या दुसऱ्या टप्प्यातील कामांसाठी बैठक

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या दुसऱ्या टप्प्यातील विकासकामांना सुमारे ३९० कोटी रुपयांची संयुक्त प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये दर्शन पथ व घाटांचा विकास, शाही मार्गाचे पुनर्विकास व सौंदर्यीकरण, विधी भवन व संबंधित धार्मिक सुविधांची उभारणी, शिवसृष्टीसह उद्यान व सार्वजनिक जागांचा विकास तसेच विक्रेत्यांसाठी नियोजित सुविधा उभारण्याचा समावेश आहे. या कामांमुळे भाविकांच्या हालचाली सुलभ होऊन कुंभमेळा कालावधीत नियोजनबद्ध व सुरक्षित व्यवस्थापनास चालना मिळणार आहे.

आगामी सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या तयारीच्या पार्श्वभूमीवर नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाने त्र्यंबकेश्वर, शिर्डी तसेच संबंधित जोड रस्त्यांवरील महत्त्वाच्या पायाभूत सुविधा व गर्दी व्यवस्थापनाच्या कामांना प्रशासकीय मंजुरी दिली. विभागीय आयुक्त तथा कुंभमेळा प्राधिकरण प्रमुख डॉ. प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी झालेल्या ऑनलाइन बैठकीत या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

शिर्डी येथे २४.५३ कोटी रुपयांच्या रस्ता व पार्किंगविषयक पायाभूत कामांना मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये होल्डिंग एरिया, पिक-अप व ड्रॉप-ऑफ व्यवस्था, श्री साईबाबा मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यांचे रुंदीकरण तसेच भाविकांच्या गर्दीचे नियोजनबद्ध व्यवस्थापन यांचा समावेश आहे. कुंभमेळा तीर्थयात्रा परिघातील महत्त्वाचा धार्मिक केंद्रबिंदू म्हणून शिर्डी येथे कुंभमेळा वारसा दर्शविणारी स्वागत कमान उभारण्यात येणार आहे. शिर्डी-संगमनेर दरम्यानच्या महत्त्वाच्या जोड रस्त्यांच्या विकासासाठी ९७.२५ कोटी रुपयांची प्रशासकीय मंजुरी देण्यात आली असून, यामुळे आंतरजिल्हा धार्मिक वाहतूक अधिक सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

त्र्यंबकेश्वर येथील ऐतिहासिक कुशावर्त कुंडाच्या जतन व दुरुस्तीसाठी ३.१२ कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये फरशीकरण तसेच छत संरचनेच्या दुरुस्तीचा समावेश आहे. तसेच गोदावरी-नंदिनी संगमाजवळ टाकळी येथे नवीन घाटाच्या बांधकामाला ७२.१६ कोटी रुपयांची प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे घाटाची लांबी सुमारे ४०० मीटरपर्यंत वाढणार असून प्रमुख स्नान पर्वणीच्या दिवशी भाविकांची क्षमता, सुरक्षितता व गर्दी नियंत्रण अधिक सक्षम होणार आहे. बैठकीस कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह, नाशिक महापालिका आयुक्त मनीषा खत्री, नाशिक जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, अहिल्यानगर जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, शिर्डी नगर परिषदेचे मुख्याधिकारी सतीश दिघे, कुंभमेळा प्राधिकरण उपायुक्त योगेंद्र चौधरी तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, पुरातत्त्व विभाग, महावितरण आणि संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी मंजूर कामांची वेळेत अंमलबजावणी, विभागांमधील समन्वय आणि सातत्यपूर्ण देखरेख अत्यंत महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट केले.

Nashik Edition
Feb 01, 2026 Page No. 03
Powered by: erelego.com

सकाळ

# गडावरील शिवालय तलाव परिसरात होणार बसस्थानक

## सप्तशृंगगड ग्रामसभेत झाला ठराव

**सकाळ वृत्तसेवा**

वणी, ता. १ : श्रीक्षेत्र सप्तशृंगगडावरील फनिक्यूलर ट्रॉली प्रकल्पामुळे गावातर्गत असलेल्या बाजारपेठेतील गर्दी कमी झाल्याने गावातील अर्थव्यवस्था कोलमडली आहे. व्यावसायिकांवर संकट ओढावल्याची भावना ग्रामस्थांनी सप्तशृंगगड ग्रामसभेत व्यक्त केली आहे. दरम्यान गडावरील प्रस्तावित बसस्थानक हे शिवालय परिसरात बांधण्यात यावे अशा मागणीचा ठरावही ग्रामसभेत करण्यात आला आहे.

सप्तशृंगगड ग्रामपंचायतीची प्रजासत्ताक दिनाचा ग्रामसभा शनिवारी (ता.३१) सरपंच रमेश पवार यांच्या अध्यक्षतेखाली झाली. ग्रामसभेत युवकांनी पुढाकार घेत बसस्थानक हे शिवालय परिसरात छत्री बंगल्याजवळच बांधण्यात यावे, अशी एकमुखी मागणी केली. संतप्त महिला व युवकांनी फनिक्युलर ट्रॉलीमुळे गावात येणाऱ्या भाविकांची संख्या रोडावली आहे. त्यामुळे गावाच्या अर्थकारणावर परिणाम झाला आहे. सकाळी ६ ते ९ व संध्याकाळी ६ ते ९ या दरम्यान फनिक्युलर ट्रॉली बंद ठेवण्यात यावी. त्यातून गावातील व्यावसायिकांना लाभ होऊ शकेल. त्याचप्रमाणे गावाबाहेर तांबूल तिर्थाच्या ठिकाणी वनविभागाची जागा असल्याने तेथे ३० कोटी रुपये खर्चून बागबगीचा तयार करण्याचे काम चालू आहे. ते त्वरित बंद करून हा प्रकल्प शिवालय तलाव याठिकाणी उभारावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली.



**सप्तशृंगगड :** ग्रामसभेत आक्रमकपणे प्रश्न मांडताना ग्रामस्थ.

सप्तशृंगगड हे ग्रामपंचायत पेसा क्षेत्रांतर्गत असल्याने येथे कुठल्याही प्रकारचे काम करण्याअगोदर पेसा कमिटीला विश्वासात घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कुठल्याही कामांना परवानगी न देण्याचीही आक्रमक भूमिका घेण्यात आली. याबाबतचे ठराव बनवून प्रशासनाकडे कार्यवाही पाठविण्यात यावे असेही ग्रामसभेत ठरले. याशिवाय ग्रामपंचायतीच्या आरो प्लांटमधील साहित्य चोरीला गेले आहे, त्याची चौकशी करण्यात यावी. खासगी पाण्याचे टँकर बंद करण्यात यावे. शिवालय तलाव येथील ग्राम कुलदैवताच्या ठिकाणी असलेले अतिक्रमण काढून टाकावे, एका घरात एकच नळ कनेक्शन देण्यात यावे, फनिक्यूलर ट्रॉलीपासून ते पुलापर्यंत दुभाजक टाकावेत, परतीच्या रस्त्यावरील बॅरिकेट्स हटवावेत, अशा विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. उपसरपंच संदीप बेनके यांनी एसटी व अन्य वाहने गावातून रिंग रोडने बाहेर काढण्यात येतील, असा ठराव केला. ग्रामसभेला ग्रामसेवक संजय देवरे, ग्रामपंचायत सदस्य बेबीबाई जाधव, मनीषा गवळी, लिपिक विजय वाघ यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

सकाळ

# हर घर जल योजनेची पथकाकडून पाहणी

■ सकाळ वृत्तसेवा

साल्हेर, ता. १ : बागलाण पश्चिम आदिवासी पट्ट्यातील साल्हेर येथील जल जीवन मिशन अंतर्गत हर घर जल नळ योजनेचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याने या कामावरती केंद्रीय पथकाने पाहणी केली. संबंधित पाणीयोजनेच्या संथ कामाबाबत ग्रामस्थांच्या तक्रारी आहेत. पथकाकडून कामाची गुणवत्ता, कामाबद्दल बारीक-सारीक गोष्टी बघून घेऊन अहवाल पाठविला जाणार आहे.

अधिकाऱ्यांना यावेळी केंद्रीय पथकाने स्थानिक नागरिकांशी तसेच ग्रामस्थांबाबत विचारणा केल्याचे सांगितले जाते. मात्र ग्रामस्थांना माहिती नसतांना संबंधित दौरा नियोजित केलेला असल्याने अधिकाऱ्यांची व ठेकेदाराची तारांबळ उडाली. साल्हेर येथील जीवन मिशन अंतर्गत हर घर जल नळ पाणीपुरवठा योजनेला घरघर लागली असून कामे अपूर्ण आहेत. धुळे लोकसभेच्या खासदार डॉ. शोभा बच्छाव यांच्या तक्रारीनंतर बागलाण तालुक्यातील अनेक गावात केंद्रीय पथकाने कामाची पाहणी केली.

Nashik, Nashik-Today
02/02/2026 Page No. 2

सकाळ

# निर्यातक्षम द्राक्षे १२०, स्थानिक १०० रुपये दराने

## काढणी हंगामाला सुरुवात, मात्र उत्पादन घटल्याने दर ऐतिहासिक उंचीवर

**एस. डी. आहिरे** : सकाळ वृत्तसेवा

पिंपळगाव बसवंत, ता. १ : निसर्गाच्या तडाख्याने यंदा द्राक्ष खायला काय, बघायलासुद्धा मिळणार नाही... अशी स्थिती होणार असल्याचे बोलले जात होते. त्याचा प्रत्यय आता यायला लागला आहे. अवघे तीस टक्के उत्पादन येणे दृष्टिपथात असल्याने मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी होत असल्याने द्राक्षांचे दर कधी नव्हे एवढे कडाडले आहेत. देशांतर्गत स्थानिक द्राक्षांना शंभर रुपये तर निर्यातक्षम द्राक्षाला एकशे सत्तर रुपये प्रतिकिलो असा सर्वकालिक उच्चांकी दराचा गोडवा मिळत आहे. दराने शंभरी गाठली असली तरी बागेतील वेलींना द्राक्षांचे घड नसल्याने ही दरवाढ शेतकऱ्यांना फारशी लाभदायी दिसत नाही.

जानेवारी महिना उजाडताच निफाड तालुक्यात खवैय्यासाठी जिभेवर गोड, रसाळ चव पेरणाऱ्या द्राक्ष हंगामाचा श्रीगणेशा होता. यंदाचे वर्ष शेतकऱ्यांची कसोटी पाहणारे ठरले. सलग सात महिने पावसामुळे बहुतांश द्राक्षबागा यंदा बहरल्याच नाही. सरासरी ७० टक्के बागा द्राक्षविनाच आहेत. त्याचा परिणाम हंगामावर स्पष्ट दिसतो आहे. महिनाभर उशिराने द्राक्ष हंगामाचा पडदा बाजूला सरकला आहे.



पिंपळगाव बसवंत : सध्या काढणीला आलेली द्राक्षे.

उत्पादन कमी निघत असल्याने द्राक्षाच्या बाजारभावाला जणू सोन्याची झळाळी आली आहे, पण बागेत द्राक्षच नाहीत. मागणीपेक्षा पुरवठा कमी झाल्याने द्राक्षाच्या दराला सुवर्णझळाळी आली आहे. पण पावसाच्या तडाख्याने बागा मोठ्या प्रमाणात वांझोट्या राहिल्या. त्यामुळे दरात तेजी असली तरी बागांमध्ये द्राक्षच शिल्लक नसल्याचे दिसत आहे. सोनाका, थॉमसन, सुधाकर वाणांचे दर शंभर ते १२० रुपये किलोपर्यंत पोचले आहेत. निर्यातीला फ्लेम, काळ्या रंगाची द्राक्षांचे दर १५० ते १८० रुपये पर्यंत झेपावले आहे. व्यापाऱ्यांकडून या दराने द्राक्षांचे सौदे सुरू आहेत. एवढा आकर्षक भाव असून बागेत द्राक्ष नसल्याने शेतकरी हतबल आहेत. गुजरात, दिल्ली, पंजाब येथे नाशिक जिल्ह्यातून दररोज १५० टन द्राक्ष पोहचत आहे.



> मागणी असूनही द्राक्षच नसल्याने पुरवठा करता येत नाही. त्याचा परिणाम दरात मोठी उसळी आली आहे. ही तेजी कायम असल्याने शेतकऱ्यांनी घाई न करता द्राक्ष परिपक्व होऊ द्यावी.
>
> **- संतोष निकम**, द्राक्ष व्यापारी, पिंपळगाव बसवंत

सकाळ

# हरवलेल्या दुचाकीची स्क्रॅपमध्ये विक्री?

## पोलिसांनी तक्रार दडपली, लिलाव केला आणि आता उडवाउडवीची उत्तरे

■ **रावसाहेब उगले** : सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. १ : अपार्टमेंटमधून चोरी झालेल्या अन् पोलिसांच्या भागेत हरविलेल्या दुचाकीची तक्रार नोंदवून न घेणे, वर्षभर फिरवणे आणि अखेर त्याच दुचाकीचा पोलिसांकडूनच स्क्रॅपमध्ये लिलाव होणे, हा प्रकार केवळ निष्काळजीपणा नसून पोलिस प्रशासनाच्या गंभीर अपयशाचे जीवंत उदाहरण ठरत आहे. धक्कादायक बाब म्हणजे, हीच दुचाकी आज खुलेआम रस्त्यावर सुसाट धावत असताना पोलिस मात्र, 'आम्हाला काही माहिती नाही' अशी भूमिका घेत आहेत. तक्रारदाराच्या रेट्यानंतर शुक्रवारी (ता. ३०) पिंपळगाव पोलिसांनी ती दुचाकी ताब्यात घेतली असली तरी दुचाकी परत देण्यासाठी आता नवनवा पाढा वाचला जात आहे.

पिंपळगाव बसवंत येथील तौसिफ शेख यांची दुचाकी (एमएच १५, डीटी ४५८५) ही ९ नोव्हेंबर २०२३ ला घोडकेनगर येथील अपार्टमेंटमधून चोरीला गेली. याबाबत शेख यांनी १४ नोव्हेंबर २०२३ रोजी पिंपळगाव बसवंत पोलिस ठाण्यात लेखी तक्रार अर्ज सादर केला. मात्र, तक्रार नोंदवून घेण्याऐवजी पोलिसांनी त्यांना वर्षभर चकरा मारायला लावल्या.

**दुचाकी पोहोचली स्क्रॅपपर्यंत**

मार्च २०२५ मध्ये आडगाव पोलिसांनी या दुचाकीचा स्क्रॅपमध्ये लिलाव केला. कायदेशीर नियमानुसार, जप्त किंवा बेवारस वाहनांचा लिलाव करण्यापूर्वी मूळ मालकाचा शोध घेणे, आरटीओ तपासणी करणे आणि

> हरवलेली दुचाकी संबंधिताने स्क्रॅपमध्ये खरेदी केलेली आहे. खरेदीदार आणि तक्रारदार एकमेकांचे नातेवाईक आहेत. त्यांना एकमेकांशी तडजोड करून दुचाकी देण्यास सांगितले आहे. हरवलेली दुचाकी मूळ व्यक्तीला परत दिली आहे. २०२३ च्या तक्रार अर्जाबद्दल आपल्याला काही माहित नाही.
>
> **- प्रदीप देशमुख**, पोलिस निरीक्षक, पिंपळगाव बसवंत

> पिंपळगाव पोलिसांनी संबंधिताला बोलवून दुचाकी देण्यास सांगितले आहे. मात्र, अद्याप दुचाकी मिळालेली नाही. २०२३ ला तक्रार देऊनही पोलिसांनी फिर्याद नोंदवून घेतलेली नाही.
>
> **- तौसिफ शेख**, तक्रारदार

चोरीची नोंद आहे का याची खातरजमा करणे बंधनकारक असते. मग या प्रकरणात ही प्रक्रिया झालीच नाही की मुद्दाम टाळली गेली, असा प्रश्न उपस्थित होतो. चोरीची तक्रार वेळेत दिली गेली असतानाही ती नोंदवली नाही, लिलावाआधी मूळ मालकाची खातरजमा केली नाही आणि आता सत्य समोर येऊनही दुर्लक्ष केले जात आहे. या सर्व बाबी केवळ निष्काळजीपणाच्या पलिकडच्या आहेत. त्यामुळे हे प्रकरण स्वतंत्र चौकशीची मागणी करत आहे. आज मूळ मालक तौसिफ शेख न्यायासाठी दारोदार ठोठावत आहे तर चोरीची दुचाकी पिंपळगाव पोलिस ठाण्याच्या आवारात मूळ मालकाच्या प्रतिक्षेत उभी आहे.



### पोलिसांचे हात वर

७ ऑक्टोबर २०२५ ला शेख हे ओझर येथे गेले असता त्यांना स्वतःचीच चोरीस गेलेली दुचाकी रस्त्यावर धावताना दिसली. चौकशी केल्यावर संबंधित व्यक्तीने आडगाव पोलिसांच्या लिलावात ही दुचाकी आठ हजार ९०० रुपयांना स्क्रॅपमध्ये खरेदी केल्याचे म्हटले आहे. परंतु, तसे पुरावे मिळाले नाहीत. त्यामुळे चोरीची दुचाकी पोलिसांच्या माध्यमातूनच 'कायदेशीर' बनवली गेली, असा धक्कादायक निष्कर्ष निघतो. हा प्रकार समोर आणूनही पिंपळगाव पोलिसांनी जबाबदारी झटकत, 'आम्हाला काहीच माहिती नाही,' असे सांगत हात वर केले. ९ जानेवारी २०२६ ला पुन्हा पाठपुरावा केल्यानंतर संशयित खरेदीदाराला पोलिस ठाण्यात बोलावण्यात आले. मात्र, त्यानंतरही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे पोलिस कारवाई का करीत नाहीत, स्वतःहून कुणाला वाचवले जात आहे का, असा प्रश्न विचारला जात आहे.

सकाळ

# निर्यातक्षम द्राक्षे १२०, स्थानिक १०० रुपये दराने

## काढणी हंगामाला सुरुवात, मात्र उत्पादन घटल्याने दर ऐतिहासिक उंचीवर

■ **एस. डी. आहिरे** : सकाळ वृत्तसेवा

पिंपळगाव बसवंत, ता. १ : निसर्गाच्या तडाख्याने यंदा द्राक्ष खायला काय, बघायलासुद्धा मिळणार नाही... अशी स्थिती होणार असल्याचे बोलले जात होते. त्याचा प्रत्यय आता यायला लागला आहे. अवघे तीस टक्के उत्पादन येणे दृष्टिपथात असल्याने मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी होत असल्याने द्राक्षांचे दर कधी नव्हे एवढे कडाडले आहेत. देशांतर्गत स्थानिक द्राक्षांना शंभर रुपये तर निर्यातक्षम द्राक्षाला एकशे वीस रुपये प्रतिकिलो असा सर्वकालिक उच्चांकी दराचा गोडवा मिळत आहे. दराने शंभरी गाठली असली तरी बागेतील वेलींना द्राक्षांचे घड नसल्याने ही दरवाढ शेतकऱ्यांना फारशी लाभदायी दिसत नाही.



**पिंपळगाव बसवंत** : सध्या काढणीला आलेली द्राक्षे.



मागणी असूनही द्राक्षच नसल्याने पुरवठा करता येत नाही. त्याचा परिणाम दरात मोठी उसळी आली आहे. ही तेजी कायम असल्याने शेतकऱ्यांनी घाई न करता द्राक्ष परिपक्व होऊ द्यावी.
- **संतोष निकम**, द्राक्ष व्यापारी, पिंपळगाव बसवंत

जानेवारी महिना उजाडताच निफाड तालुक्यात खवैय्यांसाठी जिभेवर गोड, रसाळ चव पेरणाऱ्या द्राक्ष हंगामाचा श्रीगणेशा होता. यंदाचे वर्ष शेतकऱ्यांची कसोटी पाहणारे ठरले. सलग सात महिने पावसामुळे बहुतांश द्राक्षबागा यंदा बहरल्याच नाहीत. सरासरी ७० टक्के बागा द्राक्षविनाच आहेत. त्याचा परिणाम हंगामावर स्पष्ट दिसतो आहे. महिनाभर उशिराने द्राक्ष हंगामाचा पडदा बाजूला सरकला आहे.

उत्पादन कमी निघत असल्याने द्राक्षाच्या बाजारभावाला जणू सोन्याची झळाळी आली आहे, पण बागेत द्राक्षच नाहीत. मागणीपेक्षा पुरवठा कमी झाल्याने द्राक्षाच्या दराला सुवर्णझळाळी आली आहे. पण पावसाच्या तडाख्याने बागा मोठ्या प्रमाणात वांझोट्या राहिल्या. त्यामुळे दरात तेजी असली तरी बागांमध्ये द्राक्षच शिल्लक नसल्याचे दिसत आहे. सोनाका, थॉमसन, सुधाकर वाणांचे दर शंभर ते १२० रुपये किलोपर्यंत पोचले आहेत. निर्यातीला फ्लेम, काळ्या रंगाची द्राक्षांचे दर १५० ते १८० रुपये पर्यंत झेपावले आहे. व्यापाऱ्यांकडून या दराने द्राक्षांचे सौदे सुरू आहेत. एवढा आकर्षक भाव असून बागेत द्राक्ष नसल्याने शेतकरी हळहळत आहेत. गुजरात, दिल्ली, पंजाब येथे नाशिक जिल्ह्यातून दररोज १५० टन द्राक्ष पोहचत आहे.

सकाळ

# जटायू तीर्थक्षेत्राची अधिकाऱ्यांकडून पाहणी

## ग्रामपंचायतीने सुचविलेल्या कामांबाबत चर्चा

**सर्वतीर्थ टाकेद, ता. १ :** सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर सर्वतिर्थ टाकेद येथील जटायू तीर्थक्षेत्र व परिसराचा सर्वांगिण विकास करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. ग्रामपंचायत व स्थानिक ट्रस्टने सुचविलेल्या विविध विकासकामांचा समावेश अधिकृत आराखड्यात करण्यात यावा, यासाठी ही पाहणी करण्यात आली.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सोनवणे, पाणीपुरवठा विभागाचे तायडे, गटविकास अधिकारी महेश वळवी, अतिरिक्त गटविकास अधिकारी चिंतामण गोडे, प्रशासक तथा विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर कराळे व ग्रामविकास अधिकारी विजय रासकर उपस्थित होते.

अधिकारी पथकाने जटायू तीर्थक्षेत्राची पाहणी करून कुंभमेळ्यानिमित्त येणाऱ्या साधू, महंत व भाविकांच्या सोयी-सुविधांबाबत स्थानिक पदाधिकारी व ट्रस्ट प्रतिनिधींशी सविस्तर चर्चा केली. ग्रामपंचायत व ट्रस्टकडून कोट्यवधी रुपयांचा आराखडा सुचविण्यात आली असून त्यामध्ये श्रीराम मंदिराचा जिर्णोद्धार, साधू-महंतांसाठी होम- हवन व साधना केंद्र, १५०० मीटर भूमिगत गटार व्यवस्था, वाहनतळासाठी पेव्हर ब्लॉक, बस निवारा, पोलिस चौकी, शौचालय व स्नानगृह, भोजनालय, कॉंक्रिटीकरण, साधूंसाठी ५० खोल्यांची निवास व्यवस्था, निवारा शेड, तीर्थ व मंदिर सुशोभीकरण, पाण्याची टाकी, जनरेटर, अंतर्गत रस्ते व पाणपोई आदी कामांचा समावेश आहे. उपसरपंच रामचंद्र परदेशी, सामाजिक कार्यकर्ते रतन नाना बांबळे, ललित मडके, शांताराम भांगे तसेच ट्रस्टचे अंबादास महाराज श्रीवास्तव यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.



सर्वतीर्थ टाकेद : येथील जटायू तीर्थक्षेत्राची पाहणी करताना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार व अन्य अधिकारी. (छायाचित्र : शाहबाज शेख)

सकाळ

# ऑडिओ गाइडमुळे मिळेल तीर्थाची इत्यंभूत माहिती

## णमोकार तीर्थ
पंचकल्याणक महोत्सव

■ प्रशांत [illegible] : सकाळ वृत्तसेवा

**नाशिक, ता. १ : मालसाने (ता. चांदवड) येथे सुमारे ४० एकर परिसरात विस्तारलेले 'णमोकार तीर्थ' हे केवळ एक धार्मिक स्थळ नसून, श्रद्धा, अध्यात्म, कला आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा सुरेख संगम ठरत आहे. भव्य आणि नियोजनबद्ध रचनेमुळे हे तीर्थ भाविकांसाठी एक अद्वितीय आध्यात्मिक अनुभूती देणारे केंद्र बनले. या ठिकाणी उभारण्यात येत असलेली सर्व भुवने, शेकडो मूर्ती, अनेक स्तंभ, कित्येक मार्ग या सर्वांची माहिती देण्यासाठी एक ऑडिओ गाइड बनविण्यात येणार आहे. या ४० एकर परिसरात भाविक कोठेही उभा राहिल्यास त्या जागेची माहिती त्याला तत्काळ मिळेल.**



[illegible]

या विशाल तीर्थक्षेत्रात विविध भुवने, कलात्मक रचनेची कलादालने, २४ जैन तीर्थंकरांच्या भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळातील ७२ मनोहारी मूर्ती, त्याशिवाय येथे [illegible] शेकडो मूर्ती, भाविकांच्या सोयीसाठी सुसज्ज धर्मशाळा, शांतीचा अनुभव देणारी [illegible] केंद्र, गुरुभक्तीचे प्रतीक असलेले गुरु मंदिर, तसेच राहण्यासाठी व्यवस्था आणि भोजनाची नियमित व्यवस्था ([illegible]) उपलब्ध करून देण्यात आली आहे.

इतक्या मोठ्या आणि बहुआयामी परिसरात प्रत्यक्ष येणाऱ्या भाविकांना किंवा पर्यटकांना नेमकी दिशा, योग्य स्थळे आणि प्रत्येक वास्तूचे महत्त्व समजून घेता यावे, यासाठी णमोकार तीर्थात आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून एक विशेष ऑडिओ गाइड प्रणाली विकसित करण्यात आली आहे. यामुळे भाविक ज्या वास्तूसमोर उभे असतील, त्या वास्तूविषयी [illegible] आणि माहितीपूर्ण विवरण ऐकता येईल. संबंधित वास्तूचे धार्मिक, ऐतिहासिक व आध्यात्मिक महत्त्व या माध्यमातून सहजपणे समजणार आहे. संपूर्ण तीर्थदर्शन अधिक सुलभ आणि अर्थपूर्ण होईल.

या ऑडिओ गाइडमुळे भाविकांना केवळ माहितीच मिळणार नाही, तर योग्य दिशा दाखवण्यासाठी मदत होणार आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, प्रथमच येणारे भाविक तसेच [illegible] ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरेल.

### असे आहे 'स्मार्ट ऑडिओ गाइड'

■ एखाद्या स्थळासमोर उभे राहिल्यावर त्याची इत्यंभूत माहिती ऑडिओ स्वरूपात देण्यासाठी 'स्मार्ट ऑडिओ गाइड' तंत्रज्ञान वापरले जाते. यात त्या स्थळाच्या बाजूला कोड किंवा एनएफसी टॅग बसविले जातात. नागरिकांनी मोबाईलने स्कॅन करताच संबंधित माहितीचा ऑडिओ सुरू होतो. काही ठिकाणी जीपीएस व जिओ-फेन्सिंग तंत्रज्ञानाचा वापर करून विशिष्ट परिसरात प्रवेश करताच आपोआप माहिती ऐकू येण्याची सोय केली जाते. यासाठी स्वतंत्र मोबाईल ॲप किंवा वेब-आधारित प्लॅटफॉर्म वापरला जातो. ऑडिओसाठी [illegible] व टेक्स्ट-टू-स्पीच (टीटीएस) तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. बहुभाषिक पर्याय, दृष्टिहीनांसाठी सोयीस्कर रचना आणि अपडेट करता येणारी माहिती ही या प्रणालीची वैशिष्ट्ये ठरू शकतात. अशा तंत्रज्ञानामुळे इतिहास, संस्कृती व वास्तुरचनांची माहिती अधिक प्रभावीपणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचते.

### 'एआय'च्या आधारे मिळणार उत्तरे

■ [illegible] जगातील सर्व भाषांमध्ये, २० कोटी आध्यात्मिक प्रश्नांची उत्तरे आचार्य देवनंदी महाराज यांच्या आवाजात देता येणार आहेत. हे शक्य होण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित बहुभाषीय तंत्रज्ञान वापरले जाईल. [illegible] २० कोटी आध्यात्मिक प्रश्नांची उत्तरे निर्माण केली गेली. [illegible] व न्यूरल टेक्स्ट-टू-स्पीच तंत्रज्ञानाद्वारे ही उत्तरे आचार्यश्रींच्या आवाजात मिळणार आहेत. ही संपूर्ण प्रणाली [illegible]

Nashik Sakal Today [illegible] Page No. 2

सकाळ

# वडाळा शिवारात रस्तेकामात 'गोलमाल'

## महापालिका आयुक्तांकडून पाहणी; निकृष्ट थर पुन्हा उखडण्याचे आदेश

■ सकाळ वृत्तसेवा

**नाशिक, ता. १ : शहरात कुंभमेळ्याच्या निमित्ताने विविध ठिकाणी रस्त्यांची कामे सुरू आहेत. रस्त्यांची कामे करताना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण करण्याच्या सूचना महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांनी दिल्या असतानाही वडाळा शिवारात सुरू असलेल्या एका रस्त्याच्या कामात गोलमाल होत असल्याचा प्रकार खुद्द आयुक्त खत्री यांनी रंगेहाथ पकडला. त्यानंतर तातडीने काम थांबविण्याचे आदेश दिले.**

कुंभमेळ्याच्या निमित्ताने शहरात ज्याप्रमाणे सहाशे कोटी रुपयांच्या रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली आहेत. परंतु, रस्ता तयार करताना पुन्हा खोदला जाऊ नये व गुणवत्तापूर्ण रस्ता तयार होण्याच्या दृष्टीने आयुक्तांनी पाणीपुरवठा, विद्युत, ऑप्टिकल फायबर आदी प्रकारच्या केबल टाकण्यासाठी डक्ट तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत. रस्त्यांची गुणवत्ता तपासण्यासाठी 'आयआयटी मुंबई'सोबत करार करण्यात आला आहे तर अधिकारी व ठेकेदारांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण कामे करण्याच्या वारंवार सूचना देण्यात आल्या आहेत. याच

> नागरिकांच्या करातून होणाऱ्या प्रत्येक विकास कामांमध्ये गुणवत्ता हीच अंतिम कसोटी आहे. निकृष्ट काम करणाऱ्यांना कोणतीही सहानुभूती दाखविली जाणार नाही.
> **- मनीषा खत्री,**
> आयुक्त, महापालिका

अनुषंगाने पूर्व विभागातील वडाळा शिवार येथील संत सावता माळीनगर व विठ्ठल मंदिर परिसरात सुरू असलेल्या रस्ता दुरुस्ती व डांबरीकरण कामाची अचानक पाहणी केली. या कामामध्ये [illegible] अंदाजपत्रक व तांत्रिक मापदंडानुसार साहित्य वापरले जात नसल्याचे निदर्शनास आले. तातडीने रस्त्याचे काम थांबविण्याचे सूचना आयुक्तांनी जागेवर देत [illegible] पद्धतीने रस्त्यावर टाकलेला थर पूर्णतः काढून नव्याने नियम, अटी व शर्तीनुसार थर टाकण्याच्या सूचना दिल्या. सदर कामाची पुढील तपासणी करून नियमानुसार काम न झाल्यास ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याबाबतचा अधिकाऱ्यांना [illegible] निर्णयाचा इशारा देण्यात आला. या वेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, महापालिकेच्या गुणवत्ता व नियंत्रण कक्षाचे कार्यकारी अभियंता नितीन पाटील, शहर अभियंता संजय अग्रवाल, उमेश पूर्व विभागातील बांधकाम विभागाचे अभियंता उपस्थित होते. आयुक्तांच्या भेट घडवून कामांची गुणवत्ता तपासण्याच्या भूमिकेमुळे ठेकेदाराचे धाबे दणाणले आहेत. शहरातील विकासकामे केवळ कागदावर नव्हे तर प्रत्यक्ष मैदानावर [illegible] आणि गुणवत्तेबाबत कुठलीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचे स्पष्टीकरण आयुक्तांनी अधिकाऱ्यांसह ठेकेदारांना यावेळी दिले.



**नाशिक :** पूर्व विभागातील वडाळा येथील श्री विठ्ठल मंदिर परिसरात सुरू असलेल्या रस्तेकामातील त्रुटींची जागेवर जाऊन पाहणी करताना महापालिका आयुक्त मनीषा खत्री व अधिकारी.

सकाळ

# जलजीवनची कामे अपूर्णच, घशाला कोरड कायम

## सुरगाणा तालुक्यातील स्थिती : अधिकारी, ठेकदारांच्या मनमानीने जनतेचे हाल सुरू

■ हंसराज भोये : सकाळ वृत्तसेवा

मनखेड, ता. १ : सरकारने मोठा गाजावाजा करून राबविलेल्या जलजीवन योजनेचा तालुक्यात बोजवारा उडाला आहे. दिखाव्यासाठी कामे पूर्ण झालेली असली तरी त्यातून जनतेपर्यंत अजून पाणी पोचलेलेच नाही हे मात्र भीषण वास्तव आहे. असे असताना या कामांची बिले मात्र पूर्ण निघालेली आहेत. मग अधिकाऱ्यांनी कशाच्या आधारे ही बिले दिली, कामे अपूर्ण असताना हे कसे काय घडले याबाबतेवर जनतेला पाणी का मिळालेले नाही याचे उत्तर कसा मागत आहे. तालुक्याच्या अतिदुर्गम आदिवासीबहुल भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ठिकाणी ग्रामपंचायतअंतर्गत असलेल्या जांभूळपाडा (उ.) या गावात जलजीवन मिशन अंतर्गत पाणीयोजनेचे काम झालेले दाखवून दोन वर्षे झाली, पण ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे अद्यापही गावाला पाणी मिळाले नाही. ग्रामस्थांनी वारंवार तक्रार करूनही ना सरपंच, ना ग्रामसेवक याकडे लक्ष द्यायला तयार नाही. यामुळे ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. एक ते दीड किलोमीटरवरून डोक्यावर हंडा घेऊन महिलांना पाणी आणावे लागत आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून कंत्राटदारावर कारवाई करावी, त्याला काळ्या यादीत टाकावे अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. प्रशासनाने लक्ष घालून आठवड्याभरात पाणीपुरवठा सुरळीत करावा अन्यथा ग्रामपंचायतला टाळे ठोकून सरपंच किंवा ग्रामसेवकाला ग्रामपंचायत आवारात फिरकू देणार नाही असा इशारा संतप्त ग्रामस्थांनी दिलेला आहे.

> ग्रामसेवक, सरपंचांना हे पीडित वास्तव वारंवार सांगूनही ते लक्ष द्यायला तयार नाही. ठेकेदार तर कुणालाच जुमानत नाही. यावर प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी अन्यथा टाळेबंदी आंदोलन करून त्यांना रस्त्यावर फिरकू देणार नाही.
> **- महेंद्र पाडवी**, स्थानिक ग्रामस्थ, जांभूळपाडा

> पाणी लांबून आणावे लागत असल्याने महिलांचे प्रचंड हाल होत आहेत. डोक्यावर हंडा घेऊन एक ते दीड किलोमीटर पायपीट करून पाणी आणावे लागत आहे. मग लाखो रुपये खर्च केलेली ही योजना काय कामाची. कार्यवाही न झाल्यास आंदोलन छेडण्यात येईल.
> **- वंदना भोये**, स्थानिक महिला, जांभूळपाडा (उ.)

**ग्रामसभांमध्ये चर्चा; पण...**

सध्या एक ते दीड किलोमीटरवरून डोक्यावर हंडा घेऊन पाणी आणावे लागत असल्याने महिला- पुरुषांमध्ये भांडणे होत आहेत. पुरुषांनी अनेकदा ग्रामसभांमध्ये हा प्रश्न मांडला, मात्र सरपंच, ग्रामसेवकांनी त्याला फारसे गांभीर्याने घेतले नाही, त्यामुळे नेमके पाणी पुढे कुठे जाणार असा प्रश्न उपस्थित होतो.



जांभूळपाडा : जलजीवनअंतर्गत उभारलेली पाण्याची टाकी. दुसऱ्या छायाचित्रात येथील जुनी पाण्याची टाकी.

Nashik, Nashik Today
03/02/2026 Page No. 2

सकाळ

# एकत्रित काम करून 'हरितकुंभ' साकारूया!

## प्रवीण गेडाम यांची साद : दोनदिवसीय पर्यावरण कार्यशाळेचा समारोप

■ **सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. १ : निसर्गाच्या विपरीत जाऊन काही करणे चुकीचे आहे हे सत्यच आहे; परंतु समतोल साधण्यासाठी काही गोष्टी कराव्या लागतात. आर्थिक विकासाचा समतोल साधायचा असेल तर दोन्ही गोष्टींकडे समसमान लक्ष द्यावे लागते. सर्व पर्यावरणप्रेमींकडे आम्ही सहकारी म्हणूनच पाहतो, सर्वांनी एकत्रित काम करूयात, पुन्हा हरितकुंभ करूयात, अशी साद विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिली.



**नाशिक :** कार्यशाळेप्रसंगी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, महापालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद.

गेव्ह वेल्फेअर ऑर्गनायझेशन यांच्या विद्यमाने बेळगाव ढगा, त्र्यंबकेश्वर रोड येथील चंद्रभागा लॉन्समध्ये दोन दिवसीय कार्यशाळेचा समारोप करण्यात आला. या वेळी महापालिका आयुक्त मनिषा खत्री, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी प्रशांत गायकवाड, रमेश अय्यर, ॲड. श्रीराम पिंगळे यांची उपस्थिती होती. डॉ. गेडाम म्हणाले, की आपल्याला धार्मिक व सांस्कृतिक गरजा लक्षात घेता कुंभमेळा गरजेचा आहे. तो हेरिटेज आहे त्याला आपण जपले पाहिजे. महापालिका आयुक्त मनिषा खत्री यांनी पर्यावरणप्रेमींच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. पहिली सभा झाल्यानंतर लगेचच वृक्ष प्राधिकरण समिती गठित करण्यात येणार आहे. तसेच तपोवनातील वृक्षतोड प्रश्नी रात्रीतून कोणतीही वृक्षतोड होणार नाही. जे काही होईल ते सर्वांच्या संमतीने होईल असे आयुक्त खत्री म्हणाल्या. या वेळी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनीदेखील पर्यावरणप्रेमींचे समाधान केले. ते म्हणाले की, पर्यावरणप्रेम ही खूप मोठी संकल्पना आहे, दोन्ही बाजूंनी संवाद होणे महत्त्वाचे आहे. आम्ही तयार आहोत, तुम्हीही एक पाऊल पुढे या असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले. कार्यशाळेत मानव उत्थान मंच, जैवविविधता, जलमृदा संरक्षण व संवर्धन, गरूडझेप प्रतिष्ठान, रान फाउंडेशन, गोदामाई प्रतिष्ठान ट्रस्ट, निसर्गसेवक युवक मंच, नाशिक नागरिक कृती समिती, ग्रीन रिव्हॉल्यूएशन, उत्तुंग झेप फाउंडेशन, गोदावरी संवर्धन, कपिला नदी संवर्धन, गोदावरी स्वच्छता अभियान यासह ४० हून अधिक पर्यावरणप्रेमी संस्था सहभागी झाल्या. यावेळी देवांग जानी, मनोज साठे, अश्विनी देशपांडे, दत्तात्रेय ढगे, आदिनाथ ढाकणे, संदीप भानोसे, अमित कुलकर्णी, जगबीर सिंग, अश्विनी भट, सुनील मेंढेकर, निशिकांत पगारे आदी उपस्थित होते.

Nashik, Nashik-Today
02/02/2026 Page No. 3

सकाळ

# अर्थसंकल्पात सिंहस्थाचा ‘कुंभ’ रिता

■ सकाळ वृत्तसेवा

**नाशिक, ता. १ : केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पात आगामी सिंहस्थ-कुंभमेळ्यासाठी भरघोस निधीची तरतूद केली जाईल, अशी अपेक्षा होती; पण अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्प सादर करताना कुंभमेळ्याचा साधा उल्लेखही केला नाही. त्यामुळे नाशिककरांची घोर निराशा झाली आहे.**

## केंद्र सरकारकडून नाशिककरांची घोर निराशा




अर्थमंत्री सीतारामन यांनी रविवारी (ता. १) त्यांच्या कारकीर्दीतला सलग नववा अर्थसंकल्प सादर केला. सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा, शिक्षण, महामार्ग, रेल्वे, आरोग्य सुविधा अशा विविध घटकांसाठी मोठ्या घोषणा करण्यात आल्या. यंदाच्या अर्थसंकल्पात नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या अनुषंगाने शासन विशेष पॅकेज अथवा भरीव निधीची तरतूद करेल, अशी आशा होती. त्या दृष्टीने आपल्या जिल्ह्याचे लक्ष अर्थसंकल्पाकडे लागून होते. परंतु, अर्थमंत्र्यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात निधी तरतूद दूरच; पण सिंहस्थाचा साधा नामोल्लेखही केला नाही.

सिंहस्थ कुंभमेळ्याचे ध्वजारोहण अवघ्या दहा महिन्यांवर येऊन ठेपले. यंदाच्या कुंभमेळ्यात किमान १० ते १२ कोटी भाविक हजेरी लावतील, असा अंदाज आहे. त्यादृष्टीने राज्य शासन व प्रशासन तयारीला लागले. तब्बल २५ हजार कोटींचा आराखडा सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाने तयार केला आहे. त्यात पायाभूत सुविधांसह महामार्गाचे जाळे व अन्य विकासकामांचा समावेश करण्यात आला. या माध्यमातून नाशिक सर्वांगीण विकासासह आजूबाजूच्या जिल्ह्यांच्या आर्थिक विकासाला हातभार लागणार आहे. त्यामुळे केंद्रीय अर्थसंकल्पात नाशिकला मानाचे स्थान मिळेल, अशी शक्यता वर्तविली जात होती. प्रत्यक्षात केंद्र सरकारने अर्थसंकल्पात कुंभमेळ्याचा समावेश करणे टाळले. परिणामी, केंद्रीय पातळीवर सिंहस्थाचा कुंभ रिताच राहिला आहे.

### पर्यटनासाठी ठोस बाबी नाहीत

■ देशातील १५ पुरातत्त्वीय स्थळांच्या पर्यटन विकासासह २० प्रमुख पर्यटनस्थळी १० हजार पर्यटक मार्गदर्शक केंद्रे सरकार तयार करणार आहे. मंदिरांच्या शहरांचा विकासाच्या अर्थसंकल्पात अंतर्भाव करण्यात आला. पण, सिंहस्थाच्या अनुषंगाने नाशिक जिल्ह्यासह उत्तर महाराष्ट्रातील पर्यटन वाढीच्या दृष्टीने कोणतीही ठोस पावले अर्थसंकल्पात उचलण्यात आलेली दिसून येत नाहीत. परिणामी, सिंहस्थाच्या रूपाने नाशिकला पर्यटन जिल्हा म्हणून पुढे आणण्याच्या प्रयत्नांवर पाणी फेरले गेले आहे.


# महाराष्ट्राला एक लाख कोटी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेला अर्थसंकल्प हा विकसित भारताकडे दमदार वाटचाल करणारा आहे. कर हस्तांतरणाच्या नव्या सूत्रामुळे महाराष्ट्राला मिळणारा वाटा हा ९८,३०६ कोटी रुपये असणार आहे. याशिवाय, अर्थसंकल्पाचे प्राथमिक आकलन करता १२ हजार ३५५ कोटी विविध प्रकल्पांसाठी आहेत. त्यामुळे सुमारे एक लाख कोटी रुपयांचा निधी महाराष्ट्राला मिळेल,' अशी माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी मुंबईत दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी वर्षा निवासस्थानी पत्रकार परिषदेत या अर्थसंकल्पाबाबत प्रतिक्रिया दिली. 'या अर्थसंकल्पात नियोजनबद्ध शहरीकरण करून, उद्योगाला प्रोत्साहन देऊन, गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीसाठी खंबीर उपाययोजना मांडण्यात आल्या आहेत. पायाभूत सुविधा क्षेत्रात १२ लाख कोटींची गुंतवणूक सरकार



करणार आहे, ही गुंतवणूक पूर्वी अवघी एक लाख कोटी होती. पाच लाख लोकसंख्या असलेल्या शहरातील विकासाचा विचार करून शहरीकरणाच्या एकात्मिक विचार केला आहे. यातून विविध क्षेत्रांना दिशा, गती आणि निधी प्राप्त होणार आहे. याचा मोठा लाभ महाराष्ट्राला होणार आहे. शेती, पशुपालन, मत्स्यव्यवसाय आणि सिंचन यासाठी भरीव तरतुदी करण्यात आल्या आहेत,' असे ते म्हणाले. 'लखपती दीदी योजनेच्या यशानंतर महिलांसाठी स्वतंत्र मॉल आणि उद्योगांच्या संधी तयार करण्याची योजना, प्रत्येक जिल्ह्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी वसतिगृहांच्या योजनाही महत्त्वाच्या आहेत. जिल्हा रुग्णालयात आपत् चिकित्सा व्यवस्था उभी करण्याचा निर्णय आरोग्य क्षेत्रात मोलाचा ठरेल.

मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद हायस्पीड कॉरिडॉरमुळे जीडीपीत मोठी वाढ होईल. पुणे-हैदराबाद कॉरिडॉरचा मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्राला मोठा लाभ होईल. ग्रोथहबसाठी पाच हजार कोटी प्रत्येकी पाच वर्षांत प्राप्त होणार आहेत, याचा लाभ मुंबई महानगर (एमएमआर), पुणे महानगर, नागपूर महानगर ग्रोथहबला होणार आहे,' असेही त्यांनी सांगितले.

### 'राज्याला शक्ती देणारा अर्थसंकल्प'

'एकीकडे लहान शहरांच्या सर्वांगीण विकासाला चालना देताना, पायाभूत सुविधा वाढवण्याच्या, सूक्ष्म आणि मध्यम उद्योगांना मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन देण्याच्या घोषणांमुळे देशाचे ग्रोथ इंजिन असलेल्या मुंबई आणि महाराष्ट्राला मोठे बळ मिळेल. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या स्वप्नातील विकसित भारताच्या दिशेने निर्धारपूर्वक पाऊल टाकणारा हा अर्थसंकल्प आहे,' अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. 'जगातील अनेक देशांची अर्थव्यवस्था कोलमडली असताना भारताने आपला विकासदर कायम ठेवला आहे. आर्थिक विकास, सर्वसामान्य जनतेचे जीवनमान उंचावणे आणि सबका साथ सबका विकास या तीन कर्तव्यांभोवती हा अर्थसंकल्प बांधण्यात आलेला आहे. त्यात वर्तमानाचे भान आहे आणि भविष्याची जाण आहे,' असे त्यांनी सांगितले. मनोरंजन उद्योगाचे बलस्थान असलेल्या मुंबईत इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी उभारण्याची केलेली घोषणा महत्त्वपूर्ण आहे, असेही ते म्हणाले.

# जिल्हा परिषद शोधणार उत्पन्नाचे नवे स्रोत

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

जिल्हा परिषदेस आता मार्चमध्ये सादर होणाऱ्या अर्थसंकल्पाचे वेध लागले आहेत. या अनुषंगाने आगामी वर्षातील अर्थसंकल्पाचा ताळमेळ बसविण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मालकीच्या भाडेतत्त्वावर देण्यायोग्य मालमत्तांच्या करारांपासून तर उपकर वसुलीपर्यंत काय-काय प्रयत्न करता येतील, याचा अंदाज जिल्हा परिषद प्रशासनाकडून घेतला जात आहे. जिल्हा परिषदेच्या मालकीच्या काही मालमत्ता भाडेतत्त्वावर देऊन उत्पन्नाचे नवे स्रोत या स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी उभे केले जाणार आहेत.

शासनाकडून 'व्हर्च्युअल पर्सनल डिपॉझिटरी अकाऊंट' (व्हीपीडीए) ही ऑनलाइन प्रणाली लागू होण्याअगोदर जिल्हा परिषदेच्या मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांच्या खात्यात जमा होणारा निधी जिल्हा परिषदेला बँकेत ठेवी स्वरुपात जमा करणे शक्य होत होते. यातून मिळणाऱ्या मोठ्या व्याजाची रक्कमदेखील जिल्हा परिषदेसाठी उत्पन्नाचा स्रोत होती.

## मालमत्ता भाडेतत्वावर; उपकर वसुलीवरही भर

यानंतरच्या टप्प्यात 'व्हीपीडीए'प्रणाली लागू करण्यात आल्यानंतर मात्र रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अंतर्गत आभासी खाते उघडून त्यात निधीची आभासी रक्कम जमा करण्यात येते. ही रक्कम प्रशासनाला वर्षभरात खर्च करण्याचे बंधन आहे.




तसे न झाल्यास या खात्यातील शिल्लक निधी शासनाकडे वर्ग करण्यात येतो. परिणामी, अपेक्षित निधीसाठी पुन्हा कागदपत्रे लागतात.

### निर्णयास उशीर का?

व्हीपीडीए प्रणाली लागू झाल्याच्या दिवसापासून प्रशासनाने उत्पन्नाच्या अतिरिक्त स्रोतांचा विचार करणे आवश्यक होते, असाही सूर ग्रामीण भागातून व्यक्त केला जात आहे. जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प सादर होण्यास अवघा महिनाभराचा अवधी हाताशी आहे. या अनुषंगाने वित्त व लेखा विभागासह सर्व विभागांची अंदाजपत्रकासाठी पूर्वतयारी सुरू आहे. एकीकडे जिल्हा परिषद मोकळे भूखंड, विविध करांमधून होणारी वसुली व पाणीपुरवठ्याच्या पाणीपट्टीसारख्या पारंपरिक स्रोतांवर वसुलीसाठी अवलंबून आहे, तर दुसरीकडे नवीन इमारतीत स्थलांतरीत झाल्यानंतर या इमारतीच्या देखभाल दुरुस्तीसाठीही दरमहा पाच लाखांवर खर्च अपेक्षित आहे. या स्थितीत उत्पन्न व वजावटीची हातातोंडाची मिळवणी करण्यासाठी प्रशासनाला लवकर निर्णय घेण्याशिवाय गत्यंतर नसल्याचाही सूर जिल्हा परिषद वर्तुळात आहे.

# वेतनाबाबत पुन्हा गोंधळ

## वेतन अधीक्षकांमार्फत सूचनाच नाही

- अधिकाऱ्यांची खांदेपालट झाल्याचा परिणाम
- जानेवारीचे वेतनही रखडण्याची शक्यता
- शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी पुन्हा चिंतेत

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

शिक्षण विभागातील रखडलेल्या कामांवरून थेट शिक्षक आमदारांनी सूचना देऊनही, जानेवारी महिन्याच्या वेतन प्रक्रियेत पुन्हा गोंधळ झाला आहे. वेतन अधीक्षक कार्यालयामार्फत शाळांकडे शालार्थमधून वेतनाची माहिती पुढे पाठविण्यासाठी सूचनाच आलेली नसल्याची माहिती शिक्षण विभागातील सूत्रांनी दिली. सूचनेअभावी वेतन कधी जमा होईल, अशी चिंता आता शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सतावू लागली आहे.

गेल्या महिन्यात 'एसआयटी'च्या कारवाईचे कारण देत शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी वेतनपत्रकावर सह्या करण्यास नकार दिला होता. शिक्षक-शिक्षकेतरांनी बंड पुकारल्यानंतर अधिकाऱ्यांनी आपली भूमिका बदलली व डिसेंबरचे वेतन शिक्षकांना मिळाले. यासह अनेक प्रलंबित कामांसाठी शिक्षण उपसंचालक कार्यालयात शिक्षक आमदार किशोर दराडे यांच्या उपस्थितीत शिक्षक दरबारचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी शिक्षकांचे वेतन प्रलंबित न ठेवण्याबाबतच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या होत्या. परंतु, वेतन अधीक्षक कार्यालयामार्फत शाळांना शालार्थमधून वेतनाबाबतची माहिती पाठविण्याबाबतची कोणतीही सूचना मिळालेली नसल्याने, शाळांनी ही प्रक्रियाच केलेली नसल्याचे काही शिक्षक-शिक्षकेतरांनी सांगितले.

गेल्या महिन्यात वेतन अधीक्षक नितीन पाटील कार्यमुक्त होऊन त्यांच्या जागी प्रीति पवार रुजू झाल्या आहेत. त्यांच्यामार्फत ही कार्यवाही होणे अपेक्षित होते. तसेच त्यांच्याकडून प्रशासकीय बाबींमुळे हे काम रखडलेले असल्यास, शिक्षणाधिकाऱ्यांनी ही सूचना काढणे गरजेचे असल्याची माहिती शिक्षकांनी दिली. आता ही सूचना निघून, त्यानंतर वेतन जमा होण्यास बराच कालावधी जाण्याची शक्यता आहे. जानेवारीच्या वेतनालाही विलंब होत असल्याने, शिक्षक-शिक्षकेतरांमध्ये असंतोष आहे.



### हप्ते भरण्यात अडचणी

अनेक शिक्षक-शिक्षकेतर महिन्याच्या पाच तारखेला कर्जाचे हप्ते भरतात. पहिल्या आठवड्यात वेतन झाल्यास, ही प्रक्रिया सुरळीत होते. परंतु, अद्याप शाळांकडूनच संबंधित माहिती पुढे गेलेली नसल्याने, पगार कधी होणार ते माहिती नाही. त्यामुळे शिक्षक शिक्षकेतरांना बँकांचे हप्ते भरण्यास अडचणी निर्माण होणार आहे. शिक्षण विभाग अकारण वेठीस धरीत असल्याचे आरोप हे शिक्षक करीत आहेत.

### सेवानिवृत्त अडचणीत

साधारणतः प्रत्येक महिन्याच्या २५ ते २६ तारखेदरम्यान शाळांकडून ही प्रक्रिया केली जाते व त्यानुसार पहिल्या आठवड्यात वेतन जमा होते. ही प्रक्रिया न झाल्याचा मोठा फटका जानेवारी महिन्यात सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षक-शिक्षकेतरांना बसणार आहे. ३१ तारखेला त्यांचे खाते बंद होणार असल्याने या सेवानिवृत्त झालेल्यांच्या वेतनासाठी पुण्यातून विशेष तरतूद करून वेतन काढावे लागणार आहे.

# तंत्रज्ञानासाठी प्रोत्साहनाचा मंत्र

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केंद्रीय अर्थसंकल्पात उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि कृत्रिम प्रज्ञेवर (एआय) विशेष भर दिला आहे. अर्थसंकल्पीय भाषणात त्यांनी एआयचा उल्लेख ११ वेळा केला असून तंत्रज्ञानाद्वारे सर्वसमावेशक विकासावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. विविध सरकारी विभागांतील प्रशासकीय कार्यक्षमता वाढविण्यासाठी आणि सार्वजनिक सेवा जलद करण्यासाठी एआयचा वापर केला जाणार आहे. यासाठी 'एआय मिशन' आणि 'नॅशनल क्वांटम मिशन'द्वारे विविध क्षेत्रांत नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब केला जाणार आहे.

अर्थमंत्र्यांनी आर्थिक वर्ष २०२६-२७मध्ये इंडिया एआय मिशनसाठी १,००० कोटींची तरतूद केली आहे. मागील वर्षी अर्थसंकल्पात यासाठी दोन हजार कोटींची तरतूद करण्यात आली होती. मात्र, त्यात सुधारणा करून ती आठशे कोटींवर आणण्यात आली होती. यंदाची तरतूद मागील वर्षीच्या घोषणेच्या अर्धी असली, तरी सुधारित तरतुदीपेक्षा दोनशे कोटींनी जास्त आहे. याद्वारे कमी खर्चात एआय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी ५० ते १२० अब्ज पॅरामीटर असलेली १२ पायाभूत एआय मॉडेल्स विकसित केली जातील.

### 'क्लाउड' सेवांसाठी करसूट

एआय आणि डिजिटल पायाभूत सुविधांचा प्रमुख देश म्हणून भारताची ओळख तयार करण्याचे संकेत सरकारने अर्थसंकल्पातून दिले आहेत. भारतात असलेल्या डेटा सेंटरचा वापर करून जागतिक

## क्लाउड सेवा, एआय




स्तरावर ग्राहकांना 'क्लाउड' सेवा देणाऱ्या परदेशी कंपन्यांसाठी सन २०४७पर्यंत करसूट देण्याचा प्रस्ताव सीतारामन यांनी मांडला. भारत एआयवरील जागतिक चर्चेत केंद्रस्थानी येण्याची तयारी करत असताना डेटा सेंटरना मोठे बळ मिळत आहे. यामुळे भारत केवळ जागतिक क्लाउड आणि एआय सेवांचा ग्राहक म्हणून नव्हे, तर जगाच्या डिजिटलकरणाचा एक भरभराटीचा आधार म्हणून स्थान मिळवेल, अशी अपेक्षा आहे. भारतातून जागतिक ग्राहकांना सेवा देण्यासाठी करलाभ देऊन देशाला क्लाउड कम्प्युटिंगसाठी निर्यात केंद्र करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. 'भारतातून डेटा सेंटर सेवा प्रदान करणारी कंपनी संबंधित संस्था असल्यास किंमतीवर १५ टक्के सुरक्षित सूट देण्यात येईल,' असे सीतारामन यांनी जाहीर केले.

### शेतकरी, विद्यार्थ्यांसाठी 'एआय'चा हात

शेतकऱ्यांसाठी 'भारत विस्तार' नावाचे एक नवीन बहुभाषिक एआय साधन जाहीर करण्यात आले आहे. हे साधन 'ॲग्रिस्टॅक पोर्टल' आणि 'आयसीएआर'च्या कृषी प्रणालीशी जोडले जाईल. यामुळे शेतकऱ्यांना हवामान अंदाज आणि पीक सल्ल्याबाबत मदत मिळेल. याशिवाय, शालेयस्तरापासूनच अभ्यासक्रमात 'एआय'चा समावेश करण्याचा प्रस्ताव आहे.

₹

- अर्थसंकल्पीय भाषणात अर्थमंत्र्यांकडून 'एआय'चा तब्बल ११ वेळा उल्लेख
- एआयसाठी मागील वर्षीच्या सुधारित तरतुदीपेक्षा दोनशे कोटींची अधिक तरतूद
- कमी खर्चात एआय सेवा देण्यासाठी १२ पायाभूत एआय मॉडेल्स विकसित करणार
- शालेय स्तरावर अभ्यासक्रमात 'एआय'चा समावेश

**मटा अँकर** ना सिंहस्थ निधी, ना धार्मिक कॉरिडोर; जुन्या प्रकल्पांनाही अर्थसंकल्पात ठेंगा

# नाशिकचा कुंभ यंदाही राहिला रिताच


म. टा. विशेष प्रतिनिधी, नाशिक

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शनिवार आधी सादर होणाऱ्या केंद्रीय अर्थसंकल्पात नाशिकचा कुंभ पुन्हा रिताच राहिला आहे. यापूर्वी घोषित केलेल्या निओ मेट्रो, नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वे, कृषी टर्मिनल, रेल्वे इंजिन कारखाना, रेलनीर प्रकल्प, ड्रायपोर्ट, निफाड संयंत्रासह प्रकल्पांचा साधा उल्लेखही अर्थसंकल्पात नसल्याने नाशिककरांची यंदाही निराशा झाली आहे.

म्युनिसिपल बॉन्डसाठी इन्सेंटिव्ह आणि शहरांच्या प्रकल्पांसाठी पाच हजार कोटींची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली असली, तरी त्यात नाशिकच्या वाट्याला काय मिळणार याची स्पष्टता नाही. त्यामुळे सिंहस्थासाठी भरीव तरतूद मिळेल, अशी अपेक्षा ठेवून असलेल्या प्रशासनासह नाशिककरांच्या तोंडाला पुन्हा पाने पुसली गेली आहेत. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी रविवारी लोकसभेत सादर केलेल्या सन २०२६ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात नाशिकला उत्तर महाराष्ट्राच्या विकासाला चालना मिळेल असे प्रकल्प जाहीर होतील अशी अपेक्षा होती. त्यात सन २०२७ मध्ये नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळा होत आहे. त्याच्या पार्श्वभूमीवर आधी सादर होणाऱ्या अर्थसंकल्पात नाशिकला प्रयागराजच्या धर्तीवर विशेष निधी मिळेल अशी अपेक्षा होती. त्यामुळे या अर्थसंकल्पाकडे नाशिकसह उत्तर महाराष्ट्रातील जनतेचे लक्ष लागले होते. परंतु, नाशिककरांच्या पदरी पुन्हा एकदा निराशाच आली आहे. नाशिकला उत्तर महाराष्ट्राच्या विकासाला चालना देण्यासाठी गेल्या तीन दशकांत अनेक घोषणा झाल्या. परंतु, त्या प्रत्यक्षात अद्याप आकारास आलेल्या नाहीत. नाशिकला उत्तर महाराष्ट्रासाठी या अर्थसंकल्पात नव्या घोषणा केलेल्या नसताना यापूर्वी जाहीर केलेल्या योजनांचा साधा उल्लेखही या अर्थसंकल्पात नसल्याने नाशिककरांची निराशा झाली आहे. महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधा उभारण्यासाठी कोट्यवधींची तरतूद या अर्थसंकल्पात आहे, असा दावा सत्ताधारी भाजपच्या शिवसेनेच्या शिंदे गट आणि अजित पवार गटाकडून केली जात असली, तरी प्रत्यक्षात अर्थसंकल्पात नाशिककरांच्या पदरात काहीच पडलेले नाही. मुंबई, पुणे, नागपूरच्या प्रकल्पांसाठी निधीची घोषणा होत असताना नाशिकमधील लोकप्रतिनिधींमध्ये इच्छाशक्तीचा अभाव आणि प्रशासकीय पातळीवर असलेली निराशा यामुळे नाशिकची पीछेहाट होताना दिसत आहे.

## नाशिकऐवजी पुणे-मुंबई हायस्पीड कॉरिडोर

नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वे प्रकल्प अडकलेला असताना मुंबई-पुणे हायस्पीड कॉरिडोरची घोषणा करण्यात आली असून, त्यात नाशिकला पुन्हा वगळण्यात आले आहे. तीन दशकांपासून प्रलंबित असलेल्या मनमाड-इंदूर रेल्वेमार्गाला गती देण्यासाठी निधीची तरतूद होईल अशी अपेक्षा होती. परंतु, ही अपेक्षादेखील फोल ठरली आहे. सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर नाशिकरोड रेल्वे स्टेशनवर पायाभूत सुविधा उभ्या करण्यासाठी विस्तारीकरणासाठी केंद्राच्या अर्थसंकल्पातून भरीव निधीची अपेक्षा होती. परंतु, त्यासाठी निराशाच हाती आल्याचे चित्र आहे.



## ...या प्रमुख प्रकल्पांना ठेंगा

| | |
|---|---|
| २४८० कोटींचा नमामि गोदा प्रकल्प | डिफेन्स इनोव्हेशन हब |
| नाशिकरोड कृषी टर्मिनल | नाशिक- पुणे हायस्पीड रेल्वे |
| मनमाड- इंदूर रेल्वेमार्गाला गती | नाशिकरोड रेल्वे इंजिन कारखाना |
| महापालिकेचे निओ मेट्रो प्रकल्प | नाशिकरोडला रेलनीर प्रकल्प |
| निफाडचा ड्रायपोर्ट प्रकल्प | प्रस्तावित रिंगरोड प्रकल्प |
| प्रस्तावित [illegible] प्रकल्प | द्वारका- नाशिकरोड डबलडेकर उड्डाणपूल |
| आदिवासींसाठी क्रीडा प्रबोधिनी | लॉजिस्टिक अन् आयटी पार्क |

## सिंहस्थ कुंभमेळ्याचा उल्लेखही नाही

नाशिक-त्र्यंबकेश्वरमधील सिंहस्थाच्या नियोजनासाठी पायाभूत सुविधांकरिता नाशिकमधील यंत्रणांनी २४ हजार कोटींचा आराखडा शासनाला सादर केलेला आहे. त्याला अद्याप मंजुरी मिळालेली नसली, तरी राज्याकडून १५ हजार कोटींची कामे सुरू असल्याचा दावा केला जात आहे. त्यात रिंगरोडसाठी मंजुरी दिली असून, साडेआठ हजार कोटींच्या रिंगरोडसाठी केंद्राने साडेतीन हजार कोटी देण्याची तयारी दर्शविली आहे. सिंहस्थानिमित्त नाशिकला अतिरिक्त निधी मिळाल्यास नाशिक शहराच्या विकासाला चालना मिळण्याची शक्यता होती. नाशिक-त्र्यंबकेश्वर धार्मिक कॉरिडोरची घोषणाही या अर्थसंकल्पात होईल अशी अपेक्षा होती. परंतु, सिंहस्थ कुंभमेळ्याचा साधा उल्लेखही या अर्थसंकल्पात न झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

# विवरणपत्र प्रक्रियेत आमूलाग्र सुधारणा

**सीए दिलीप सातभाई**



'प्राप्तिकर कायदा, २०२५'च्या 'कलम २६३'मध्ये करदात्यांद्वारे प्राप्तिकर विवरणपत्र दाखल करण्यासंबंधीच्या तरतुदी स्पष्ट केल्या आहेत. [illegible]

### अंतिम तारखांबाबतची तरतूद

[illegible]

### प्रस्तावित अंतिम तारखा

'प्राप्तिकर कायदा, १९६१'मधील

| करदात्यांचा वर्ग | लागू कलम | अंतिम तारीख |
|---|---|---|
| करदाता (कंपनी भागीदार किंवा अशा भागीदाराची पत्नी वगळून) | कलम १३९ | ३० नोव्हेंबर |
| कंपनी, केंद्रीय अधिनियम कायद्यानुसार ज्यांची खाती लेखापरीक्षित आहेत. | १३९ लागू नाही | ३१ ऑक्टोबर |
| लेखापरीक्षण आवश्यक नसलेले व्यवसाय | -- | ३१ ऑगस्ट |
| इतर करदाते | -- | ३१ जुलै |



केंद्र सरकारने 'प्राप्तिकर कायदा, २०२५'अंतर्गत प्राप्तिकर विवरणपत्र भरण्याच्या प्रक्रियेत करदात्यांसाठी दिलासादायक बदल प्रस्तावित केले आहेत. या बदलांचा उद्देश करदात्यांवरील अनुपालनाचा ताण कमी करणे, अंतिम तारखांमध्ये सुसूत्रता आणणे आणि अनवधानाने झालेल्या चुका सुधारण्याची संधी वाढवणे हा आहे.

### सुधारणा

[illegible]

### अंमलबजावणीची तारीख

[illegible]

### सुधारित विवरणपत्राच्या मुदतीत वाढ

[illegible]

### मुदतवाढीची गरज

[illegible]

### अंमलबजावणी

[illegible]

### लहान करदात्यांच्या परदेशी मालमत्ता (फास्ट डीएस २०२६)

[illegible]

### सध्याचे अद्ययावत विवरणपत्र

- तोट्याचे विवरणपत्र भरू शकत नाही.
- करदायित्व कमी करू शकत नाही.
- परतावा वाढवू शकत नाही.

### प्रस्तावित दिलासा

[illegible]

### अतिरिक्त प्राप्तिकराबाबत तरतूद

[illegible]

### अंमलबजावणी

[illegible]

(लेखक ज्येष्ठ सीए आहेत.)



## नवीन करप्रणाली

(एक एप्रिल २०२६पासून अंमलबजावणी)

| उत्पन्नमर्यादा | कराचा दर |
|---|---|
| शून्य ते चार लाखांपर्यंत | ---- |
| चार ते आठ लाखांपर्यंत | पाच टक्के |
| आठ ते १२ लाखांपर्यंत | १० टक्के |
| १२ ते १६ लाखांपर्यंत | १५ टक्के |
| १६ ते २० लाखांपर्यंत | २० टक्के |
| २० ते २४ लाखांपर्यंत | २५ टक्के |
| २४ लाख किंवा त्यापेक्षा अधिक | ३० टक्के |

## रुपया असा येणार




## रुपया असा जाणार



# ध्वजस्तंभ उभारण्याची तयारी

म. टा. विशेष प्रतिनिधी, नाशिक

नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर ध्वजस्तंभ व पताका यांच्या रचना व उभारणीवर सिंहस्थ प्राधिकरणाकडून काम सुरू झाले आहे. यात ध्वजस्तंभांची उंची ५१ फूट व ३१ फूट अशी असेल. त्यांची पायाभरणी अनुक्रमे १ फूट व ८ इंच त्रिज्येची असेल. पाया साधा ठेवण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

स्मार्ट सिटी मिशन कार्यालय येथे ध्वजस्तंभ व पताका यांच्या रचना व उभारणीवर शुक्रवारी (दि. ३०) प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली आढावा आणि नियोजन बैठक झाली. यावेळी कुंभमेळ्याच्या काळात उभारण्यात येणाऱ्या ध्वजस्तंभ व पताकांचे

## प्राधिकरणाने घेतली पुरोहित संघासोबत बैठक

नियोजन, स्थापत्य रचना, साहित्य निवड, उंची, धार्मिक व सांस्कृतिक प्रतीकात्मकता यावर चर्चा झाली. बैठकीस पालिका आयुक्त मनीषा खत्री, शहर अभियंता संजय अग्रवाल, कार्यकारी अभियंता राहुल पाटील, कार्यकारी अभियंता स्नेहल पगारे, पुरोहित संघ अध्यक्ष चंद्रशेखर पंचाक्षरी, रामानंदाचार्य दक्षिण पीठाचे सचिव प्रवीण ठाकूर, गंगा गोदावरी पुरोहित संघाचे उपाध्यक्ष दिलीप शुक्ला, पुरोहित संघ त्र्यंबकचे अध्यक्ष मनोज एन. जेते, श्रीपाद अकोलकर, सुयोग एस. देवकुटे उपस्थित होते.

## समुद्रमंथन संबंधित संदर्भाचा समावेश

सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रस्तावित नियोजन व रचनेबाबत सादरीकरण केले. ध्वजस्तंभ मजबूत व टिकाऊ पायाभरणीसह उभारण्यात येणार असून, कोणत्याही प्रकारचे संरचनात्मक नुकसान होऊ नये याची काळजी घेतली जाणार आहे. कुंभमेळ्याच्या पौराणिक महत्त्वाशी निगडित प्रतीकात्मक कोरीव काम, विशेषतः समुद्रमंथनाशी संबंधित संदर्भ, ध्वजस्तंभांवर समाविष्ट करण्यात येणार आहेत. पताकांची रचना पुरोहित संघांकडून करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

# 'पीएम घरकुल'मधून चार कोटी घरे प्रस्तावित

**नवी दिल्ली :** अर्थसंकल्पात बांधकाम क्षेत्र हे आर्थिक विकासाचे इंजिन मानून अनेक महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आल्या आहेत. पीएम घरकुल योजनेचा विस्तार करून, चार कोटी घरे बांधणे, १४ मोठ्या शहरांसाठी मेट्रो स्थानकांच्या परिसरात निवासी व व्यावसायिक बांधकामांना चालना देणे, एक लाख कोटी रुपयांचा वाढीव भांडवली खर्च, दस्तनोंदणीचे आधुनिकीकरण आदी सुधारणात्मक उपाययोजना सुचवण्यात आल्या आहेत.

केंद्रीय गृहनिर्माण आणि नगरविकास मंत्रालयासाठी अर्थसंकल्पात ८५,५२२.३९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. याच मंत्रालयामार्फत पीएम घरकुल योजना राबविण्यात येते. पीएम घरकुल योजनेसाठी (शहरी) सहा हजार कोटी रुपये राखून ठेवण्यात आले आहेत. त्याखेरीज या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यासाठी १२,६२५.०५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

केंद्रीय गृहनिर्माण व नगरविकास मंत्रालयामार्फत बांधण्यात येणाऱ्या 'सेंट्रल विस्टा'सारख्या प्रकल्पांसाठी चार हजार कोटी रुपयांची तरतूद आहे. स्मार्ट सिटी योजनेसाठी यंदा कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. तर पीएम-ई बस सेवा योजनेसाठी ५०० कोटी रुपये देण्यात आले आहेत.

शहरी आपत्ती निधी हा निधी या अर्थसंकल्पात नव्यानेच तयार करण्यात आला असून, त्यासाठी १० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

## गृहनिर्माण



### चार कोटी नवे घरे बांधणार

सरकारने 'पीएम आवास योजना' अंतर्गत पुढील टप्प्यात ग्रामीण आणि शहरी भागात मिळून ४ कोटी नवीन घरे बांधण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यामुळे सिमेंट, पोलाद आणि विटांच्या मागणीत मोठी वाढ होऊन बांधकाम क्षेत्राला गती मिळेल. राज्य सरकारांनी मुद्रांक शुल्क कमी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जमिनीच्या नोंदींच्या संगणकीकरणासाठी 'जीआयएस मॅपिंग' आणि 'युनिक लँड पार्सल आयडेंटिफिकेशन नंबर'च्या अंमलबजावणीसाठी निधी दिला जाईल.

₹

- पीएम घरकुल योजनेतून चार कोटी घरे बांधणी प्रस्तावित
- वाढीव भांडवली खर्चातून शहरी भागांत पायाभूत सुविधांचा विकास करणार
- जमिनीच्या नोंदींच्या संगणकीकरणाला गती देणार
- नवी १२ औद्योगिक शहरे विकसित केली जाणार
- बांधकाम क्षेत्रातील तरतुदींमुळे सिमेंट, पोलाद, विटा यांना मागणी वाढणे अपेक्षित

# करतंट्यातून मुक्ती

■ सीए संजीव गोखले



गेल्या वर्षी अर्थसंकल्प सादर करताना १२ लाख रुपयांच्या आत वार्षिक उत्पन्न असेल तर त्यावर नवीन कर प्रणालीत कोणताही कर भरावा लागणार नाही, अशी मोठी घोषणा करण्यात आली होती. त्यामुळे या वर्षी करदात्यांना पुन्हा मोठ्या सवलती दिल्या जातील, अशी अपेक्षा नव्हती. असे असले तरी काही प्रमाणात कर कमी होईल; निदान पगारदार करदात्यांना मिळणाऱ्या प्रमाणित वजावटीत वाढ होईल असे वाटत होते. परंतु प्रत्यक्ष या अर्थसंकल्पात कररचनेत कोणताही बदल केला गेला नाही. कोणतीही सवलत किंवा वजावट दिलेली नाही. मात्र करदात्यांना काही दिलासा मिळेल अशा काही तरतुदी त्यात आहेत.

**अर्थसंकल्पाने करात कुठलीही सवलत वा वजावट दिलेली नाही. मात्र, करतंट्यांतून मुक्तता मिळेल, अशी पावले टाकलेली आहेत.**

कर विवरणपत्र सादर करण्यासाठी ३१ जुलै ही अंतिम तारीख असते. त्यानंतर विलंब शुल्क भरून विवरणपत्र सादर करता येते. लेखा परीक्षण न लागणाऱ्या सगळ्याच करदात्यांना याच तारखेच्या आत विवरणपत्र सादर करावे लागते. साहजिकच शेवटच्या दिवशी वेबसाइटवर ताण येतो. यासाठी पगारदार व्यक्ती आणि निवृत्तिवेतन मिळणाऱ्या करदात्यांना ३१ जुलै आणि व्यापार किंवा व्यवसाय करणाऱ्या करदात्याला ३१ ऑगस्ट अशा दोन तारखांपर्यंतची मुदत विवरणपत्र सादर करण्यासाठी असेल. त्यामुळे वेबसाइटवर येणारा ताण कमी होईल.

सुधारित किंवा उशिराने विवरणपत्र सादर करण्यासाठी ३१ डिसेंबर ही तारीख होती. ती वाढवून ३१ मार्चपर्यंत हे विवरणपत्र सादर करता येईल, असा बदल केला गेला आहे. यामुळे काही अपरिहार्य कारणाने विवरणपत्र सादर करता न आलेल्या करदात्यांना तीन महिन्यांचा अतिरिक्त कालावधी मिळेल.

करपात्र उत्पन्न नसेल तर फॉर्म १५ एच किंवा जी देऊन मुळातून करकापात करू नका, अशी विनंती केली जायची. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना प्रत्येक कंपनीत स्वतंत्र फॉर्म भरावा लागत असे. मात्र ज्या ठिकाणी डिमॅट खाते असेल तिथे फॉर्म १५ एच किंवा जी दिल्यास त्या खात्यात असलेल्या सर्व कंपन्या मुळातून कर कापणार नाहीत. हा मोठा दिलासा करदात्यांना या तरतुदीमुळे मिळेल.

परदेशातील मालमत्ता निवासी करदात्यांना विवरणपत्रात दाखवावी लागते. तसेच उत्पन्न मिळत असेल तर त्यावर करही भरावा लागतो. असे न केल्यास मोठ्या दंडाला सामोरे जावे लागते. या ऐवजी आता दंड न घेता, न भरलेला कर आणि त्यावर अतिरिक्त ३० टक्के कर भरून दंड वाचवता येईल, अशी महत्त्वाची घोषणा अर्थसंकल्पात आहे. अनेक ठिकाणी दंड न आकारता ठराविक शुल्क भरून करदात्याला प्रकरण मिटवता येईल. एकंदरीत दंडाची कारवाई आणि त्यातून निर्माण होणारे तंटे यातून करदात्याला सुटकेचा मार्ग उपलब्ध करून दिला गेला आहे.

कर निर्धारण केल्यावर करदात्याला त्याविषयी अपील सादर करताना निर्धारित कराच्या २० टक्के कर अनामत म्हणून भरावा लागत होता. ही तरतूद खूपच जाचक होती. यासाठी आता केवळ १० टक्के कर भरावा लागेल, अशी सुधारित तरतूद केली गेली आहे. यामुळे कर विवादाचे निराकरण होईपर्यंत अडकून राहिलेली रक्कम कमी होईल. विशेष करून व्यावसायिकांना याचा फायदा होईल.

एकंदरीत या अर्थसंकल्पात करसवलती दिल्या नसल्या तरी करदात्यांच्या अडचणी लक्षात घेऊन त्यावर उपाय आखले गेले आहेत. तसेच एसटीटीखेरीज कोणताही अतिरिक्त कर लावला गेलेला नाही. भांडवली नफ्यावर लागणाऱ्या करात कोणतीही वाढ केलेली नाही. हीच या अर्थसंकल्पाची जमेची बाजू आहे. वित्तीय तूट, सरकारी खर्च आणि सरकारी कर्ज या सगळ्याच बाबींमध्ये शिस्त पाळण्यात आल्यामुळे एक चांगला अर्थसंकल्प असे याचे वर्णन करावे लागेल.

(लेखक करसल्लागार आहेत.)

# हवाई वाहतूक क्षेत्रातील पूरक उद्योगांना बळ

**नवी दिल्ली :** देशाच्या विविध भाग विमान वाहतुकीने जोडण्याच्या दृष्टीने 'उडान' योजनेला बळ देण्याचा मानस अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आला आहे. त्याचबरोबर विमानतळांच्या आधुनिकीकरणासाठी सार्वजनिक-खासगी भागीदारीवर भर दिला जाणार आहे. अर्थसंकल्पातील निर्णय धोरणात्मक असून, त्यामध्ये आकडेवारीचा समावेश करण्यात आलेला नाही.

नागरी आणि लष्करी विमान वाहतुकीसाठी या अर्थसंकल्पात येथे तरतुदींवर धोरणात्मक बाबींवर भर देण्यात आला आहे. प्रशिक्षणासाठीची प्रवासी विमाने आणि इतर एअरक्राफ्ट (हेलिकॉप्टर वगैरे) यासाठी लागणारे घटक आणि सुटे भाग यावरील मूळ उत्पादन शुल्क माफ करण्यात आले आहे.

संरक्षण क्षेत्रातील कंपन्यांकडून विमाने व इतर एअरक्राफ्टसाठी लागणाऱ्या घटकांच्या व सुट्या भागांचे उत्पादन, देखभाल, दुरुस्ती यासाठी आयात केल्या जाणाऱ्या कच्च्या मालावरील मूळ आयातशुल्कही माफ करण्यात आले आहे.

**१२० नवे विमानतळ उभारणार**

गेल्या काही वर्षात सरकारने हवाई वाहतूक क्षेत्राचा विस्तार करण्याचे धोरण अंगीकारले आहे. त्यासाठी छोट्या व मध्यम शहरांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या शहरांना जोडणारी 'उडान' योजनेचा विस्तार करण्याची योजना आखली आहे.




पुढील १० वर्षात १२० नवीन ठिकाणांना विमानसेवेने जोडण्याचे आणि अतिरिक्त ४ कोटी प्रवाशांना लाभ देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत विशेषतः डोंगराळ भाग, ईशान्येकडील राज्ये आणि महत्त्वाकांक्षी जिल्ह्यांमध्ये लहान विमानतळ आणि हेलिपॅड विकसित करण्यावर भर दिला जाईल.

- नागरी विमान वाहतूक मंत्रालयासाठी २४००.३१ कोटी रुपये तरतूद
- नागरी विमान वाहतूक महासंचालनालय (डीजीसीए) आणि नागरी विमान वाहतूक सुरक्षा ब्युरो (बीसीएएस) यांच्या साठी अनुक्रमे ३३० कोटी आणि ९५ कोटी रुपयांची तरतूद
- देशभरात ५० नवीन विमानतळ विकसित करण्यासाठी आराखडा तयार करण्यात आला आहे.
- बिहारमध्ये नवीन ग्रीनफील्ड विमानतळ आणि बिहटा येथे विमानतळ विकसित करण्याचा प्रस्ताव

**हवाई मालवाहतुकीचे आधुनिकीकरण**

एअर कार्गो आधुनिकीकरण करण्यासाठी नाशवंत वस्तूंच्या (उदा. कृषी उत्पादने) साठा वाहतुकीसाठी एअर कार्गो गोदामे उभारण्यासाठी गुंतवणूक केली जाईल. कारण कस्टम्सची प्रक्रिया अधिक सुलभ आणि डिजिटाइज केली जाईल. शेतमाल आणि नाशवंत मालाची वाहतूक हवाई मार्गे झाल्यास या मालाचे नुकसान टाळणे शक्य होणार आहे. त्या दृष्टीने गोदाम उभारणी, प्रक्रिया सुलभीकरण या बाबी अधिक महत्त्वाच्या ठरणार आहेत.




पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळ

**विमान वाहतुकीलाही चालना**

नागरी तसेच संरक्षण विमानवाहतूक क्षेत्रातील देशांतर्गत उत्पादनाला चालना देण्यासाठी महत्त्वाच्या सीमाशुल्क सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यातून 'मेक इन इंडिया' धोरणाशी सुसंगत असून, देशांतर्गत उत्पादन, गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीला प्रोत्साहन देण्याचा उद्देश स्पष्ट होतो. विमानवाहतूक आणि संरक्षण क्षेत्रात भारताला जागतिक उत्पादन केंद्र म्हणून उभे करण्याच्या दिशेने टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल आहे, अशी प्रतिक्रिया केंद्रीय नागरी वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली.

# छायाचित्र प्रदर्शनाची नाशिककरांना मेजवानी

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

## डॉ. विनय ठकारांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आजपासून आयोजन


नांदूरमध्यमेश्वर अभयारण्य, वन्यजीव विभाग, महाराष्ट्र पक्षीमित्र आणि वेटलँड एज यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. विनय ठकार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. आजपासून (दि. २) या तीन दिवसीय प्रदर्शनाला सुरुवात होणार आहे. यावेळी जिल्ह्यातील निसर्ग व वन्यजीव छायाचित्रकारांनी रेखाटलेली छायाचित्र बघण्याची संधी नाशिककरांना मिळणार आहे.

प्रदर्शनाचे उद्घाटन सोमवार (दि. २) सायंकाळी ६ वाजता होणार आहे. सकाळी दहा ते रात्री आठ वाजेपर्यंत प्रदर्शन खुले असणार आहे. प्रदर्शनात नाशिकमधील प्रसिद्ध छायाचित्रकार अनंत सरोदे, अनिल माळी, सतीश गोगटे, शिरीष कालकोतवार, बाबासाहेब गायकवाड, प्रशांत वाघ, मिलिंद देशमुख, अनिरुद्ध जाधव, संग्राम गोवर्धने, वेद शिंदे, दिलीप गिते, किशोर वडनेरे, प्रवीण दौंड, राहुल वडगुले, सीमा तांगडपल्ली, सीमा पाटील, प्रतिभा ठकार यांनी साकारलेल्या कलाकृतींचा समावेश असेल.

यानिमित्ताने नांदूरमध्यमेश्वर अभयारण्य रामसर स्थळ सेवा गौरव पुरस्कारांचेही वितरण केले जाणार आहे. यावेळी रामेश्वर सारडा, सुनील वाडेकर यांना सन्मानित केले जाईल. कार्यक्रमासाठी दत्ता उगावकर, हिरालाल चौधरी उपस्थित असणार आहेत. नाशिककरांनी प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अनिल माळी आणि अनंत सरोदे यांनी केले आहे.

# धोरणी व भविष्यवेधी अर्थसंकल्प

डॉ. अभिजित फडणीस





वरकरणी निराश करणारा, पण अंतरंगात साक्षेपी, धोरणी व भविष्यवेधी असा हा अर्थसंकल्प आहे, असे त्याचा सखोल आढावा घेता जाणवते.

# रुग्णांसाठी 'मेडिकल हब'ची सुदृढ व्यवस्था

यंदाच्या अर्थसंकल्पात आरोग्य क्षेत्रावर विशेष लक्ष देण्यात आले असून या क्षेत्राच्या तरतुदीमध्ये दहा टक्क्यांची वाढ करण्यात आली आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाला १,०६,५३०.४२ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले. मेडिकल टूरिझममध्ये प्रमुख ठिकाण म्हणून भारताला प्रोत्साहन देण्यासाठी पाच प्रादेशिक मेडिकल हब स्थापन करण्याच्या दृष्टीने राज्यांना पाठबळ देण्यासाठी सरकारने योजना प्रस्तावित केली आहे. खासगी क्षेत्राच्या भागीदारीने हे हब उभारले जाणार आहेत.

हे हब वैद्यकीय, शैक्षणिक आणि संशोधन सुविधा एकत्रित करणारे एकात्मिक आरोग्यसेवा संकुल म्हणून काम करेल, असे सीतारामन यांनी सांगितले. १,०६,५३०.४२ कोटींपैकी १,०१,७०९.२१ कोटी रुपये आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागासाठी आणि आरोग्य संशोधन विभागासाठी ४,८२१.२१ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहेत.

## आयुर्वेदाला बळ

करोनाकाळानंतर आयुर्वेदाला जागतिक स्तरावर स्वीकारले गेले. योगासनांना ओळख मिळाली, यावर सीतारामन यांनी भर दिला. या क्षेत्रात संशोधनाला आणखी वाव देण्यासाठी त्यांनी तीन नव्या अखिल भारतीय आयुर्वेद संस्था स्थापन करण्याची घोषणा केली. 'दर्जेदार आयुर्वेद उत्पादने औषधी वनस्पतींचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना आणि उत्पादनांवर प्रक्रिया करणाऱ्या तरुणांना मदत करतात,' असे सीतारामन यांनी नमूद केले. अर्थसंकल्पात आयुष फार्मसी आणि औषध चाचणी प्रयोगशाळा अद्ययावत करण्याचे आणि आणखी कुशल कर्मचारी उपलब्ध करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. जामनगरमधील जागतिक आरोग्य संघटनेचे (डब्ल्यूएचओ) ग्लोबल ट्रॅडिशनल मेडिसिन सेंटर अद्ययावत करण्याचीही सीतारामन यांनी जाहीर केले.




- पाच प्रादेशिक 'मेडिकल हब' स्थापन करण्यासाठी खासगी क्षेत्रासोबत भागीदारी
- आयुर्वेदाच्या प्रोत्साहनासाठी तीन नव्या आयुर्वेद संस्था स्थापन करणार
- आरोग्य मंत्रालयाला १,०६,५३०.४२ कोटी रुपयांचे वाटप
- खासगी, सरकारी क्षेत्रांमध्ये नवीन 'अलाइड हेल्थकेअर प्रोफेशनल्स' संस्था



सरकारी रुग्णालये ही आजही सर्वसामान्यांचा आधार आहेत. जे.जे. रुग्णालयातील सामान्य रुग्णांची गर्दी ही सार्वजनिक आरोग्य सेवेच्या आवश्यकतेचे प्रातिनिधिक उदाहरण.

## 'आयुष'साठी ४,४०८.९३ कोटी

आयुष मंत्रालयाच्या अर्थसंकल्पीय तरतुदीत २० टक्के वाढ झाली आहे. २०२५-२६मध्ये 'आयुष'साठी ३,६०९.८२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती, तर २०२६-२७मध्ये ४,४०८.९३ कोटी रुपये करण्यात आले आहे. राष्ट्रीय आयुष मिशनसाठीची २०२५-२६मधील ७८०.९६ कोटी रुपयांच्या तरतुदीत वाढ करत २०२६-२७मध्ये ती १,३०० कोटी रुपये करण्यात आली आहे. ही वाढ ६६.५ टक्के आहे. अखिल भारतीय आयुर्वेद संस्थेसाठीची तरतूद मात्र १२ टक्क्यांनी कमी करण्यात आली आहे. आयुर्वेद शिक्षण आणि संशोधन संस्थेसाठीचा निधी २७९.२४ कोटी रुपयांवरून २११.०५ कोटी रुपयांपर्यंत कमी करण्यात आला आहे.

## १ लाख आरोग्य व्यावसायिक

पुढील पाच वर्षांत नेत्रोपचारशास्त्र, रेडिओलॉजी, भूल आणि उपयोजित मानसशास्त्र यांसह विविध क्षेत्रांमध्ये सुमारे एक लाख संबंधित आरोग्य व्यावसायिकांना जोडून घेण्याची घोषणा राज्य सरकारने रविवारी केली. संलग्न आरोग्य व्यावसायिकांसाठी असलेल्या विद्यमान संस्थांचे आधुनिकीकरण केले जाईल आणि खासगी, सरकारी क्षेत्रांमध्ये नवीन 'अलाइड हेल्थकेअर प्रोफेशनल्स' (एएचपी) संस्था स्थापन केल्या जातील. यामुळे आरोग्य क्षेत्रात भारतातील तरुणांसाठी कुशल करिअरच्या संधींची एक नवीन श्रेणी निर्माण होईल. नेत्रोपचारशास्त्र, रेडिओलॉजी, भूल, शस्त्रक्रिया तंत्रज्ञान, उपयोजित मानसशास्त्र यांसह १० निवडक क्षेत्रांचा यात समावेश असेल आणि पुढील पाच वर्षांत १ लाख एएचपी जोडले जातील, असे निर्मला सीतारामन म्हणाल्या. प्रथमच एएचपीसाठी एक हजार कोटींचे वाटप करण्यात आले आहे.

## वृद्धांसाठी काळजीवाहू

वृद्धांसाठीच्या आरोग्यासाठी निगडित काळजीच्या सेवांचा समावेश असलेली एक मजबूत काळजी प्रणाली तयार करण्याची घोषणा करण्यात आली आहे. या अंतर्गत राष्ट्रीय कौशल्य पात्रता आराखड्याशी संबंधित विविध उपक्रम विकसित केले जाणार आहेत. त्यातून, मुख्यत्वे लोकांची काळजी, आरोग्यसेवा, योग व वैद्यकीय सहायक उपकरणांचे संचालन यांसारख्या संलग्न कौशल्य असलेल्या बहु-कुशल काळजीवाहकांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. येत्या वर्षात १.५ लाख काळजीवाहकांना प्रशिक्षण दिले जाईल.

## मानसिक आरोग्याला बळकटी

झारखंडची राजधानी आणि मानसिक आरोग्य संस्थांसाठी ओळखल्या जाणाऱ्या रांचीमध्ये मानसिक आरोग्य संस्थेची (नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ ॲण्ड न्यूरो सायन्सेस) स्थापना करण्यात येणार आहे. रांचीतील हे दुसरे केंद्र असून पहिले बेंगळूरु येथे उभारण्यात आले आहे.

# विकास-वित्तीय शिस्तीचे संतुलन


■ सीए डॉ. योगेश सातपुते




केंद्र सरकारचा भांडवली खर्च २०२५-२६च्या सुधारित अंदाजातील १०.९६ लाख कोटी रुपयांवरून २०२६-२७ मध्ये १२.२१ लाख कोटी रुपयांवर पोहोचला आहे. एकंदरीत प्रभावी भांडवली खर्च (४.९ लाख कोटी अनुदानासह) विक्रमी १७.१५ लाख कोटींवर गेला आहे. यामध्ये राज्य व स्थानिक संस्थांना भांडवली निर्मितीसाठी ४.९३ लाख कोटींचे अनुदान दिले गेले आहे. त्यामुळे केंद्र-राज्य समन्वय अधिक मजबूत झाला असून, राज्यांना मोठ्या प्रमाणात भांडवल उपलब्ध होईल.

अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले की, सार्वजनिक भांडवली खर्च २०१४-१५ मध्ये दोन लाख कोटींवरून २०२५-२६ मध्ये ११.२ लाख कोटींवर पोहोचला आहे. २०२६-२७ मध्ये तो १२.२ लाख कोटींवर नेण्याचा प्रस्ताव आहे. हा खर्च अंदाजित जीडीपीच्या ४.४ टक्के इतका आहे. हा आकडा आतापर्यंतचा सर्वाधिक आहे. यामुळे ७ टक्क्यांपेक्षा जास्त आणि सलग वाढ साध्य करण्यासाठी सार्वजनिक भांडवली खर्च नायकाच्या भूमिकेत असल्याचे अधोरेखित होते. भारताच्या विकास धोरणात पायाभूत सुविधा कायम केंद्रस्थानी राहिल्या आहेत. सन २०१५पासून सार्वजनिक भांडवली खर्च सातत्याने वाढत असून, अलीकडील वर्षांत त्याला अधिक गती मिळाली आहे. रस्ते, रेल्वे, बंदरे, ऊर्जा, विमान वाहतूक आणि डिजिटल पायाभूत सुविधा यामधील मोठ्या प्रमाणावरील गुंतवणुकीमुळे संपर्कक्षमता मजबूत झाली आहे, क्षमता विस्तारली आहे आणि लॉजिस्टिक्स कार्यक्षमता सुधारली आहे. यामुळे आर्थिक वाढ व उत्पादनक्षमतेसाठी अगदी सक्षम गुणक निर्माण झाले आहेत, असे आर्थिक सर्वेक्षणाने नमूद केले आहे. पायाभूत सुविधांवरील भांडवली खर्चाचा अर्थव्यवस्थेवर अत्यंत सकारात्मक परिणाम होतो. २०२५-२६च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार, पायाभूत सुविधा उभारणीसाठी खर्च केलेल्या प्रत्येक एक



> **पायाभूत सुविधा आधारित विकासाला सातत्याने चालना देण्यावर अर्थसंकल्पात भर आहे. हा विकास साधताना वित्तीय शिस्त राखली आहे.**

रुपयामागे देशाचा जीडीपी २.५ ते ३.५ने वाढतो.

अर्थात मोठ्या खर्चासाठी लागणारे भांडवल म्हणजे २०२६-२७च्या केंद्रीय अर्थसंकल्पात सरकारने एकूण १७.२ लाख कोटींचे स्थूल कर्जउभारणीचे लक्ष्य निश्चित केले आहे. यापैकी निव्वळ बाजार कर्जउभारणी ११.७ लाख कोटी इतकी अपेक्षित आहे. ही आकडेवारी वित्तीय शिस्तीच्या स्पष्ट प्रवासाला अधोरेखित करते, कारण राजकोषीय तूट ही गेल्या वर्षातील ४.४ टक्क्यांवरून २०२६-२७ मध्ये ४.३ टक्क्यांपर्यंत कमी झाली आहे. जरी तूट कमी झाली असली तरी स्थूल कर्जउभारणी अपेक्षेपेक्षा जास्त आहे. यामागील मुख्य कारण म्हणजे ५.५ लाख कोटींच्या मोठ्या परतफेडीची जबाबदारी. या परतफेडीमुळे सरकारला अतिरिक्त निधी उभारावा लागेल, ज्यामुळे बाजारातील बाँड्सचा पुरवठा वाढेल आणि यामुळे बाँड बाजारावर दबाव येईल आणि व्याजदर देखील किंचित वाढतील अशी शक्यता नाकारता येत नाही. तरीही, राजकोषीय तूट कमी होत असल्याने दीर्घकालीन दृष्टीने अर्थव्यवस्था अधिक स्थिर व विश्वासार्ह बनत आहे. या अर्थसंकल्पात भविष्यवेधी पायाभूत सुविधांवर विशेष भर देण्यात आला आहे.

■ **भांडवली खर्चाचा तपशील**

२०२६-२७ च्या अर्थसंकल्पात वाहतूक क्षेत्राला सर्वाधिक प्राधान्य दिले असून, रेल्वेसाठी २.७७ लाख कोटी रुपये आणि रस्ते विकासासाठी २.७५ लाख कोटींची विक्रमी तरतूद केली आहे. संरक्षण क्षेत्राचा भांडवली खर्च मागील वर्षाच्या तुलनेत १७.६ टक्क्यांने वाढवून २.१९ लाख कोटी रुपये करण्यात आला आहे, ज्यामुळे नवीन विमाने आणि उपकरणांच्या खरेदीला वेग येईल. ग्रामीण विकासांतर्गत थेट भांडवली खर्च कमी असला तरी, पंतप्रधान आवास योजना (पीएमएवाय) आणि ग्राम सडक योजनेद्वारे (पीएमजीएसवाय) ग्रामीण भागात मालमत्ता निर्मितीसाठी अनुदानावर भर देण्यात आला आहे. तसेच, ऊर्जा क्षेत्रात अणुऊर्जा प्रकल्प, ग्रीन हायड्रोजन मिशन आणि सौरऊर्जेसाठी (पीएम-सूर्यघर) विशेष तरतूद करण्यात आली असून, या क्षेत्रातील मोठी गुंतवणूक सरकारी कंपन्यांच्या माध्यमातून अपेक्षित आहे.

याशिवायही काही महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या आहेत. पायाभूत सुविधा जोखीम हमी निधी, केंद्रीय सार्वजनिक कंपन्यांच्या मालमत्तांचा आरईआयटीद्वारे पुनर्वापर, नवीन मालवाहतूक कॉरिडॉर (डांकुनी-सुरत), २० राष्ट्रीय जलमार्ग, किनारी मालवाहतूक प्रोत्साहन योजना (२०४७ पर्यंत ६ टक्क्यांवरून १२ टक्के वाटा), सी-प्लेन व्हीजीएफ, राज्यांसाठी २ लाख कोटी रुपयांची एसएएससीआय योजना, आणि पूर्वोदय योजना (ईस्ट कोस्ट इंडस्ट्रियल कॉरिडॉर) या त्यातील काही महत्त्वाच्या घोषणा. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारताने संरक्षण क्षेत्रातील आधुनिकीकरणाला प्राधान्य दिले आहे. या संघर्षाने सुरक्षा वातावरणात नवे आव्हान निर्माण केले असून, त्याला उत्तर म्हणून संरक्षण खर्चात ही मोठी वाढ करण्यात आली आहे. भांडवली खर्चाची तरतूद एकटीच २.१९ लाख कोटी रुपये इतकी असून, त्यातील प्रमुख वाटा लढाऊ विमाने, नौदल ताफा, पाणबुड्या तसेच स्वदेशी संरक्षण उत्पादनासाठी करण्यात आले आहे.

शहरीकरणाला नवा दृष्टिकोन 'सिटी इकॉनॉमिक रीजन्स'द्वारे मिळतो. टियर दोन व तीनची शहरे व मंदिरनगरींसाठी प्रत्येकी पाच हजार कोटींचा निधी पाच वर्षांत दिला जाणार आहे. तसेच ७ हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर (उदा. मुंबई-पुणे, दिल्ली-वाराणसी) प्रस्तावित आहेत. अर्थसंकल्पात पुढील पाच वर्षांसाठी कार्बन कॅप्चर, युटिलायझेशन आणि स्टोरेज (सीसीयूएस) तंत्रज्ञानासाठी २०,००० कोटींची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. ही गुंतवणूक रसायन, ऊर्जा, पोलाद, सिमेंट आणि रिफायनरी या पाच प्रमुख क्षेत्रांमध्ये केली जाणार आहे. हरित उपक्रम म्हणून सीसीयूएस तंत्रज्ञान कार्बन डायऑक्साइडचे संकलन करून त्याचा पुनर्वापर किंवा सुरक्षित साठवणूक करते, ज्यामुळे औद्योगिक प्रदूषण कमी होऊन शाश्वत विकासाला चालना मिळते. लिथियम-आयन सेल्स, सोलर ग्लास, न्यूक्लियर वस्तू व महत्त्वाच्या खनिज प्रक्रियेसाठी करात सूट दिली आहे.

या अर्थसंकल्पात निर्गुंतवणुकीस स्वतंत्र लक्ष्य न देता तीस 'इतर प्राप्ती'त ८०,००० कोटींवर समाविष्ट केले आहे. ही २.४ पट वाढ असून, पीएसयू बँकांतील हिस्सेविक्री, धोरणात्मक खासगीकरण (आयडीबीआय बँक, शिपिंग कॉर्प), आणि मालमत्ता चलनीकरण यावर आधारित आहे. अर्थमंत्र्यांनी गुणवत्तापूर्ण अंमलबजावणीवर भर दिला आहे, तेही वेळेत पूर्ण होणाऱ्या, मूल्यवर्धक प्रकल्पांवर लक्ष केंद्रित करून.

■ **बाजारपेठ व अर्थव्यवस्थेवरील परिणाम**

भांडवली खर्चाची सातत्यपूर्ण वाढ पायाभूत सुविधा, भांडवली वस्तू, सिमेंट, स्टील यांना चालना देईल असे वाटते. शहरी व टियर-दोन केंद्रित गुंतवणूक रिअल इस्टेट व लॉजिस्टिक्सला बळकटी देईल. निर्गुंतवणुकीमुळे सार्वजनिक बँका व शिपयार्डसच्या मूल्यात वाढ होईल.

हा अर्थसंकल्प निर्णायक कृती करणारा आहे. १२.२ लाख कोटींचा भांडवली खर्च हा विकासाचे इंजिन ठरतो, तर ८०,००० कोटींचा निर्गुंतवणूक हा त्याचा वित्तीय आधार आहे. विकसित भारताच्या आकांक्षा आणि वित्तीय शिस्त यांचा संतुलित संगम या अर्थसंकल्पातून दिसतो.


(लेखक अर्थविषयक अभ्यासक आहेत.)

# अर्थसंकल्पात कुंभमेळ्यासाठी तरतुदीची गरज नाही - गिरीश महाजन

**नाशिक :** गोदावरी काठावर नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी सुमारे ३० हजार कोटींच्या आराखड्याच्या आधारे कामे सुरू झाली असताना केंद्रीय अर्थसंकल्पात कुंभमेळ्यासाठी कुठलीही तरतूद केली गेली नसल्याची टीका होत आहे. यावर कुंभमेळामंत्री गिरीश महाजन यांनी अर्थसंकल्पात कुंभमेळ्यासाठी वेगळी तरतूद करण्याची गरज नसल्याचा दावा केला आहे. नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्यात पाच ते सात कोटी भाविक सहभागी होण्याचा अंदाज आहे. हे लक्षात घेऊन केंद्र आणि राज्य सरकारने विविध योजनांची आखणी केली आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात नाशिकसह उत्तर महाराष्ट्र मुख्यत्वे सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी काही नवीन घोषणा होते का, याकडे सर्वांचे लक्ष होते. अर्थसंकल्पात कुंभमेळ्याचा उल्लेख करण्यात आला नाही.

दै.लोकमत

दि.२ फेब्रुवारी,२०२६

लोकमत

# द्वारका चौकात बसेस, जड वाहनांना प्रवेश बंदी

## शहरातील पर्यायी मार्गांवर वाहतुकीचा वाढला भार

लोकमत न्यूज नेटवर्क



**नाशिक :** द्वारका चौकात अंडरपासच्या बांधकामाला अखेर सोमवार (दि. २)पासून सुरुवात होत असल्याने वाहतूक कोंडी व अपघातांचा धोका टाळण्यासाठी जड व अवजड वाहने, खासगी प्रवासी बसेस, एसटी, सिटीलिंक तसेच इतर वाहनांना पुढील तीन महिन्यांसाठी प्रवेश बंद करत आली आहे.

येत्या १५ फेब्रुवारीनंतर हलक्या वाहनांनाही द्वारका सर्कल परिसरात प्रवेश बंद करण्यात येणार आहे. रविवारपासूनच एसटी महामंडळाकडून एसटीच्या वाहतूक मार्गात बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे पंचवटी ते नाशिकरोडदरम्यान प्रवास करणाऱ्या नागरिकांना सुमारे ५ किलोमीटरचा अतिरिक्त फेरा मारावा लागणार असून, शालीमार ते नाशिकरोड रेल्वेस्टेशन या मार्गावर तब्बल ६ किलोमीटरची वाढीव फेरी पडणार आहे. परिणामी, नागरिकांचा वेळ आणि इंधन खर्च मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. यामुळे आता नाशिकरोडला रेल्वे गाठायची असेल किंवा शाळेत व महाविद्यालयात व कामांवर वेळेवर पोहोचायचे असेल तर नागरिकांना घरातून अर्धातास आधीच बाहेर पडावे लागणार आहे. शहरातील द्वारका सर्कल येथील अंडरपास (भुयारी मार्ग) कामाला सुरुवात करण्यात आली आहे. या कामासाठी द्वारका सर्कल वाहतुकीसाठी बंद करण्यात येणार आहे.

### अरुंद रस्त्यांवर वाढला ताण

सारडा सर्कल ते गडकरी चौक, गडकरी चौक ते संदीप हॉटेल, साईनाथनगर चौफुली, भाभानगर ते नागजी चौक, ट्रॅक्टर हाऊस परिसर, इंदिरानगर बापू बंगला चौक, तसेच शालीमार ते त्र्यंबक नाका या भागांमध्ये रविवार (दि. १) वाहतुकीचा ताण वाढला.

लोकमत

# सुळे डाव्या कालव्याच्या पोटचाऱ्यांमध्ये वाढली झुडपे


## सिंचनाचा प्रश्न गंभीर होणार; शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिळकोस :** येथील सुळे डाव्या कालव्याच्या वितरिका (पोटचाऱ्या) मध्ये काटेरी झुडपे, गवत वाढले असून, पाणी नियमनासाठी बसविण्यात आलेले लोखंडी गेटची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. परिणामी, लाभधारक शेतकऱ्यांना पाण्याचे व्यवस्थापन करताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहेत. पाटबंधारे विभाग याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

वितरिकांमध्ये वाढलेल्या काटेरी झुडपांमुळे पाण्याच्या प्रवाहाला अडथळा निर्माण होत असून, काही ठिकाणी वितरिका पूर्णपणे बुजल्याचे चित्र आहे. त्यामुळे शेतीपर्यंत पाणी पोहोचत नसल्याने रब्बी पिकांना मोठा फटका बसत आहे. वितरिकांवरील लोखंडी गेट गंजलेल्या, तुटलेल्या अवस्थेत असून, काही ठिकाणी गेटचे स्लॅब व सिमेंटचे बांधकामही मोडकळीस आले आहे. यामुळे पाण्याचे योग्य नियोजन होत नसून काही शेतकऱ्यांच्या शेतात पाणी जात नाही, तर काही ठिकाणी अनियंत्रित पाणी वाहून नुकसान होत आहे.





कालव्याच्या वितरिकांची साफसफाई होत नसल्याने त्यात काटेरी झुडपे, गवत वाढले आहे. वितरिकांमधील गेटवरील कॉंक्रीटचे स्लॅब तुटले असून, गेट नादुरुस्त झाले आहे.

“

सुळे डावा कालवा आमच्या शेतीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र, वितरिकांमध्ये झुडपे वाढल्याने पाणी अडते, गेट निकामी झाल्याने पाण्याचे योग्य नियोजन होत नाही. अनेकदा विभागाकडे तक्रार करूनही कुणी फिरकत नाही. वेळेत दुरुस्ती केली नाही तर वितरिका व गेट पूर्णपणे बुजण्याची भीती आहे. पाटबंधारे विभागाने याकडे तत्काळ लक्ष द्यावे.

**दादाजी जाधव,** तालुका उपाध्यक्ष, शेतकरी संघटना, पिळकोस

### तत्काळ दुरुस्त करा

पोटचाऱ्यांची अवस्था अशीच कायम राहिल्यास भविष्यात सिंचनाचा प्रश्न आणखी गंभीर होईल. पाटबंधारे विभागाने तत्काळ पोटचाऱ्यांची साफ सफाई, गेटची दुरुस्ती करावी अशी मागणी शेतकरी संघटनेचे उपाध्यक्ष दादा जाधव, सतीश वाघ, मनाजी जाधव, मार्कंड जाधव, रामदास आहेर, बबन सूर्यवंशी, शांताराम आहेर, दत्तू वाघ, संदेश जाधव, किशोर जाधव यांनी केली आहे.

# शहरामध्ये दुचाकी चोर सुसाट; सहा महिन्यांत ३९० दुचाकींची चोरी

## चोर सापडेना : सरकारवाडा, मुंबईनाका, पंचवटी परिसर बनले चोरांचे हॉटस्पॉट

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक** : शहरात दुचाकी चोरीचे सत्र सुरूच असून, [illegible] गुन्ह्यांची उकल सोडा [illegible] मुसक्या आवळण्यात पोलिस यंत्रणा अपयशी ठरत असल्याचे दिसून येत आहे. शहरात दररोज किमान दोन किंवा त्याहून अधिक दुचाकी चोरीला जात आहेत.

गेल्या सहा महिन्यांत ३९० दुचाकींची चोरी झाली असून, यात सर्वाधिक चोरीचे प्रमाण ऑक्टोबर ते नोव्हेंबर या कालावधीत राहिले आहे. सरकारवाडा, पंचवटी, तसेच मुंबई नाका पोलिस ठाणे हद्द दुचाकी चोरीचे हॉटस्पॉट बनले असून, सर्वाधिक सार्वजनिक [illegible] आस्थापना हद्दीत असल्याने या भागात दुचाकी चोरीचे प्रमाण अधिक असल्याचा [illegible] पोलिसांनी [illegible] आहे. शहरातील गर्दीची ठिकाणे, [illegible] परिसर, शासकीय कार्यालये व रुग्णालयांच्या आवारात लावलेल्या दुचाकी चोरीस जाण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. सोसायट्यांच्या पार्किंगमध्ये असलेल्या मोटारसायकली चोरट्यांच्या निशाण्यावर आहेत.



**५२ दुचाकी**

[illegible] दुचाकी चोरट्यांकडून [illegible] आहे. [illegible] ५२ दुचाकींची चोरी झाली आहे. सरकारवाडा पोलिस ठाण्यातील [illegible] आहे. [illegible] पोलिस ठाण्यांतील १० ते ३० दुचाकी जप्त करण्यात आल्या होत्या.

### स्वतंत्र पथकाची निर्मिती कागदावरच

शहरात दुचाकी चोरीच्या वाढत्या घटना [illegible] पथक नियुक्त करण्यात आले होते. या पथकाकडून दुचाकी चोरीच्या [illegible] गुन्ह्यांची उकल केली जाते. मात्र, दुचाकी चोरीचे प्रमाण कमी होण्याचे नाव घेत नसून [illegible] पोलिसांचा धाक उरला नसल्याचे दिसून येत.

### व्यापारी संकुल लक्ष्य

[illegible] चोरीचे प्रमाण [illegible] असून, [illegible] परिसर, व्यापारी संकुले येथे दुचाकी चोरी होत आहे.

### वेगवेगळ्या भागातील चोरटे

दुचाकी चोरणारे शहरातील वेगवेगळ्या भागातील चोरटे सक्रिय झाले असून [illegible] काही [illegible] समावेश आहे. दुचाकी चोरांची ही [illegible] उद्ध्वस्त करण्याची मागणी शहरातील नागरिकांकडून होत आहे.

### पाच मिनिटांत या दोन सलग चोरीच्या घटना

[illegible] दोन चोरट्यांनी [illegible] दुचाकी चोरी करून नेली. [illegible] दुचाकीचा वापर करून [illegible] पार्किंगमधून आणखी एक दुचाकी चोरीस गेली. पाच मिनिटांत या दोन सलग चोरीच्या घटनांमुळे शहरात खळबळ उडाली आहे.

> दुचाकी चोरीचे प्रमाण वाढले असून, चोरट्यांच्या तपासासाठी स्वतंत्र पथक तयार केले आहे. या गुन्ह्यात काही [illegible] सक्रिय झाली असल्याने त्यांच्यावर कठोर कारवाई करताना अडचण येते.
>
> — सुरेश आव्हाड, पोलिस निरीक्षक, सरकारवाडा

लोकमत

# मालेगाव तालुक्यात पिकांवर किडीचा प्रादुर्भाव; मका, गहू, कांदा पिके धोक्यात

## महागड्या फवारणीमुळे आर्थिक गणित कोलमडले : उत्पादनात मोठी घट होण्याची भीती

लोकमत न्यूज नेटवर्क

**मालेगाव :** तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून निसर्गाचा लहरीपणा शेतकऱ्यांसाठी अडचणीचा ठरत आहे. खरिपातील पिकांवर अवकृपा झाल्यानंतर आता रब्बी हंगामावरही अनिश्चिततेचे सावट आहे. सतत बदलणाऱ्या हवामानामुळे मका, गहू, हरभरा आणि कांदा या पिकांवर किडी व रोगांचा प्रादुर्भाव वाढत असल्याने पिके धोक्यात आली असून पीक वाचवण्यासाठी शेतकऱ्यांना महागड्या औषधांची फवारणी करावी लागत आहे.

कधी थंडी, कधी कडक ऊन तर कधी ढगाळ वातावरण असा निसर्गाचा लहरीपणा पाहायला मिळत आहे. दिवसा वाढणारे तापमान आणि रात्रीचा गारवा यामुळे पिकांच्या वाढीचा नैसर्गिक समतोल बिघडला आहे. विशेषतः कांदा, गहू आणि हरभरा पिकांवर रसशोषक किडी आणि रोगांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. ही कीड पिकांचे अन्न शोषत असल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची भीती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांना आधीच खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे उत्पादनात घट आली होती.



### अनेक शेतकऱ्यांचा कापूस, कांदा अद्याप घरातच पडून

लागवडीचा खर्चही निघाला नव्हता, त्यात कपाशीला व कांद्याला अपेक्षित भाव नसल्यामुळे अनेक शेतकऱ्यांचा कापूस व कांदा अद्याप घरातच पडून आहे. त्यात आता हवामान बदलामुळे रब्बी पिकांवर किडीचा प्रादुर्भाव वाढत असून, याचा पिकांवर परिणाम होण्याची शक्यता शेतकरी व्यक्त करत आहेत.

**७,४८७**

हेक्टर क्षेत्रावर गहू पिकाच्यात आला असून गव्हाची पेरणी सर्वाधिक आहे. त्या खालोखाल मक्याची पेरणी १,७४१ हेक्टरवर तर हरभऱ्याची पेरणी सुमारे ५,०११ हेक्टर क्षेत्रावर झालेली आहे. यंदा तालुक्यातील १३,५०५ हेक्टर सर्वसाधारण क्षेत्रानुसार तब्बल १५,६२० हेक्टर क्षेत्रावर रब्बी पिकांची पेरणी पूर्ण झाली आहे.

### अवकाळीची टांगती तलवार

ढगाळ वातावरणामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांच्या उरात धडकी भरली आहे. खरीप हंगाम हातातून गेल्यानंतर शेतकऱ्यांनी परतीच्या पावसाच्या भरवशावर रब्बीची स्वप्ने पाहिली होती. मात्र आता ऐन फुलोऱ्यात असलेल्या पिकांवर अवकाळी पावसाचे संकट घोंघावत आहे. जर पाऊस पडला तर गहू, हरभरा या पिकांचे नुकसान होईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

### मार्गदर्शनाची गरज

वातावरणातील बदलामुळे यंदा कांदा लागवडीचे वेळापत्रकही पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. तीन टप्प्यात होणारी लागवड यंदा चार टप्प्यात करावी लागली आहे. त्यातच कांदा आणि हरभऱ्यावर मावा रोगाचा प्रादुर्भाव होत असल्याने शेती आता अधिक जोखमीची बनली आहे. सध्याची परिस्थिती पाहता, कृषी विभागाने शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करावे, अशी मागणी तालुक्यातील शेतकरी करत आहेत.

> गेल्या काही दिवसांपासून रब्बी हंगामासाठी वातावरणात बदल झाल्यामुळे पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव वाढत असल्याने शेतकऱ्यांनी आवश्यक त्या कीटकनाशकाची फवारणी करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी हरभऱ्यातील घाटेअळीसाठी निंबोळी अर्काची फवारणी करावी, तर कांद्यावरील करपा रोगासाठी ट्रायकोडर्माची फवारणी करावी.
>
> **भगवान गोर्हे,**
> तालुका कृषी अधिकारी, मालेगाव

Hello Nashik Gramin
Page No. 1 Feb 02, 2026
Powered by: erelego.com


लोकमत

# संरक्षण विषयक आत्मनिर्भरतेने नाशिकला बूस्ट

## केंद्र शासनाकडून आधुनिकीकरणासाठी तरतूद : स्थानिक रोजगार, गुंतवणूक वाढणार, उद्योजकांच्या आशा पल्लवित

लोकमत न्यूज नेटवर्क

[illegible]




[illegible]

### डिफेन्स कॉरिडोरला चालना

[illegible]

### शस्त्रास्त्रांचे होणार आधुनिकीकरण

[illegible]



[illegible]


### रोजगार वाढेल



[illegible]

[illegible]

### कुंभमेळ्यासाठी भोपळा




[illegible]

### मेट्रो पुन्हा साइडिंगला



[illegible]

### नाशिक-पुणे रेल्वे अधांतरी



[illegible]

लोकमत

मस्ट READ

# नाशिक शहरात येणाऱ्या प्रवाशांना पडणार फेरा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** नाशिक शहरात कामानिमित्ताने येणाऱ्या ग्रामीण भागातील प्रवाशांना चांगलाच फेरा पडणार आहे. विशेषतः कळवण, पेठ, सप्तश्रृंग गड, मालेगाव, मनमाड, नांदगाव, येवला, लासलगाव येथून नाशिकला येणाऱ्या प्रवाशांना आता पंचवटीतील निमाणी स्थानकातच उतरून पुढे शहरात येण्यासाठी पायपीट करावी लागणार किंवा रिक्षाचा आधार घ्यावा लागणार आहे.

नाशिक शहरातील द्वारका सर्कल येथे अंडरपासचे काम सुरू असल्यामुळे राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसच्या वाहतूक मार्गात बदल करण्यात आला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातून शहर परिसरात येणाऱ्या प्रवाशांची काही प्रमाणात गैरसोय होणार आहे. कळवण, पेठ, सप्तश्रृंग गड, मालेगाव, मनमाड, नांदगाव, येवला, लासलगाव येथून एस.टी. बसने येणाऱ्या प्रवाशांना पंचवटीतील निमाणी बसस्थानकातच उतरावे लागणार आहे. याशिवाय परतीला देखील त्यांना येथूनच बस पकडावी लागणार आहे. या तालुक्यातील प्रवाशांना शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी म्हणजेच सीबीएसला बसने येता येणार नाही. त्यांना निमाणी स्थानकातून रिक्षा करून किंवा पायपीट करीतच सीबीएस, शालिमार गाठावे लागणार आहे.



याशिवाय त्र्यंबकेश्वर, सिन्नर व इगतपुरी, गिरणारे, हरसूल, ओझरखेड येथील ग्रामीण भागातील बसेस मात्र नवीन बसस्थानक (ठक्कर स्टॅन्ड) पर्यंत येणार आहेत. या प्रवाशांना ने-आण करणाऱ्या बसेस नविन स्थानकातून सुटणार असल्या तरी त्यांच्या मार्गातही बदल करण्यात आला असून त्यांना देखील शहराला वळसा घालूनच पुढे मार्गक्रमण करावा लागणार आहे.

## अंडरपास कामांसाठी प्रशासनाचे नियोजन

१ नाशिक शहरातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या द्वारका सर्कल येथे अंडरपास बांधण्यात येणार असून त्यासाठीचे कामकाज सुरू झाले आहे.

२ द्वारका चौकातून येणाऱ्या-जाणाऱ्या बसेसचा मार्ग बदलण्यात आल्याने ग्रामीण भागातील प्रवाशांना मध्यवर्ती भागात येण्यासाठी त्रास सहन करावा लागणार आहे.

३ विशेष म्हणजे बसेसच्या या वाहतुकीतील बदल अनिश्चित काळासाठी असल्याने तीन ते चार महिने हा बदल राहण्याची शक्यता असल्याने यादरम्यान प्रवाशांची कसरत होणार आहे.

लोकमत

मस्ट READ

# कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सर्वतीर्थ टाकेद येथील जटायू तीर्थक्षेत्राच्या विकासाला चालना

## जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी केली कामांची पाहणी



सर्वतीर्थ टाकेद येथे सिंहस्थ कुंभमेळ्यापूर्वी ग्रामपंचायत व ट्रस्टच्या पदाधिकारी यांच्याशी चर्चा करताना जि. प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार. समवेत रामचंद्र परदेशी, ट्रस्टी अंबादास श्रीवास्तव, ललित मडके, रतन बांबळे आदी.

**सर्वतीर्थ टाकेद** : २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सर्वतीर्थ टाकेद येथील जटायू तीर्थक्षेत्र व परिसराचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषद अधिकाऱ्यांनी विविध विकासकामांची पाहणी केली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओंकार पवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी गुंडे, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सोनवणे, पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी तायडे, गटविकास अधिकारी महेश वळवी, अतिरिक्त बीडीओ गोडे, प्रशासक तथा विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर कराळे, ग्रामविकास अधिकारी विजय रासकर आदींनी पाहणी केली.

सर्वतीर्थ टाकेद व संबंधित ट्रस्टच्या वतीने सुचविण्यात आलेल्या विविध विकासकामांचा आराखड्यात समावेश करून ही कामे तातडीने मार्गी लावावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. पथकाने सिंहस्थ कुंभमेळ्यानिमित्त येणारे साधू, महंत, लाखो भाविक यांच्या सोयीसुविधांचा आढावा घेतला. भाविकांच्या निवास, पाणीपुरवठा, स्वच्छता, वाहतूक व सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक सुविधांबाबत स्थानिक पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य व ट्रस्ट पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली.

उपसरपंच रामचंद्र परदेशी, सामाजिक कार्यकर्ते रतन नाना बांबळे, ललित मडके, शहाबाज शेख, शांताराम भांगे, अंबादास महाराज श्रीवास्तव, किशोर पवार, सागर दवंडे, लालमन नांगरे, ज्ञानेश्वर भवारी, सुभाष मेमाणे आदी उपस्थित होते.

## ..या कामांचा समावेश

श्रीराम मंदिराचा जीर्णोद्धार, साधू-महंतांसाठी होम-हवन, साधना केंद्र उभारणी, भूमिगत गटार व्यवस्था, वाहनतळासाठी पेव्हर ब्लॉक बसविणे, प्रवाशांसाठी बस निवारा, पोलिस चौकी, सार्वजनिक शौचालये, भोजनालय, अंतर्गत रस्त्यांचे काँक्रीटीकरण, साधू-महंतांसाठी ५० खोल्यांची निवास व्यवस्था, निवारा शेड, तीर्थ व मंदिर सुशोभीकरण, पाण्याची टाकी, परिसरातील रस्ते, पाणपोई आदी कामांचा समावेश आहे.

आपल्या बातम्या, आतल्या बातम्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# घाट, रस्ते, दर्शन मार्ग; 390 कोटींच्या कामांना मंजुरी

**नाशिक :** आगामी सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाने त्र्यंबकेश्वर, शिर्डी तसेच संबंधित जोड रस्त्यांवरील महत्त्वाच्या पायाभूत सुविधा आणि गर्दी व्यवस्थापनाशी संबंधित कामांना प्रशासकीय मंजुरी दिली आहे. विभागीय आयुक्त तथा कुंभमेळा प्राधिकरण प्रमुख प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेत झालेल्या ऑनलाईन बैठकीत या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थाच्या दृष्टीने महत्त्वाच्या दुसऱ्या टप्प्यातील विकासकामांना सुमारे ३९० कोटींची संयुक्त प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. या अंतर्गत दर्शन पथ व घाटविकास, शाही मार्गाचा पुनर्विकास व सौंदर्यीकरण, विधी भवन व इतर धार्मिक सुविधांची उभारणी, शिवसृष्टीसह उद्यान व सार्वजनिक जागांचा विकास, विक्रेत्यांसाठी नियोजित सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत. या कामांमुळे भाविकांच्या हालचाली अधिक सुलभ होऊन कुंभमेळा कालावधीत सुरक्षित व नियोजनबद्ध व्यवस्थापन शक्य होणार आहे. कुंभमेळा तीर्थयात्रा परिपथातील महत्त्वाचे धार्मिक केंद्र असलेल्या शिर्डीत २४.५३ कोटींचा रस्ता व पार्किंगविषयक पायाभूत कामांना मंजुरी देण्यात आली आहे. यात होल्डिंग एरिया, पिक अँड व ड्रॉप व्यवस्था, मंदिराकडे जाणाऱ्या प्रमुख रस्त्यांचे रुंदीकरण, गर्दीचे व्यवस्थापन याचा समावेश आहे. यासोबतच शिर्डीत कुंभमेळ्याचा वारसा दर्शविणारी स्वागत कमान उभारण्यात येणार आहे. तसेच, शिर्डी-संगमनेर दरम्यानच्या जोड रस्त्यांच्या विकासासाठी १७.२५ कोटींची प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे.

## घाटांचे सौंदर्यीकरण

त्र्यंबकेश्वर येथील ऐतिहासिक कुशावर्त कुंडाच्या जतन व दुरुस्तीसाठी ३.१२ कोटी मंजूर करण्यात आले असून, यात फरशीकरण तसेच छत संरचनेच्या दुरुस्तीचा समावेश आहे. याशिवाय गोदावरी-नंदिनी संगमाजवळ टाकळी येथे नवीन घाट बांधकामासाठी ७२.१६ कोटींची मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे घाटाची लांबी सुमारे ४०० मीटरपर्यंत वाढणार असून, प्रमुख स्नान पर्वणीच्या दिवशी भाविकांची क्षमता, सुरक्षितता आणि गर्दी नियंत्रण अधिक सक्षम होणार आहे.

आपलं महानगर | My महानगर .com
www.mymahanagar.com

# कुंभमेळ्याआधी शुक्ल तीर्थाचा विकास करा

**सर्वतीर्थ टाकेद :** कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शुक्ल तीर्थावर मूलभूत सुविधा व विकास कामांची तातडीची आवश्यकता असल्याचे मत मुख्य ट्रस्टी व परिसरातील नागरिकांनी व्यक्त केले आहे.

आतापर्यंत झालेली विकास कामे, मागील कुंभमेळ्यात साधुग्राम,भक्तनिवास,पार्किंग व्यवस्था,कोरीव दगडात कुंडाचे सुशोभीकरण अंदाजे १ ते १.५ कोटी रुपयांची कामे झाली. मात्र, सध्या ही सर्व कामे दुरुस्तीच्या अवस्थेत आहेत. आगामी कुंभमेळ्यासाठी प्रवेशद्वार सुधारणा व सुशोभिकरण, रस्ता रुंदीकरण व दुरुस्ती, मंदिर रंगरंगोटी व संरचनात्मक दुरुस्ती, मंदिर, परिसर सुशोभिकरण, सभामंडप,भाविकांसाठी निवास व्यवस्था, शौचालये व पिण्याच्या





पाण्याची टाकी, सामाजिक सभागृह, महिलांसाठी कपडे बदलण्याची स्वतंत्र व्यवस्था, फेवर ब्लॉक, गोशाळा, पार्किंग सुविधा, सीसीटीव्ही यंत्रणा मंदिर व कुंड संरक्षण भिंत व कंपाऊंड वॉल प्रशासनाकडे मागणी ग्रामस्थांनी व मुख्य ट्रस्टी यांनी केली आहे.

सध्या या तीर्थाची जबाबदारी रामनारायण दास गुरुदासजी (फलाहारी) यांच्याकडे आहे. १६ वर्षापासून पूजा-पाठ, देख-रेख विषम्बरदास गुरु भगवानदास बैरागी करत आहेत. अपुऱ्या सुविधांमुळे भाविक व साधुसंतांची गैरसोय होत आहे. रामायणात उल्लेख असलेल्या या तीर्थाला धार्मिक व सांस्कृतिक दृष्ट्या विशेष महत्त्व असल्याने शुक्ल तीर्थाचे आगामी कुंभमेळ्याआधी ही सर्व विकास कामे करावी, अशी मागणी मुख्य ट्रस्टी व स्थानिक नागरिकांनी केली आहे. प्रशासनाने याकडे लक्ष देत तातडीने विकास कामांना मंजुरी द्यावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# सिंहस्थात हेलिकॉप्टर सेवेचा पर्याय तपासा

## केंद्रीय मंत्री गजेंद्रसिंह शेखावत : कुंभमेळा एक अमूल्य सांस्कृतिक ठेवा

**नाशिक :** कुंभमेळा हा केवळ धार्मिक आयोजन नसून, एक अमूल्य सांस्कृतिक ठेवा आहे. या माध्यमातून नाशिकचे ब्रॅण्डिंग करण्यासोबतच धार्मिक पर्यटनवाढीच्या दृष्टीने नाशिक-त्र्यंबक हेलिकॉप्टर सेवेचा पर्याय तपासा, असे निर्देश केंद्रीय सांस्कृतिक व पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी दिले.

मंत्री शेखावत यांच्या अध्यक्षतेत जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात कुंभमेळा-२०२७ अंतर्गत सुरू असलेल्या पायाभूत सुविधा व तयारीच्या कामांचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. कुंभमेळ्याचे अध्यात्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित करताना शेखावत म्हणाले की, या महत्त्वाचे प्रतिबिंब रामकाल पथमध्ये उमटले पाहिजे. रामकाल पथ साकारताना स्थानिक वास्तुकलेशी सुसंगत रचना करावी. रंगसंगती, भित्तीचित्रे आणि कलात्मक मांडणीद्वारे भाविकांना रामायणकालीन परंपरेची माहिती मिळेल, असे नियोजन करावे. यासाठी चित्रकला शाखेतील स्थानिक विद्यार्थ्यांचा सहभाग घ्यावा, अशी सूचनाही त्यांनी केली. कुंभमेळा काळात मोबाईल नेटवर्क सुरळीत राहील, यासाठी आतापासूनच नियोजन करावे. रामकाल पथसह इतर विकासकामांचे प्रस्ताव राज्य शासनामार्फत तातडीने सादर करावेत, असेही त्यांनी सांगितले.

जिल्ह्यात धार्मिक व ऐतिहासिक पर्यटनाची मोठी क्षमता असून त्यादृष्टीने प्रभावी ब्रँडिंग करावे. बैठकीत विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांनी सिंहस्थ सुरू असलेल्या सिंहस्थ विकासकामांची माहिती दिली.

Nashik Edition
Feb 02, 2026 Page No. 3
Powered by: erelego.com

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# ‘ॲक्शन मोड’मध्ये कामे करा

## कुंभमंत्री गिरीश महाजनांचे यंत्रणांना स्पष्ट निर्देश

नाशिक : नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ महाकुंभमेळा यशस्वी होण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी ही संधी समजून जबाबदारीने काम करावे. कुंभमेळ्यासाठी सुरू असलेली विकासकामे गुणवत्तापूर्ण, दर्जेदार तसेच विहित कालावधीत पूर्ण होण्यासाठी प्रत्येक यंत्रणेने ‘ॲक्शन मोड’मध्ये कामे करावीत, असे स्पष्ट निर्देश जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी दिले.

नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या वतीने आज आयोजित करण्यात आलेल्या गुणवत्ता नियंत्रण प्रशिक्षण कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय



आयुक्त प्रवीण गेडाम, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, नाशिक महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्यासह विविध अंमलबजावणी यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. ते पुढे म्हणाले की, रस्ते, कॉंक्रीटीकरण, गोदावरी स्वच्छता तसेच मलनिस्सारण प्रकल्पांच्या कामांमुळे नागरिकांना काही प्रमाणात तात्पुरती गैरसोय होऊ शकते; मात्र ही सर्व कामे गुणवत्तेची कोणतीही तडजोड न करता दर्जेदार पद्धतीने पूर्ण झाली पाहिजेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. विकासकामे करताना कोणतीही चूक होणार नाही, यासाठी कटाक्षाने दक्षता घेण्यात यावी. कामांमध्ये त्रुटी आढळल्यास शासन जबाबदारी निश्चित करून आवश्यक ती कारवाई करण्यास मागे-पुढे पाहणार नाही, असेही त्यांनी सांगितले. गुणवत्ता नियंत्रण प्रशिक्षण कार्यशाळा ही यासाठी दिशादर्शक व मोलाची ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमास विविध शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी, अंमलबजावणी यंत्रणांचे अभियंते तसेच गुणवत्ता नियंत्रण व तृतीय-पक्ष तपासणी संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Nashik Edition
Feb 02, 2026 Page No. 7
Powered by: erelego.com

दै.सकाळ

दि.२ फेब्रुवारी,२०२६

सकाळ

# ऑडिओ गाइडमुळे मिळेल तीर्थाची इत्यंभूत माहिती

## णमोकार तीर्थ

पंचकल्याणक महोत्सव

■ प्रशांत भलीरकर : सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. १ : मालसाने (ता. चांदवड) येथे सुमारे ४० एकर परिसरात विस्तारलेले 'णमोकार तीर्थ' हे केवळ एक धार्मिक स्थळ नसून, श्रद्धा, अध्यात्म, कला आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा सुरेख संगम ठरत आहे. भव्य आणि नियोजनबद्ध रचनेमुळे हे तीर्थ भाविकांसाठी एक अद्वितीय आध्यात्मिक अनुभूती देणारे केंद्र बनले. या ठिकाणी उभारण्यात येत असलेली सर्व भुवने, शेकडो मूर्ती, अनेक स्तंभ, कित्येक मार्ग या सर्वांची माहिती देण्यासाठी एक ऑडिओ गाइड बनविण्यात येणार आहे. या ४० एकर परिसरात भाविक कोठेही उभा राहिल्यास त्या जागेची माहिती त्याला तत्काळ मिळेल.



एआय संपादित

या विशाल तीर्थक्षेत्रात विविध भुवने, कलात्मक रचनेची कलादालने, २४ जैन तीर्थंकरांच्या धूम्रकाय, कमलाकार व भक्तिभावाशील ७२ मनोहारी मूर्ती, त्याशिवाय येथे असणाऱ्या शेकडो मूर्ती, भाविकांच्या सोयीसाठी सुसज्ज धर्मशाळा, शांतीचा अनुभव देणारे आध्यात्मिक ध्यान केंद्र, गुरुभक्तीचे प्रतीक असलेले गुरु मंदिर, तसेच राहण्यासाठी स्वच्छ आणि सोयीस्कर निवास व्यवस्था (खोल्या) उपलब्ध करून देण्यात आली आहे.

इतक्या मोठ्या आणि बहुआयामी परिसरात प्रथमच येणाऱ्या भाविकांना किंवा पर्यटकांना नेमकी दिशा, योग्य स्थळे आणि प्रत्येक वास्तूचे महत्त्व समजून घेता यावे, यासाठी णमोकार तीर्थात आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करीत एक विशेष ऑडिओ गाइड प्रणाली विकसित करण्यात आली आहे. यामुळे भाविक ज्या वास्तूसमोर उभे असतील, त्या वास्तूविषयी संक्षिप्त, अचूक आणि माहितीपूर्ण विवरण ऐकता येईल. संबंधित वास्तूचे धार्मिक, ऐतिहासिक व आध्यात्मिक महत्त्व या माध्यमातून सहजपणे समजणार आहे. संपूर्ण तीर्थातील अधिक सुलभ आणि अर्थपूर्ण ठरेल.

या ऑडिओ गाइडमुळे भाविकांना केवळ माहितीच मिळणार नाही, तर योग्य दिशा शोधण्यासाठी मदत होणार आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, बाहेरून येणारे भाविक तसेच प्रथमच दर्शनासाठी आलेल्या श्रद्धाळूंना ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरेल.

### असे आहे 'स्मार्ट ऑडिओ गाइड'

■ एखाद्या स्थळासमोर उभे राहिल्यावर त्याची इत्यंभूत माहिती ऑडिओ स्वरूपात देण्यासाठी 'स्मार्ट ऑडिओ गाइड' तंत्रज्ञान वापरले जाते. यात त्या स्थळाला क्यूआर कोड किंवा एनएफसी टॅग बसविले जातात. नागरिकांनी मोबाईलने स्कॅन करताच संबंधित माहितीचा ऑडिओ सुरू होतो. काही ठिकाणी जीपीएस व जिओ-फेन्सिंग तंत्रज्ञानाचा वापर करून विशिष्ट परिसरात प्रवेश करताच आपोआप माहिती ऐकू येण्याची सोय केली जाते. यासाठी स्वतंत्र मोबाईल ॲप किंवा वेब-आधारित प्लॅटफॉर्म वापरला जातो. ऑडिओसाठी व्यावसायिक स्टुडिओ व टेक्स्ट-टू-स्पीच (टीटीएस) तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. बहुभाषिक पर्याय, दृष्टिहीनांसाठी सोयीस्कर रचना आणि अपडेट करता येणारी माहिती ही या प्रणालीची वैशिष्ट्ये ठरू शकतात. अशा तंत्रज्ञानामुळे इतिहास, संस्कृती व वास्तुस्थळांची माहिती अधिक प्रभावीपणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचते.

### 'एआय'च्या आधारे मिळणार उत्तरे

■ एखाद्या वेळी जगातील सर्व भाषांमध्ये, २७ कोटी आध्यात्मिक प्रश्नांची उत्तरे आचार्य देवनंदी महाराज यांच्या आवाजात देता येणार आहेत. हे शक्य होण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित बहुस्तरीय तंत्रज्ञान वापरले जाईल. आचार्य देवनंदी महाराज यांच्या प्रवचनांवर आधारित ज्ञान-संग्रहाला तज्ज्ञ लँग्वेज मॉडेल प्रशिक्षित करून २७ कोटी आध्यात्मिक प्रश्नांची उत्तरे निर्माण केली गेली. जगातील सर्व भाषांसाठी एआय भाषांतर इंजिन वापरून प्रश्न व उत्तरे तत्काळ भाषांतरित केली जातील. त्यानंतर व्हॉइस क्लोनिंग व न्यूरल टेक्स्ट-टू-स्पीच तंत्रज्ञानाद्वारे ही उत्तरे आचार्यश्रींच्या आवाजात मिळणार आहेत. ही संपूर्ण प्रणाली क्लाउड सर्व्हर, उच्च क्षमतेचे डेटा प्रोसेसिंग आणि एआय आधारित विश्लेषण यंत्रणा यांच्या सहाय्याने एकाच वेळी लाखो लोकांपर्यंत पोहोचविता येऊ शकेल.

Nashik, Nashik Today
02/02/2026 Page No. 2

सकाळ

# वडाळा शिवारात रस्तेकामात 'गोलमाल'

## महापालिका आयुक्तांकडून पाहणी; निकृष्ट थर पुन्हा उखडण्याचे आदेश

■ सकाळ वृत्तसेवा

**नाशिक, ता. १ : शहरात कुंभमेळ्याच्या निमित्ताने विविध ठिकाणी रस्त्यांची कामे सुरू आहेत. रस्त्यांची कामे करताना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण करण्याच्या सूचना महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांनी दिल्या असतानाही वडाळा शिवारात सुरू असलेल्या एका रस्त्याच्या कामात गोलमाल होत असल्याचा प्रकार खुद्द आयुक्त खत्री यांनी रंगेहाथ पकडला. त्यानंतर तातडीने काम थांबविण्याचे आदेश दिले.**

नागरिकांच्या करातून होणाऱ्या प्रत्येक विकास कामांसाठी गुणवत्ता हीच अंतिम कसोटी आहे. निकृष्ट काम करणाऱ्यांना कोणतीही सहानुभूती दाखविली जाणार नाही.
**- मनीषा खत्री,**
आयुक्त, महापालिका



**नाशिक :** पूर्व विभागातील वडाळा येथील श्री विठ्ठल मंदिर परिसरात सुरू असलेल्या रस्तेकामातील त्रुटींवर बोट ठेवत पाहणी करताना महापालिका आयुक्त मनीषा खत्री व अधिकारी.

सकाळ

# जलजीवनची कामे अपूर्णच, घशाला कोरड कायम

## सुरगाणा तालुक्यातील स्थिती : अधिकारी, ठेकदारांच्या मनमानीने जनतेचे हाल सुरू

■ हंसराज भोये : सकाळ वृत्तसेवा

[illegible]


> [illegible]
> - महिंद्र पाडवी, स्थानिक ग्रामस्थ, जांभूळपाडा

> [illegible]
> - वंदना भोये, स्थानिक महिला, जांभूळपाडा दा.

[illegible]

**ग्रामसभांमध्ये चर्चा; पण...**

[illegible]



जांभूळपाडा : जलजीवनअंतर्गत उभारलेली पाण्याची टाकी. [illegible] पाण्याची टाकी.

सकाळ

# पोलिस शासक नव्हे; तर सेवकच

## आयुक्त संदीप कर्णिक : कम्युनिटी पोलिसिंगच्या माध्यमातून 'झीरो टॉलरन्स'



सकाळ

# एकत्रित काम करून 'हरितकुंभ' साकारूया!

## प्रवीण गेडाम यांची साद : दोनदिवसीय पर्यावरण कार्यशाळेचा समारोप

■ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. १ : निसर्गाच्या विपरीत जाऊन काही करणे चुकीचे आहे हे सत्यच आहे; परंतु समतोल साधण्यासाठी काही गोष्टी कराव्या लागतात. आर्थिक विकासाचा समतोल साधायचा असेल तर दोन्ही गोष्टींकडे समसमान लक्ष द्यावे लागते. सर्व पर्यावरणप्रेमींकडे आम्ही सहकारी म्हणूनच पाहतो, सर्वांनी एकत्रित काम करूयात, पुन्हा हरितकुंभ करूयात, अशी साद विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिली.

गेव्ह वेल्फेअर ऑर्गनायझेशन यांच्या विद्यमाने बेळगाव ढगा, त्र्यंबकेश्वर रोड येथील चंद्रभागा लॉन्समध्ये दोन दिवसीय कार्यशाळेचा समारोप करण्यात आला. या वेळी महापालिका आयुक्त मनिषा खत्री, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी प्रशांत गायकवाड, रमेश अय्यर, ॲड. श्रीराम पिंगळे यांची उपस्थिती होती. डॉ. गेडाम म्हणाले, की आपल्याला धार्मिक व सांस्कृतिक गरजा लक्षात घेता कुंभमेळा गरजेचा आहे. तो हेरिटेज आहे त्याला आपण जपले पाहिजे. महापालिका आयुक्त मनिषा खत्री यांनी पर्यावरणप्रेमींच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. पहिली सभा झाल्यानंतर लगेचच वृक्ष प्राधिकरण समिती गठित करण्यात येणार आहे. तसेच तपोवनातील वृक्षतोड प्रश्नी रात्रीतून कोणतीही वृक्षतोड होणार नाही. जे काही होईल ते सर्वांच्या संमतीने होईल असे आयुक्त खत्री म्हणाल्या. या वेळी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनीदेखील पर्यावरणप्रेमींचे समाधान केले. ते म्हणाले की, पर्यावरणप्रेम ही खूप मोठी संकल्पना आहे, दोन्ही बाजूंनी संवाद होणे महत्त्वाचे आहे. आम्ही तयार आहोत, तुम्हीही एक पाऊल पुढे या असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले. कार्यशाळेत मानव उत्थान मंच, जैवविविधता, जलमृदा संरक्षण व संवर्धन, गरूडझेप प्रतिष्ठान, रान फाउंडेशन, गोदामाई प्रतिष्ठान ट्रस्ट, निसर्गसेवक युवक मंच, नाशिक नागरिक कृती समिती, ग्रीन रिव्हॉल्यूएशन, उत्तुंग झेप फाउंडेशन, गोदावरी संवर्धन, कपिला नदी संवर्धन, गोदावरी स्वच्छता अभियान यासह ४० हून अधिक पर्यावरणप्रेमी संस्था सहभागी झाल्या. यावेळी देवांग जानी, मनोज साठे, अश्विनी देशपांडे, दत्तात्रेय ढगे, आदिनाथ ढाकणे, संदीप भानोसे, अमित कुलकर्णी, जगबीर सिंग, अश्विनी भट, सुनील मेंढेकर, निशिकांत पगारे आदी उपस्थित होते.



नाशिक : कार्यशाळेप्रसंगी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, महापालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद.

Nashik, Nashik-Today
02/02/2026 Page No. 3

सकाळ

# अर्थसंकल्पात सिंहस्थाचा 'कुंभ' रिता

## केंद्र सरकारकडून नाशिककरांची घोर निराशा

■ सकाळ वृत्तसेवा

**नाशिक, ता. १ : केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पात आगामी सिंहस्थ-कुंभमेळ्यासाठी भरघोस निधीची तरतूद केली जाईल, अशी अपेक्षा होती; पण अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्प सादर करताना कुंभमेळ्याचा साधा उल्लेखही केला नाही. त्यामुळे नाशिककरांची घोर निराशा झाली आहे.**

अर्थमंत्री सीतारामन यांनी रविवारी (ता. १) त्यांच्या कारकीर्दीतला सलग नववा अर्थसंकल्प सादर केला. सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा, शिक्षण, महामार्ग, रेल्वे, आरोग्य सुविधा अशा विविध घटकांसाठी मोठ्या घोषणा करण्यात आल्या. यंदाच्या अर्थसंकल्पात नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळाव्याच्या अनुषंगाने शासन विशेष पॅकेज अथवा भरीव निधीची तरतूद करेल, अशी आशा होती. त्या दृष्टीने अवघ्या जिल्ह्याचे लक्ष अर्थसंकल्पाकडे लागून होते. परंतु, अर्थमंत्र्यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात निधी तरतूद दूरच; पण सिंहस्थाचा साधा नामोल्लेखही केला नाही.

सिंहस्थ कुंभमेळ्याचे ध्वजारोहण अवघ्या दहा महिन्यांवर येऊन ठेपले. यंदाच्या कुंभमेळ्यात किमान १० ते १२ कोटी भाविक हजेरी लावतील, असा अंदाज आहे. त्यादृष्टीने राज्य शासन व प्रशासन तयारीला लागले. तब्बल २५ हजार कोटींचा आराखडा सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाने तयार केला आहे.




त्यात पायाभूत सुविधांसह महामार्गांचे जाळे व अन्य विकासकामांचा समावेश करण्यात आला. या माध्यमातून नाशिक सर्वांगीण विकासासह आजूबाजूच्या जिल्ह्यांच्या आर्थिक विकासाला हातभार लागणार आहे. त्यामुळे केंद्रीय अर्थसंकल्पात नाशिकला मानाचे स्थान मिळेल, अशी शक्यता वर्तविली जात होती. प्रत्यक्षात केंद्र सरकारने अर्थसंकल्पात कुंभमेळ्याचा समावेश करणे टाळले. परिणामी, केंद्रीय पातळीवर सिंहस्थाचा कुंभ रिताच राहिला आहे.

### पर्यटनासाठी ठोस बाबी नाहीत

■ देशातील १५ पुरातत्त्वीय स्थळांच्या पर्यटन विकासासह २० प्रमुख पर्यटनस्थळी १० हजार पर्यटक मार्गदर्शक केंद्रे सरकार तयार करणार आहे. मंदिरांच्या शहरांचा विकासाचा अर्थसंकल्पात अंतर्भाव करण्यात आला. पण, सिंहस्थाच्या अनुषंगाने नाशिक जिल्ह्यासह उत्तर महाराष्ट्रातील पर्यटन वाढीच्या दृष्टीने कोणतीही ठोस पावले अर्थसंकल्पात उचलण्यात आलेली दिसून येत नाहीत. परिणामी, सिंहस्थाच्या काळाचे नाशिकला पर्यटन जिल्हा म्हणून पुढे आणण्याच्या प्रयत्नांवर पाणी फेरले गेले आहे.

सकाळ

# गडावरील शिवालय तलाव परिसरात होणार बसस्थानक

## सप्तशृंगगड ग्रामसभेत झाला ठराव

**सकाळ वृत्तसेवा**

वणी, ता. १ : श्रीक्षेत्र सप्तशृंगगडावरील फनिक्यूलर ट्रॉली प्रकल्पामुळे गावातर्गत असलेल्या बाजारपेठेतील गर्दी कमी झाल्याने गावातील अर्थव्यवस्था कोलमडली आहे. व्यावसायिकांवर संकट ओढावल्याची भावना ग्रामस्थांनी सप्तशृंगीगड ग्रामसभेत व्यक्त केली आहे. दरम्यान गडावरील प्रस्तावित बसस्थानक हे शिवालय परिसरात बांधण्यात यावे अशा मागणीचा ठरावही ग्रामसभेत करण्यात आला आहे.



सप्तशृंगगड : ग्रामसभेत आक्रमकपणे प्रश्न मांडताना ग्रामस्थ.

सप्तशृंगगड ग्रामपंचायतीची प्रजासत्ताक दिनाचा ग्रामसभा शनिवारी (ता.३१) सरपंच रमेश पवार यांच्या अध्यक्षतेखाली झाली. ग्रामसभेत युवकांनी पुढाकार घेत बसस्थानक हे शिवालय परिसरात छत्री बंगल्याजवळच बांधण्यात यावे, अशी एकमुखी मागणी केली. संतप्त महिला व युवकांनी फनिक्युलर ट्रॉलीमुळे गावात येणाऱ्या भाविकांची संख्या रोडावली आहे. त्यामुळे गावाच्या अर्थकारणावर परिणाम झाला आहे. सकाळी ६ ते ९ व संध्याकाळी ६ ते ९ या दरम्यान फनिक्युलर ट्रॉली बंद ठेवण्यात यावी. त्यातून गावातील व्यावसायिकांना लाभ होऊ शकेल. त्याचप्रमाणे गावाबाहेर तांबूल तिर्थाच्या ठिकाणी वनविभागाची जागा असल्याने तेथे ३० कोटी रुपये खर्चून बागबगीचा तयार करण्याचे काम चालू आहे. ते त्वरित बंद करून हा प्रकल्प शिवालय तलाव याठिकाणी उभारावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली.

सप्तशृंगगड हे ग्रामपंचायत पेसा क्षेत्रांतर्गत असल्याने येथे कुठल्याही प्रकारचे काम करण्याअगोदर पेसा कमिटीला विश्वासात घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कुठल्याही कामांना परवानगी न देण्याचीही आक्रमक भूमिका घेण्यात आली. याबाबतचे ठराव बनवून प्रशासनाकडे कार्यवाही पाठविण्यात यावे असेही ग्रामसभेत ठरले. याशिवाय ग्रामपंचायतीच्या ऑरो प्लांटमधील साहित्य चोरीला गेले आहे, त्याची चौकशी करण्यात यावी. खासगी पाण्याचे टँकर बंद करण्यात यावे. शिवालय तलाव येथील ग्राम कुलदैवताच्या ठिकाणी असलेले अतिक्रमण काढून टाकावे, एका घरात एकच नळ कनेक्शन देण्यात यावे, फनिक्यूलर ट्रॉलीपासून ते फुलापर्यंत दुभाजक टाकावेत, परतीच्या रस्त्यावरील बॅरिकेट्स हटवावेत, अशा विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. उपसरपंच संदीप बेनके यांनी एसटी व अन्य वाहने गावातून रिंग रोडने बाहेर काढण्यात येतील, असा ठराव केला. ग्रामसभेला ग्रामसेवक संजय देवरे, ग्रामपंचायत सदस्य बेबीबाई जाधव, मनीषा गवळी, लिपिक विजय वाघ यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

Nashik, District-Today
02/02/2026 Page No. 1

सकाळ

# हर घर जल योजनेची पथकाकडून पाहणी

■ सकाळ वृत्तसेवा

साल्हेर, ता. १ : बागलाण पश्चिम आदिवासी पट्ट्यातील साल्हेर येथील जल जीवन मिशन अंतर्गत हर घर जल नळ योजनेचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याने या कामावरती केंद्रीय पथकाने पाहणी केली. संबंधित पाणीयोजनेच्या संथ कामाबाबत ग्रामस्थांच्या तक्रारी आहेत. पथकाकडून कामाची गुणवत्ता, कामाबद्दल बारीक-सारीक गोष्टी बघून घेऊन अहवाल पाठविला जाणार आहे.

अधिकाऱ्यांना यावेळी केंद्रीय पथकाने स्थानिक नागरिकांशी तसेच ग्रामस्थांबाबत विचारणा केल्याचे सांगितले जाते. मात्र ग्रामस्थांना माहिती नसतांना संबंधित दौरा नियोजित केलेला असल्याने अधिकाऱ्यांची व ठेकेदाराची तारांबळ उडाली. साल्हेर येथील जीवन मिशन अंतर्गत हर घर जल नळ पाणीपुरवठा योजनेला घरघर लागली असून कामे अपूर्ण आहेत. धुळे लोकसभेच्या खासदार डॉ. शोभा बच्छाव यांच्या तक्रारीनंतर बागलाण तालुक्यातील अनेक गावात केंद्रीय पथकाने कामाची पाहणी केली.

Nashik, Nashik-Today
02/02/2026 Page No. 2

सकाळ

# हरवलेल्या दुचाकीची स्क्रॅपमध्ये विक्री?

## पोलिसांनी तक्रार दडपली, लिलाव केला आणि आता उडवाउडवीची उत्तरे

■ रावसाहेब उगले : सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. १ : अपार्टमेंटमधून चोरी झालेल्या अन् पोलिसांच्या भाषेत हरविलेल्या दुचाकीची तक्रार नोंदवून न घेणे, वर्षभर फिरवणे आणि अखेर त्याच दुचाकीचा पोलिसांकडूनच स्क्रॅपमध्ये लिलाव होणे, हा प्रकार केवळ निष्काळजीपणा नसून पोलिस प्रशासनाच्या गंभीर अपयशाचे जीवंत उदाहरण ठरत आहे. धक्कादायक बाब म्हणजे, हीच दुचाकी आज खुलेआम रस्त्यावर सुसाट धावत असताना पोलिस मात्र, 'आम्हाला काही माहिती नाही' अशी भूमिका घेत आहेत. तक्रारदाराच्या रेट्यानंतर शुक्रवारी (ता. ३०) पिंपळगाव पोलिसांनी ती दुचाकी ताब्यात घेतली असली तरी दुचाकी परत देण्यासाठी आता नवाच फंडा वापरला जात आहे.

पिंपळगाव बसवंत येथील तौसिफ शेख यांची दुचाकी (एमएच १५, डीटी ४५८५) ही ९ नोव्हेंबर २०२३ ला पोद्देकेनगर येथील अपार्टमेंटमधून चोरीला गेली. याबाबत शेख यांनी १४ नोव्हेंबर २०२३ रोजी पिंपळगाव बसवंत पोलिस ठाण्यात लेखी तक्रार अर्ज सादर केला. मात्र, तक्रार नोंदवून घेण्याऐवजी पोलिसांनी त्यांना वर्षभर चकरा मारायला लावल्या.

**दुचाकी पोहोचली स्क्रॅपपर्यंत**

मार्च २०२५ मध्ये आडगाव पोलिसांनी या दुचाकीचा स्क्रॅपमध्ये लिलाव केला. कायदेशीर नियमानुसार, जप्त किंवा बेवारस वाहनांचा लिलाव करण्यापूर्वी मूळ मालकाचा शोध घेणे, आरटीओ तपासणी करणे आणि चोरीची नोंद आहे का याची खातरजमा करणे बंधनकारक असते. मग या प्रकरणात ही प्रक्रिया झालीच नाही की मुद्दाम टाळली गेली, असा प्रश्न उपस्थित होतो. चोरीची तक्रार वेळेत दिली गेली असतानाही ती नोंदवली नाही, लिलावाआधी मूळ मालकाची खातरजमा केली नाही आणि आता सत्य समोर येऊनही दुर्लक्ष केले जात आहे. या सर्व बाबी केवळ निष्काळजीपणाच्या पलिकडच्या आहेत. त्यामुळे हे प्रकरण स्वतंत्र चौकशीची मागणी करत आहे. आज मूळ मालक तौसिफ शेख न्यायासाठी दरवाजे ठोठावत आहे तर चोरीची दुचाकी पिंपळगाव पोलिस ठाण्याच्या आवारात मूळ मालकाच्या प्रतिक्षेत उभी आहे.

> हरवेली दुचाकी संबंधिताने स्क्रॅपमध्ये खरेदी केलेली आहे. खरेदीदार आणि तक्रारदार एकमेकांचे नातेवाईक आहेत. त्यांना एकमेकांशी तडजोड करून दुचाकी देण्यास सांगितले आहे. हरवेली दुचाकी मूळ व्यक्तीला परत दिली आहे. २०२३ च्या तक्रार अर्जाबद्दल आपल्याला काही माहित नाही.
>
> **- प्रदीप देशमुख,** पोलिस निरीक्षक, पिंपळगाव बसवंत

> पिंपळगाव पोलिसांनी संबंधिताला बोलावून दुचाकी देण्यास सांगितले आहे. मात्र, अद्याप दुचाकी मिळालेली नाही. २०२३ ला तक्रार देऊनही पोलिसांनी फिर्याद नोंदवून घेतलेली नाही.
>
> **- तौसिक शेख,** तक्रारदार



### पोलिसांचे हात वर

७ ऑक्टोबर २०२५ ला शेख हे ओझर येथे गेले असता त्यांना स्वतःचीच चोरीस गेलेली दुचाकी रस्त्यावर धावताना दिसली. चौकशी केल्यावर संबंधित व्यक्तीने आडगाव पोलिसांच्या लिलावात ही दुचाकी आठ हजार ९०० रुपयांना स्क्रॅपमध्ये खरेदी केल्याचे म्हटले आहे. परंतु, तसे पुरावे मिळाले नाहीत. त्यामुळे चोरीची दुचाकी पोलिसांच्या माध्यमातूनच 'कायदेशीर' बनवली गेली, असा धक्कादायक निष्कर्ष निघतो. हा प्रकार समोर आणूनही पिंपळगाव पोलिसांनी जबाबदारी झटकत, 'आम्हाला काहीच माहिती नाही,' असे सांगत हात वर केले. ९ जानेवारी २०२६ ला पुन्हा पाठपुरावा केल्यानंतर संशयित खरेदीदाराला पोलिस ठाण्यात बोलावण्यात आले. मात्र, त्यानंतरही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे पोलिस कारवाई का करीत नाहीत, स्वतःसह कुणाला वाचवले जात आहे का, असा प्रश्न विचारला जात आहे.

सकाळ

# जटायू तीर्थक्षेत्राची अधिकाऱ्यांकडून पाहणी

## ग्रामपंचायतीने सुचविलेल्या कामांबाबत चर्चा

**सर्वतीर्थ टाकेद, ता. १ :** सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर सर्वतीर्थ टाकेद येथील जटायू तीर्थक्षेत्र व परिसराचा सर्वांगिण विकास करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. ग्रामपंचायत व स्थानिक ट्रस्टने सुचविलेल्या विविध विकासकामांचा समावेश अधिकृत आराखड्यात करण्यात यावा, यासाठी ही पाहणी करण्यात आली.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सोनवणे, पाणीपुरवठा विभागाचे तायडे, गटविकास अधिकारी महेश वळवी, अतिरिक्त गटविकास अधिकारी चिंतामण गोडे, प्रशासक तथा विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर कराळे व ग्रामविकास अधिकारी विजय रासकर उपस्थित होते.

अधिकारी पथकाने जटायू तीर्थक्षेत्राची पाहणी करून कुंभमेळ्यानिमित्त येणाऱ्या साधू, महंत व भाविकांच्या सोयी-सुविधांबाबत स्थानिक पदाधिकारी व ट्रस्ट प्रतिनिधींशी सविस्तर चर्चा केली. ग्रामपंचायत व ट्रस्टकडून कोट्यवधी रुपयांचा आराखडा सुचविण्यात आली असून त्यामध्ये श्रीराम मंदिराचा जिर्णोद्धार, साधू-महंतांसाठी होम- हवन व साधना केंद्र, १५०० मीटर भूमिगत गटार व्यवस्था, वाहनतळासाठी पेव्हर ब्लॉक, बस निवारा, पोलिस चौकी, शौचालय व स्नानगृह, भोजनालय, काँक्रिटीकरण, साधूंसाठी ५० खोल्यांची निवास व्यवस्था, निवारा शेड, तीर्थ व मंदिर सुशोभीकरण, पाण्याची टाकी, जनरेटर, अंतर्गत रस्ते व पाणपोई आदी कामांचा समावेश आहे. उपसरपंच रामचंद्र परदेशी, सामाजिक कार्यकर्ते रतन नाना बांबळे, ललित मडके, शांताराम भगि तसेच ट्रस्टचे अंबादास महाराज श्रीवास्तव यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.



सर्वतीर्थ टाकेद : येथील जटायू तीर्थक्षेत्राची पाहणी करताना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार व अन्य अधिकारी. (छायाचित्र : शाहबाज शेख)

Nashik, Nashik-Today
02/02/2026 Page No. 2

नवराष्ट्र Nashik | 02 February 2026 | Page 3

# सर्वसामान्यांच्या आकांक्षा पूर्ण करणारा

## मंत्री महाजन यांची अर्थसंकल्पाबाबत नाशकात प्रतिक्रिया



### नाशिक जिल्हा व उ.महाराष्ट्राला काय?

नाशिक जिल्हा व उत्तर महाराष्ट्राला केंद्रीय अर्थसंकल्पात काय तरतूद आहे का? असा प्रश्न मंत्री महाजन यांना पत्रकारांनी विचारला असता त्यांनी अर्थसंकल्पात केलेली तरतूद ही सर्वांसाठीच आहे. त्यामुळे त्याचा फायदा सर्वांनाच मिळेल असे सांगितले.

**नाशिक, (प्र.)** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज संसदेत सादर केलेला केंद्रीय अर्थसंकल्प हा सर्वसमावेशक, गरीबकेंद्रित आणि भविष्यातील भारताला महासत्ता बनविण्याच्या दिशेने टाकलेले ठोस पाऊल असल्याची प्रतिक्रिया जलसंपदा, आपत्ती व्यवस्थापन तथा कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी व्यक्त केली आहे. हा अर्थसंकल्प केवळ आकड्यांचा खेळ नसून, सामान्य नागरिकांच्या आशा-आकांक्षा आणि देशाच्या दीर्घकालीन विकासाचा रोडमॅप असल्याचे त्यांनी सांगितले.

मंत्री महाजन म्हणाले की, या अर्थसंकल्पात गरीब कल्याण, ग्रामीण विकास आणि सर्वसामान्य माणसाच्या जीवनमान उंचावण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. ग्रामीण विकासासाठी तब्बल साडे बारा लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, यामुळे खेडी अधिक सक्षम होतील, रोजगारनिर्मितीला चालना मिळेल आणि स्थलांतर थांबवण्यास मदत होईल. पाच लाख लोकसंख्या असलेली गावे स्वयंपूर्ण करण्याचा सरकारचा संकल्प या बजेटमधून स्पष्ट होत आहे. शेती आणि ऊर्जाक्षेत्राबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, सोलर आणि वीज क्षेत्राला दिलेले प्रोत्साहन ऐतिहासिक आहे. शेतीआधारित वीजनिर्मितीमुळे शेतकऱ्यांच्या वीज गरजा पूर्ण होतीलच, शिवाय भविष्यात अतिरिक्त वीज इतर राज्यांना किंवा उद्योगांना देता येईल. त्यामुळे येणाऱ्या काळात वीज स्वस्त होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

सेमी कंडक्टर मिशनसाठी ४० हजार कोटी रुपयांची तरतूद ही 'आत्मनिर्भर भारत'च्या दिशेने मोठी झेप असून, भारताला तंत्रज्ञान क्षेत्रात जागतिक स्तरावर सक्षम बनवेल, असेही त्यांनी नमूद केले. वाहतूक, रस्ते विकास, जलवाहतूक आणि ट्रान्सपोर्ट क्षेत्राला दिलेले प्राधान्य हे उद्योग, व्यापार आणि पर्यटनासाठी उपयुक्त ठरणार आहे. आरोग्य क्षेत्रात कॅन्सर व मधुमेहावरील औषधे स्वस्त करण्याचा निर्णय हा सामान्य रुग्णांसाठी दिलासा देणारा असल्याचे मंत्री महाजन यांनी सांगितले. पर्यटन आणि क्रीडा क्षेत्रालाही चालना देण्यात आली असून, क्रीडा साहित्य स्वदेशी पद्धतीने तयार करण्याला प्राधान्य देणे हा देशांतर्गत उद्योगांसाठी महत्त्वाचा निर्णय आहे. २०२० ते २०४७ या कालखंडात भारताला महासत्ता बनविण्याचा संकल्प या अर्थसंकल्पातून स्पष्ट दिसतो. त्यामुळे हा अर्थसंकल्प केवळ आजचा नाही, तर उद्याच्या विकसित भारताचा पाया घालणारा विकासात्मक अर्थसंकल्प आहे, असे ठाम मत मंत्री गिरीश महाजन यांनी व्यक्त केले.

# वाहतूक पोलिसांना दीडशे बॉडीवॉर्न कॅमेरे

## गर्दी नियंत्रणासह ई-चलनासाठी उपयोग होणार

**नाशिक (प्र.)** सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शहर वाहतूक पोलिसांना लवकरच नवीन दीडशे बॉडीवॉर्न कॅमेरे देण्यात येणार आहे. शहरातील रस्ते व पूल उभारणी, दुरुस्तीसह द्वारका येथील 'ग्रेड सेपेटर' उभारणीसाठी इतर मार्गांकिन जड-अवजड व नियमित वाहतूक वळविण्यात आली. कोंडी, समस्यांमुळे नागरिकांची पोलिसांसोबत हुज्जत वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे सुरक्षा व पुराव्यांकरीता नवीन दीडशे बॉडी वॉर्न कॅमेरे खरेदी केले जाणार आहेत.

ई-चलान करताना अनेकदा वाद उद्भवतात. तसेच पोलिसही आपल्याकडील मोबाईलमध्ये फोटोज घेतात. असे फोटो न्यायालयातही उपयोगी पडत नाही. याबाबत गत महिन्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही बॉडी कॅमेरे असलेल्या वाहतूक पोलिसांनीच कारवाई करणे उचित असल्याचे सांगत टप्याटप्याने राज्यभरातील वाहतूक पोलिसांनी बॉडी कॅमेरे देण्याचे सुतोवाच केले होते. नाशिकमध्ये यापूर्वी दिलेले १५० कॅमेरे नादुरुस्त झाले आहेत. तसेच त्यांचे तंत्रज्ञानही फार जुने आहेत. आता नाशिक शहर पोलिसांच्या वाहतूक पोलिसांना १५० कॅमेरे लवकरच उपलब्ध होतील.



### काय आहे बॉडीवॉर्न कॅमेरे

दंडात्मक कारवाई आणि त्यानंतर होणाऱ्या वादांच्या पार्श्वभूमीवर पारदर्शकता राखण्यासाठी अग्रयावत बॉडीवॉर्न कॅमेऱ्यांचा वापर करण्यास काही वर्षांपासून सुरूवात झाली. नाशिकमध्ये सर्व प्रथम हे कॅमेरे २०१५च्या कुंभमेळ्या दरम्यान दाखल झाले होते. त्यामुळे वाहतूक पोलिसांना घटनास्थळाचे थेट चित्रीकरण करण्याची सुविधा प्राप्त होते.

### एका स्पॉटवर एक कॅमेरा

वाहतूक पोलिसांची संख्या ही खूपच मर्यादीत असून, सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी त्यात वाढ करण्यात येणार आहे. सिंहस्थ कुंभमेळ्यात बॉडी कॅमेऱ्याचा चांगला वापर होऊ शकतो. त्यामुळे चारपैकी एका कर्मचाऱ्याकडे कॅमेरा देण्याचे यापूर्वीचे धोरण यापुढे सुद्धा कायम ठेवण्यात येईल.

### वाहतूक विभागाचे सात पथके कार्यरत

पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या आदेशान्वये शहरातील सातही वाहतूक पथकांनी वाहतूक सुरक्षा, नियमनाचे चोख नियोजन केले आहे. परंतु, शहरातील प्रत्येक रस्त्यावर सुरू असलेल्या खोदकामांमुळे प्रत्येकाच्या खोळंबा होत आहे. वाहतूक सहाय्यक आयुक्त अदिता शिंदे यांनी सातही पथकांनी चोख बंदोबस्त, बॅरेकेडिंग आणि गर्दीच्या ठिकाणी लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यासाठी पंचवटी, सरकारवाडा, नाशिकरोड, अंबड या प्रमुख चार पथकांसह द्वारका, एक्स्लो पॉइंट, सातपूर हे अतिरिक्त तीन पथके कार्यरत आहेत.

तयारी

## पायभूत सुविधासाठी शिर्डीला २४.५३ कोटी रुपये; त्र्यंबकेश्वर दर्शनपथ कामास वेग

# दुसऱ्या टप्प्यातील विकासकामांसाठी ३९० कोटी मंजूर

नाशिक (प्र.) सिंहस्थ कुंभमेळा तयारीच्या पार्श्वभूमीवर नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाने त्र्यंबकेश्वर, शिर्डी तसेच संबंधित जोड रस्त्यांवरील महत्त्वाच्या पायाभूत सुविधा व गर्दी व्यवस्थापनाच्या कामांना प्रशासकीय मंजुरी दिली. विभागीय आयुक्त तथा कुंभमेळा प्राधिकरण प्रमुख प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ऑनलाईन बैठकीत या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.




त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या दुसऱ्या टप्प्यातील विकासकामांना सुमारे ३९० कोटी रुपयांची संयुक्त प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे दर्शन पथ व घाटांचा विकास, शाही मार्गाचे पुनर्विकास व सौंदर्यीकरण, विश्री भवन,शिवसृष्टी उद्यान व सार्वजनिक जागांचा विकास तसेच विक्रेत्यांसाठी नियोजित

## शिर्डी-संगमनेर दरम्यानच्या जोडरस्त्यांच्या विकासासाठी १७.२५ कोटी रुपये मंजूर

- कामामुळे भाविकांना हालचाली सुलभ होऊन कुंभमेळा काळातील नियोजनबद्ध व सुरक्षित व्यवस्थापनास चालना मिळणार आहे. त्र्यंबकेश्वर येथील ऐतिहासिक कुशावर्त कुंड यांच्या जतन व दुरुस्तीसाठी ३.१२ कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये [illegible] तसेच छत संरचनेच्या दुरुस्तीचा समावेश आहे.
- तसेच या बैठकीत शिर्डी येथे २४.५३ कोटी रुपयांच्या रस्ता व पार्किंगच्या कामाला मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये होल्डिंग एरिया, पिक-अप व ड्रॉप-ऑफ व्यवस्था, श्री साईबाबा मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यांचे रुंदीकरण तसेच भाविकांच्या गर्दीचे नियोजनबद्ध व्यवस्थापनाचा समावेश आहे. कुंभमेळा तीर्थक्षेत्र परिपथातील महत्त्वाचा धार्मिक केंद्रबिंदू मानून शिर्डी येथे कुंभमेळा वारसा दर्शविणारी स्वागत कमान उभारली जाणार आहे. शिर्डी–संगमनेर दरम्यानच्या महत्त्वाच्या जोड रस्त्यांच्या विकासासाठी १७.२५ कोटी रुपयांची प्रशासकीय मंजुरी देण्यात आली असून, यामुळे आंतरजिल्हा भाविक वाहतूक अधिक सुरक्षित होण्यास मदत होणार आहे. याशिवाय गोदावरी–नंदिनी संगमाजवळ टाकळी येथे नवीन घाटाच्या बांधकामास ४२.१६ कोटी रुपयांची प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे घाटाची लांबी सुमारे ४०० मीटरपर्यंत वाढणार असून, प्रमुख स्नान पर्वणीच्या दिवशी भाविकांची क्षमता, सुरक्षितता व गर्दी नियंत्रण अधिक सक्षम होणार आहे.
- बैठकीस कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह, पालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, अहिल्यानगर जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, शिर्डी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सतीश दिघे, कुंभमेळा प्राधिकरण उपआयुक्त केमेंद्र चौधरी उपस्थित होते.

# भारताच्या उड्डाणाला बळ देणारा



देशाच्या दीर्घकालीन विकासदृष्टीचा स्पष्ट आणि भक्कम आराखडा मांडणारा अर्थसंकल्प आहे. कर रचनेत स्थैर्य राखत विविध क्षेत्रांत मोठ्या घोषणा करून अर्थव्यवस्थेला गती देण्याचा प्रयत्न यामधून स्पष्ट दिसतो. गेमिंग, कंटेंट क्रिएशनसारख्या नव्या क्षेत्रांसाठी १५ हजार शाळांमध्ये विशेष लॅब्स उभारून २०३० पर्यंत २० लाख व्यावसायिक घडवण्याचा संकल्प हा डिजिटल आणि क्रिएटिव्ह इंडियाला नवे बळ देणारा आहे. पुणे–हैदराबादसह सात हाय-स्पीड रेल कॉरिडॉर्समुळे प्रवास सुलभ होईल, व्यापाराला चालना मिळेल आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला वेग प्राप्त होईल. कृषी आणि उद्योग क्षेत्रालाही या अर्थसंकल्पातून नवे बळ मिळाले आहे. नारळ, काजू, कोको, बदाम यांसारख्या पिकांच्या उत्पादनवाढीसाठी विशेष योजनांमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

– **छगन भुजबळ**, अन्न व नागरी पुरवठा मंत्री.

# सिंहस्थाच्या नावाखाली गोरगरीब हॉकर्सवर अन्याय !

▸ पंचवटी (वा.) वैष्णवरोड रामकुंड परिसरातील खासगी जागेवर गेल्या अनेक वर्षांपासून उदरनिर्वाहासाठी व्यवसाय करणाऱ्या हॉकर्स व टपरीधारकांवर कुंभमेळ्याच्या नावाखाली अन्यायकारक कारवाई करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे. कोणतीही पूर्वसूचना न देता मनपा अतिक्रमण विभागाने टपऱ्या हटविल्याने हॉकर्स व प्रशासनात तीव्र खडाजंगी झाली. घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी आलेल्या कुंभमेळामंत्री गिरीश महाजन यांना संतप्त हॉकर्सनी मनपा आयुक्तांविरोधात तक्रारी मांडत घेराव घालून न्याय



देण्याची मागणी करण्यात आली. यावर पालकमंत्री महाजन यांनी 'या प्रकरणात नक्कीच तोडगा काढू' असे आश्वासन दिले. वैष्णव रोड रामकुंड येथील ही जागा पूर्वी माधवराव पेशव्यांच्या सासरच्या 'रास्ते परिवाराची' असल्याचे सांगण्यात

> हा पहिला कुंभ नाही, आमच्या परिवारांनी अनेक कुंभ पाहिले आहेत. आजपर्यंत कधीही या कायदेशीर टपऱ्या हटविण्यात आलेल्या नाहीत. शहरात धनदांडग्यांची बेकायदेशीर अतिक्रमणे असताना त्याकडे दुर्लक्ष केले जाते आणि गोरगरीब व्यावसायिकांच्या खाजगी जागेतील टपऱ्यांवरच कारवाई होते, यामागे संशय आहे.
>
> **- विजय राजपालगिरी गोस्वामी.**

येते. पुढे योगेश गणेशगिरी गोस्वामी यांनी सातत्याने पाठपुरावा करून ही जागा गोसावी समाजाच्या नावावर करून घेतली. सिंहस्थात नागासाधूंच्या सोयीसाठी तसेच नंतर गोसावी समाजाच्या दफनविधीसाठीही या जागेचा वापर झाला आहे.

गोसावी समाज संस्थेच्या व्यवस्थापकपदी असलेल्या गोस्वामी यांना मध्यंतरी अर्धांगवायूचा झटका आल्याने व्यवस्थापनात बदल झाला आणि त्यानंतरच ही कारवाई झाल्याची चर्चा हॉकर्समध्ये आहे. १९९० सालीही वाद होऊन टपरीधारक न्यायालयात गेले असता तत्कालीन जिल्हाधिकारी व मनपा अधिकाऱ्यांनी टपरीधारकांच्या बाजूने निकाल दिला होता. सध्याच्या मनपा आयुक्तांनी बेकायदेशीररीत्या अतिक्रमण हटविल्याचा आरोप वैभव गोस्वामी, विजय गोस्वामी, रजनी हिंगमिरे, आकाश खोडे, आकाश सुरडकर, श्रीकांत आडोळे, विजय बोरसे यांनी केला आहे.

संभ्रम

## मार्ग बदल, वेळेत वाढ; प्रवासी अक्षरशः वाऱ्यावर, नाराजीचे वातावरण

# द्वारका कामाचा धक्का थेट निमाणी स्थानकाला

▶ **पंचवटी (वा.)** द्वारका येथील ग्रेड सेप्रेटरच्या कामासाठी प्रस्तावित वाहतूक बदलांचा सर्वांत मोठा फटका निमाणी बसस्थानकातून प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांना बसणार आहे. कोणतीही ठोस पूर्वसूचना, पर्यायी व्यवस्था किंवा प्रवासी सुलभता केंद्र न उभारता राबविण्यात येणाऱ्या या बदलांमुळे निमाणी बसस्थानकात गोंधळ, संभ्रम आणि नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. निमाणी बसस्थानकातून दररोज सुरत, वापी, वलसाड, इंदोर, मालेगाव, मनमाड, जळगाव, धुळे, नंदुरबार, शिरपूर, सटाणा, शहादा यांसह छत्रपती संभाजीनगर, जालना, बुलढाणा, लोणारकडे जाणाऱ्या शेकडो लांब पल्ल्याच्या व ग्रामीण फेऱ्या सुटतात. या सर्व बसेस आता नांदूरनाका - नाशिकरोड - इंदिरानगर अंडरपास मार्गे वळवण्यात येणार असल्याने प्रवासाच्या कालावधी लक्षणीय वाढणार आहे. वेळ, खर्च आणि सुरक्षिततेचा त्रिकोणी फटका, मार्ग बदलामुळे प्रवासासाठी जादा वेळ, इतर साधनांवर अवलंबित्व वाढण्याची शक्यता अपुरी माहितीमुळे बस चुकण्याचा धोका, महिला, वृद्ध व आजारी प्रवाशांची कुचंबणा अशी स्थिती निर्माण होणार असल्याची भीती प्रवाशांमधून व्यक्त होत आहे.



“ आम्ही ग्रामीण भागातून पहाटे येतो, निमाणीवरच मुंबईची बस मिळायची. आता अचानक महामार्ग बसस्थानक गाठल्यावर आम्ही जायचं कसं? कुठलीही सूचना नाही, हा प्रवाशांवर अन्याय आहे.

— प्रदीप शिलावट, प्रवासी (नाशिक–सटाणा)

“ मार्ग बदलामुळे वेळ वाढणार, बस उशिरा सुटणार आणि वर माहितीही नीट नाही. आधीच तिकीट दर जास्त, आता हा नवा त्रास. प्रशासनाने प्रवाशांचा विचार करायलाच हवा.

— छाया क्षीरसागर, प्रवासी (नाशिक–धुळे)

## प्रवाशांकडून मदत कक्षासह सूचना फलकांची मागणी

निमाणी बसस्थानकात तातडीने स्वतंत्र प्रवासी मार्गदर्शन कक्ष, बदललेल्या फेऱ्यांचे मोठे सूचना फलक, अतिरिक्त कर्मचारी व स्वयंसेवकध्वनीप्रणालीद्वारे सातत्याने घोषणा अशा उपाययोजना न झाल्यास, द्वारका काम सुरू होण्यापूर्वीच निमाणी बसस्थानक प्रवाशांच्या रोषाचे केंद्र बनेल, अशी तीव्र प्रतिक्रिया उमटत आहे.

## ‘निमाणी’तून मुंबई गाड्या हद्दपार

धुळे व जळगाव मार्गांवरून मुंबईकडे जाणाऱ्या व येणाऱ्या सर्व रा.प. बसेसना निमाणी बसस्थानकात प्रवासी चढ-उतारास बंदी घालण्यात आली आहे. या बसेस थेट महामार्ग बसस्थानकावरूनच चालणार असल्याने, निमाणीवर येणाऱ्या प्रवाशांना अचानक बसस्थानक बदलण्याचा फटका बसणार आहे. विशेषतः ग्रामीण भागातून येणाऱ्या प्रवाशांसाठी हा बदल अतिशय गैरसोयीचा ठरणार आहे.

## व्हीजी ३० वापरावर तात्काळ ब्रेक ● आरएस १ ने नव्याने काम करण्याचे आदेश

# निकृष्ट रस्तादुरुस्ती कामावर आयुक्तांची कारवाई

नाशिक (प्र.) शहरातील विकासकामे केवळ कागदावर नव्हे तर प्रत्यक्ष मैदानावर तपासली जातील आणि गुणवत्तेबाबत कोणतीही ढिलाई सहन केली जाणार नाही, हे पुन्हा एकदा ठामपणे अधोरेखित करत मनपा आयुक्त मनिषा खत्री यांनी रस्ते दुरुस्ती कामातील त्रुटींवर थेट कारवाई केली.



वडाळा शिवार येथील संत सावता माळी नगर, विठ्ठल मंदिर परिसरात सुरू असलेल्या रस्ता दुरुस्ती व सरफेस ड्रेसिंग कामाच्या ठिकाणी आयुक्तांनी अचानक भेट देत पाहणी केली. या वेळी मंजूर अंदाजपत्रक व तांत्रिक मापदंडानुसार आरएस १ बिटुमन मिश्रण वापरणे अपेक्षित असताना, प्रत्यक्षात व्हीजी ३० बिटुमन वापरून काम सुरू असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. ही गंभीर बाब लक्षात येताच आयुक्तांनी कोणताही विलंब न करता काम तात्काळ थांबवण्याचे आदेश दिले. तसेच चुकीच्या पद्धतीने टाकलेला रस्त्याचा थर पूर्णपणे काढून टाकून, निर्धारित आरएस १ मिश्रणानेच नव्याने व दर्जेदार काम पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी कंत्राटदार व संबंधित मनपा अधिकाऱ्यांना दिले.

## झिरो टॉलरन्स धोरण प्रभावीपणे

आयुक्तांच्या या थेट कारवाईमुळे शहरातील कंत्राटदार व मनपाच्या प्रशासकीय यंत्रणेला स्पष्ट संदेश गेला असून सुरू असलेल्या सर्व विकासकामांवर कठोर देखरेख आणि झिरो टॉलरन्स धोरण प्रभावीपणे राबवले जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. गतीसोबत गुणवत्ता आणि नियोजनासोबत शिस्त हीच नाशिकच्या विकासाची ओळख बनवण्याच्या दिशेने मनपा प्रशासनाची पावले अधिक ठाम आहेत हे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे.

## विकासकामात गुणवत्ता हीच अंतिम कसोटी


नागरिकांच्या करातून होणाऱ्या प्रत्येक विकासकामात गुणवत्ता हीच अंतिम कसोटी आहे. निकृष्ट काम करणाऱ्यांना कोणतीही सहानुभूती दाखवली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा आयुक्त खत्री यांनी दिला. या पाहणी दरम्यान अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, मनपाचे गुणवत्ता अभियंता नितीन पाटील, शहर अभियंता संजय अग्रवाल यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
नाशिक आवृत्ती
epaper.deshdoot.com
02 Feb 2026 - Page 1

# नाशिककडे दुर्लक्ष? सिंहस्थाचाही उल्लेख नाही

नाशिक । प्रतिनिधी

काल केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत सादर केलेला अर्थसंकल्प महाराष्ट्रासाठी आणि विशेषतः नाशिकसाठी एक प्रकारे निराशाजनक ठरला आहे. आगामी सिंहस्थ मेळा, वाढती लोकसंख्या, अपुरी पायाभूत सुविधा आणि नागरिकांच्या मूलभूत गरजा लक्षात घेता नाशिकसाठी भरीव तरतूद होणे अपेक्षित होते. मात्र, या अर्थसंकल्पात नाशिकचा साधा उल्लेखही न झाल्याने नाराजी दिसून येत आहे.



नाशिकमध्ये होणारा सिंहस्थ मेळा हा केवळ धार्मिक सोहळा नसून तो जागतिक स्तरावरील एक भव्य आयोजन आहे. देश-विदेशातून कोट्यवधी भाविक या मेळ्याला उपस्थित राहतात. या पार्श्वभूमीवर मेट्रो प्रकल्प, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, रिंगरोड, पाणीपुरवठा, मलनिस्सारण व्यवस्था, रस्ते, आरोग्य सेवा, स्वच्छता यांसारख्या पायाभूत सुविधांसाठी विशेष केंद्रीय पॅकेज जाहीर होणे आवश्यक होते. मात्र, या अर्थसंकल्पात त्याबाबत कोणतीही ठोस घोषणा किंवा निधीची तरतूद करण्यात आलेली नाही. नाशिक हे धार्मिक, औद्योगिक, शैक्षणिक आणि कृषी क्षेत्रात महत्वाचे शहर आहे. तरीही शहराच्या वाढत्या गरजा लक्षात घेता केंद्र सरकारकडून

पान ८ वर >>>



राज्य शासनानेच अद्याप तयारी केलेली दिसत नाही. तेव्हा केंद्र सरकारकडून तरी काय अपेक्षा करणार? या अर्थसंकल्पात काही ठोस निधीची घोषणा होईल, अशी अपेक्षा होती. मात्र, त्याचा साधा उल्लेखही दिसला नाही. केंद्र व राज्य निधीची तरतूद करुन कामांना सुरवात करावी.

■ महंत भक्तिचरणदास महाराज, राष्ट्रीय प्रवक्ते वैष्णव आखाडा परिषद



मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनात नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ मेळ्याच्या अनुषंगाने निधीची ठोस तरतूद करण्याची मागणी केली होती. मात्र, यंदाच्या अर्थसंकल्पात नाशिकबाबत कोणतीही सकारात्मक तरतूद दिसून येत नाही, ही अत्यंत निराशाजनक बाब आहे.

■ राजाभाऊ वाजे, शिवसेना (उबाठा) खासदार, नाशिक

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
नाशिक आवृत्ती
epaper.deshdoot.com
02 Feb 2026 - Page 2 CITY

# सतर्कतेसाठी बॉडी वॉर्न कॅमेरे

## द्वारकाच्या 'ग्रेड सेप्रेटर' कामामुळे नाशिककरांच्या मनात कोंडी; ३०० मीटरनंतर पर्यायी मार्ग

■ नाशिक । प्रतिनिधी

सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर द्वारका येथील ग्रेड सेप्रेटर उभारणीसाठी इतर मार्गांवरुन जड-अवजडसह नियमित वाहतूक वळविण्यात आली आहे. कोंडी, समस्यांमुळे नागरिकांची पोलिसांसोबत हुज्जत वाढण्याची शक्यता असल्याने वाहतूक पोलीस सतर्क झाले आहेत. संयमाने परिस्थिती हाताळण्यासह सुरक्षा व पुराव्यांकरीता नवीन दीडशे बॉडी वॉर्न कॅमेरे खरेदी केले जाणार आहेत.




पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या आदेशान्वये शहरातील सातही वाहतूक पथकांनी वाहतूक सुरक्षा, नियमनाचे चोख नियोजन केले आहे. परंतु, शहरातील प्रत्येक रस्त्यावर सुरू असलेल्या खोदकामांमुळे प्रत्येकाचा खोळंबा होत आहे. वाहतूक सहाय्यक आयुक्त अद्विता शिंदे यांनी सातही पथकांनी चोख बंदोबस्त, बॅरकेडिंग आणि गर्दीच्या ठिकाणी लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यासाठी पंचवटी, सरकारवाडा, नाशिकरोड, अंबड या प्रमुख चार पथकांसह द्वारका, एस्क्लो पॉइंट, सातपूर हे अतिरिक्त तीन पथके कार्यरत आहेत. दरम्यान, शहरातील वाहतूक व्यवस्थेत बदल झाल्यासंदर्भात पोलिसांनी वेळोवेळी अधिसूचना जारी करुन नागरिकांना सूचित केले आहे. विशेष म्हणजे, शहरातील प्रत्येक चौकांत फलकांद्वारे दुरुस्ती कामे व पर्यायी रस्त्यांची माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. तरीही काही ठिकाणी नागरिकांमार्फत पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांशी हुज्जत घातली जात आहे.

| |
|---|
| ■ सन २०१७ मध्ये शहरात 'बॉडी वॉर्न कॅमेरे' खरेदी |
| ■ बहुतांश कॅमेरे कालबाह्य व नादुरुस्त |
| ■ सन २०२५ मध्ये १५० नवीन कॅमेरे खरेदीचा निर्णय |
| ■ वाहतूक बदल, नाकाबंदी व महत्त्वाच्या बंदोबस्तात कॅमेऱ्यांचा वापर |
| ■ द्वारका ग्रेड सेपरेटरमुळे वाहनधारकांना ३०० मीटरवरुन पर्यायी मार्ग |

देशदूत
नाशिक आवृत्ती
epaper.deshdoot.com
02 Feb 2026 - Page 08 CHOJA

# नाशिककडे दुर्लक्ष? सिंहस्थाचाही उल्लेख नाही

अपेक्षित असलेला निधी मिळालेला नाही. शहरातील वाहतूक कोंडी, अपुरी बससेवा, पिण्याच्या पाण्याची समस्या, ड्रेनेज व्यवस्था, प्रदूषण आणि वाढती लोकसंख्या यावर उपाययोजना करण्यासाठी भरीव तरतुदी आवश्यक होत्या. अर्थसंकल्पात नाशिकसाठी स्वतंत्र तरतुद नसल्याने विकासकामांना मोठा फटका बसणार आहे. नाशिकसारख्या महत्त्वाच्या शहराला सिंहस्थासाठी विशेष निधी न देणे हे राज्यावर अन्याय असल्याची भावना व्यक्त होत आहे. पश्चिम बंगालसारख्या काही राज्यांच्या आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवूनच हा अर्थसंकल्प सादर करण्यात आल्याचा आरोपही केला जात आहे. काही निवडक राज्यांना झुकते माप देऊन इतर राज्यांकडे दुर्लक्ष करण्यात आल्याची भावना निर्माण झाली आहे.

शिल्पकार विकासाचा...

देशदूत

नाशिक आवृत्ती

epaper.deshdoot.com
02 Feb 2026 - Page 3 CITY

# सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर रस्ते विकासाला गती

## शहरजिल्ह्यात सुमारे १६ हजार ४९४ कोटींच्या कामांचे नियोजन

**नाशिक । प्रतिनिधी**

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहर व जिल्ह्यातील पायाभूत सुविधांचा व्यापक विकास करण्यावर केंद्र सरकार, राज्य सरकार तसेच सिंहस्थ प्राधिकरणांकडून विशेष भर देण्यात येत आहे. या अंतर्गत शहर व जिल्ह्यातील रस्ते विकासासाठी एकूण सुमारे १६ हजार ४९४ कोटी रुपयांच्या कामांचे नियोजन करण्यात आले असून, विविध माध्यमांतून ही कामे हाती घेण्यात आली आहेत.

शहर, त्र्यंबकेश्वर, शिर्डी परिसरावर विशेष लक्ष नाशिक शहर, त्र्यंबकेश्वर, नाशिक जिल्हा तसेच शिर्डी परिसरातील रस्ते, दळणवळण व्यवस्था आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी शासन गांभीर्याने लक्ष देत आहे. केंद्र सरकार, राज्य शासन आणि संबंधित प्राधिकरणांच्या माध्यमातून विविध ठिकाणी रस्ते व जोडरस्त्यांच्या कामांना गती देण्यात आली आहे.

### राज्य व केंद्र मोठ्या प्रमाणात गुंतवणूक

नाशिक महानगरपालिकेच्या माध्यमातून २,६०८.६४ कोटी रुपयांची रस्ते व पायाभूत सुविधांची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत १,९८५.३० कोटी रुपयांची राज्य शासनाची कामे प्रस्तावित आहेत, तर ४,१९८.२१ कोटी रुपयांच्या केंद्र सरकारच्या माध्यमातून विकास कामांना मंजुरी देण्यात आली आहे.

राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरण (न्हाई) मार्फत केंद्र सरकारच्या निधीतून २,५६८ कोटी रुपयांची रस्ते विकासाची कामे हाती घेण्यात आली आहेत. तसेच, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या माध्यमातून प्राधिकरणाच्या निधीतून ४,६२७.४७ कोटी रुपयांची कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत.



### रिंग रोडसह अंतर्गत रस्त्यांचा होणार कायापालट

या सर्व विकासकामांमुळे नाशिक शहराला जोडणारे प्रमुख रस्ते, शहराभोवतीचा रिंग रोड तसेच अंतर्गत रस्त्यांची सक्षम आणि आधुनिक उभारणी केली जाणार आहे. त्यामुळे सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने केवळ भाविकांच्या सोयीसाठीच नव्हे, तर दीर्घकालीन दृष्टीने शहराच्या पायाभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणावर विकास होणार असल्याचे स्पष्ट चित्र दिसून येत आहे.

लोकमंथन

# सिंहस्थासाठी केंद्रीय मंत्र्यांनी जिल्हा प्रशासनाला दिल्या महत्त्वपूर्ण सूचना

**लोकमंथन । प्रतिनिधी**

**नाशिक ।** पुढील वर्षी नाशिक, त्र्यंबकेश्वर येथे होणारा सिंहस्थ- कुंभमेळ्याचा उत्सव मोठा सांस्कृतिक ठेवा आहे. त्याचे परिपूर्ण दस्तऐवजीकरण करावे, असे निर्देश केंद्रीय सांस्कृतिक व पर्यटनमंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी शनिवारी (ता. ३१) दिले. केंद्रीय मंत्री शेखावत यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ पायाभूत सुविधा व तयारी कामकाजाची आढावा बैठक झाली. याप्रसंगी ते बोलत होते. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, महापालिका आयुक्त मनीषा खत्री, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता अरुंधती शर्मा, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक जगदीश चव्हाण, महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभागाचे सहायक संचालक अमोल गोटे आदी उपस्थित होते.



केंद्रीय मंत्री शेखावत म्हणाले, की कुंभमेळ्याचे मोठे आध्यात्मिक महत्त्व आहे. त्याचे प्रतिबिंब रामकाल पथमध्ये उमटावे. रामकाल पथ साकारताना स्थानिक वास्तू कलेशी सुसंगत रचना करावी. तसेच रंगसंगतीच्या माध्यमातून भाविकांना रामायण काळाची माहिती होईल, असे नियोजन करावे. त्यासाठी चित्रकला शाळेच्या स्थानिक विद्यार्थ्यांची मदत घ्यावी. कुंभमेळ्याचे नियोजन करताना महिला, तरुणांसह समाजातील विविध घटकांचा सहभाग घ्यावा. कुंभमेळ्यानिमित्त तैनात अधिकारी व कर्मचाऱ्यांची कार्यशाळा घ्यावी.

त्यात त्यांना कुंभमेळ्याचे महत्त्व यासंबंधीची माहिती द्यावी. कुंभमेळ्यानिमित्त देश-विदेशातून भाविक येतील. त्यांच्यासाठीच्या पायाभूत सोयीसुविधा वेळेत पूर्ण कराव्या.

या कालावधीत मोबाईल नेटवर्क सुरळीत राहण्यासाठी आतापासून उपाययोजना कराव्या. रामकाल पथसह उर्वरित विविध विकास कामांसाठीचा प्रस्ताव राज्य शासनाच्या माध्यमातून तातडीने सादर करावा. तसेच त्र्यंबकेश्वर येथील विकास कामांचा समावेश असलेला परिपूर्ण आणि सर्वसमावेशक आराखडा सादर करावा. गर्दी व्यवस्थापनाचे सूक्ष्म नियोजन करावे. भाविकांच्या सोयीसाठी ठिकठिकाणी पाणी उपलब्ध होईल, असे नियोजन करावे. तसेच भाविकांसाठी हेल्पलाइन सुविधा कार्यान्वित करावी. नाशिकसह जिल्ह्यात धार्मिक, ऐतिहासिक पर्यटनाला मोठी संधी आहे. त्यादृष्टीने ब्रँडिंग करावे. नाशिक, त्र्यंबकेश्वर हवाई दळण- वळणाच्या सुविधा उपलब्ध होऊ शकतात का याची पडताळणी करावी, अशाही सूचना केंद्रीय मंत्री शेखावत यांनी केल्या.

लोकमंथन

# कुंभमेळ्याच्या कामात हलगर्जीपणा नको गिरीश महाजन यांचा कडक कारवाईचा इशारा

लोकमंथन । प्रतिनिधी



**नाशिक** । कुंभमेळ्याच्या निमित्ताने शहरात रस्ते, गोदावरी स्वच्छता, मलनिस्सारण प्रकल्पांची कामे सुरू आहेत. कामाच्या निमित्ताने नाशिककरांची तात्पुरती गैरसोय होऊ शकते, परंतु भविष्यात कायमस्वरूपी पायाभूत सुविधा उपलब्ध होणार असल्याचे मत कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी व्यक्त करताना दर्जेदार कामांसाठी सहकार्याचे आवाहन केले. कामांमध्ये त्रुटी आढळल्यास संबंधितांवर कारवाई करण्याचा इशारा त्यांनी दिला. कालिदास कलामंदिरात नाशिक- त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणातर्फे गुणवत्ता नियंत्रण प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या वेळी ते बोलत होते. ते म्हणाले, प्रयागराज कुंभमेळ्याचा अनुभव लक्षात घेता नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे जागेची मर्यादा आहे. प्रयागराजच्या तुलनेत भाविकांची संख्या चार ते पाचपटीने वाढणार असल्याने गर्दी व्यवस्थापनासह पायाभूत सुविधांचे शिस्तबद्ध नियोजन आवश्यक आहे. शासनाने विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. निधीचा अपव्यय होणार नाही याची दक्षता यंत्रणांनी घ्यावी. जगभरातून भाविक येणार असल्याने, नियोजनाचे कौतुक झाले पाहिजे, अशी भावना निर्माण झाली पाहिजे. त्यामुळे जबाबदारीने कामे पार पाडावी. कुंभमेळा संधी समजून शासकीय यंत्रणांनी जबाबदारीने काम करावे. कुंभमेळा जवळ आल्याने कालावधीत कामे पूर्ण करण्यासाठी 'ॲक्शन मोड' घ्यावा. विभागीय आयुक्त तथा कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम यांनी गुणवत्ता नियंत्रण नियोजन, अंमलबजावणीचा अविभाज्य भाग असल्याचे नमूद केले. विकास कामे करताना शासकीय यंत्रणांमधील समन्वय आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह म्हणाले, पावसाळ्याचा कालावधी व तीव्रता कामांच्या गुणवत्तेवर परिणाम करणार नाही, यासाठी अंमलबजावणीचे वेळापत्रक हवामानाशी सुसंगत असावे. गुणवत्ता हमी यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठीच कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन कार्यशाळेत आयआयटी मुंबईचे डॉ. धर्मवीर सिंह यांनी बिटुमिनस तसेच काँक्रिट रस्त्यांच्या बांधकामातील तांत्रिक बाबी, लवचिक व कठीण रस्त्यांचे निकष यावर सविस्तर मार्गदर्शन केले. विकास ठाकर यांनी नागरी पायाभूत सुविधा समन्वय, पावसाळी पाणी व्यवस्थापन, कामांची गुणवत्ता व नियंत्रण याविषयी माहिती दिली. त्रयस्थ गुणवत्ता नियंत्रण संस्थेचे अविनाश आठवले व वैभव भोसले यांनी आयएसओ मानकांनुसार तपासणी, निरीक्षण व अहवाल प्रक्रियेचे सादरीकरण केले. देवळाली कॅन्टोन्मेंट बोर्डाचे पियुष पाटील यांनी विविध परवानग्या व ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले.

लोकमंथन

# रामतीर्थावर फडकणार ५१ फुटांचा भव्य ध्वज

**लोकमंथन । प्रतिनिधी**

**नाशिक** । आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यात रामतीर्थ परिसरात ५१ फूट उंचीचा ध्वजस्तंभ उभारला जाणार असून, गंगा मंदिराच्या परिसरात ३१ फुटांचा ध्वजस्तंभ असेल. या ध्वजस्तंभाची पायाभरणी अनुक्रमे एक फूट व आठ इंच त्रिज्येची असेल. ध्वजस्तंभाचा पाया साधा ठेवला जाईल, तर सजावटीचे व प्रतीकात्मक काम स्तंभावर करण्याबाबत सर्वानुमते निश्चित केले आहे. आगामी नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर ध्वजस्तंभ व पताका यांच्या रचना व उभारणीबाबत आढावा व नियोजन बैठक नुकतीच स्मार्टसिटी मिशन कार्यालयात झाली. नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह अध्यक्षस्थानी होते. बैठकीत नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ कुंभमेळ्याच्या काळात उभारण्यात येणाऱ्या ध्वजस्तंभ व पताकांचे नियोजन, स्थापत्य रचना, साहित्य निवड, उंचीचे निकष, धार्मिक व सांस्कृतिक प्रतीकात्मकता तसेच कामकाजाच्या नियोजनावर सविस्तर चर्चा झाली. सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रस्तावित नियोजन व रचनेबाबत सविस्तर सादरीकरण केले. ध्वजस्तंभ मजबूत व टिकाऊ पायाभरणीसह उभारण्यात येणार असून, कोणत्याही प्रकारचे संरचनात्मक नुकसान होऊ नये, याची काळजी घेतली जाईल. नाशिक व त्र्यंबकेश्वर येथील पुरोहित संघांनी ध्वजस्तंभांसाठी आध्यात्मिक व धार्मिक रचनात्मक घटक सादर केले. हे घटक स्थापत्य रचनेत समाविष्ट कले जाणार असून, सार्वजनिक बांधकाम विभागाने दोन्ही पुरोहित संघांशी चर्चा करून अंतिम आराखडे सादर करण्याचे निर्देश दिले.

तसेच, पताकांची रचना संबंधित पुरोहित संघांकडूनच करण्यात येईल, असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. बैठकीचा समारोप करताना सर्व संबंधित विभागांना धार्मिक पावित्र्य, सांस्कृतिक महत्त्व व दीर्घकालीन उपयोगिता लक्षात घेऊन जबाबदाऱ्या वेळेत व समन्वयाने पार पाडण्याचे निर्देश दिले.

बैठकीस महापालिका आयुक्त मनीषा खत्री, शहर अभियंता संजय अग्रवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल पाटील, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता स्नेहल पगारे आदींसह कलाकार व शिल्पकार प्रमोद कांबळे, पुरोहित संघ नाशिकचे अध्यक्ष चंद्रशेखर पंचाक्षरी, रामानंदाचार्य दक्षिण पीठाचे सचिव प्रविण ठाकूर, गंगा गोदावरी पुरोहित संघाचे उपाध्यक्ष दिलीप शुक्ला, पुरोहित संघ त्र्यंबकेश्वरचे अध्यक्ष मनोज जेते, सचिव श्रीपाद अकोलकर, खजिनदार सुयोग देवकुटे आदी उपस्थित होते. समुद्रमंथनाशी संबंधित संदर्भ ध्वजस्तंभावर ध्वजस्तंभ हे केवळ भौतिक संरचना नसून श्रद्धा, सांस्कृतिक वारसा व सामाजिक एकतेचे प्रतीक आहे.

नवभारत Nashik | 02 February 2026 | Page 4

**कुंभमेला** | केंद्रीय मंत्री गजेंद्र सिंह शेखावत ने की तैयारियों की समीक्षा

# 'रामकाल पथ' में रामायण काल की झलक

## पूर्ण दस्तावेज तैयार करने के दिए निर्देश

■ **नाशिक, ब्यूरो.** केंद्रीय सांस्कृतिक एवं पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत ने कहा कि नाशिक-त्र्यंबकेश्वर में आयोजित होने वाला आगामी सिंहस्थ कुंभमेला एक विशाल सांस्कृतिक विरासत है. उन्होंने निर्देश दिए कि इस आयोजन का व्यापक और पूर्ण दस्तावेजीकरण किया जाना चाहिए ताकि इसकी महत्ता भविष्य के लिए संरक्षित रहे. केंद्रीय मंत्री शेखावत ने रविवार को जिलाधिकारी कार्यालय के केंद्रीय सभागार में सिंहस्थ कुंभमेला 2027 की बुनियादी सुविधाओं और तैयारियों की समीक्षा बैठक की अध्यक्षता की. इस अवसर पर राष्ट्रीय महिला आयोग की अध्यक्षा विजया रहाटकर, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम और कुंभमेला प्राधिकरण के आयुक्त शेखर सिंह सहित वरिष्ठ अधिकारी उपस्थित थे.



## वास्तुकला के साथ समन्वय बैठाने के दिए गए निर्देश

रामकाल पथ और स्थानीय कला का संगम: बैठक के दौरान श्री शेखावत ने विशेष रूप से 'रामकाल पथ' के निर्माण पर जोर दिया. उन्होंने कहा कि रामकाल पथ का निर्माण करते समय स्थानीय वास्तुकला के साथ समन्वय बिठाया जाए. पथ की रंग योजना और डिजाइन ऐसी हो जिससे श्रद्धालुओं को रामायण काल की अनुभूति हो. इसके लिए उन्होंने कला क्षेत्र के स्थानीय छात्रों की मदद लेने का सुझाव दिया. कुंभ के नियोजन में महिलाओं, युवाओं और समाज के विभिन्न वर्गों को शामिल किया जाए.



## बुनियादी सुविधाओं के साथ तकनीक पर दिया गया जोर

- केंद्रीय मंत्री ने निर्देश दिया कि देश-विदेश से आने वाले श्रद्धालुओं के लिए बुनियादी सुविधाओं का कार्य समय सीमा के भीतर पूरा हो. उन्होंने वर्तमान से ही मोबाइल नेटवर्क की सुचारू व्यवस्था सुनिश्चित करने और श्रद्धालुओं की सुविधा हेतु 'हेल्पलाइन' शुरू करने को कहा. साथ ही, उन्होंने नाशिक और त्र्यंबकेश्वर के लिए हवाई कनेक्टिविटी की संभावनाओं को तलाशने के भी निर्देश दिए. मंत्री महोदय ने भीड़ प्रबंधन के सूक्ष्म नियोजन और जगह-जगह पेयजल की उपलब्धता सुनिश्चित करने की बात कही.
- कुंभमेला ड्यूटी पर तैनात होने वाले अधिकारियों के लिए विशेष कार्यशालाएं आयोजित करने के निर्देश दिए ताकि वे इस आयोजन के आध्यात्मिक महत्व को समझ सकें. बैठक में विभागीय आयुक्त डॉ. गेडाम, कुंभमेला आयुक्त शेखर सिंह और मनपा आयुक्त मनीषा खत्री ने साधुग्राम, दर्शन पथ, रामकाल पथ, भूमि अधिग्रहण और प्रभावितों के पुनर्वास के संबंध में अब तक हुई प्रगति की विस्तृत जानकारी दी.

**बदलाव** | बिना पूर्व सूचना रूट डायवर्जन से हजारों वाहन चालकों सहित यात्री हुए परेशान

# निर्माणी बस स्टैंड पर यात्रियों को झेलनी पड़ी मुसीबतें

■ नाशिक, ब्यूरो. द्वारका सर्कल पर प्रस्तावित डेड सेपरेटर के काम के चलते किए गए यातायात बदलावों का सबसे बड़ा असर निर्माणी बस स्टैंड से यात्रा करने वाले हजारों यात्रियों पर पड़ने वाला है. बिना किसी ठोस पूर्व सूचना, वैकल्पिक व्यवस्था या यात्री सुविधा केंद्र के लागू किए जा रहे इन बदलावों के कारण निर्माणी बस स्टैंड पर भ्रम और भारी नाराजगी का माहौल है. निर्माणी बस स्टैंड से रोजाना सूरत, वापी, इंदौर, मालेगांव, जलगांव, धुलिया, नंदुरबार सहित छत्रपति संभाजीनगर और जालना की ओर जाने वाली सैकड़ों बसें चलती हैं. अब इन सभी बसों को नांदुरनाका - नाशिकरोड - इंदिरानगर अंडरपास के रास्ते मोड़ा जाएगा,





जिससे यात्रा के समय में काफी बढ़ोतरी होगी.मार्ग परिवर्तन से समय और खर्च बढ़ेगा, साथ ही अन्य साधनों पर निर्भरता बढ़ेगी. जानकारी के अभाव में बस छूटने का डर और बुजुर्गों व बीमार यात्रियों को होने वाली भारी परेशानी.धुलिया और जलगांव मार्ग से मुंबई आने-जाने वाली सभी राज्य परिवहन (ST) बसों के निर्माणी स्टैंड पर रुकने और यात्रियों को चढ़ाने-उतारने पर पाबंदी लगा दी गई है. ये बसें अब सीधे 'महामार्ग बस स्टैंड' से संचालित होंगी. ग्रामीण क्षेत्रों से आकर मुंबई जाने वाले यात्रियों के लिए यह बदलाव सबसे अधिक कष्टदायक साबित हो रहा है.सहायता केंद्र और सूचना बोर्ड की मांग: निर्माणी बस स्टैंड पर बढ़ते तनाव को देखते हुए यात्रियों ने प्रशासन से तत्काल निम्नलिखित व्यवस्थाओं की मांग की है.

## स्वतंत्र यात्री मार्गदर्शन केंद्र की स्थापना

“ बदले हुए रूट और समय सारणी के बड़े सूचना बोर्ड ,अतिरिक्त कर्मचारियों की नियुक्ति और लाउडस्पीकर के माध्यम से निरंतर घोषणा ,जानकारों का मानना है कि यदि प्रशासन ने समय रहते यात्रियों के लिए सुलभ उपाय नहीं किए, तो द्वारका का काम शुरू होने से पहले ही निर्माणी स्टैंड यात्रियों के बड़े विरोध का केंद्र बन सकता है .हम ग्रामीण क्षेत्रों से सुबह जल्दी आते हैं . निर्माणी से ही मुंबई की बस मिलती थी . अब अचानक उसे महामार्ग स्टैंड शिफ्ट कर दिया गया, हम वहां कैसे पहुंचेंगे ? कोई सूचना नहीं दी गई. यह अन्याय है .

- प्रदीप शिलावट, यात्री, नाशिक- सटाणा

# भक्तों की यात्रा बनेगी आसान

## भक्तों की यात्रा को आसान बनाने के लिए 'मेगा' प्लान

### मेला प्रशासन ने किया शहर का सयुंक्त सर्वे




■ नाशिक, (सं.) सिंहस्थ कुंभ मेले के दौरान भक्तों के आसान और सुरक्षित सफर के लिए पब्लिक ट्रांसपोर्ट सिस्टम को प्राथमिकता दी जा रही है. एसटी कॉर्पोरेशन भक्तों के ट्रांसपोर्ट के लिए 4,500 बसें देगा. साथ ही, जिले में जरूरी रेलवे लेवल क्रॉसिंग के मैनेजमेंट के लिए सिंहस्थ अथॉरिटी ने एक जॉइंट सर्वे किया है. नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभ मेले के सिलसिले में, सिंहस्थ-कुंभ मेला अथॉरिटी ने स्टेट ट्रांसपोर्ट कॉर्पोरेशन और रेलवे की एक मीटिंग की. यह मीटिंग कुंभ मेला कमिश्नर शेखर सिंह की मौजूदगी में पंचवटी में स्मार्ट सिटी मिशन ऑफिस में हुई. इस मौके पर महाराष्ट्र स्टेट रोड ट्रांसपोर्ट कॉर्पोरेशन के मैनेजिंग डायरेक्टर डॉ. माधव कुसेकर, जनरल मैनेजर (ट्रांसपोर्ट) नितिन मैंद, जनरल मैनेजर (सिविल इंजीनियरिंग) दिनेश महाजन, डिप्टी जनरल मैनेजर (ऑपरेशंस) चेतन हसबनीस, नाशिक रीजनल मैनेजर विजय गीते और दूसरे लोग मौजूद थे.

**बाहरी पार्किंग से अंदरूनी पार्किंग तक चलेगी बसें ;** कुंभ मेले के दौरान बाहरी पार्किंग से अंदरूनी पार्किंग तक 4500 एसटी बसें चलाई जाएंगी. ये बसें कस्बे मुकेने, ओझर, खेरवाडी, नाशिक रोड, देवलाली कैंप, इगतपुरी रेलवे स्टेशन वगैरह जगहों से त्र्यंबकेश्वर और अंदरूनी पार्किंग तक पहुंचाएंगी. इसके लिए एसटी कॉर्पोरेशन के अधिकारियों ने बताया कि बस की उपलब्धता, रूट प्लानिंग और सामान सप्लाई मैनेजमेंट के लिए सेंट्रल लेवल पर डिटेल्ड प्लानिंग चल रही है.



### बस स्टैंड का पुर्नविकास भी होगा



कुंभ मेले के तहत त्र्यंबकेश्वर, जव्हार फाटा, निफाड़ी, वानी, नाशिक हाईवे जैसे बड़े बस स्टैंड के रेनोवेशन और कंक्रीटिंग के लिए जल्द ही वर्क ऑर्डर दिए जाएंगे. साथ ही, सप्तश्रृंगगढ़ में जमीन अधिग्रहण प्रोसेस के हिसाब से शर्तों के साथ टेंडर बुलाने की संभावना पर भी चर्चा हुई. हर डिवीजन में अलग सिंहस्थ-कुंभ मेला सेल बनाने, डिवीजन प्लान और रिटायर्ड एसटी कर्मचारियों को नियम के मुताबिक मानदेय या कॉन्ट्रैक्ट बेसिस पर शामिल करने पर भी चर्चा हुई.

### रेलवे भी चलाएगी स्पेशल ट्रेनें

सिंहस्थ के दौरान रेलवे की तरफ से स्पेशल ट्रेनें चलाई जाएंगी. इस बारे में एक हाई-लेवल मीटिंग भी हुई. सेंट्रल रेलवे के भुसावल डिवीजन ने 16 जरूरी रेलवे लेवल क्रॉसिंग पर रिपोर्ट दी है. इन जगहों पर कई कामों को मंजूरी मिली है, और रेलवे डिपार्टमेंट ने इन्हें दिसंबर 2026 तक पूरा करने का टारगेट रखा है. कुंभ मेला अथॉरिटी रेलवे लेवल क्रॉसिंग पर सर्वे कर रही है. यह सर्वे 27 तारीख तक चलेगा. इसमें डिस्ट्रिक्ट एडमिनिस्ट्रेशन, पुलिस डिपार्टमेंट, म्युनिसिपल कॉर्पोरेशन, पब्लिक वर्क्स डिपार्टमेंट, डिस्ट्रिक्ट काउंसिल के साथ-साथ सेंट्रल रेलवे की दूसरी संबंधित एजेंसियां और अधिकारी हिस्सा ले रहे हैं.




नवभारत Nashik | 02 February 2026 | Page 2

# त्र्यंबकेश्वर में माघ पूर्णिमा पर हुआ बिल्व तीर्थ स्नान

■ त्र्यंबकेश्वर, (सं.) . आज यहां माघ पूर्णिमा के अवसर पर, अखिल भारतीय अखाड़ा परिषद द्वारा नील पर्वत के पीछे स्थित बिल्व तीर्थ में एक पवित्र स्नान संपन्न किया गया. अखाड़ा परिषद के महासचिव हरिगिरिजी महाराज उनकी पहल पर स्नान का आयोजन किया गया था. आगामी सिहस्थ कुंभ मेले के उत्साहपूर्वक और सुचारू रूप से संपन्न होने की कामना के लिए बिलवतीर्थ महादेव की प्रार्थना करने के बाद भगवान गुरु दत्तात्रेय हर हर महादेव के मंत्र का जाप करते हुए स्नान संपन्न किया गया. यह भव्य और दिव्य झील यहाँ के प्रसिद्ध नील पर्वत के पीछे स्थित है. तीन वर्ष पूर्व चंद्र ग्रहण के दौरान एक साधु ने यहां स्नान किया था. अखाड़ा परिषद के अध्यक्ष, रवींद्रपुरी महाराज, अखाड़ा परिषद के महासचिव हरिगिरिजी महाराज भी और शंकरानंद सरस्वती भी श्री पंचासनाम जूना

## भिक्षुओं ने किया स्नान



इसके लिए भिक्षु लगभग तीन घंटे तक इस मंदिर मे बैठे रहे. इसके लिए जिला कलेक्टर और आयुक्त को बुलाया गया और व्यवस्था की गई. साधुओं की ओर से महासचिव ने मांग की कि सरकार को त्र्यंबकेश्वर मंदिर मे देवी पार्वती की मूर्ति स्थापित करनी चाहिए और झील का सौदर्यीकरण करना चाहिए. हरिगिरी महाराज ने इस स्थान पर सड़क निर्माण की भी मांग की. सड़क बनने से क्षेत्र के लोगों के लिए परिवहन आसान हो जाएगा. फिलहाल सड़क की हालत अच्छी नही है.

अखाड़े के साधु सचिव महाराज एवं धनंजय गिरि महाराज ने स्नान किया.

साईमत



# विक्रमी झेप! खत वाहतुकीने ओलांडला ५३० लाख टनाचा टप्पा

**नाशिक । प्रतिनिधी।**

रेल्वे मंत्रालय आणि खते विभाग यांच्यातील समन्वयाने खरीप हंगाम २०२५ आणि चालू रब्बी हंगामात खतांची रेकची जलद आणि सुरळीत वाहतूक झाल्यामुळे राज्यांना खतांचा वेळेवर पुरवठा करणे दृष्टीपथात आले आहे. एप्रिल-डिसेंबर २०२५ दरम्यान खतांच्या वाहतुकीने आतापर्यंतचा उच्चांक गाठला. या काळात प्रथमच ५०० लाख मेट्रिक टनाचा टप्पा पार करत एकूण पुरवठ्याने ५३०.१६ लाख मेट्रिक टनाचा टप्पा ओलांडला.

खरीप असो वा रब्बी हंगाम, खतांची वेळेवर उपलब्धता शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची असते. तुटवड्यामुळे खतांच्या काळ्या बाजाराला प्रोत्साहन मिळते. शेतकऱ्यांना वेळेवर खते उपलब्ध करण्यासाठी रेल्वे मंत्रालय आणि खते विभागातील सुधारित समन्वयाचा परिणाम सुरळीत पुरवठ्यावर झाल्याचे रेल्वे प्रशासनाने म्हटले आहे. सर्वत्र वेळेवर पुरवठा झाल्यामुळे शेतकऱ्यांना ऐन लागवडीच्या हंगामात खतांची कोणतीही कमतरता भासणार नाही, याची हमी मिळाली. रेल्वे मंत्रालयाच्या प्रयत्नांमुळे देशभरात पुरेशा प्रमाणात खतांचा साठा उपलब्ध करण्यास मदत झाल्याचे खते विभागाने म्हटले आहे. या कालावधीत, जुलै २०२५ मध्ये रेकची सरासरी वाहतूक प्रतिदिन ७२ रेक्सपर्यंत वाढली, ऑगस्ट २०२५ मध्ये ती प्रतिदिन ७८ रेक्स, तर सप्टेंबर २०२५ मध्ये ती प्रतिदिन ८० रेक्सपर्यंत पोहोचली.

२०२५-२६ या आर्थिक वर्षात एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीत सरकारने सर्व राज्यांमध्ये सर्व प्रमुख खतांचा पुरेसा साठा उपलब्ध केला. युरियाची देशात ३१२.४० लाख मेट्रिक टन आवश्यकता असताना सरकारने ३५०.४५ लाख टन साठा उपलब्ध केला. तसेच पी अँड के खतांची (उदा. डीएपी, एमओपी आणि एनपीकेएस) २५२.८१ एलएमटी आवश्यकता होती. त्यासाठी २८७.६१ लाख मेट्रिक टन साठा उपलब्ध करण्यात आला. सातत्याने मूल्यांकन केलेल्या गरजेपेक्षा अतिरिक्त आणि अखंड पुरवठा दिसून आला. राज्यांनीही तळागाळापर्यंतच्या शेतकऱ्यांना खतांचा पुरेसा साठा उपलब्ध व्हावा, यासाठी ठोस उपाययोजना केल्या आहेत. एप्रिल-डिसेंबर २०२५ दरम्यान खतांच्या वाहतुकीने आतापर्यंतचा उच्चांक गाठला, या काळात पहिल्यांदा खतांच्या पुरवठ्याने ५३०.१६ लाख मेट्रिक टनाचा टप्पा ओलांडला. ही आकडेवारी आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या संबंधित कालावधीच्या तुलनेत १२.२ टक्के वाढ दर्शवते, तर आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या मागील विक्रमापेक्षा ८.५ टक्के जास्त आहे.

**युरियाची वाहतूक ११ हजार रेकवर**

युरिया रेकच्या वाहतुकीत गेल्या वर्षीच्या तुलनेत आठ टक्के वाढ नोंदवत संख्या १० हजार ८४१ रेक्सवर पोहोचली, तर पी अँड के खतांच्या वाहतुकीत १८ टक्के वाढ होऊन ती ८ हजार ८९६ रेकवर पोहोचली. रेल्वे मंत्रालय, बंदरे, राज्य सरकारे आणि खत कंपन्या यांच्यातील वाढलेल्या समन्वयामुळे ऐन कृषी हंगामात राज्यांना खतांचा सुरळीत आणि वेळेवर पुरवठा झाल्याचा दावा केला जात आहे.

लोकमत

# नाशिक मेट्रोला केंद्राचा 'लाल सिग्नल'; प्रस्ताव राज्याकडे परत, स्वप्न अधांतरी!

## नाशिक मेट्रोबाबत केंद्र सरकारची भूमिका उदासिन

।नाशिक । प्रतिनिधी।

**सार्वजनिक जलद वाहतुकीची गरज लक्षात घेऊन नाशिक शहरात टायरवर आधारीत मेट्रो निओची संकल्पना मांडण्यात आली होती. केंद्र सरकारने २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात त्याचा उल्लेख देखील केला. या प्रकल्पाविषयी लोकसभेत नुकत्याच उपस्थित झालेल्या प्रश्नावर केंद्र सरकारने मेट्रो प्रकल्प खर्चिक असतात, मेट्रो हा राज्याचा विषय आहे. नाशिक मेट्रोचा प्रस्ताव निरीक्षणासह राज्याकडे परत पाठविल्याचे लेखी उत्तरात म्हटले आहे. यामुळे केंद्र सरकारची नाशिक मेट्रोबाबत भूमिका अद्याप अनिश्चित व उदासीन असल्याचे समोर आले आहे.**



नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे यांनी अतारांकित प्रश्नात नाशिक मेट्रो प्रकल्पाची घोषणा, सध्याची स्थिती, आवश्यक मंजुरी, निधी, अडथळे, मेट्रो निओचा निर्णय तसेच २०२७ च्या कुंभमेळ्यापूर्वी मेट्रो कार्यान्वित करण्याबाबत सरकारची भूमिका आदी मुद्यांवर विचारणा केली होती. केंद्रीय गृहनिर्माण व नागरी कार्य मंत्रालयाच्या उत्तरात सर्वसाधारण आणि गोलमोल बाबींचाच उल्लेख असून कोणत्याही ठोस, कालमर्यादेसह प्रतिसाद दिला नसल्याचा आक्षेप खासदार वाजे यांनी नोंदविला. ना कालमर्यादा, ना निर्णय, ना स्पष्ट दिशा असा हा प्रतिसाद नाशिककरांच्या अपेक्षांवर पाणी फेरणारा आहे.

अर्थसंकल्पात नाव, पण जमिनीवर काहीच नाही. नाशिक मेट्रो प्रकल्पाचा उल्लेख २०२१-२२ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात झालेला असतानाही प्रत्यक्षात ठोस पाऊल उचललेले नाही, ही स्थिती मंत्रालयाच्या उत्तरातून समोर आली. राज्य सरकारने सादर केलेला मेट्रो निओचा प्रस्ताव केंद्राने निरीक्षणांसह परत पाठवला, मात्र त्या निरीक्षणांवर पुढे काय कार्यवाही झाली, याबाबत केंद्राने मौन बाळगले आहे.

नाशिकमध्ये २०२७ मध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यात कोट्यवधी भाविक सहभागी होण्याचा अंदाज आहे. या काळात मेट्रोसारख्या सार्वजनिक वाहतुकीची नितांत गरज आहे. मात्र, कुंभमेळ्यासाठी मेट्रोबाबत सरकारची कोणतीही स्पष्ट योजना नाही. नाशिकच्या मेट्रोचा प्रस्ताव राज्य सरकारकडे प्रलंबित असल्याने निश्चित कालमर्यादा किंवा आर्थिक तरतुदींबाबत ठोस माहिती उपलब्ध नसल्याचे उत्तरात म्हटले आहे. आज शहर वाहतूक कोंडी, वाढती लोकसंख्या आणि अपुऱ्या सार्वजनिक वाहतुकीमुळे हैराण आहे. अशा परिस्थितीत केंद्र आणि राज्य सरकारमधील फाइल फेरीत नाशिक मेट्रो अडकून पडणे, हे अन्यायकारक आहे. वाढते शहरीकरण, अपुरे रस्ते, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, प्रदूषण यांचा भविष्याचा विचार करता मेट्रो किंवा निओ मेट्रो हे प्रकल्प शहरासाठी अत्यंत आवश्यक आहेत. अर्थसंकल्पात जाहीर करूनही सरकार टाळाटाळ करत असेल तर हे निराशाजनक आणि नाशिककरांच्या विश्वासाला तडा देणारे असल्याचे खासदार वाजे यांनी म्हटले आहे.

दै.लोकमत टाईम्स

दि.२ फेब्रुवारी,२०२६

LOKMAT TIMES

# NTKMA initiates plan to manage railway operations during Kumbh

## It has scheduled joint surveys at all identified locations between Jan 23 and Feb 27

LOKMAT NEWS NETWORK

NASHIK, FEB 1

The Nashik Trimbakeshwar Kumbh Mela Authority (NTKMA) has initiated a coordinated process to ensure smooth, safe and uninterrupted movement of pilgrims and vehicles during the Simhastha Kumbh Mela 2027 by planning advance measures for management of critical railway level crossings across Nashik district. The Simhastha Kumbh Mela, scheduled from July to September 2027, is expected to witness a very large influx of devotees and a significant increase in vehicular as well



as rail traffic. In view of this, NTKMA has taken up focused planning to ensure uninterrupted railway operations, including the running of additional special trains, while maintaining public safety and traffic efficiency.

In this context, a high-level review meeting was held recently at the Nashik Smart City Office, where the need for eliminating congestion at busy railway level crossings was discussed. The meeting deliberated on permanent solutions through construction of Road Over Bridges (ROBs), Road Under Bridges (RUBs) and Limited Height Subways, as well as interim arrangements through temporary closures with planned traffic diversions during the period of Kumbh Mela, wherever required.

Based on a detailed proposal received from the Bhusawal Division of Central Railway, 16 critical railway level crossings have been identified where ROBs, RUBs or related works are already sanctioned and targeted for completion by December 2026. In cases where commissioning of these structures may not be feasible before the Kumbh period, well-planned diversion routes have been proposed to allow temporary closure of the level crossings for the three-month Kumbh duration, ensuring smooth movement of trains and enhanced safety.

NTKMA has scheduled joint surveys at all identified locations between January 23 and February 27 to assess the on-ground feasibility of these diversion plans and to facilitate timely issuance of No Objection Certificates (NOCs). These joint surveys will be carried out with the participation of concerned district administration, police, municipal authorities, Public Works Department, Zilla Parishad and other relevant agencies, along with Central Railway officials.

The joint surveys will help finalise diversion arrangements, review traffic connectivity for local villages, and streamline inter-departmental coordination. Necessary instructions have been issued to all concerned authorities to depute responsible officers with relevant maps, traffic data and proposals for effective decision-making. The progress of these surveys and decisions regarding temporary closures and diversions will be reviewed in the next coordination meeting scheduled on February 28.

LOKMAT TIMES • Anchor

# Civic body plans modern dialysis unit at Nashik Road

Proposal cleared by health department; tender process underway

LOKMAT NEWS NETWORK
NASHIK, FEB 1

Keeping in mind the upcoming Simhastha Kumbh Mela and the growing healthcare needs of the city, the Nashik Municipal Corporation (NMC) is planning to set up a dialysis centre with 12 beds at Thackeray Hospital in Nashik Road at a cost of around ₹ 2 crore.

Bytco Hospital, also known as Balasaheb Thackeray Hospital, is one of the city's major hospitals. After its expansion, the hospital now has nearly 500 beds, with scope to add another 500 in the future. A modern blood bank with advanced facilities is also expected to start within the next 15 days. This will make different blood components available and provide major financial relief to poor and middle-class patients.

As Nashik continues to expand rapidly, pressure on basic services such as healthcare has increased. The municipal corporation is therefore working to improve facilities, especially ahead of the Kumbh Mela. At present, the civic health department runs five major hospitals and about 35 urban health centres. Recently, 85 Health and Wellness Centres and 15 'Aapla Dawakhana' clinics have also been added.


File photo

> About ₹2 crore has been set aside for machinery and other supporting services. This centre will be very useful for patients suffering from kidney failure. The tender cell is currently checking the technical aspects, after which further action will be taken.
>
> **- Dr Vijaykumar Deokar,** Chief Medical Officer, NMC

## Proposal sent for tender scrutiny

Along with the blood bank, a 12-bed dialysis centre will also be started at the hospital. As the earlier tender did not receive a response, a fresh tender is being issued. The health department has sent the proposal to the tender cell for technical checking and approval. The required machinery is expected to be finalised within the next 15 days. After approval from the tender cell, financial bids will be opened and a contractor will be selected.

LOKMAT TIMES
Monday, 2.02.2026

# Defence self-reliance to boost Nashik industries

## Higher central funding for modernisation; jobs, investment to rise

LOKMAT NEWS NETWORK
NASHIK, FEB 1

The central government has increased funding for modernising the defence sector, which will allow private companies to take part in manufacturing after research and development. This has raised hopes among entrepreneurs in Nashik.

Nashik has been declared a defence hub and is also set to be included in a defence corridor. This is expected to benefit both small and large industries and create more employment opportunities. The city already plays an important role with the Hindustan Aeronautics Limited (HAL) plant and a DRDO research unit. Fighter aircraft such as MiG, Sukhoi and now Tejas are produced at HAL, along with training simulators.

After the liberalisation of industry policies, local companies have begun supplying defence materials, with a growing contribution to the Tejas aircraft project. Under the government's Atmanirbhar Bharat initiative, more weapons, fighter jets and drones will now be made domestically, a move expected to further benefit Nashik-based industries.




The Nashik semi high-speed railway project had earlier gained strong momentum, but it has now stalled due to a dispute over whether the route should go via Sangamner or Shirdi. No funds have been allocated for the project in this year's budget.

Although Sukhoi and Tejas fighter aircraft are currently being manufactured at HAL, there is a strong possibility that fifth-generation fighter jets will also be produced in Nashik in the future. This is likely to lead to the addition of new production lines at the facility. As a result, local employment is expected to increase and industrial growth in the region is likely to receive a major boost.

Despite a ₹ 25,000 crore master plan being prepared for the Kumbh Mela to be held in Nashik from this year, no specific announcement was made for the Nashik and Trimbakeshwar Kumbh Mela in the budget presented on Sunday, February 1. Kumbh Mela Minister Girish Mahajan, however, claimed that separate funds would be allocated for the event.

The proposal to develop the country's first tyre-based Metro Neo in Nashik has been shelved once more. There was earlier talk of exploring a regular metro or a similar monorail system, but no progress has been made. Funds have not even been allocated for a basic survey of the project.

The central government has allocated ₹ 6.81 lakh crore for the defence sector in the Union Budget, marking a 15 per cent increase compared to the previous year. Spending on the modernisation of equipment and weapons has been raised by 22 per cent. The Defence Research and Development Organisation (DRDO) will carry out research, after which many of the required systems and equipment will be procured from the private sector. This is expected to directly benefit entrepreneurs and industries in Nashik.

A Defence Corridor has been proposed for Nashik. Earlier, the government had announced the setting up of a Defence Innovation Hub in the city. Later, Chief Minister Devendra Fadnavis reaffirmed the plan for a Defence Corridor during the municipal election campaign. At the recent investment summit held in Davos, agreements worth ₹ 30,100 crore were signed for the Nashik region, including projects related to the defence sector. With the central government promoting private sector participation under the Atmanirbhar Bharat initiative, this development is seen as a major boost for industries in Nashik.

दै.दिव्य मराठी

दि.२ फेब्रुवारी,२०२६

# नाशिकसह राज्यात तीन दिवस ढगाळ वातावरण; काही ठिकाणी हलका पाऊस

**प्रतिनिधी** | नाशिक

नाशिकसह महाराष्ट्रात आगामी तीन दिवस ढगाळ वातावरण राहणार असून, तसेच तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे. २ ते ४ फेब्रुवारीपर्यंतच्या ३ दिवसांत नाशिक, त्र्यंबकेश्वर, सिन्नर, इगतपुरी, दिंडोरी, निफाड, कळवण, सटाणा, मालेगाव, संगमनेर, अकोला, कोपरगाव, राहता, धुळे, साक्री, शिंदखेडा, शिरपूर या तालुक्यांसह जळगाव व नंदुरबार जिल्ह्यातील लगतच्या परिसरात ढगाळ वातावरण राहील. तुरळक ठिकाणी दोन ते चार मिलिमीटर पावसाची शक्यता आहे. ५ फेब्रुवारीपासून ढगाळ वातावरण निवळण्याची शक्यता आहे.

७ फेब्रुवारीपर्यंतच्या आठवड्यात महाराष्ट्रात पहाटे ५ चे किमान तापमान फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यातील त्याच्या या काळातील सरासरी तापमानापेक्षा ३ ते ४ अंश सेल्सिअसने अधिक राहील. उत्तर कोकण व मध्य महाराष्ट्रातील १३ जिल्ह्यांत थंडीऐवजी रात्रीचा उकाडा जाणवणार आहे. उर्वरित महाराष्ट्रात संमिश्र वातावरण राहील. केवळ माफक थंडीची शक्यता आहे. फेब्रुवारी महिन्याच्या उर्वरित ३ आठवड्यांत महाराष्ट्रात थंडी जाणवणार आहे, परंतु नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, छत्रपती संभाजीनगर, जालना या जिल्ह्यात थंडीचे प्रमाण कमी राहणार आहे.

## आर्द्रता थंड वाऱ्यात मिसळत असल्याने ढगांचे सावट

*▪ नेहमी जम्मू-काश्मीर, लेह लडाख यांच्या अक्षवृत्तांवरून पश्चिमेकडून पूर्वेकडे जाणारे पश्चिमी प्रक्षोभ फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात पंजाब, राजस्थान राज्याच्या अक्षवृत्तांवरून खान्देशसह सध्या उत्तर महाराष्ट्रापर्यंत पोहोचले आहे. शिवाय महाराष्ट्रावर प्रत्यावर्ती चक्रीय वारे स्थित असल्यामुळे बंगालच्या उपसागरातील आर्द्रता या थंड वाऱ्यात मिसळत आहे. त्यामुळे खान्देशसह संपूर्ण उत्तर महाराष्ट्रावर ढगांचे सावट आहे.*

**– माणिकराव खुळे,** हवामानतज्ञ

**गोंधळ** • द्वारका भुयारी मार्गाच्या कामात चालढकल; सिटीलिंक, एसटी बसला फेरा

# वाहतूक बदलाचा फटका, प्रवाशांचा संताप

प्रतिनिधी | नाशिक

द्वारका चौकातील प्रस्तावित भुयारी मार्गाच्या पहिल्या टप्प्याचे काम सुरू होण्यास एमएसआरडीसी विभागाकडून होत असलेल्या चालढकलमुळे सर्वसामान्य नाशिककरांचे हाल होत आहेत. वाहतूक बदलाची अधिसूचना काढून पाच दिवस उलटले तरी प्रत्यक्ष काम सुरू न झाल्याने, नवीन मार्गाचा विनाकारण मोठा फेरा नागरिकांना पडत आहे. यामुळे एसटी, सिटी लिंक बसचे प्रवासी आणि वाहनचालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

वाहतूक मार्गात बदलाची अधिसूचना काढून पाच दिवसांचा कालावधीत उलटूनही संबंधीत विभागाकडून काम सुरू करण्यास विलंब होत असल्याने दोन्ही विभागात समन्वयाचा अभाव प्रकर्षाने दिसून येत आहे. मात्र यामुळे वाहनचालकांसह सिटी लिंक व एसटी बसने प्रवास करणाऱ्यांसह नागरिकांना मोठा फेरा पडत असल्याने त्यांची गैरसोय होत आहे.

द्वारका सर्कलवरून इतरत्र जाणारी अवजड वाहतुकीला शनिवारी (दि. ३१) रात्री १९ वाजेनंतर प्रवेश बंद करण्यात येणार होता. आता मंगळवार, दि. ३ पासून प्रत्यक्षात कामाला सुरुवात होणार असल्याचे एमएसआरडीसीकडून सांगण्यात असल्याने काम प्रत्यक्षात कधी सुरू होणार याबाबत अद्याप साशंकता आहे. वाहतूक पोलिसांनी नियोजित वाहतूक मार्ग बदलाची अधिसूचना काढून पाच दिवस उलटले आहेत. याचा फटका नागरिकांना बसत असल्याने पोलिसांवर टिका होत आहे.

वाहतूक मार्ग बदलाची अधिसूचना काढून पाच दिवस उलटले आहेत तरी भुयारी मार्गाचे काम सुरू झालेले नाही. आता मंगळवारी हे काम सुरू होईल असे सांगितले जात असले तरी याबाबत साशंकता असल्याने गोंधळ कायम आहे.

English Speaking Course
Google Rating (100)
4.8 ★★★★★
New Batches 4th Feb
1 to 2 pm | 8 to 9 pm
KEWAL ACADEMY
Ashok Stambh, Nashik
9325252546

## एमएसआरडीसी-वाहतूक पोलिस विभागात असमन्वयाने नागरिकांचे हाल

### काठे गल्ली-द्वारका रोडवर बॅरिकेटिंग

काठे गल्ली ते द्वारका रोडवर शोभा मोटरपर्यंत दोन्ही बाजूने रस्त्यावर २४ फुटावर बॅरिकेटिंग लावण्यात येणार आहे. या रोडवर फक्त, दुचाकी अन्य हलक्या वाहनांना प्रवेश सुरू राहणार आहे. द्वारकावरील भुयारी मार्गाच्या कामामुळे ठिकठिकाणी बॅरिकेटिंग लावण्यात येणार आहे.




द्वारका सर्कलवर अवजड वाहनांना बंदीचा लावलेला फलक.

### अवजड वाहनांसह बसच्या मार्गात बदल

द्वारका सर्कलवर भुयारी मार्गाच्या काम सुरू होणार असल्याने या भागातील वाहतूक कोंडी टाळण्याकरता सर्व प्रकारच्या अवजड वाहनांसह खासगी बस, एसटी बस पर्यायी मार्गाने वळवण्यात आल्या आहेत. या मार्गावर मुंबईकडे जाणाऱ्या वाहनांना फक्त रात्री १० ते सकाळी ८ पर्यंत प्रवेश खुला राहणार आहे.

**पर्यायी मार्ग असे : पुण्याकडून मुंबईकडे जाणारी वाहने** सिन्नर फाटा, दत्तमंदिर सिग्नल, फेम सिग्नल द्वारीकडे वळून रविशंकर मार्गाने अटवण हॉटेल, वडाळानाका सर्कल, साईनाथ सिग्नल, द्वारीकडे वळून कलानगर सिग्नल, पाथर्डी गाव सर्कल, पाथर्डी फाटा, वरवाडे पोहेर मार्गे एन एच ३ महामार्गाने मुंबईकडे जातील. पुणे कडे जाणारी वाहने- पाथर्डी फाटा, पाथर्डी गाव सर्कल द्वारीकडे कलानगर सिग्नल, साईनाथ सिग्नल, वडाळानाका सर्कल, रहमतनगर, अटवण हॉटेल, टेंबे पेट्रोल पंप, रंगा कॅम्पस द्वारीकडे वळून रविशंकर मार्गाने फेम सिग्नल, उजवीकडे वळून पुणा रोडने जातील.

• **एसटी बस पर्यायी मार्ग नाशिक रोड हून मुंबईकडे जाणारा मार्ग-** सिन्नर फाटा, दत्तमंदिर सिग्नल डावीकडे वळून संत सावता माळी मार्गाने म्हाडा कॉलनी वडाळा, कलानगर सिग्नल, लेखानगर, उजवीकडे वालभारती सर्विसरोडने जॉगिंग ट्रॅक, मुंबईनाका सर्कल, महामार्ग स्थानक येथून पाच मुंबईनाका, इंदिरानगर जॉगिंग ट्रॅक शाळे मार्गे पाथर्डी फाटा मार्गे पुढे मुंबईकडे जातील.

• **सिटी लिंक बस तपोवन येथून सुटणार-** शालिमार ते नाशिक रोड शालिमार, खडकाळी सिग्नल, म्हाडा सर्कल, उजवीकडे नेहरू उद्यान शालेय दूध बाजार चौक, कोकेवाडी, डावीकडे वळून वडाळा नाका, उजवी कडे वळून नागजी सिग्नल, अशोका सिग्नल, फेम सिग्नल मार्गे नाशिक रोड कडे जातील येतील.

• **सिटी लिंक बस तपोवन येथून सुटणार-** निमाणी बस स्थानकातून सुटणाऱ्या सर्व सिटी लिंक बसेस तपोवन सिटी लिंक बस डेपो येथून सुटतील.

**मंडे पॉझिटिव्ह** शहरातील ११ एसटीपी प्लांटमध्ये बसवणार नवीन मशीनरी

# गंगापूर एसटीपीत २९.५ दशलक्ष लिटर अशुद्ध पाण्यावर दररोज होणार प्रक्रिया

**प्रतिनिधी** | नाशिक

गोदावरीचे प्रदूषण कमी करण्यासाठी शहरातील ११ मलनिस्सारण (एसटीपी) केंद्रांमध्ये नवीन मशिनरी बसवण्यात येणार आहे. त्यामुळे गोदावरीत आता शुद्ध पाणी सोडण्यात येणार आहे. एकट्या गंगापूर येथील केंद्रातून दररोज १८ दशलक्ष लिटर अशुद्ध पाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी नदीत सोडले जाते. या केंद्रासाठी नवीन मशिनरी मंजूर झाल्याने ११.५ दशलक्ष लिटरने क्षमता वाढणार असून एकूण २९.५ दशलक्ष लिटर अशुद्ध पाणी शुद्ध करून नदीत सोडले जाणार आहे.

गोदावरीचे प्रदूषण रोखण्यासाठी शासन स्तरावर विविध योजना राबवण्यात येत आहेत. त्यात मलनिस्सारण केंद्र महत्त्वाचा घटक असल्याने या केंद्रांचे आधुनिकीकरण करण्यात येत आहे. शहरातील ११ पैकी गंगापूर व पिंपळगांव खांब हे दोन केंद्रच अपग्रेटेड आहेत. उर्वरित ९ केंद्रांवर जुनीच मशिनरी आहे. त्यामुळे या केंद्रांचे आधुनिकीकरण केले जात आहे. नवनिर्वाचित नगरसेविका अंकिता शिंदे यांनी प्रश्नाबाबत एसटीपी प्लांटला भेट देत माहिती जाणून घेतल्यानंतर केंद्रावरील अधिकारी लक्ष्मीकांत दुसाने यांनी याबाबत माहिती दिली.

## सध्या १८ दक्षलक्ष लिटर क्षमता, ११.५ दशलक्ष लिटरची वाढ

### इनसाइड स्टोरी

**साफसफाईवेळी अशुद्ध पाणी पात्रात**

अशुद्ध पाण्यावर प्रक्रिया झाल्यानंतर ते पाणी गोदावरीत सोडण्यापूर्वी मेरी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व थर्ड पार्टी असलेल्या अश्वमेध लॅबकडून पाण्याची तपासणी केली जाते. मात्र, वर्षातून एक ते दोन वेळा केंद्रातील मशिनरींची साफसफाई करताना दुर्गंधी सुटून अशुद्ध पाणी थेट गोदापात्रात जाते.

### दिव्य मराठी नॉलेज

**केंद्रापर्यंत आलेल्या पाण्याचे होते स्क्रीनिंग**

गंगापूर येथील सांडपाणी प्रक्रिया केंद्रात शिवाजीनगर, ध्रुवनगर, गंगापूर, रामेश्वरनगर परिसरातील ड्रेनेजचे अशुद्ध पाणी चेंबर्सद्वारे येते. या पाण्यात प्लास्टिकसह वेगवेगळा कचरा असतो. त्यामुळे या पाण्याचे केंद्रात स्क्रिनिंग केले जाते. त्यातून ६ ते १२ एमएमचा कचरा वेगळा केला जातो. त्यानंतर ते अशुद्ध पाणी ग्रीट रिमोव्हिएन युनिटमध्ये सोडून त्याचे शुद्धीकरण केले जाते.

**सोलार सिस्टीम सुरू करण्याचा मानस**



*गंगापूर येथील मलनिस्सारण केंद्रात २१ कर्मचारी चार शिफ्टमध्ये काम करतात. या केंद्राला दरमहा ९ लाख रुपये वीज बिल येते. हे वीज बिल कमी करण्यासाठी या ठिकाणी सोलर सिस्टीम सुरू करण्याचा माझा मानस आहे. सोलरसाठी एकदाच खर्च केल्यानंतर दरवर्षी १ कोटी ८ लाख रुपयांची बचत होणार आहे.* - **अंकिता शिंदे,** नगरसेविका

**दिव्य मराठी एक्सक्लुझिव्ह** नाशिककरांच्या सुरक्षिततेविषयी अग्निशमन, महापालिक प्रशासन उदासीन; एक नादुरुस्त, दुसरी प्रदर्शनापुरती

# 3 वर्षांपासून १3 लाखांच्या दोन अत्याधुनिक फायर बुलेट धुळीत पडून


[illegible] | नाशिक

[illegible]

## अग्निशमनलाच सुविधा नकोशी



[illegible]



[illegible]

## मूळ उद्देशालाच 'खो'

[illegible]

## दुरुस्तीचा प्रस्ताव दिला



[illegible]

**बैठक** • जनतेने सतर्कता बाळगून प्रशासनाला सहकार्य करण्याचे बारवाल यांचे आवाहन

# मालेगावी शब - ए - बारातच्या गर्दीवर सीसीटिव्हीसह पोलिसांची राहणार नजर

प्रतिनिधी | मालेगाव

प्रशासनाने पुरेशी खबरदारी घेत बंदोबस्त व सुविधा पुरविण्याचे नियोजन केले आहे. बडा कब्रस्तानसह इतर गर्दीच्या ठिकाणी सीसीटिव्ही कॅमेरे बसविले जातील. साध्या वेशात पोलिस पथके तैनात रहातील. सर्व कब्रस्तान परिसराची पहाणी करुन अडचणी दूर केल्या जातील. नागरिकांनी सतर्कता बाळगून कुठलाही अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता घेवून प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन शहर विभागाचे सहाय्यक पोलिस अधीक्षक सिध्दार्थ बारवाल यांनी केले.

येत्या ३ फेब्रुवारी रोजी मुस्लिम बांधवांचा शब-ए-बारात सण साजरा होत आहे. या दिवशी नागरिक आपल्या पूर्वजांच्या स्मृतींना उजाळा देतात. कबरींची रंगरंगोटी करुन दुवा पठण करतात. तसेच मशिदींमध्ये रात्रभर नमाज पठण करत असतात. सणाच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी (दि.३०) सायंकाळी पोलिस नियंत्रण कक्षात कब्रस्तान ट्रस्टी व शांतता समिती सदस्यांची बैठक बोलविण्यात आली होती.

यावेळी बारवाल यांनी मार्गदर्शन केले. महापालिका व खाजगी वीज कंपनीशी निगडीत सर्वच समस्या मार्गी लावल्या जातील. बडा कब्रस्तान, आयशानगर, सोनापूर, संगमेश्वर, कॅम्प आदी भागातील मुस्लिम दफनभूमींची पहाणी केली केली. मशिदी व कब्रस्तानच्या ट्रस्टींशी चर्चा करुन त्यांचे नियोजन जाणून घेतल्याचे बारवाल यांनी स्पष्ट केले.

कॅम्प विभागाचे सहाय्यक पोलिस अधीक्षक दर्शन दुगड, बडा कब्रस्तानचे ट्रस्टी अॅड. नियाज लोधी, मनपाचे अतिरिक्त आयुक्त रोहिदास दोरकुळकर यांनीही मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी सर्व कब्रस्तानांचे प्रमुख व पोलिस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी उपस्थित होते.




नियंत्रण कक्षात बैठकीप्रसंगी उपस्थित सहाय्यक पोलिस अधीक्षक दर्शन दुगड, सिध्दार्थ बारवाल, प्रांताधिकारी नितीन सदगीर आदी.

## कब्रस्तानांची स्वच्छता व अखंडीत वीजेची मागणी

कब्रस्तानांची स्वच्छता, पाणी, वीज, अतिक्रमण आदी समस्या मांडण्यात आल्या. मनपाचे अतिरिक्त आयुक्त दोरकुळकर यांनी या अडचणी सोडविण्याचे आश्वासन दिले. काही दिवसांपूर्वी बडा कब्रस्तानची पहाणी केली आहे. सध्या स्वच्छतेची कामे सुरु आहेत. बंद विद्युत दिव्यांची दुरुस्ती केली जाईल. अतिक्रमण हटवून रस्ते मोकळे केले जातील असेही दोरकुळकर यांनी सांगितले.

## बडा कब्रस्तानवर लक्ष

२००६ मध्ये याच दिवशी बडा कब्रस्तानजवळ बॉम्बस्फोट झाले होते. शहराची संवेदनशीलता व पूर्व इतिहास पहाता या भागात विशेष बंदोबस्त तैनात राहिल. भिक्षेकरुंना कब्रस्तान परिसरापासून दूर बसविले जाणार आहे. गर्दीचा विचार करता बडा कब्रस्तानमध्ये एका गेटने प्रवेश व तर मागील गेटने बाहेर पडण्यासाठी मार्ग खुला ठेवला जाणार आहे.

हमारा महानगर
epaper.hamaramahanagar.net
02 Feb 2026 - Page 5

# त्र्यंबकेश्वर के सिंहस्थ कुंभ मेले का संपूर्ण दस्तावेजीकरण किया जाए : मंत्री शेखावत

महानगर नेटवर्क

नाशिक

अगले वर्ष नाशिक के त्र्यंबकेश्वर में आयोजित होने वाला सिंहस्थ कुंभ मेला एक महत्वपूर्ण सांस्कृतिक धरोहर है। केंद्रीय संस्कृति एवं पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत ने आज निर्देश दिया कि इसका पूर्ण दस्तावेजीकरण किया जाए। केंद्रीय मंत्री शेखावत की अध्यक्षता में जिला कलेक्टर कार्यालय के केंद्रीय हॉल में नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभ मेला 2027 के लिए बुनियादी ढांचे और तैयारियों के कार्यों की समीक्षा बैठक आयोजित की गई। बैठक के दौरान वे बोल रहे थे। राष्ट्रीय महिला आयोग की अध्यक्ष विजया राहटकर, संभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभ मेला विकास प्राधिकरण के आयुक्त शेखर सिंह, जिला कलेक्टर आयुष प्रसाद, नगर आयुक्त मनीषा खत्री, लोक निर्माण विभाग के अधीक्षक अभियंता अरुंधती शर्मा, कार्यकारी अभियंता नवनाथ सोनवणे, महाराष्ट्र पर्यटन विकास निगम के क्षेत्रीय प्रबंधक जगदीश चव्हाण, महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभाग के सहायक निदेशक अमोल गोटे और अन्य उपस्थित थे।

केंद्रीय मंत्री श्री शेखावत ने कहा कि कुंभ मेले का आध्यात्मिक महत्व बहुत अधिक है। रामकाल पथ में इसकी झलक दिखनी चाहिए। रामकाल पथ का निर्माण करते समय स्थानीय स्थापत्य कला के अनुरूप डिजाइन तैयार किया जाना चाहिए। रंगों के प्रयोग से श्रद्धालुओं को रामायण काल की झलक मिल सके। इसके लिए चित्रकारी के स्थानीय छात्रों की सहायता ली जानी चाहिए। केंद्रीय मंत्री ने यह भी सुझाव दिया कि नाशिक और त्र्यंबकेश्वर में वायु रूपांतरण सुविधाएं उपलब्ध कराई जा सकती हैं या नहीं, इसकी पुष्टि की जानी चाहिए। संभागीय आयुक्त डॉ. गेडाम, कुंभ मेला आयुक्त श्री सिंह और नगर आयुक्त खत्री ने सिंहस्थ कुंभ मेले के अवसर पर चल रहे विकास कार्यों, साधुग्राम, त्र्यंबकेश्वर और रामकाल में दर्शन पथ, भूमि अधिग्रहण और प्रभावित लोगों के पुनर्वास के बारे में विस्तृत जानकारी दी।



## जोधपुर और बीकानेर के लिए सीधी ट्रेन सेवा शुरू की जाए

**नाशिक।** राजस्थान-हरियाणा-गुजरात प्रवासी संघ की ओर से केंद्रीय संस्कृति और पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत को ज्ञापन देकर नासिक से राजस्थान के जोधपुर और बीकानेर के लिए सीधी ट्रेन सर्विस शुरू करने की मांग की गई। राजस्थान प्रवासी संघ के प्रतिनिधि तेजपालसिंह सोढा ने अपनी बात रखते हुए कहा कि



धर्म, इंडस्ट्री और कॉमर्स के लिहाज से नासिक बहुत जरूरी शहर होने के बावजूद, यह दुख की बात है कि नासिक से राजस्थान के लिए कोई सीधी ट्रेन सर्विस नहीं है। राजस्थान, हरियाणा और गुजरात के बड़ी संख्या में नागरिक नासिक और उसके आसपास रहते हैं और उन्हें धार्मिक, सामाजिक, पारिवारिक और बिजनेस कारणों से अक्सर राजस्थान आना-जाना पड़ता है। इस मांग को गंभीरता से लेते हुए मंत्री गजेंद्रसिंह शेखावत ने पॉजिटिव रुख अपनाया। उन्होंने भरोसा दिलाया कि जल्द ही केंद्रीय रेल मंत्री अश्विनी वैष्णव से इस बारे में चर्चा करके नासिक से जोधपुर-बीकानेर के लिए सीधी ट्रेन सर्विस शुरू करने की कोशिश की जाएगी। उन्होंने यह भी साफ किया कि प्रवासी संघ की मांग को पूरा करने के लिए केंद्र सरकार के लेवल पर फॉलो-अप किया जाएगा।

हमारा महानगर

epaper.hamaramahanagar.net
02 Feb 2026 - Page 5

# सिंहस्थ कुंभ मेला इंफ्रास्ट्रक्चर के लिए 390 करोड की मंज़ूरी

**नाशिक।** आने वाले सिंहस्थ कुंभ मेला 2027 की तैयारियों के बैकग्राउंड में, नासिक-त्र्यंबकेश्वर कुंभ मेला अथॉरिटी ने त्र्यंबकेश्वर, शिरडी और उससे जुड़ी कनेक्टिंग सड़कों पर जरूरी इंफ्रास्ट्रक्चर और भीड़ मैनेजमेंट के कामों के लिए एडमिनिस्ट्रेटिव मंजूरी दे दी है। डिविजनल कमिश्नर और कुंभ मेला अथॉरिटी के चीफ प्रवीण गेडाम की अध्यक्षता में शुक्रवार को हुई मीटिंग में इन कामों का डिटेल्ड रिव्यू किया गया। त्र्यंबकेश्वर में सिंहस्थ कुंभ मेले के लिए डेवलपमेंट कामों के दूसरे फेज़ के लिए करीब 390 करोड़ रुपये की जॉइंट एडमिनिस्ट्रेटिव मंजूरी दी गई है। शिरडी में 24.53 करोड़ रुपये के रोड और पार्किंग इंफ्रास्ट्रक्चर के कामों को मंजूरी दी गई है। होल्डिंग एरिया, पिक-अप और ड्रॉप-ऑफ अरेंजमेंट, श्री साईंबाबा मंदिर तक जाने वाली सड़कों को चौड़ा करना और श्रद्धालुओं की भीड़ का प्लान्ड मैनेजमेंट शामिल है।

DESHDOOT Times

....watching north maharashtra

epaper.deshdoot.com
02 Feb 2026 - Page 1

## DESHDOOT: Panel discussion on Union Budget

# Growth push; Nashik still waiting, opine experts



**NASHIK:** The Union Budget 2026-27 largely continues the policy framework of previous years, offering limited new announcements while focusing on accelerating growth, fulfilling aspirations and strengthening the vision of Sabka Saath, Sabka Vikas. While the Budget appears favourable to large corporate industries and certain regions, it has disappointed grape and pomegranate growers in Maharashtra, experts observed during a discussion forum organised by Daily Deshdoot, bringing together dignitaries and experts from various fields to analyse its impact.

Editor Shailendra Tanpure interacted with senior industrialist Vivek Gogate, builder Avinash Shirode, investment advisor Pramod Puranik, economist Dr. Satish Srivastava, CA Anand Daga, CA Anuja Burad, Archana Jangada, GST expert Sanjay Burad, and Balasaheb Gadakh of the Grape Growers' Association. The panel shared insights to help citizens understand different aspects of the Budget.

The total outlay of the Budget has been pegged at Rs 53.5 lakh crore, with no change in income tax rates. Finance Minister Nirmala Sitharaman, while presenting her record ninth Union Budget, outlined three key Kartavyas—accelerating growth, fulfilling aspirations and inclusive development.

A key announcement was the proposal to build seven high-speed rail corridors across the country, two of which are in Maharashtra—the Mumbai-Pune and Pune-Hyderabad corridors. While these projects are expected to significantly reduce travel time, boost economic activity and generate employment, experts questioned whether cities like Nashik would directly benefit from them.

*(Contd on P 4)*

### Pramod Puranik

Investment advisor

"The ninth Union Budget largely continues previous policies, avoided mention of railways, and that market reactions are temporary as simplified measures will support growth over time, while future concessions, especially for the pharma sector, may depend on a possible pact with US."

### Vivek Gogate

Industrialist

"The Budget focuses on accelerating growth and productivity, with Rs 10,000 crore investments to boost manufacturing, electronics, AI-driven sectors, and MSMEs, strengthening India as a global supplier hub while also creating long-term employment opportunities."

### Archana Jangada

CA

"The key highlight of the Budget is the introduction of a simpler, digital-friendly income tax law, with reforms like easier TDS processes and extended return deadlines, making it reformist rather than revolutionary and aimed at reducing disputes and compliance burden for taxpayers."

### Balasaheb Gadakh

Farmer

"Budget mixed, welcoming the push for bio-farming and promotion of coconut and cashew. Disappointment over the exclusion of grapes and pomegranates. Stronger support for fruit growers in Maharashtra was expected and hoped future policies would address their concerns."

### Avinash Shirode

Realtor

"Budget 2026-27 focuses on infrastructure-led urbanisation, with higher capex, new rail and freight corridors, city economic regions and tax simplifications driving long-term real estate growth, especially in Tier-II and Tier-III cities rather than direct sector sops."

### Anand Daga

CA

"The Budget favours large companies and foreign investment, which will boost jobs but may strain power and water resources, raised concerns over Nashik's place in City Economy Regions, and noted that higher taxes on futures and options triggered a sharp market fall."

### Dr. Satish Srivastava

Economist

"The Budget shows only a marginal rise in capital expenditure while successfully controlling the fiscal deficit, encourages the generic pharmaceutical sector and medical tourism, but offers limited relief on rising healthcare, education and unemployment concerns, with insufficient support for agriculture, MSMEs and the service sector, leaving common taxpayers disappointed."

### Anuja Burad

CA

"The Budget placed unexpected emphasis on income tax reforms, with promises of simpler ITR forms whose implementation timeline remains uncertain. She welcomed the six-month declaration scheme for foreigners and noted that the focus on AI is likely to create new job opportunities for youth. Overall, the Budget contains several positive announcements."

### Sanjay Burad

GST expert

"GST was not mentioned in the Budget as tax changes are now made regularly by the GST Council. Although tax collections stand at Rs 24.98 lakh crore, the govt's 55 per cent interest burden raises concerns about its impact on development. The 4.5 per cent GDP growth target as positive but stressed that India's low global manufacturing share of just 3–4% needed attention.".

THE FREE PRESS JOURNAL

**MELA PLANS** | **Authority approves Phase 2 projects, roads and ghats to boost pilgrim management for 2027; Gedam stresses timely project execution**

# NTKMA clears major Kumbh works

**FPJ News Network**
NASHIK



The Nashik-Trimbakeshwar Kumbh Mela Authority (NTKMA) accorded administrative approval to major infrastructure and crowd management works during an online review meeting held on Friday, as part of systematic preparations for the Simhastha Kumbh Mela 2027.

The meeting was chaired by Divisional Commissioner and NTKMA head Dr Pravin Gedam. A significant portion of the approvals relates to Phase 2 development works at Trimbakeshwar, with an estimated combined cost of around Rs380 crore, aimed at strengthening pilgrimage infrastructure, improving crowd regulation and enhancing the overall pilgrim experience.

The approved works include development of the Darshan Path and ghats, redevelopment and beautification of the Shahi Marg, construction of the Vidhi Bhavan and other allied religious facilities, creation of gardens and landscaped public spaces, including Shivsrushti, and the provision of organised vendor zones to ensure regulated and orderly economic activity during the Kumbh Mela period.

At Shirdi, administrative approval was granted for road and parking infrastructure works estimated at Rs24.53 crore. These include the development of holding areas, designated pick-up and drop-off points, widening of approach roads to the Shri Saibaba Temple and allied crowd management measures. A Kumbh Mela Heritage Swagat Kaman will also be erected, recognising Shirdi as an important religious node connected to the broader Kumbh pilgrimage circuit.

To strengthen regional road connectivity, works on key corridors between Shirdi and Sangamner were approved at an estimated cost of Rs97.25 crore, ensuring smoother inter-district movement of pilgrims during the Kumbh Mela period. In addition, restoration of the Kushavart Kund at Trimbakeshwar was approved at an estimated cost of Rs8.12 crore, including flooring work and repairs to the roof structure, with a focus on conservation of the religious water body.

The meeting also cleared the construction of a new ghat at Takli, at an estimated cost of Rs72.10 crore. The project will extend the existing ghat length to 400 metres at the Godavari-Nandini Sangam, significantly enhancing bathing capacity, safety and crowd dispersal during peak ritual days of the Simhastha Kumbh Mela.

Those present at the meeting included NTKMA Commissioner Shekhar Singh, Nashik Municipal Corporation's Commissioner Manisha Khatri, Nashik District Collector Ayush Prasad, Ahilyanagar District Collector Pankaj Ashiya, Chief Officer of Shirdi Municipal Council Satish Dighe, NTKMA Deputy Commissioner Yogendra Chaudhari, and senior officials from the Public Works Department, Archaeology Department, Maharashtra State Electricity Distribution Company Limited and other concerned departments.

Chairing the meeting, Dr Gedam stressed that the timely execution of the sanctioned works, strong inter-departmental coordination and continuous monitoring would be crucial to ensuring safe, efficient and pilgrim-centric arrangements for the Simhastha Kumbh Mela 2027.

# जिल्हा अहिल्यानगर

प्रभात
www.dainikprabhat.com

# पाथर्डीत चैन स्नॅचिंगचा घटनांत वाढ

**पाथर्डी, दि.१ (प्रतिनिधी)** - पाथर्डी तालुक्यात महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने जबरदस्तीने हिसकावून नेण्याच्या चैन स्नॅचिंग घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याने शहरासह ग्रामीण भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नुकतीच निपाणी जळगाव शिवारात वृद्ध महिलेचे मंगळसूत्र तोडून नेल्याची घटना घडली. यापूर्वी शहरातील विविध भागांतही असेच प्रकार घडल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढली आहे.

शुक्रवारी (दि. ३०) दुपारी निपाणी-जळगाव शिवारात ऊसाला पाणी देण्यासाठी गेलेल्या एका वृद्ध दाम्पत्यावर चोरट्यांनी डाव साधला. भगवान धोंडीबा आव्हाड (वय ८०) यांच्या पत्नी अनुगाबाई या बांधाच्या कडेला बसलेल्या असताना, पाणी पिण्याचा व रस्ता विचारण्याचा बहाणा करून आलेल्या इसमाने अचानक त्यांच्या गळ्यातील सुमारे दीड तोळे वजनाचे, मणी व दोन पळ्या असलेले सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून नेले. त्याच्यासोबत दुचाकीवर थांबलेला दुसरा साथीदार असून, दोघेही टाकळी फाट्याच्या दिशेने पसार झाले.याप्रसंगी वृद्ध महिलेने धाडस दाखवत चोरट्याला पकडण्याचा प्रयत्न केला. त्यांनी दोन्ही हातांनी चोरट्याच्या शर्टचे कॉलर घट्ट धरले; मात्र तो झटापटीतून सुटून पळून जाण्यात यशस्वी झाला.दरम्यान, दोन दिवसांपूर्वी पाथर्डी शहरातील साईनाथ नगर परिसरातही एका महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. या घटनेत मंगळसूत्र तुटले असले तरी मोठी चोरी टळली. या प्रकारामुळे महिलांमध्ये भीती पसरली आहे. पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.


दै.देशदुत

दि.२ फेब्रुवारी,२०२६

# शेतकऱ्यांना पुन्हा रात्रीची वीज

## आंदोलनाचा इशारा ; जेऊर परिसरातील शेतकरी झाले आक्रमक

▶ नगर तालुका (वा.) बिबट प्रवण क्षेत्रात शेतकऱ्यांसाठी दिवसा वीज देण्याचा निर्णय प्रशासनाच्या वतीने घेण्यात आला होता. परंतु हा निर्णय फक्त नावालाच महिना- दोन महिन्यांसाठी घेण्यात आला. त्यानंतर २८ जानेवारी पासून पुन्हा शेतकऱ्यांसाठी रात्रीची वीज देण्याचा प्रकार सुरू झाल्याने जेऊर परिसरातील शेतकरी आक्रमक झाले आहेत. शेतकऱ्यांसाठी दिवसा वीज उपलब्ध करून द्यावी अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. दोन महिन्यापूर्वी तालुक्यात बिबट्यांनी मोठ्या प्रमाणात धुमाकूळ घातला होता. गावोगावी बिबट्यांकडून पाळीव प्राण्यांच्या शिकारी केल्या जात होत्या. निंबळक, खारे कर्जुने परिसरात चिमुकल्यांवर बिबट्यांचा हल्ला मन हेलकावून टाकणारी घटना घडली होती. मानव वस्तीत बिबट्यांचा वावर आढळून येत होता. रात्री अप रात्री शेतकऱ्यांसाठी पिकाला पाणी देणे धोकादायक असल्यामुळे शेतकऱ्यांसाठी दिवसा वीज देण्याचा प्रशासनाने निर्णय घेतला होता. दिवसा विज हा निर्णय फेल गेल्याचा आरोप ग्रामस्थांमधून



### शेतकऱ्यांच्या जीवाला धोका

❝ ज्वारी कर पिकांची उभी वाढलेली आहे. डोंगराच्या कडेला मोठ्या प्रमाणात शेतजमिनी आहेत. अशा ठिकाणी दिवसा विद्युत पाणी देण्यास भीती वाटते. रात्रीची वीज असल्यामुळे बहुतेकजण नाईलाजास्तव अशा धोकादायक ठिकाणी रात्री विद्युत पाणी देण्यासाठी जावेच लागते. त्यांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी दिवसा वीज उपलब्ध करून देण्याची गरज आहे.

– नंदू केरू तोडमल (शेतकरी, जेऊर)

महावितरण कंपनीकडून २८ जानेवारीपासून शेतकऱ्यांसाठी विजेचे वेळापत्रक बदलविण्यात आले आहे. पुन्हा रात्रीची वीज शेतकऱ्यांना सोडण्यात येत आहे. दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होते. त्यामुळे दुर्घटना घडण्याची प्रशासन वाट पाहत आहे का ? त्यानंतर पुन्हा शेतकऱ्यांना दिवसा उपलब्ध होईल असा संतप्त सवाल

### खरीप हंगाम अतिवृष्टीमुळे गेला वाया; शेतकरी चिंतेत

तालुक्यातील खरीप हंगाम अतिवृष्टीमुळे वाया गेला आहे. खरीप हंगामातील तोट्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडलेला असताना देखील बळीराजाने रब्बी हंगामातील पिकांची पेरणी मोठ्या प्रमाणात केली आहे. तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे बहुतांशी भागात मुबलक पाणी उपलब्ध आहे. परंतु विजेचा खेळ खंडोबा व शेतकऱ्यांसाठी रात्रीची वीज यामुळे रब्बी हंगामातील पिकांना फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी दिवसाचीच वीज मिळण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

### विजेचे वेळापत्रक बदलल्याने झाले हाल

मागील महिन्यात शेतीच्या विजेचे वेळापत्रक बदलून रात्रीची वीज सोडण्यात आली होती. त्यावेळी शेतकऱ्यांनी अक्षय कर्डिले यांची भेट घेतली होती. अक्षय कर्डिले यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा सुरू करण्यात आला होता. परंतु पंधरा दिवसातच तो निर्णय रद्द करून पुन्हा शेतकऱ्यांना रात्रीची वीज सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे महावितरण कंपनी बाबत शेतकऱ्यांमध्ये मोठा रोष निर्माण झाला आहे.

### रब्बी हंगामातील सर्वच पिकांना पाण्याची गरज

सद्यस्थितीत रब्बी हंगामातील गहू, हरभरा, गावरान कांदा, लसूण, चारा पिके सर्वांनाच पाणी देण्याची आवश्यकता आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळणे गरजेचे असताना देखील शेतकऱ्यांसाठी रात्रीची वीज सोडण्यात येत आहे. गेल्या काही दिवसांपासून बिबट्यांचा वावर व पाळीव प्राण्यांच्या शिकारीच्या घटना कमी झालेल्या आहेत. परंतु त्यामुळे परिसरात बिबटे नाहीत असे म्हणणे चुकीचे ठरेल. शेतकऱ्यांमध्ये अद्यापही बिबट्यांच्या दहशतीचे वातावरण आहे. शेतकऱ्यांसाठी दिवसा वीज उपलब्ध करून द्यावी अशी मागणी जेऊर पंचक्रोशीतील ग्रामस्थांमधून करण्यात आली आहे.

सकाळ

# पाळीव जनावरांचे आरोग्य रामभरोसे

## पशुवैद्यकीय अधिकाऱ्याची नेमणूक करावी ; शेतकऱ्यांची मागणी

**पुणतांबे, ता. १ :** येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात पशुवैद्यकीय अधिकारी नसल्याने जनावरांना वेळेवर आरोग्य सेवा मिळत नाही, तसेच या दवाखान्याला नेहमीच कुलूप लागलेले असते. त्यामुळे पशुपालकांनी पशुसंवर्धन खात्याबद्दल संताप व्यक्त केला, तसेच जिल्हा पशुवैद्यकीय अधिकारी यांनी या प्रश्नात लक्ष घालून पशू वैद्यकीय अधिकाऱ्याची नेमणूक करावी, अशी मागणी केली.

पुणतांबे येथील पशु वैद्यकीय दवाखाना श्रेणी दोनमधील आहे. शासन दप्तरी याची नोंद श्रेणी एकमध्ये झालेली आहे. या ठिकाणी असलेले पशुवैद्यकीय अधिकारी डिसेंबरमध्ये सेवानिवृत्त झाले. परंतु त्यांच्या जागेवर दुसरे कोणतेही वैद्यकीय अधिकारी तालुका पशू खात्याकडून मिळालेले नाही. पुणतांबे, चांगदेवनगर, रस्तापूर, रामपूरवाडी भागात जनावरांची संख्या मोठी आहे. त्यांना वेळेवर पशू आरोग्य सेवा मिळणे गरजेचे आहे. परंतु पशू वैद्यकीय अधिकारीच नसल्याने जनावरांना आरोग्य सेवा मिळत नाही. नाइलाजाने पशुपालकांना खासगी आणि महागडे उपचार करावे लागतात. पूरक व्यवसायासाठी शेतकऱ्यांनी पशुपालन करावे, असे शासनाचे धोरण आहे. मात्र, पशू दवाखान्यात वैद्यकीय अधिकाऱ्याची कमतरता आहे. याबाबत राहाता तालुका पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडे पशुवैद्यकीय अधिकारी नेमण्याची मागणी केली.



**पुणतांबे :** येथील पशुवैद्यकीय दवाखान्याला कार्यालयीन वेळेतही कुलूप लागलेले आहे.
(छायाचित्र : किरण नाईक)

सकाळ

# शाळांना सुविधा मिळाल्या, गुणवत्तेचे काय ?

**योजना केंद्र सरकारची असो नाही तर राज्य सरकारची. तिचा लाभ घेण्यापेक्षा ती कशी ओरबाडता येईल, अशीच मानसिकता पाहायला मिळते. योजनेतील रुपया शेवटच्या लाभार्थ्यापर्यंत पोचतो का, यावर संसदेतही चर्वितचर्वण झाले. आता हा लाभ थेट बँक खात्यावर दिला जात असला तरीही शंका आहे. तशीच शंका सरकारी शाळांतील भौतिक सुविधांबाबत उपस्थित झाली आहे. लाभ दिला मात्र गुणवत्ता दिसत नसल्याने त्याचे ऑडिट सुरू झालेय... तेही किती गांभीर्याने केले जाते, यावरच त्याची गुणवत्ता अवलंबून आहे.**



मिनी मंत्रालय

■ अशोक निंबाळकर

## गुरुजी काय करतात...

■ केंद्र सरकारने राज्यातील शाळांतील भौतिक सुविधांची तपासणी सुरू केली आहे. कोणतीही तपासणी करताना वस्तुस्थिती दडवली जाते. त्यामुळे कोणत्याही चौकशी समितीच्या अहवालातून ठोस निष्कर्ष निघत नाही. तो न निघाल्याने परिणामी वेळ आणि पैसा व्यर्थ जातो. कोणत्याही देशाची शैक्षणिक गुणवत्ता उच्च दर्जाची असेल तरच तो देश विविध स्तरावर प्रगती करतो. आपल्या देशातील सरकारी शाळांना, विद्यार्थ्यांना जर भौतिक सुविधा पुरवूनही गुणवत्ता साधता येत नसेल तर गुरुजी काय करतात, असा सवाल उपस्थित होतो.

खासगी अनुदानित आणि इतरही माध्यमांच्या शाळेत भौतिक सुविधा चांगल्या असतात. त्यासाठी कुठून पालक आपल्या पाल्यांना प्रवेश मिळवून घेतात. तिथे भरमसाट प्रवेश, परीक्षा शुल्क भरतात. सरकारी शाळा यासह अन्य कारणांमुळे बंद पडत असल्याचे समोर आले. त्यानंतर राज्य आणि केंद्र सरकारने शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याचा निर्णय घेतला. समग्र शिक्षा अभियानांतर्गत राज्य शासनाला वर्षाला, पुस्तके तसेच विविध प्रकारचे साहित्य दिले. त्यासाठी कोट्यवधींचा निधी दिला जातो. प्रत्येक वर्षी विद्यार्थ्यांना नवीन पुस्तके दिली जातात. मात्र, तुलनेत गुणवत्ता वाढलेली दिसत नाही.

याच कारणावरून केंद्र सरकारने शाळा आणि विद्यार्थ्यांचे सामाजिक सर्वेक्षण सुरू केले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात संगमनेर व श्रीगोंदे तालुक्यातील ७२२ शाळांमध्ये तपासणी केली जात आहे. शाळांना आलेला निधी त्याच कामासाठी खर्च केला की नाही. पुस्तके वेळेत आली की नाही. गणवेश मिळाला का आदी बाबी तपासल्या जात आहेत. त्याची शहानिशा शाळा व्यवस्थापन समितीसमोर केली जात आहे. तालुका स्तरावर त्याची सुनावणी होणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. एप्रिल महिन्यापर्यंत हे काम चालणार आहे.

सर्वेक्षणाच्या माध्यमातून प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना येत असलेल्या अडचणी, यात यांची माहिती घेण्यात येणार आहे. यात आणखी काही सुधारणा हव्या का, याबाबत अहवालही केंद्राला देण्यात येणार असल्याचे शिक्षा परिषदेतील सूत्रांनी सांगितले.

बालभारतीकडून विद्यार्थ्यांना येत शाळेत पुस्तके पुरविली जातात. मध्यंतरी दोन वर्षांपूर्वी एकात्मिक योजनेमध्ये सर्व विषयांची पुस्तके, तसेच त्यामध्ये काही वह्यांची पानेही जोडली गेली होती. त्यामुळे विद्यार्थ्यांना अध्ययन करताना अडचणी निर्माण होत होत्या. त्यामुळे ही योजना गुंडाळून प्रत्येक विषयासाठी वेगवेगळे पुस्तक देण्याचे धोरण हाती घेतले. गणवेशाबाबतही राज्य सरकारची धरसोड वृत्ती दिसून येते. प्रारंभी शाळा व्यवस्थापन समितीकडे असलेले गणवेशाचे काम राज्यस्तर एकाच ठेकेदाराला दिले गेले. ते शैक्षणिक वर्ष संपले तरी विद्यार्थ्यांना ना कापड मिळाले, ना गणवेश मिळाले. तुटपुंज्या निधीत दोन-दोन गणवेश खरेदी करण्याची सरकारची मानसिकता असते, तर मुख्याध्यापकाने पोषण आहार, शाळेचे बांधकामाची देखरेख केली पाहिजे, अशी अपेक्षा असते. त्यामुळे गुणवत्तेवर परिणाम होत असल्याचे शिक्षक संघटना खासगीत सांगतात.

Nagar, Nagar-Today
02/02/2026 Page No. 3

सकाळ

# अनिश्चित हवामानाचा शेतीला फटका

## कांदा, रब्बी पिकांसह फळबागांचे नुकसान; शेतकरी अडचणीत

**संगमनेर, ता. १ : सातत्याने बदलणाऱ्या हवामानाचा थेट फटका शेती पिकांना बसत असून, त्यातच शेतीमालाला अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने शेतकरी मेटाकुटीस आले आहेत. कधी कडक ऊन, कधी सतत ढगाळ वातावरण, तर कधी अचानक पावसाच्या सरी अशा अनिश्चित हवामानामुळे शेती करणे दिवसेंदिवस अधिक जोखमीचे ठरत आहे.**



**संगमनेर :** संगमनेरमध्ये ढगाळ हवामानामुळे शेतकरी ट्रॅक्टरच्या मदतीने डाळिंबबागा फवारणी केली.

> सध्या ढगाळ वातावरणामुळे डाळिंब बागांमध्ये करपा व किडींचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत आहे. ज्या डाळिंब बागा सेटिंग अवस्थेत आहेत, तेथे कळ्या गळून पडत असून फुटव्यांची वाढ होत आहे. या ढगाळ वातावरणाचा सर्वच पिकांवर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे महागडी औषधे फवारावी लागत आहेत. एकूणच सध्याच्या परिस्थितीत शेती करणे अत्यंत अवघड झाले आहे.
>
> **- बाळासाहेब कुऱ्हाडे,** शेतकरी, केळेवाडी

गेल्या काही वर्षांपासून निसर्गाचा समतोल बिघडलेला दिसून येत आहे. वेळेअवेळी होणारा पाऊस, कडाक्याची थंडी, अचानक वाढलेले तापमान व दीर्घकाळ टिकणारे ढगाळ वातावरण यांचा विपरीत परिणाम शेती पिकांवर होत आहे. या हवामान बदलामुळे पिकांवर विविध रोग व किडींचा प्रादुर्भाव वाढला आहे. पिके वाचवण्यासाठी शेतकऱ्यांना महागडी औषधे व कीटकनाशकांची फवारणी करावी लागत आहे. परिणामी उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. अशा परिस्थितीत काबाडकष्ट करून पिकविलेल्या शेतीमालाला अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे. सध्या शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर गावरान कांद्याची लागवड केली आहे. मात्र गेल्या चार ते पाच दिवसांपासून सुरू असलेल्या ढगाळ वातावरणामुळे कांदा पिकांसह फळबागांना मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावे लागत आहे.

याचबरोबर गहू, हरभरा यासारख्या रब्बी पिकांनाही या हवामानाचा फटका बसत आहे. ढगाळ वातावरणामुळे पिकांची वाढ खुंटत आहे. रोगांचा प्रादुर्भाव वाढत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता अधिकच वाढली आहे. एकीकडे वाढता उत्पादन खर्च, दुसरीकडे शेतीमालाला मिळणारा अत्यल्प बाजारभाव आणि त्यातच अनिश्चित हवामान, अशा तिहेरी संकटात शेतकरी सापडला आहे.

लोकमत
अहिल्यानगर, सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६

# छत गळके, भिंतींना गेले तडे; वर्गखोल्या कोसळण्याचा धोका

## येवले वस्ती येथील मराठी शाळेची दुरवस्था : परिपाठासाठी अपुरी जागा

लोकमत न्यूज नेटवर्क

**राहुरी :** छत गळके, भिंतींना तडे, फरशा उखडलेल्या वर्गखोली कोणत्याही क्षणी कोसळेल, याची भीती. मोकळी जागा तर दूरच, विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी मैदानही नाही. परिपाठासाठी विद्यार्थ्यांना उभे राहण्यासाठी जागा अपुरी पडत असल्याने काही विद्यार्थी शाळेच्या बाहेर उभे राहून प्रार्थना व राष्ट्रगीत म्हणत असल्याचे विदारक चित्र राहुरी नगरपरिषदेच्या हद्दीतील येवले वस्ती येथील नूतन मराठी शाळा क्रमांक ९ येथे पाहायला मिळत आहे.

या शाळेत सध्या पहिली ते सातवीपर्यंतचे वर्ग अवघ्या ४ खोल्यांत चालवले जात आहेत. तब्बल १३० विद्यार्थ्यांसाठी केवळ ६ वर्गखोल्या उपलब्ध आहेत. खोल्यांची अवस्था अत्यंत जीर्ण आणि धोकादायक आहे. मध्यंतरी प्रशासनाने तात्पुरती डागडुजी केली. मात्र, विद्यार्थ्यांच्या जीवाचा धोका अद्याप टळला नसल्याने पालकवर्गात चिंता कायम आहे. पावसाळ्यात तर परिस्थिती अधिकच गंभीर बनते. एखादी दुर्घटना घडण्याची वाट प्रशासन पाहत आहे का? असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. विशेष म्हणजे, या शाळेची विद्यार्थी पटसंख्या अन्य शाळेपेक्षा चांगली आहे, शिक्षक स्टाफही पुरेसा व कार्यक्षम आहे. येवले वस्ती परिसरात मैदानासह नवीन, सुसज्ज शाळा इमारत तातडीने उभारावी, अशी मागणी होत आहे.

> संबंधित शाळेची इमारत जीर्ण झाली आहे. नगरपालिका प्रशासनाने तत्काळ नवीन इमारत बांधावी. वस्ती शाळा इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत असावी. मर्यादित विद्यार्थी असतील तर शिक्षकांना विद्यार्थ्यांवर वैयक्तिक लक्ष केंद्रित करता येईल. येवले वस्ती ही राहुरी शहरानजीक असल्याने पाचवीपासून पुढील शिक्षण शहरातील शाळेत घेण्यासाठी विद्यार्थ्यांना अडचण नाही.
>
> **संजय वाराळे,** शिक्षणप्रेमी



जागेअभावी परिपाठावेळी गेटच्या बाहेर उभे असलेले येवले वस्ती येथील नूतन मराठी शाळा नंबर ९ या शाळेचे विद्यार्थी.

> नूतन मराठी शाळा नंबर ९ या शाळेची इमारत जुनी झाली आहे. इमारतीची प्रत्यक्ष पाहणी करणार आहे. इमारतीसंदर्भात योग्य तो निर्णय घेतला जाईल. विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी सध्या तात्पुरती जागा उपलब्ध करून देण्यात येईल.
>
> **भाऊसाहेब मोरे,** नगराध्यक्ष, राहुरी

# जिल्हा धुळे

लोकमत
जळगाव, सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६

# मालपूर गावातील पांझरा नदी काठ, नागरिकांसाठी जीवघेणा....

## संरक्षण भिंतीची मागणी : नदीकाठची माती ढासळल्याने रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण

लोकमत न्यूज नेटवर्क



पांझरा नदी काठाच्या शेजारी अशा प्रकारे झाडी- झुडपे वाढून नदीचा काठ धोकादायक पद्धतीने झालेला आहे.

**साक्री :** तालुक्यातील पांझरा नदीच्या तीरावर वसलेले मालपूर गाव सध्या एका गंभीर संकटाचा सामना करत आहे. पावसाळ्यात नदीला येणाऱ्या प्रचंड पुरामुळे गावाच्या पश्चिम भागातील नदीकाठची माती सातत्याने ढासळत असून, यामुळे नदीकाठावर असलेल्या रहिवासी घरांना मोठा धोका निर्माण झाला आहे. पावसाळ्यापूर्वी प्रशासनाने धोका ओळखत तत्काळ उपाय योजना कराव्यात अशी अपेक्षा होत आहे.

मालपूर गाव नदीच्या काठावर उंच कड्यावर वसलेले आहे. या कड्याच्या खालच्या भागात अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात काटेरी झुडपे उगवली आहेत. ही झुडपे दिवसेंदिवस मोठी होत आहे. त्यामुळे ढिगारा कोसळण्याची शक्यता दिसून येत आहे. यासाठी या ठिकाणी संरक्षण भिंत उभारावी, अशी आग्रही मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

### झुडपांमुळे पाण्याचा प्रवाह बदलतो...

पावसाळ्यात जेव्हा नदीला पूर येतो, तेव्हा या झुडपांमुळे पाण्याचा प्रवाह बदलून कडा अधिक वेगाने ढासळतो. यामुळे भविष्यात संपूर्ण गावठाण परिसराला धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे.

> पांझरा नदीच्या तीरावरील उंच कड्याची माती दरवर्षी पुरामुळे ढासळत आहे. परिणामी, भिंतीजवळ राहणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने संरक्षण भिंतीचे काम मंजूर करावे.
>
> **पराग भामरे,** ग्रामस्थ मालपूर

### नदीकाठच्या रहिवासी घरांचे अस्तित्व आले धोक्यात

नदीकाठावरच अनेक कुटुंबांची पिढ्यानपिढ्यांची घरे आहेत. दरवर्षी पावसाळ्यात नदीची पाणी पातळी वाढली की, कड्याची माती थोड्या-थोड्या प्रमाणात खचत जाते. सद्यस्थितीत ही धूप घरांच्या अगदी जवळ येऊन पोहोचली आहे. जर वेळीच उपाययोजना केली नाही, तर पुराच्या प्रवाहात ही घरे कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### तालुका प्रशासनाकडून ठोस कारवाईची आहे अपेक्षा

मालपूरमधील ग्रामस्थांनी अनेकदा या समस्येकडे लक्ष वेधले आहे. मात्र, अद्यापपर्यंत ठोस उपाययोजना झालेली नाही. आता पावसाळा जवळ येत असल्याने किंवा भविष्यातील संभाव्य जीवितहानी टाळण्यासाठी संबंधित विभागाने तातडीने पाहणी करून या ठिकाणी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी मालपूरकरांनी केली आहे.

> मालपूर गावातील पांझरा नदीच्या काठालगत असलेल्या कड्यावरच रहिवाशांची घरे आहेत. पावसाळ्यात नदीला मोठ्या प्रमाणात पूर येत असतो, ज्यामुळे दिवसेंदिवस कडा कोसळत आहे. भविष्यात घरांना मोठा धोका निर्माण होऊ शकतो. संबंधित विभागाने याची तत्काळ दखल घेऊन या ठिकाणी संरक्षक भिंत बांधावी.
>
> **नैनेश भामरे,** गटनेते, ग्रामपंचायत मालपूर

> नदीकाठच्या कड्यावर अनेक वर्षांपासून अनेक कुटुंबे वास्तव्यास आहेत. पावसाळ्यात येथील परिस्थिती भयावह असते. त्यामुळे येथे संरक्षण भिंत असणे अत्यंत आवश्यक आहे. प्रशासनाने विलंब न करता हे काम हाती घ्यावे.
>
> **दादाजी नांद्रे,** ग्रामस्थ, मालपूर

लोकमत
जळगाव, सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६

# बोगस दिव्यांगांचा प्रवास थांबणार, धावत्या एसटीतही खरेखोटे होणार

## बनावट वैश्विक दिव्यांग ओळखपत्र घेऊन प्रवास सवलतीचा गैरफायदा करणाऱ्यांवर कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे** : राज्यातील राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) प्रवाशांसाठी मोठा इशारा जारी झाला आहे. बनावट वैश्विक अपंग ओळखपत्र (यूडीआयडी) घेऊन प्रवास सवलतीचा गैरफायदा करणाऱ्यांवर कठोर कारवाई होणार आहे. दिव्यांग नसतानाही बनावट यूडीआयडी मिळवून प्रवास करणाऱ्यांना आता गुन्हाही दाखल होणार आहे.

दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी परिवहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांना पत्राद्वारे निर्देश दिले आहेत. सोलापुरात बनावट दिव्यांग ओळखपत्र प्रकरण समोर आल्यानंतर, मुंढे यांनी सर्व जिल्ह्यात वैद्यकीय प्रमाणपत्रांची तपासणी आणि पडताळणी करण्याचे आदेश दिले एसटी महामंडळाला दिले आहेत. मुंढे यांच्या सूचनेनुसार, राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व प्रवाशांच्या दिव्यांग प्रमाणपत्रांची पडताळणी यूडीआयडी मोबाइल ॲपद्वारे करण्याच्या सूचना आहेत.

### आता बोगस प्रवाशांना बसणार चपराक...

प्रवाशाचे वैश्विक अपंग ओळखपत्र क्रमांक आणि जन्म तारीख ॲपमध्ये नोंदवून त्याची वैधता तपासावी, असे आदेश दिले आहेत. यामुळे बोगस प्रवाशांना चपराक बसणार आहे.



### एसटी प्रवासात दिव्यांगांना मिळतात विविध सवलती

महाराष्ट्रात एसटी महामंडळाच्या बसमधून प्रवास करणाऱ्या दिव्यांग व्यक्तींना भाड्यात मोठी सवलत मिळते. अंध व दिव्यांग व्यक्तींना साध्या व निमआराम बसमध्ये ७५ टक्के, तर काही प्रकरणात १०० टक्के सवलत मिळते तसेच, विशिष्ट दिव्यांगत्वासाठी (४०% ते ६५% च्या वर) साथीदाराला ५०% सवलत दिली जाते.

### बोगस ओळखपत्रांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले

राज्यात एसटी महामंडळाकडून महिलांना ५० टक्के, ज्येष्ठ नागरिकांना पूर्ण किंवा अंशतः सवलत आणि दिव्यांगांना मोफत किंवा नाममात्र भाडे आकारले जाते. या सवलतीचा गैरफायदा घेण्यासाठी काही प्रवासी बनावट दिव्यांग प्रमाणपत्रे आणि त्यानुसार आधार कार्ड तयार करून सवलतीचा लाभ घेत आहेत.

### दिव्यांग प्रवाशांच्या ओळखपत्रांची तपासणी

एसटी बसमधून दिव्यांग प्रवाशांना मिळणाऱ्या सवलतीचा गैरवापर रोखण्यासाठी बनावट दिव्यांग ओळखपत्र व प्रमाणपत्रांची कडक तपासणी केली जाणार आहे. आधुनिक मोबाइल ॲप आणि तपासणी मोहीम राबवून, दोषींवर पोलिस कारवाई केली जाणार आहे.

### धावत्या बसमध्ये होणार तपासणी

एसटीतील सर्व वाहक, पर्यवेक्षकीय कर्मचारी तसेच विभागीय कार्यालयातील मार्ग तपासणी पथकातील कर्मचाऱ्यांना 'यूडीआयडी डिपार्टमेंट ऑफ इम्पॉवरमेंट ऑफ पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज' हे मोबाइल ॲप डाउनलोड करून कार्ड तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले.

### प्रमाणपत्राची ॲपमध्ये होणार आता पडताळणी

एसटीतील सर्व वाहक, पर्यवेक्षकीय कर्मचारी तसेच विभागीय कार्यालयातील मार्ग तपासणी पथकातील कर्मचाऱ्यांना 'यूडीआयडी डिपार्टमेंट ऑफ इम्पॉवरमेंट ऑफ पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज' हे मोबाइल ॲप डाउनलोड करून कार्ड तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या ॲपद्वारे यूडीआयडी कार्ड क्रमांक व जन्मतारीख नोंदवून कार्ड वैध असल्याची खातरजमा केली जाणार आहे.

### बोगस आढळल्यास कार्ड जप्त, गुन्हा दाखल होणार

कार्ड बनावट अथवा अवैध असल्याचे निष्पन्न झाल्यास ते जप्त करून आगारात जमा करण्यात येणार असून, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६च्या कलम ९१ नुसार कायदेशीर कारवाईसह गुन्हाही दाखल करण्यात येणार आहे. जप्त करण्यात आलेल्या ओळखपत्रांची नोंद आगार व विभागीय स्तरावर ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

### पात्र दिव्यांगांची मात्र काळजी घेतली जाणार

जे प्रवासी खरोखर दिव्यांग आहेत, अशा प्रवाशांना बसमध्ये चढताना वाहकांनी मदत करावी, त्यांना बसमध्ये वाहकांनी जागा उपलब्ध करून द्यावी, स्वतः त्यांच्या जवळ जाऊन तिकीट काढावे, त्यांना चढण्यासाठी व उतरण्यासाठी मदत करावी, त्यांना सन्मानाने वागणूक द्यावी, अशा सूचना एसटी महामंडळाने आगारांना देण्यात आल्या आहेत.

लोकमत

# शहराचा ताबा 'मोकाट' जनावरांकडे; महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष, चौका चौकात जनावरांचेच 'राज'..!

महापालिका प्रशासनाच्या नाकावर टिच्चून मोकाट गुरांचा धुमाकूळ; नागरिकांची नाराजी, नव्या शिलेदारांनी आता तरी लक्ष घालण्याची गरज





## मनपा कार्यालयाला जनावरांचा वेढा

## न कोंडवाडा, न अधिकारी; प्रशासन रामभरोसे !

## मालक निर्धास्त, प्रशासन सुस्त

## १९४९

## जनावरांच्या बंदोबस्ताची जबाबदारी कोणाची ?

## मोकाट जनावरांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले

## नागरिकांच्या तक्रारीकडे मनपाकडून होतेय दुर्लक्ष...

सकाळ

# संपादित जमिनीचा मोबदला देण्यात हेराफेरी ?



[illegible]

# जिल्हा जळगाव

लोकमत

# आचारसंहितेपूर्वीच ग्रामपंचायतींच्या तिजोरीत तब्बल ११८ कोटींची भर!

## ५ वर्षांत जिल्ह्याला मिळाला हजार कोटींचा निधी; ७३५ ग्रामपंचायतींच्या कार्यकाळातील शेवटची 'लॉटरी'

लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायत निवडणुकांच्या तोंडावर ग्रामीण भागात विकासकामांचा धडाका लावण्यासाठी केंद्र सरकारने खजिना खुला केला आहे. १५ व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून जळगाव जिल्ह्यातील ११५० ग्रामपंचायतींना एका महिन्यात तब्बल ११८ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. विशेष म्हणजे, जिल्ह्यातील ७३५ ग्रामपंचायतींची मुदत फेब्रुवारीमध्ये संपत असल्याने आचारसंहितेच्या कचाट्यात अडकण्यापूर्वीच हा निधी मिळाला आहे.

नव्याने प्राप्त झालेल्या ११८ कोटींपैकी ३३ कोटींचा 'अबंधित' निधी जिल्हा परिषदेकडे जमा झाला आहे. हा निधी ग्रामपंचायतींच्या खात्यावर वर्ग करण्याची प्रशासकीय तयारी अंतिम टप्प्यात आहे. आचारसंहिता कोणत्याही क्षणी लागू शकते, हे ओळखून तातडीने निधी वाटप करण्याची घाई सध्या जिल्हा परिषदेत पाहायला मिळत आहे.



### पाच वर्षांचा हिशेब : १००० कोटींचा टप्पा पार

**एकूण मिळालेला निधी :** ८८५ कोटी (अधिक चालू वर्षातील ११८ कोटी मिळून १००० कोटींच्या वर).

**झालेला खर्च :** आतापर्यंत ७४० कोटी रुपये खर्चून गावकुसातील विकासकामे मार्गी लागली आहेत.

**शिल्लक निधी :** अजूनही १४५ कोटी रुपये ग्रामपंचायतींच्या खात्यावर अखर्चित असून, ते खर्च करण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर आहे.

### निधी खर्चाचे '५०-५०' सूत्र, आता सौर उर्जेवर भर

१५ व्या वित्त आयोगाचा निधी खर्च करताना केंद्राने काही अटी घातल्या आहेत. एकूण निधीपैकी ५० टक्के रक्कम ही पाणीपुरवठा आणि स्वच्छता यासारख्या मूलभूत कामांसाठीच वापरावी लागते. तर उर्वरित ५० टक्के निधी इतर नागरी सुविधांसाठी वापरता येतो.

यावर्षीपासून ग्रामपंचायतींना त्यांच्या स्वतःच्या इमारती, अंगणवाड्या आणि शासकीय कार्यालयांवर 'सोलर सिस्टीम' बसवण्यासाठी या निधीतून खर्च करण्याची मुभा देण्यात आली आहे. यामुळे ग्रामपंचायतींची वीज बिले कमी होऊन त्या अधिक स्वयंपूर्ण होतील.

### वर्षनिहाय निधीचा ओघ

| आर्थिक वर्ष | मिळालेला निधी (अंदाजे) |
|---|---|
| २०२०-२१ | २१४.४८ कोटी |
| २०२१-२२ | १५१.२३ कोटी |
| २०२२-२३ | ११४.८८ कोटी |
| २०२३-२४ | ८४.०० कोटी |
| २०२४-२५ | ७०.०० कोटी |
| २०२५-२६ | ११८.०० कोटी |

लोकमत

# जिल्ह्यात सव्वा दोन लाख विद्यार्थी ठरले 'निपुण'

## पाचवीपर्यंतच्या ३ हजारांपेक्षा जास्त शाळा सहभागी

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव** : विद्यार्थ्यांच्या पायाभूत साक्षरतेचा पाया भक्कम करण्यासाठी 'निपुण महाराष्ट्र' अभियान राबविण्यात येत असून जळगाव जिल्ह्यातील ३३३८ शाळेतील २ लाख २६ हजार विद्यार्थी 'निपुण' ठरले आहेत. या अभियानात विद्यार्थ्यांना पायाभूत साक्षरतेवर आणि संख्याज्ञानाविषयी मार्गदर्शन केले जात असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. केंद्र सरकारच्या 'निपुण भारत' अभियानांतर्गत महाराष्ट्र राज्याने हा उपक्रम हाती घेतला आहे.

**जिल्ह्यातील २ लाख २६ हजार विद्यार्थी निपुण अभियानात सहभागी असून आगामी काळात अजून विद्यार्थी अभियानात जोडले जातील. अभियानात जोडलेल्या विद्यार्थ्यांवर विशेष लक्ष देण्याचे निर्देश शिक्षक व पर्यवेक्षीय यंत्रणेला देण्यात आले आहेत.**

**विजय पवार,** जिल्हा नोडल अधिकारी जळगाव

## शाळा 'निपुण' ठरण्याचे हे आहेत कडक निकष

एखादी शाळा 'निपुण' म्हणून घोषित होण्यासाठी केवळ विद्यार्थी प्रगत असून चालत नाही, तर संपूर्ण शाळेची शैक्षणिक गुणवत्ता त्या पातळीवर असणे आवश्यक आहे.

**इयत्ता दुसरी ते पाचवीपर्यंतचे** किमान ८० टक्के विद्यार्थी त्यांच्या वयानुसार अपेक्षित असलेल्या पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान कौशल्यांमध्ये 'निपुण' असणे अनिवार्य आहे.



लोकमत

# 'कृत्रिम बुद्धिमत्ते'वर आंतरराष्ट्रीय परिषद

लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळा व पीएम उषाअंतर्गत 'बोध, मानवी बुद्धिमत्ता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता' (कॉग्निजन ह्यूमन अँड आर्टिफिशियल इंटेलिजंन्स) या विषयावर आयोजित आंतरराष्ट्रीय परिषद पार पडली.

या परिषदेचे उद्घाटन नीती आयोगाचे वरिष्ठ सल्लागार व्ही. के. सिंग यांच्याहस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, तर विद्यापीठ अनुदान आयोगाचे सचिव प्रा. मनीष जोशी, जीएसएफसी विद्यापीठ वडोदरा येथील कुलगुरू प्रा. जी. आर. सिन्हा, प्रा. बी. व्ही. पवार, आंतरराष्ट्रीय परिषदेचे मुख्य संयोजक तथा संगणकशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. राकेश रामटेके, प्रा. एस. आर. कोल्हे, सचिव डॉ. अजय सुरवाडे, समन्वयक डॉ. राम भावसार उपस्थित होते. प्रास्ताविक आंतरराष्ट्रीय परिषदेचे मुख्य संयोजक तथा संगणक शास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. राकेश रामटेके यांनी केले. सन्मानपत्राचे वाचन मंजिरी पाटील यांनी केले.

सूत्रसंचालन प्रा. सुनीता जेना व प्रा. मानसी वैद्य यांनी केले, तर आभार प्रा. राम भावसार यांनी मानले

Jalgaon Main
Page No. 4 Feb 02, 2026
Powered by: erelego.com

लोकमत

# तुम्ही आणा वाळू चोरून, आम्ही घेतो घरकूल बांधून!

## जप्त केलेली वाळू ४६७ लाभार्थ्यांना घरकुलांच्या कामासाठी वाटप

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** महसूल व पोलिस प्रशासनाने गेल्या १० महिन्यात जप्त केलेल्या ६८८५ ब्रास वाळूपैकी ४६७ घरकुलांच्या लाभार्थ्यांना प्रत्येकी पाच ब्रास वाळूचा साठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. वाळूमाफियांनी वाहून आणलेल्या वाळू साठा उपलब्ध झाल्याने 'तुम्ही आणा वाळू चोरून, आम्ही घेतो घरकूल बांधून' म्हणत लाभार्थ्यांनी प्रशासकिय कारवाईचे स्वागत केले आहे.

गेल्या दहा महिन्यात महसूल व पोलिसांनी केलेल्या कारवाईतून जिल्ह्यात ६८८५ ब्रास वाळूचा साठा जप्त करण्यात आला होता. त्यात जळगाव तालुक्यातून २३२८, धरणगाव १८२७ व चोपडा तालुक्यातून १९७३ ब्रास वाळूचा समावेश होता.

अवैध उत्खनन व वाहतूक केल्याप्रकरणी गुन्हे दाखल असताना



महसूल विभागाने या माफियांवर दंडात्मक कारवाई देखील केली आहे.

मात्र जप्त केलेला वाळूचा साठा घरकूलच्या लाभार्थ्यांना वाटप करण्याची तरतूद असल्याने हा साठा त्यांना उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यानुसार गेल्या दहा महिन्यात ४६७ लाभार्थ्यांनी घरकुलांचा पाया रचला आहे.

### तालुकानिहाय घरकूल लाभार्थ्यांना वाळू वाटप

| तालुका | वाळू (ब्रास) | लाभार्थी |
|---|---|---|
| जामनेर | ८५ | १७ |
| एरंडोल | २१७ | ४३ |
| भुसावळ | १३० | २६ |
| चोपडा | ११०५ | ३८१ |

### २७ लाखांचा महसूल प्राप्त

घरकूलधारकांना वाळू वाटप केल्यानंतर शिल्लक साठ्याचा लिलाव करण्यात आला. त्यातून २७ लाख २२ हजार ३६१ रुपयांचा महसूल शासनाच्या तिजोरीत पडला आहे. तर धरणगाव तालुक्यात १८२७ ब्रास वाळू साठ्याचा लिलाव करण्यात आला आहे. तर पारोळा तालुक्यात २० ब्रास वाळू जप्त केली असताना संबंधितांना दंडाची नोटीस बजावण्यात आली आहे.

लोकमत

# दूषित व फेसाळ पाणीपुरवठा, अमळनेरकरांच्या आरोग्यास धोका

## तलाठी कॉलनी व माधव नगर परिसरातील नागरिक त्रस्त; उपाययोजनेचे आश्वासन

लोकमत न्यूज नेटवर्क

**अमळनेर :** शहरातील ढेकू रोड परिसरातील तलाठी कॉलनी व माधव नगर भागात मागील पाच दिवसांपासून दूषित व फेसाळ पाण्याचा पुरवठा होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. नळातून येणाऱ्या पाण्याला फेस येत असून, तीव्र दुर्गंधी येत असल्यामुळे हे पाणी पिण्यास अयोग्य असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

नळातून येणारे पाणी पिवळसर व गढूळ दिसत आहे. काही घरांमध्ये पाण्याच्या भांड्यात गाळ साचत असल्याचेही निदर्शनास आले आहे. दूषित पाण्यामुळे पोटदुखी, उलट्या, जुलाब, तसेच त्वचारोग यांसारख्या आजारांचा धोका वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व आजारी व्यक्तींना याचा अधिक धोका असल्याचे नागरिकांनी सांगितले.

**तक्रारी करूनही उपाय नाही**

तलाठी कॉलनी व माधव नगर परिसरातील नागरिकांनी या समस्येबाबत नगरपालिकेकडे वारंवार तक्रारी केल्या आहेत. मात्र, पालिकेचे कर्मचारी पाहणीसाठी येऊन किरकोळ दुरुस्ती करून परत जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे मूळ समस्या कायम असून, पाण्याच्या गुणवत्तेत कोणतीही ठोस सुधारणा झालेली नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.



### पाणीपुरवठ्याची लोकप्रतिनिधींकडून पाहणी

या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा सभापती कैलास पाटील व माजी नगरसेवक दीपक पाटील यांनी तलाठी कॉलनी व माधव नगर परिसराला भेट देऊन परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी नागरिकांशी संवाद साधून समस्या जाणून घेतली. जलवाहिन्यांमध्ये गळती, जुन्या पाइपलाइनमधून दूषित पाण्याचे मिश्रण किंवा तांत्रिक बिघाड यामुळे ही समस्या उद्भवत असल्याची शक्यता नागरिकांनी व्यक्त केली.

**५** पासून शहरातील तलाठी कॉलनी व माधव नगर परिसरात गढूळ पाणीपुरवठा होत आहे.यामुळे नागरिक त्रस्त झाले आहे.

**पालिकेने उपाययोजना करावी**

> माधवनगर भागात अनेक घरांना पाणी पोहोचत नसल्याने तेथील व्हॉल्व्ह तपासणी करून आवश्यक बदल करण्यात येतील. तलाठी कॉलनीत नवीन जलवाहिनी टाकून शुद्ध पाणीपुरवठा होईल याची काळजी घेतली जाईल.

**कैलास पाटील,** पाणीपुरवठा सभापती, अमळनेर नगरपालिका.

### पाणी विकत घेण्याची वेळ नागरिकांवर आर्थिक ताण

दूषित पाण्यामुळे अनेक नागरिकांना पिण्याचे पाणी बाहेरून विकत घ्यावे लागत आहे. त्यामुळे नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असून, दैनंदिन जीवनावरही परिणाम होत आहे. महिलांना घरगुती कामांसाठी स्वच्छ पाणी उपलब्ध होत नसल्याने मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

### तातडीने उपाययोजना करण्याची मागणी

नागरिकांनी पालिकेने पाणीपुरवठा यंत्रणेची सखोल तपासणी करून जलवाहिन्यांतील गळती शोधून दुरुस्ती करावी, तसेच शुद्ध पिण्याच्या पाण्याचा नियमित पुरवठा सुनिश्चित करावा, अशी मागणी केली आहे.

लोकमत


# समर्पित विकास निधीच्या प्रोत्साहनाने सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांना बूस्टर

## अर्थसंकल्पात 'एमएसएमई' क्षेत्राला दिलासा : जळगावच्या ३४ हजार उद्योगांच्या आशा पल्लवित

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव** : लघू व मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देणे व सूक्ष्म उद्योगांना पाठिंबा देण्यासाठी १० हजार कोटी रुपयांच्या समर्पित विकास निधीची सुरुवात करण्याची घोषणा केंद्रीय अर्थसंकल्पात झाल्याने याचा लाभ जळगावातील उद्योगांना होणार आहे. तसेच आत्मनिर्भर भारत निधीमध्ये अतिरिक्त २ हजार कोटी रुपये जोडण्याचीही घोषणा झाल्याने या उद्योगांसाठी ही संधी मानली जात आहे.

१ फेब्रुवारी रोजी सादर केलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात सुवर्ण व्यवसायासाठी कर न वाढविल्याने 'सुवर्णनगरी'साठी हा दिलासा आहे. तसेच महिला उद्योजक, युवा उद्योजक आणि पारंपरिक कौशल्यांवर आधारित व्यवसाय करणाऱ्यांसाठी कौशल्य विकासावर भर दिला गेला आहे.



### या योजनांद्वारे उद्योगांना चालना

सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांना बळकट करण्यासाठी क्रेडीट गॅरंटी, कर्ज सुविधा आणि तांत्रिक सुधारणांवर भर दिला आहे. एमएसएमई क्लस्टर डेव्हलपमेंटद्वारे पायाभूत सुविधांवर भर आहे. क्रेडिट गॅरंटी फंड ट्रस्टमुळे लघु उद्योगांना विनातारण कर्ज मिळण्यास मदत होईल तर नवउद्योग व स्टार्टअप्ससाठी पोषक धोरण राबविले जाणार असल्याने भांडवली गुंतवणूक वाढवून उत्पादनक्षमता आणि स्पर्धात्मकता वाढविण्यास मदत होणार आहे. या सर्वातून लघू उद्योग, व्यापारी व स्वयंरोजगार करणाऱ्या घटकांना मोठा लाभ होऊ शकणार आहे.

जळगावात महिला व युवा उद्योजकांना लाभ होणार आहे. वैद्यकीय क्षेत्रातील मंडळी व रुग्णांना तसेच कृषी क्षेत्रातील योजनांचा येथील केळी, कापूस उत्पादकांना लाभ होऊ शकणार आहे. कर्जाचा सुलभ प्रवाह, तांत्रिक, आधुनिकीकरण आणि बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने असलेल्या विविध योजना जळगावात असलेल्या ३४ हजार ३८४ सूक्ष्म, लघू, मध्यम (एमएसएमई) उद्योगांना लाभदायक ठरू शकतात.

### जळगावातील 'एमएसएमई' क्षेत्र

उत्पादन क्षेत्र

| | |
|---|---|
| सूक्ष्म | ३३८४५ |
| लघू | ४८६ |
| मध्यम | ५३ |

सेवा क्षेत्रात एकूण १४,३६७ सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योग आहेत.

### समर्पित विकास व आत्मनिर्भर भारत निधी

अर्थसंकल्पात १० हजार कोटी रुपयांच्या समर्पित विकास निधीची सुरुवात करण्याची घोषणा लघू व मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देणारी असून व सूक्ष्म उद्योगांना यातून पाठिंबा मिळणार आहे. तसेच अतिरिक्त २ हजार कोटी रुपये आत्मनिर्भर भारत निधीमध्ये जोडले जाणार असल्याने या उद्योगांसाठी ही मोठी संधी मानली जात आहे.

साईमत



# सावदा रेशन दुकानांवर निकृष्ट ज्वारी वाटप

## माजी नगरसेवक भारंबे आक्रमक, पुरवठा पथक चौकशीस दाखल

**सावदा, ता. रावेर । वार्ताहर ।**

सावदा येथील रेशन दुकानावर लाभधारकांना वाटप करण्यात आलेली ज्वारी अत्यंत निकृष्ट व खराब दर्जाची आढळल्याने स्थानिक नागरिक व माजी नगरसेवक भानुदास भारंबे यांनी प्रांताधिकारी बबन काकडे तातडीने तक्रार केली. पुरवठा विभागाकडून आलेली ज्वारी अळंब लागलेली आणि उग्र वास असलेली होती. पण, ती ग्राहकांना रेशन दुकानांमार्फत वितरित केली जात होती.

यावरून माजी नगरसेवक भारंबे यांनी आक्रमक भूमिका घेतली आणि जिल्हास्तरीय चौकशीसाठी तातडीने कारवाई होण्याची मागणी केली. दिनांक ३१ जानेवारी रोजी रावेर तालुका पुरवठा अधिकारी सरोदे मॅडम, गोडाऊन कीपर हर्षल पाटील यांच्यासह पथक सावदा येथील रमाबाई महिला बचत गट स्वस्त धान्य दुकान क्रमांक १४ येथे दाखल झाले. चौकशीदरम्यान खराब ज्वारी प्रकरणाची नोंद घेण्यात आली आणि माजी नगरसेवक भारंबे यांच्या उपस्थितीत काही लाभधारकांना बोलावून त्यांच्या समस्यांचा अहवाल तयार करण्यात आला. अधिकाऱ्यांनी सांगितले की, खराब ज्वारी रेशन दुकानावर जमा करून त्याऐवजी नवीन व दर्जेदार ज्वारी लाभधारकांना पुरवठा केली जाईल.

याप्रकरणी जिल्हा पुरवठा अधिकारी महेश चौधरी यांच्याशी माजी नगरसेवक भारंबे यांनी फोनवरून चर्चा केली असून, भविष्यात लाभधारकांना खराब धान्य दिले जाणार नाही याची पूर्ण काळजी घेण्यात येणार असल्याचे आश्वासन मिळाले आहे. गोडाऊनमधून पाठविण्यात आलेली ज्वारी रेशन दुकानावर जमा करून ती बदलली जाईल आणि लाभधारकांना चांगली ज्वारी वितरित केली जाईल, अशी सूचना प्रशासनाने दिली आहे.

साईमत

# कन्हाळा परिसरात मुरुम माफियांची दहशत

## औद्योगिक जमिनीवरून दररोज अंदाजे 6 डंपर माती लंपास ; प्रशासनाच्या नाकावर टिच्चून जेसीबी-पोकलेनचा वापर

**भुसावळ । प्रतिनिधी ।**

**तालुक्यातील कन्हाळा गावाजवळील खडका औद्योगिक वसाहतीच्या (औद्योगिक क्षेत्र) मालकीच्या जमिनीवर मुरुम माफियांच्या टोळीने सर्रासपणे अवैध माती उत्खनन सुरू केली आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून हे गंभीर प्रकार सुरू असून, महसूल प्रशासनाच्या नाकावर टिच्चून जेसीबी व पोकलेन मशिन्सच्या साहाय्याने मुरुम (माती) चोरी होत आहे. आतापर्यंत अंदाजे २ हजार ब्रास मुरुम अवैधरित्या चोरून नेल्याची माहिती समोर आली आहे.**



या परिसरात भुसावळ तहसीलदारांनी नेमलेले गस्ती पथक दररोज 'भरारी' (पेट्रोलिंग) घेत असते. तरीही कन्हाळा गावातून किन्ही गावाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यालगतच हे खोदकाम आणि माती चोरीचा प्रकार त्यांच्या लक्षात येत नाही, अशी तक्रार स्थानिक नागरिकांनी केली आहे. यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. याप्रकरणी संबंधित तलाठी यांना विचारणा केली असता, त्यांनी याबाबत पूर्ण अनभिज्ञता दाखवली. मंडळाधिकारी प्रविण पाटील यांना संपर्क साधला असता, त्यांनी सांगितले की, ती जमीन औद्योगिक वसाहतीच्या मालकीची असून, तिची सुरक्षा करण्याची जबाबदारी त्यांचीच आहे. मात्र, या अवैध उत्खननामुळे शासनाच्या बुडणाऱ्या रॉयल्टीबाबत विचारणा केल्यावर त्यांनी फोन कट केला. दुसरीकडे, भुसावळ तहसीलदार निता लबडे यांना यासंदर्भात विचारले असता, त्यांनी सांगितले की, औद्योगिक वसाहतीच्या प्रतिनिधीला या जमिनीच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून आवश्यक उपाययोजना करण्याचे पत्र पूर्वीच देण्यात आले आहे. तरीही रॉयल्टी वसुली किंवा अवैध उत्खनन रोखण्याबाबत कोणतेही ठोस आदेश किंवा कारवाई दिसून येत नाही. रस्त्याच्या कामासाठी वापरली जातेय माती. या परिसरात सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामांसाठी ही चोरलेली माती वापरली जात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

अवैध मुरुम उत्खननामुळे शासनाच्या महसुलाचे मोठे नुकसान होत असून, पर्यावरणीय दृष्टिकोनातूनही हा गंभीर प्रकार आहे. स्थानिक नागरिकांनी याप्रकरणी त्वरित कारवाईची मागणी केली असून, आता जिल्हाधिकारी यांच्या स्तरावरून काय कार्यवाहीचे आदेश दिले जातात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या प्रकारामुळे भुसावळ तालुक्यातील गौण खनिज तस्करी आणि माफियांच्या मुजोरीचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

नवराष्ट्र Jalgaon | 02 February 2026 | Page 3

# विद्युत खांबांमुळे अपघाताचा धोका

## सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष; नशिराबाद येथे नागरिक त्रस्त

नशिराबाद (वा.) नशिराबाद-बोदवड-मलकापूर या नवीन रुंदीकरण होत असलेल्या रस्त्यावर अपघाताचा धोका कमालीचा वाढला आहे. मोठ्या चौगद्यापासून ते बापूर कॉलनीपर्यंत रस्त्याच्या दुतर्फा असलेले विद्युत खांब आणि रोहित्र (DP) अद्याप हटवण्यात आलेले नाहीत. यामुळे वाहनचालक, विद्यार्थी आणि स्थानिक नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला असून, सार्वजनिक बांधकाम विभाग कोणत्याही मोठ्या अपघाताची प्रतीक्षा करत आहे का? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.



शैक्षणिक संस्थांमुळे विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला ज्या पट्ट्यात हे विद्युत खांब रस्त्यावर अडथळा ठरत आहेत, त्याच परिसरात न्यू इंग्लिश स्कूल सह इतर महत्त्वाच्या शैक्षणिक संस्था आहेत. शाळेत येणारे विद्यार्थी, पादचारी आणि प्रवाशांना या खांबांमुळे जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. रस्त्याचे रुंदीकरण झाले असले तरी, मधोमध किंवा कडेला असलेले हे खांब मृत्यूचे सापळे बनले आहेत.

## महावितरणचे पत्र, पण बांधकाम विभाग सुस्त

- विशेष म्हणजे, महावितरणच्या नशिराबाद उपविभागाच्या सहाय्यक अभियंत्यांनी या विद्युत यंत्रणेच्या स्थलांतराबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग उपविभाग क्र. १, जळगाव यांना लेखी पत्रव्यवहार केला आहे.
- मात्र, बांधकाम विभागाने अद्याप यावर कोणतीही ठोस कार्यवाही केलेली नाही.
- दोन विभागांमधील या समन्वयाच्या अभावामुळे सर्वसामान्यांना नाहक जीव गमावण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नागरिकांची मागणी: रस्त्याचे काम होत असताना विद्युत खांब आधी हलवणे गरजेचे होते. रात्रीच्या वेळी अंधारात हे खांब दिसत नाहीत.
- जर एखादा मोठा अपघात झाला, तर त्याला जबाबदार कोण? प्रशासनाने तातडीने हे रोहित्र आणि खांब सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करावेत.

## केवळ 'डिजिटल सावधान' चा फार्स

- रात्रीच्या वेळी या खांबांचा अंदाज येत नसल्याने वाहनचालकांचे अपघात होण्याची दाट शक्यता आहे.
- या खांबांवर किंवा रोहित्रांवर वाहनचालकांना दुरून दिसेल असे कोणतेही रेडियम रिफ्लेक्टर लावण्यात आलेले नाहीत.
- प्रशासनाने केवळ काही डिजिटल बॅनरवर 'सावधान' असे फलक लावून आपली जबाबदारी झटकली आहे. प्रत्यक्ष जमिनीवर सुरक्षेच्या उपाययोजना शून्य आहेत.

**अपघाताला आमंत्रण** प्राधिकरणाचे दुर्लक्ष, पादचाऱ्यांची व वाहनचालकांची सुरक्षा धोक्यात

# राष्ट्रीय महामार्गावर अंधाराचे पसरले साम्राज्य

## अवकाळीचा पथदिपांवर तडाखा

▸ एरंडोल (वा.) येथील राष्ट्रीय महामार्गावरील भराव पूल, समांतर रस्ते आणि धरणगाव चौफुलीवरील बोगदा गेल्या पाच दिवसांपासून अंधारात बुडाला आहे. २७ जानेवारी २६ रोजी झालेल्या पावसानंतर पथदीवे बंद पडले असून महामार्ग प्राधिकरणाच्या या ' सुस्त ' कारभारामुळे वाहनधारक आणि नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे.

शिवाजी नगर ते अमळनेर नाक्यापर्यंत महामार्गाच्या दुभाजकावर आणि समांतर रस्त्यांच्या कडेला बसवण्यात आलेले हाय-टेक पथदीवे २७ जानेवारी २६ रोजी झालेल्या पावसानंतर अचानक बंद झाले. पाच दिवस



उलटूनही हे दिवे पूर्ववत करण्यात आलेले नाहीत. विशेषतः भरावपुलावर आणि बोगद्यात रात्रीच्या वेळी घनदाट काळोख असल्याने वाहन चालकांना व पादचाऱ्यांना समोरील रस्ता दिसणे कठीण झाले आहे.

विशेष म्हणजे हा परिसर अत्यंत वर्दळीचा व रहदारीचा असून जड वाहनांची सतत ये-जा असते. धरणगाव चौफुलीजवळील बोगद्यात रात्रीच्या अंधारामुळे वाहनांचा अंदाज येत नाही.स्थानिक नागरिकांसाठी असलेल्या समांतर रस्त्यांवर पादचाऱ्यांची व वाहनचालकांची सुरक्षा धोक्यात आली आहे.यापूर्वीही अनेकदा अशाच प्रकारे पथदीवे बंद राहिल्याच्या घटना घडल्या आहेत.ज्यामुळे प्रशासनाच्या देखभालीवर प्रश्नचिन्ह उभे राहत आहे.

## नागरिकांकडून होतोय संताप व्यक्त

- एरवी किरकोळ कामांसाठी तत्परता दाखवणारे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण या गंभीर समस्येकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा संताप नागरिकांमधून व्यक्त होत आहे. अंधाराच्या साम्राज्यामुळे एखादा मोठा अपघात घडल्यावरच यंत्रणेला जाग येईल का? असा जळजळीत सवाल वाहनचालक व नागरिक विचारत आहेत.
- महामार्गावर रात्रीच्या वेळी प्रवास करणे म्हणजे मृत्यूला निमंत्रण देण्यासारखे झाले आहे. पथदीवे सुरू करण्यासाठी प्रशासनाला कोणता मुहूर्त हवा आहे?
- संतप्त नागरिक व वाहनचालक, एरंडोल रशासनाने तात्काळ दखल घेऊन ' दिवे लावण्याचा ' मुहूर्त शोधावा आणि जनतेची या जीवघेण्या अंधारातून सुटका करावी.
- हीच सध्या एरंडोलकरांची प्रमुख मागणी आहे.

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
जळगाव आवृत्ती
epaper.deshdoot.com
02 Feb 2026 - Page 6

# दोन वर्षांच्या लढ्यानंतर ७५३ एल महामार्ग बाधीत, शेतकऱ्यांची अखेर नुकसान भरपाई स्वीकारण्यास सुरुवात

▸▸ मुक्ताईनगर । मोतीलाल जोगी

गेल्या दोन वर्षापासून तालुक्यातील सुमारे दीडशे शेतकरी हैदराबाद महामार्गासाठी शेत अधिग्रहित झालेल्या शेतजमिनीच्या मोबदल्यासाठी योग्य भाव मिळावा म्हणून शासनाशी विविध मार्गाने लढा देत होते. शासनाने शेतकऱ्यांना वेगवेगळे भाव दिलेत. आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांनी अखेर अधिग्रहित शेत जमिनीच्या मोबदल्यात भरपाई म्हणून रक्कम स्वीकारण्यास सुरुवात केली आहे.



याबाबत सविस्तर माहिती अशी, मुक्ताईनगर शहरातून इंदोर हैदराबाद ७५३ एल असा महामार्ग जात आहे. सदर रस्ता चार पदरी होणार आहे. शहर परिसरातील ४२ तर तालुक्यातील दीडशे शेतकरी या महामार्गाच्या कामामुळे बाधित झाले आहे.

सुरुवातीला अधिग्रहित शेत जमिनीचा दर फक्त ४५ रुपये प्रति चौरस मीटर भाव होता. दुसऱ्या अवार्डला ९ १० भाव होता. त्याच जमिनीला सन २०११-१२ मध्ये ३२०० रुपये, सन २०२२ मध्ये ४५ रुपये झाला. २०२३ मध्ये मध्ये नऊशे दहा रुपये आणि आता २०२५ मध्ये निकाल दिला त्यावेळेस लवादाने २८२ रुपये प्रति चौरस मीटर व ४२३ रुपये प्रति चौरस मीटर या भावाने मोबदला दिला. मात्र आता राष्ट्रीय महामार्ग अंतर्गत जमीन आहे म्हणून २० टक्के कपात कापून २८२ प्रमाणे अंतिम भाव दिला जात आहे. या प्रकरणी शेतकऱ्यांनी दोन वर्ष सतत योग्य वाढीव मोबदला मिळण्यासाठी शासनाशी लोकशाही मार्गाने विविध आंदोलने केली, निवेदन दिली. मात्र शेतकऱ्यांना यश आले नाही. शासनाने त्यांचा हेका कायम ठेवला, दबाव ठेवत, पोलिसांचा बंदोबस्त वाढवून अधिग्रहित शेतीत जेसीबी घुसून जमीन खरडली होती. आता अखेरीस आधीच आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना नाइलाजाने शासन देत असलेली रक्कम स्विकारावी लागत आहे. परिसरातील एकूण ४२ शेतकरी बाधित तथा लाभार्थी आहेत. दरम्यान सन २०२७मध्ये नाशिकला कुंभमेळा होणार आहे त्यापूर्वी सदर महामार्ग चौपदरीकरणाचे काम पूर्ण करण्याची तयारी शासनाची आहे.

> २०२२ पासून आम्ही सर्व बाधित शेतकरी लढा देत आहे परंतु प्रशासन व शासन शेतकऱ्यांची बाजू ऐकूनच घेत नसल्यामुळे शेवटी आम्ही आता न्यायालयात गेले आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे, आर्थिक अडचणीमुळे आधीच शेतकरी संकटात आहे. आम्ही तक्रार कायम ठेवून पैसे स्वीकारत आहे. २०१२ मध्ये न्यायालयानेच आम्हाला ३२०० दिले होते. आणि आता कमी दर मिळत आहे. त्यामुळे आता आम्ही न्यायालयातच दाद मागत असून न्याय मिळेल, हि अपेक्षा आहे.
>
> **-नितीन जैन, बाधित शेतकरी, मुक्ताईनगर.**

तरुण भारत
02 Feb 2026 - Page 2
epaper.tarunbharatlive.com

# बांभोरी नदीपात्रात अवैध वाळू उपसामुळे महामार्ग गिरणा पूल धोक्याच्या उंबरठ्यावर?

तभा वृत्तसेवा
जळगाव, १ फेब्रुवारी

गिरणा नदी पात्रातून वर्षानुवर्षांपासून अवैधरित्या वाळूचा उपसा करून वाहतूक केली जात आहे. जागोजागी खड्डे निर्माण झाल्याने नदीपात्राला विद्रुपता आली आहे. बांभोरी येथील वाळू उपशामुळे राष्ट्रीय महामार्गावरील पूल धोक्याच्या उंबरठ्यावर आहे. पुलाच्या जवळ उत्खनन होत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्याने या पुलाच्या सुरक्षेविषयी प्रश्न निर्माण झाला आहे.

एरंडोल तालुका, जळगाव तालुका आणि धरणगाव तालुक्याच्या हद्दीत गिरणा नदीच्या पात्रात अवैधरित्या वाळू उपसा केला जात आहे. ग्रामस्थांनी ओरड केल्यानंतरही प्रशासनाच्या नाकावर टिच्चून वाळू उपसा सुरूच आहे.

शुक्रवारी (२३ जानेवारी) भर दिवसा बांभोरी येथे राष्ट्रीय पुलाच्या दहा मीटर अंतरावर पात्रातून वाळूचा उपसा केला जात असल्याचा प्रकार माहिती कार्यकर्ते दीपककुमार गुप्ता यांनी उघडकीस आणला. वाळू उत्खननातून पुलाला धोका निर्माण झाला असून याकडे प्रशासनाचा कानाडोळा आहे,असा आरोप गुप्ता यांनी हा प्रकार समोर आणून केला.

### कांताई धरणातून उपसा

गिरणावरील कांताई धरणात कढोली शिवारातून मशिनद्वारे पात्रातून वाळूचा उपसा केला जातो. पात्रातून काढलेल्या वाळूची



ट्रॅक्टरद्वारे अन्य ठिकाणी वाहतूक करून त्याठिकाणी वाळूचा ढिग तयार जातो. यठिकाणी डंपरमध्ये वाळू भरून तिचा सप्लाय केला जातो,अशी माहिती स्थानिक ग्रामस्थांकडून कळाली.

कढोली, वैजनाथ, टाकरखेडा, सावखेडा, बांभोरी, निमखेडी, आव्हाणे, आव्हाणी, नंदगाव यासह अनेक ठिकाणी नदीपात्रातून अवैध वाळूचा उपसा केला जात आहे. या उपशातून त्या त्या शिवारात पाण्याची पातळी खोल गेली असून नजिकच्या काळात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. रात्री वाळूची चोरटी वाहतूक होत आहेच. दिवसाही पात्रातून वाळूचा उपसा सुरू आहे. सरकारी खनिजाची संरक्षण करण्याची जबाबदारी असताना त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. तसेच चोरटी वाहतुकीला अटकाव केला जात नसल्याचे ग्रामस्थांकडून सांगण्यात आले आहे.

### ठोस कारवाई नाही

अवैध वाळू वाहतूक संदर्भात कारवाई होत असते. मात्र गिरणा नदीपात्रातून अवैध वाळू उत्खननाविरोधात ॲक्शन घेण्याची गरज आहे, ती होत नाही. वाळूच्या शिवारात पाण्याची पातळी खोल जात असून पात्राला विद्रुप स्वरूप येऊन नदी बकाल होत आहे. शासनाच्या खनिजाचे संरक्षण आणि नदीचे विद्रुपीकरण थांबविणे आणि पर्यावरण समतोल साधणे, अशा पद्धतीने अंमलबजावणीचा प्रशासनातून अभाव आहे, असा सूर ग्रामस्थांमधून उमटतोय.

## पुलावर होतोय कंप

राष्ट्रीय महामार्गावरील बांभोरी येथील पूल वाहतुकीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण आहे. शहरात येण्यासाठी हा एकमेव पूल आहे. शहरालगत अन्य ठिकाणाहून शिक्षण अथवा शैक्षणिक कामासाठी येणारे विद्यार्थी नागरिकांची या पुलावरून दररोज वर्दळ असते. कंपनीत जाणारे येणारे कर्मचारी, शहरात दुधाचा पुरवठा करणारे शेतकरी या पुलावरून रोज ये जा करतात. याशिवाय एस.टी.बसेस, मालवाहू वाहने, रिक्षा, दुचाकी असे असंख्य वाहनांची पुलावरून वर्दळ होत आहे. या पुलावरून जाताना कंप होतात,असे अनेकांकडून सांगण्यात आले आहे. बऱ्याच वेळा पुलावर खड्डे झाले, त्याची दुरुस्तीही झाली मात्र होणारे कंप मनाचा थरकाप करतात, अशी भावना व्यक्त होत आहे. पुलाजवळ होणाऱ्या वाळू उत्खननाने पुलाला धोका संभवण्याची भीती आहे, असाही सूर उमटतो आहे.

तरुण भारत
02 Feb 2026 - Page 9
epaper.tarunbharatlive.com

# विकसित भारताचे स्वप्न साकारणारा अर्थसंकल्प

## केंद्रीय अर्थसंकल्पावर जिल्ह्यातील मंत्री, आमदारांच्या प्रतिक्रिया

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी रविवारी नववा अर्थसंकल्प सादर केला. यंदाच्या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांच्या घोषणा मोठ्या प्रमाणावर करण्यात आल्या आहेत. या अर्थसंकल्पाचे [illegible] स्वागत केले आहे.

### विकसनशील भारताचा विकसित दिशेने नेणारा दूरदृष्टीपूर्ण अर्थसंकल्प

[illegible]

- गुलाबराव पाटील, पालकमंत्री, जळगाव

### तरुणांच्या स्वप्नांना बळ देणारा अर्थसंकल्प

[illegible]

- रक्षा खडसे, केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री

### सबका साथ, सबका विकास...

[illegible]

- संजय सावकारे, वस्त्रोद्योगमंत्री

### पायाभूत सुविधांवर भर

[illegible]

- डॉ. केतकी पाटील, जिल्हा सरचिटणीस, भाजपा.

### महिलांच्या सशक्तीकरणाला विशेष प्राधान्य

[illegible]

- स्मिता वाघ, खासदार, भाजप

### देशासह महाराष्ट्राच्या विकासाला नवी गती देणारा अर्थसंकल्प

[illegible]

- मंगेश चव्हाण, आमदार, भाजप

### आत्मनिर्भर अर्थसंकल्प

[illegible]

- सुरेश भोळे, आमदार, भाजप

### सक्षम, विकसित भारताचे स्वप्न

[illegible]

- डॉ. उल्हास पाटील, माजी खासदार

### एआय ते हाय व्हॅल्यू क्रॉप्स, मोठ्या घोषणा, अंमलबजावणीकडे लक्ष

[illegible]

- अशोक भालचंद्र जैन, अध्यक्ष, जैन इरिगेशन सिस्टिम लिमिटेड

# जिल्हा नंदुरबार

लोकमत

याकडहा लक्ष लागून आहे.

आइल मिल असोसिएशन, नंदुरबार.

# आरोग्य मंत्र्यांच्या प्रतिनिधींनी घेतला आढावा

## सिकलसेलसह आरोग्य केंद्रांना भेटी देऊन पाहणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांचे विशेष कार्य अधिकारी डॉ. रामजी आडकेकर यांनी जिल्ह्यात भेट देत आरोग्य यंत्रणेचा आढावा घेतला. शनिवारी (दि. ३१ जानेवारी) त्यांनी भेट देत आरोग्य व्यवस्थेसह अरुणोदय विशेष सिकलसेल तपासणी अभियानाचा आढावा घेतला.

भेटीप्रसंगी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रवींद्र सोनवणे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विनय सोनवणे, प्र. अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हरिश्चंद्र कोकणी, जिल्हा प्रशिक्षण पथक वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवाजी राठोड, तालुका आरोग्य अधिकारी, सिकलसेल समन्वयक तसेच संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी, उपकेंद्रस्तरीय सामुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेवक, सेविका, गटप्रवर्तक व आशा सेविका उपस्थित होत्या. प्रसंगी डॉ.आडकेकर यांनी विविध सूचना केल्या.



सिसा ता. धडगाव येथील आरोग्य केंद्रात भेटीप्रसंगी डॉ. रामजी आडकेकर. सोबत डॉ. कांतीलाल पावरा, डॉ. हरिश्चंद्र कोकणी यांच्यासह आरोग्याधिकारी व कर्मचारी.

## भेटीदरम्यान नागरिकांची मोफत सिकलसेल तपासणी

डॉ. आडकेकर यांनी धडगाव तालुक्यातील चुलवड प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच सीसा आरोग्य उपकेंद्रात भेट दिली. भेटीदरम्यान त्यांनी अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियानाबाबत आढावा घेतला. अभियानाची अंमलबजावणी, जनजागृती तसेच तपासणी व उपचार प्रक्रियेची माहिती घेऊन पुढील कालावधीत हे अभियान अधिक प्रभावीपणे राबविण्याबाबत सूचना त्यांनी दिल्या. या अभियानांतर्गत ० ते ४० वयोगटातील नागरिकांची मोफत सिकलसेल तपासणी करण्यात येत आहे. तपासणीनंतर नागरिकांना निरोगी, वाहक अथवा सिकलसेल रुग्ण (ग्रस्त) असे वर्गीकरण करण्यात येत असून, निरोगी नागरिकांना पांढरे कार्ड, वाहक नागरिकांना पिवळे कार्ड, तर सिकलसेल रुग्ण (ग्रस्त) नागरिकांना लाल कार्ड देण्यात येत आहे. तसेच वाहक व रुग्ण नागरिकांना योग्य उपचार व समुपदेशन दिले जात आहे. भेटीदरम्यान नंदुरबार जिल्हा रुग्णालयात डॉ. आडकेकर यांनी भेट देत जिल्ह्यात सुरू असलेल्या इतर आरोग्यविषयक कामकाजाचाही त्यांनी आढावा घेतला व सर्वसामान्य नागरिकांना आरोग्य सेवा सुरळीत, वेळेत व प्रभावीपणे उपलब्ध करून देण्याबाबत आरोग्य यंत्रणेला आवश्यक सूचना दिल्या.

Hello Nandurbar
Page No. 1 Feb 02, 2026
Powered by: erelego.com

लोकमत

# ग्रामसडक योजनेत निधी; मुलींना मिळेल वसतिगृह!

## केंद्रीय अर्थसंकल्पात तरतूद, राज्यासह जिल्ह्याला लाभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी संसदेत २०२६ चा केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला. रविवारी (दि. १ फेब्रुवारी) सादर झालेल्या या अर्थसंकल्पात महाराष्ट्रासाठी आणि पर्यायाने नंदुरबारला काय मिळणार याकडे जिल्ह्याचे लक्ष लागून होते. अर्थसंकल्पीय घोषणेदरम्यान नंदुरबार जिल्ह्यातील ग्रामसडक योजनेची रखडलेली कामांना निधी मिळण्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. दुसरीकडे देशभरात उच्चशिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी वसतिगृहे सुरू करण्याची घोषणा झाली आहे. यामुळे जिल्ह्याला लाभ मिळणार आहे.

२०२६ चा अर्थसंकल्प शिक्षणात गुंतवणुकीवर भर देत असल्याचे अर्थमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. त्यांच्या संकल्पनेतून मुलींच्या शिक्षणाला पाठिंबा देण्यासाठी, एसटीईएम (विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणितीय) उच्च शिक्षण देणाऱ्या राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात एक मुलींचे वसतिगृह बांधले जाईल अशी घोषणा केली आहे. जिल्ह्याला या घोषणेचा निश्चित लाभ मिळण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणितीय अर्थात एसटीईएम उच्च शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्थांचे जाळे पाहता हे वसतिगृह साकारण्याची शक्यता आहे. याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे जिल्हा प्रशासनाने दिल्यानंतर पुढील कारवाई होणार आहे. वसतीगृहासाठी निधी प्रक्रिया राज्यशासनाच्या स्तरावरून पूर्ण होणार आहे. मत्स्योत्पादनासाठी केंद्रीय अर्थसंकल्पात निधी देण्याची घोषणा झाली आहे. यातून नर्मदेतील केज प्रकल्पांना निधी मिळणार किंवा कसे याकडेही लक्ष लागून आहे.




### नवापूर उद्योग क्षेत्राला निधी लाभ होण्याची शक्यता

अर्थसंकल्पात टेक्सटाईला धोरण ठरविण्यात आले आहे. यासाठी निधी मिळून गुजरात राज्यातील टेक्सटाईल उद्योजक नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर आणि भालेर एमआयडीसीमध्ये येण्याची वाट मोकळी होणार आहे. एमएसएमई अर्थात सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी १० हजार कोटी रुपयांच्या ग्रोथ फंडची तरतूद केली आहे. यामुळे नवापूर औद्योगिक क्षेत्राला लाभ होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतर्गत महाराष्ट्रासाठी ३७८ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. यातून नंदुरबार जिल्ह्यात रखडलेली ग्रामसडक योजनांची कामे मार्गी लागण्याची शक्यता आहे.

> **अर्थसंकल्प हा आत्मनिर्भर भारताच्या पायाभरणीला बळ देणारा आहे. भारताला जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनवण्याच्या संकल्पाकडे नेणारे हे एक निर्णायक पाऊल आहे. शेतकरी, एमएसएमई क्षेत्र, उद्योगजगत तसेच समाजातील शेवटच्या घटकापर्यंत ठोस व परिणामकारक तरतुदी करण्यात आल्या आहेत. तरुणांना रोजगार, उद्योजकांना संधी, शेतकऱ्यांना सन्मान देणारा अर्थसंकल्प आहे.**
>
> **पिकेश अग्रवाल,** सचिव, ऑल इंडिया ऑईल मिल असोसिएशन, नंदुरबार.

लोकमत

# ऊस वाहून नेणाऱ्या वाहनांची डोकेदुखी...



नंदुरबार ते प्रकाशा रस्त्यावर रविवारी दुपारी ऊस वाहून नेणारी बैलगाडी उलटल्याची घटना घडली. घटनेत ऊस वाहून नेणारा किरकोळ जखमी झाला. सकाळी झालेल्या घटनेनंतर रस्त्याच्या एका बाजूला ऊस पडून होता. मार्गावर सतत वाहतूक सुरू असताना ऊस पडून असल्याने वाहनधारकांना अडचणीचे ठरत होते. नंदुरबार ते प्रकाशा रस्त्यावर ऊस वाहतूक करणारी वाहने उलटण्याच्या घटना सातत्याने वाढत आहेत.

छाया:सूर्यकांत खैरनार

लोकमत

# दोन किलोमीटर अंतराच्या रस्ता कामासाठी दीड वर्षापासून प्रतीक्षा

## वारंवार तक्रारी करूनही दुर्लक्ष : रस्त्यावर खडी विखुरल्याने वाहनधारकांसह शेतकऱ्यांचे हाल

लोकमत न्यूज नेटवर्क

**प्रकाशा :** धुरखेडा ते जुनी कलमाडी या दोन किलोमीटर रस्त्याच्या डांबरीकरण कामाला सुमारे दीड वर्षापूर्वी मंजुरी मिळाल्यानंतरही काम न झाल्याने शेतकरी त्रस्त आहेत. संबंधित ठेकेदाराने कामाची सुरुवात केली. मात्र फक्त खडी टाकली आहे. ही खडी रस्त्यावर विखुरल्याने शेतकऱ्यांचे हाल होत आहेत. या रस्त्याचे काम कधी होईल याची प्रतीक्षा लागून आहे.

जुनी कलमाडी रस्त्यावर प्रकाशासह डामरखेडा, करजई, कुकडी या चार गावांतील शेतकऱ्यांच्या शेतजमिनी आहेत. रस्त्यावर खडी असल्याने वाहन चालविण्यासाठी कसरत करावी लागते. पावसाळ्यात तर शेती करणे म्हणजे शेतकऱ्यांसाठी मोठे आव्हान असते. दोन किलोमीटर अंतराच्या या रस्त्याच्या कामासाठी सुमारे दीड कोटी रुपये मंजूर झाले आहेत. मात्र दीड वर्ष होऊनही काम होत नसल्याने शेतकऱ्यांचा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा सुरू आहे. ठेकेदार मात्र काम करीत नाही. शेतकऱ्यांनी तक्रार केल्यानंतर फक्त खडी टाकली आहे. अजून तर डांबरीकरण, तीन फरशी पुलाचे काम, साइडपट्टीचे काम सर्वच अपूर्ण आहे. म्हणून संबंधित शेतकऱ्यांची प्रकाशा येथे बैठक झाली. या बैठकीत ठरल्याप्रमाणे मुख्यमंत्र्यांनाही रस्त्याच्या कामाबाबत ई-मेलद्वारे तक्रारही करण्यात आली आहे. मात्र अद्यापही रस्ता कामाला सुरुवात होत नसल्याने शेतकऱ्यांचे हाल सुरूच आहेत. या रस्त्याचे काम त्वरित करून शेतकऱ्यांचे हाल थांबविण्याची मागणी होत आहे.



शहादा तालुक्यातील धुरखेडा ते जुनी कलमाडी रस्त्यावर खडी विखुरल्याने वाहनधारकांसह शेतकऱ्यांचे हाल होत आहेत. छाया : नरेंद्र गुरव

### शेतकऱ्यांचा पाठपुरावा; बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

१ या रस्त्याचे काम लवकर होण्यासाठी शेतकऱ्यांनी शहादा येथील सार्वजनिक बांधकाम विभागाला मे २०२५ व जुलै २०२५ असा दोन वेळा निवेदनही दिले आहे. या रस्त्याच्या डांबरीकरण कामासाठी आमदार निधीतून सुमारे दीड कोटी रुपये मंजूर करून कामाचा आदेशही काढण्यात आला आहे.

२ या कामात दोन किलोमीटर अंतराचे खडीकरण, डांबरीकरण, पाइपमोरी, साइडपट्टी, आदी कामे करण्यात येणार आहेत. मात्र संबंधित ठेकेदाराकडून काम करण्यात आलेले नाही.

३ शेतकऱ्यांना शेतात खते, बियाणे व इतर साहित्य नेण्यासाठी व शेतमाल घरी आणण्यासाठी रस्त्याअभावी कसरत करावी लागते. शेतकऱ्यांच्या मागणीवरून रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळाली होती. मात्र काम न झाल्याने शेतकऱ्यांमधून नाराजी व्यक्त होत आहे.

**१.५**

कोटी रुपये या रस्त्याच्या कामासाठी आमदार निधीतून मंजूर झाले असल्याचे सांगण्यात येते.

### खड्डे टाळण्याच्या प्रयत्नात अपघातही वाढले...

सध्या रस्त्यावर खडी पडून आहे. ती रस्त्यावर विखुरल्याने वाहन चालविताना कसरत करावी लागते. दुचाकींचे अपघातही होत आहेत. रस्त्याचे काम होण्यासाठी प्रकाशा येथील शेतकरी किशोर प्रल्हाद चौधरी, सुनील गोपाळ पाटील, दिनेश दयाभाई पाटील (डामरखेडा), नवीन श्रीपाद पाटील, आदींनी जुलै २०२५ मध्ये शहादा येथील सार्वजनिक बांधकाम विभागात कार्यकारी अभियंत्यांना भेटण्यासाठी गेले होते. मात्र ते उपस्थित नसल्याने कनिष्ठ अभियंता साळवे यांच्याशी भेट घेऊन त्यांना सर्व हकिकत सांगितली व निवेदन दिले. त्यांनीही समर्पक उत्तर देत मी संबंधित ठेकेदाराशी बोलतो व काम करण्याच्या सूचना देतो, असे सांगितले. तरीही रस्त्याचे काम झाले नाही, म्हणून संबंधित शेतकऱ्यांनी थेट मुख्यमंत्र्यांकडे ई-मेलद्वारे तक्रार केली आहे.

दिव्य मराठी धुळे सिटी 02-02-2026

# शहाद्यातील तो जीवघेणा खड्डा अखेर पालिकेने बुजवला; स्वच्छताही सुरू

## बुजवलेल्या खड्ड्यावर पेव्हर ब्लॉक बसवण्याचीही नागरिकांची मागणी

**प्रतिनिधी** | शहादा



शारदानगरातील मोकळ्या जागेतील झाडेझुडपे तोडताना पालिका कर्मचारी.

शहरातील प्रभाग क्रमांक १३ मधील शारदानगर वसाहतीतील पालिकेच्या मालकीच्या मोकळ्या जागेत ट्रॅकच्या मध्यभागी मोठा जीवघेणा खड्डा झाला होता. याबाबत 'दिव्य मराठी'च्या शुक्रवारच्या अंकात वृत्त प्रसिद्ध झाले. त्याची पालिका प्रशासनाने दखल घेत तातडीने दुसऱ्याच दिवशी तो जीवघेणा खड्डा बुजवून त्या मोकळ्या जागेची जागेची साफसफाई देखील सुरू केली.

शहरातील सामाजिक कार्यकर्ते कौस्तुभ मोरे यांनी पालिका प्रशासनाला तक्रारीद्वारे ट्रॅकच्या मध्यभागी पडलेला खड्डा त्वरित न बुजवल्यास व जागेची सफाई न केल्यास आंदोलनाचा इशारा दिला होता. शारदानगरासह परिसरातील ज्येष्ठ व इतर नागरिक सकाळी व सायंकाळी या मोकळ्या जागेत फिरायला येतात. मात्र ट्रॅकच्या मध्यभागी मोठा खड्डा पडल्याने दुर्घटनेची शक्यता होती. तसेच जागेत सर्वत्र काटेरी झाडेझुडपे वाढल्याने नागरिकांनी तेथे फिरणेही बंद केले होते.

दरम्यान, वृत्त प्रसिद्ध होताच येथील पालिकेचे बांधकाम सभापती संतोष वाल्हे व प्रभाग क्र.१३ मधील नगरसेवक ललित छाजेड यांनी प्रत्यक्ष शारदानगर वसाहतीत जाऊन पाहणी केली. नागरिकांशी चर्चा करून खड्डा बुजवून जागेची लागलीच स्वच्छता केली जाईल, असे आश्वासन दिले होते. स्वच्छता विभागाच्या कर्मचाऱ्यांमार्फत काटेरी झाडे तोडण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. नागरिकांनी मात्र खड्डा हा केवळ वाळूने न बुजवता ब्लॉक बसवण्याची मागणी केली. दरम्यान नगरसेवकांनी तातडीने दखल घेतल्याबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले. दरम्यान शहरातील प्रभागा-प्रभागात अश पद्धतीने काम होणे असल्याची अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त होऊ लागली असून यामुळे दिलास मिळणार आहे.

बेफिकिरी • पार्किंगची सोय, तरी समस्या कायम; प्रवासी करतात समस्यांचा सामना

# बसस्थानक आवारात वाहतुकीस खोडा; रक्षक केबिनजवळ बेशिस्त वाहने उभी

प्रतिनिधी | नंदुरबार

जिल्ह्याच्या ठिकाणी अद्ययावत स्वरूपात उभारलेल्या येथील बसस्थानक आवारात बेशिस्त वाहने ही प्रवाशांसाठी डोकेदुखी ठरत आहेत. कोट्यवधींचा खर्च करून उभारलेल्या या बसस्थानकात मूलभूत सुविधा आणि शिस्त यांचा कायम अभाव दिसतो. विशेषतः पार्किंग व्यवस्थेचा प्रश्न गंभीर व धोकादायक रूप घेत असून, त्याचा थेट फटका प्रवाशांना बसत आहे.

पार्किंगबाबत तक्रारी वाढल्यानंतर आवारात पार्किंग पॉइंट सुरू झाला आहे. मात्र पार्किंग पॉइंट अस्तित्वात असूनही बस स्थानक आवारात बेशिस्तपणे दुचाकी व चारचाकी वाहने उभी राहण्याचे प्रकार सर्रास सुरू आहेत. पार्किंगचा ठेका केवळ कागदावरच असल्याचे चित्र सध्या दिसत आहे. थेट प्लॅटफॉर्मलगत, हिरकणी कक्षासमोर तसेच सुरक्षा रक्षकांच्या केबिनजवळ वाहने उभी केली जातात. याच ठिकाणी आगारात येणाऱ्या बसेस थांबून प्रवासी उतरवतात. मात्र चुकीच्या ठिकाणी उभ्या केलेल्या वाहनांमुळे बस चालकांना अडथळा निर्माण होत असून, प्रवाशांना जीव मुठीत घेऊन ये-जा करावी लागते. अपघाताची शक्यता वाढली असूनही याकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याचे वास्तव आहे. त्यामुळे सुरक्षा यंत्रणा काय करते आणि प्रशासनाचे नियंत्रण कुठे आहे? असे प्रश्न उपस्थित होत आहेत. प्रवाशांची सुरक्षितता, वाहतुकीची शिस्त आणि बस स्थानकाचा सुव्यवस्थित वापर यासाठी पार्किंग व्यवस्थेवर कठोर कारवाई, स्पष्ट नियोजन आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची गरज व्यक्त होत आहे.



नंदुरबार येथील बस स्थानकात अस्ताव्यस्त लावण्यात आलेली पार्किंग.

### बसेस, प्रवाशांना वाहनांचा अडथळा, अपघाताची भीती

नंदुरबार बस स्थानकातून लांब पल्ल्यासह परराज्यात बससेवा आहे. येथे अनेक वर्षे येथे खासगी वाहनांसाठी पार्किंग व्यवस्था नव्हती. ही सुविधा सुरू झाली असली तरी समस्या कायम आहे. प्रवाशांना सोडण्यासाठी किंवा घेण्यासाठी आलेले नातलग आजही पूर्वीच्याच जागी वाहने लावतात. बाहेरून आलेल्या बसेस येथे थांबतात. त्यामुळे प्रवाशांना या बेशिस्त उभ्या वाहनांचा अडथळा ठरतो. एखाद्यावेळी अपघात होण्याची भीती आहे.

**दिव्य मराठी एक्सपर्ट**

महादू हिरणवाळे, तालुकाध्यक्ष, महाराष्ट्र प्रवासी महासंघ, नंदुरबार.

### प्रवाशांची सुरक्षितता; अंकुश हवा

एसटी महामंडळाचे येथील मध्यवर्ती आगार सर्व प्रवाशांची जीवन वाहिनी आहे. मात्र बस स्थानकाच्या प्रवेशद्वारापासून आतील भागात ठिकठिकाणी खड्डे आहेत. यामुळे बस चालकासह प्रवाशांना कसरत करावी लागते. अनेक प्रवासी दुचाकी वाहने अधिकृत वाहन तळावर न लावता स्थानकात बेशिस्तपणे लावतात. त्यावर अंकुश असणे गरजेचे आहे. पोलिस चौकी शेजारील हिरकणी कक्ष नेहमीच बंद असल्याने माता-भगिनींना गैरसोयीचे ठरते. ध्वनिक्षेपकावरून उद्घोषणा होणे आवश्यक आहे. बस स्थानकावरील स्वच्छतेला प्राधान्य देण्याची गरज असून ते द्यावे. स्थानकावरील बाकांची संख्या वाढवणेही आवश्यक आहे.

दै.सकाळ दि.२ फेब्रुवारी,२०२६

सकाळ

# थकबाकीदारांना सवलत वाढवून द्या

## आमदार राजेश पाडवी यांचे मुख्यमंत्र्यांना मागणीचे निवेदन

■ सकाळ वृत्तसेवा

**तळोदा, ता. १ : घरपट्टी, पाणीपट्टी थकबाकी असलेल्यांना ५० टक्के सवलत वाढवून मिळावी, यासाठी आमदार राजेश पाडवी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली होती. त्याची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३१ मार्चपर्यंत मुदत वाढवून दिली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी, सालदार व ग्रामस्थांनी आमदार राजेश पाडवी यांचे आभार मानले आहेत.**

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने २०२५-२६ या वर्षासाठी राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भातील शासन निर्णय नुकताच जाहीर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे घरपट्टी, पाणीपट्टीमध्ये मिळणारी ५० टक्के सवलत पुढेही लागू राहणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. ग्रामपंचायतींना स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून अधिक सक्षम करण्याचा उद्देशाने हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांच्या उत्कृष्ट कामांचे मूल्यमापन तालुका, जिल्हा, महसूल विभाग व राज्य अशा चार स्तरांवर केले जाते.



**मुंबई** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देताना आमदार राजेश पाडवी.

मूळ शासन निर्णयानुसार या अभियानाचा कालावधी १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर असा निश्चित करण्यात आला होता. मात्र राज्यातील बदलती परिस्थिती, तसेच महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचा कार्यक्रमामुळे अभियान अंमलबजावणीवर मर्यादा आल्या होत्या. अधिकाअधिक ग्रामपंचायतींना सहभागाची संधी मिळावी व सुरू असलेली विकासकामे पूर्ण करता यावी, यासाठी आमदार राजेश पाडवी यांचा याबाबत सतत पाठपुरावा सुरू होता. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून, या अभियानाचा कालावधी वाढविण्याचा निर्णय घेतला आहे.

नवीन शासन निर्णयानुसार आता ३१ मार्चपर्यंत कालावधी वाढविण्यात आला आहे. त्यामुळे ग्रामपंचायतींना विकासकामे पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त वेळ मिळणार असून, अभियानाची अंमलबजावणी होण्यास मदत होणार आहे.

Dhule, Nandurbar-Today
02/02/2026 Page No. 4

दै.पुण्यनगरी

दि.२ फेब्रुवारी,२०२६

पुण्य नगरी

# शहाद्याला अतिक्रमणाचा विळखा

## सामान्य नागरिकांकडून तक्रार पालिका प्रशासनाचे दुर्लक्ष





शहादा - शहरातील अनेक मुख्य रस्ते चौक व धार्मिक स्थळांच्या बाहेर चालत्याफिरत्या अतिक्रमणांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. याबाबत पालिका प्रशासन तसेच पोलीस प्रशासनाला अनेकदा लेखी व तोंडी तक्रारी करुनही या अतिक्रमणांवर प्रशासकीय ओझातो कारवाई का करत नाही ? हा आता संशोधनाचा विषय ठरत आहे. याबाबत एका सामाजिक कार्यकर्त्यांकडून अतिक्रमणासंदर्भात पालिकेचे मुख्याधिकारी तसेच उपनगराध्यक्षांकडे पुन्हा लेखी तक्रार करण्यात आली आहे. या तक्रारीनंतर पालिका प्रशासन काय निर्णय घेते, याकडे आता शहरवासियांचे लक्ष लागले आहे.

शहादा शहरातील मुख्य रस्ते चौक व विविध धार्मिक स्थळांच्या बाहेरील बाजूस अतिक्रमण वाढले आहे. या अतिक्रमणांमुळे शहरात अनेकदा लहान मोठे अपघात होतात, वाहून अनेकदा वादविवाद होतात. मात्र, हे आता शहरासाठी दररोजचे झाले आहे. नागरिक, विविध संघटना, सामाजिक कार्यकर्त्यांनी पालिका प्रशासनाकडे पोलीस प्रशासनाकडे शहरातील अतिक्रमणासंदर्भात अनेकदा लेखी व तोंडी तक्रारी दिल्या आहेत. मात्र, पालिका प्रशासन व पोलीस प्रशासन याकडे जाणून दुर्लक्ष करीत आहे. या वाढत्या अतिक्रमणांमुळे शहरातील एखाद्या लहान मोठ्या घटनेमुळे मोठा कायदा (पान ४ वर)

### अतिक्रमण हटावकडे दुर्लक्ष ठरतोय संशोधनाचा विषय

शहरातील मुख्य रस्त्यांवर विविध चौकांमध्ये शहरातील विविध धार्मिक स्थळांपुढे मोठ्या प्रमाणावर खाजगी टपऱ्या, हॉकर्स, चालत्या फिरत्या छोट्या दुकानं व फुटपाथवरची दुकानदारांनी मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणं थाटून शहरातील रस्ते गिळंकृत करण्यासोबत शहराचे सौंदर्य वेठीस धरले आहे. हा सारा प्रकार प्रशासन डोळेझाक करत का बघतं आहे, हा आता संशोधनाचा विषय आहे. पालिका प्रशासनानं या प्रकाराकडे गांभीर्यानं बघणं आता गरजेचं आहे. अन्यथा या छोट्या - मोठ्या अतिक्रमण धारकांमुळं उद्भवणाऱ्या लहान मोठ्या वाद विवादांमुळं शहराची कायदा व सुव्यवस्था धोक्यात येण्याची शक्यता आहे.

पुण्य नगरी

# रेल्वे स्टेशनवरील कोच स्थितीदर्शक फलक लावण्याची मागणी

**नंदुरबार :** नवापूर रेल्वे स्टेशनवरील कोच स्थितीदर्शक फलक लावण्याच्या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे खा.अॅड.गोवाल पाडवी यांना देण्यात आले.

सदर निवेदनात म्हटले आहे की, नंदुरबार जिल्हा हा अतिदुर्गम जिल्हा असून येथे पुरेशा प्रमाणात रोजगार उपलब्ध नसल्यामुळे जिल्ह्यातील अनेक नोकरवर्ग, तरुण वर्ग, विद्यार्थी हे रोजगार व शिक्षणासाठी महाराष्ट्रातील मोठ्या शहरांकडे धाव घेत असतात. तसेच मजुर वर्गदेखील रोजगारासाठी परराज्यात स्थलांतरीत होत असतो. त्यातच नवापूर तालुक्यातील अनेक नोकरवर्ग रोजगारासाठी नजिकच्या गुजरात राज्यात तसेच महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यात उदरनिर्वाहासाठी जात असतात. नवापूर रेल्वे स्थानकावर कोच स्थितीदर्शक फलक नसल्यामुळे प्रवाश्यांना कुठला डब्बा कुठे लागणार आहे, हे कळत नाही, यामुळे अनेकवेळा प्रवाश्यांना गाडी स्टेशनवर आल्यानंतर गाडी सापडविण्यासाठी अवजड सामानासह पळत रेल्वेच्या मागे किंवा पुढे जावे लागते. त्यातच सदर रेल्वे स्थानकावर गाडीचा थांबादेखील अत्यल्प वेळेसाठी असल्याने त्यातच राखीव डब्बा सापडत नसल्यामुळे अनेक वेळा वेळेअभावी सदरचे प्रवासी जागा मिळेल त्या डब्यात बसतात.मात्र, तपासणी झाल्यास अव्वाच्या सव्वा दंड भरावा लागतो. या रेल्वे स्थानकावर कोच स्थितीदर्शक फलक लावण्याची मागणी निवेदनातून पुष्पा गावित यांनी केली आहे.

Nandurbar Edition
Feb 02, 2026 Page No. 01
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# जन्म-मृत्यू दाखल्यांचे रॅकेट उघडकीस ; बनावट शिक्क्यांचा वापर

## सायबर कॅफेच्या माध्यमातून सात वर्षांपासून सुरु होता गैरप्रकार

## दोघा संशयितांना ९ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी

**नंदुरबार : शासनाच्या शिक्क्यांप्रमाणेच बनावट शिक्के बनवून सरास जन्म-मृत्यूचा खोटे दाखले देणारा धक्कादायक प्रकार नंदुरबारात उघडकीस आला आहे. शहरातील सायबर कॅफेमधून बनावट शिक्के, खोट्या नोंदी आणि फसव्या कागदपत्रांच्या आधारे जन्म-मृत्यू प्रमाणपत्रांचा धंदा गेली सहा ते सात वर्षे बिनधास्तपणे सुरू असल्याचे निष्पन्न झाले आहे. या गंभीर घोटाळ्याने प्रशासनासह नागरिकांनाही हादरवले आहे याप्रकरणी सायबर कॅफेशी संबंधित दोघांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांना ९ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे. दरम्यान, पालिकेच्या दोन कर्मचाऱ्यांनाही अधिक माहितीसाठी ताब्यात घेण्यात आल्याचे समजते.**

नंदुरबार शहरातील साक्री नाका परिसरात असलेल्या आ.के. सायबर कॅफेमध्ये संशयीत आरोपी अनिल यशवंत कोळी (रा.असाणे, ता.नंदुरबार) आणि रिजवान सुभान खान (वय ३२, रा. गुजराथ मोहल्ला, साक्री रोड, नंदुरबार) यांनी संगनमताने गेल्या सहा ते सात वर्षांपासून त्यांनी जुन्या व जीर्ण रजिस्टर व पहाता रजिस्टरमधील नोंद कार्यालयात गैरवापर करून प्रत्यक्षात जन्म नोंद नसतानाही बनावट नोंदी तयार केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. तयार केलेली बनावट जन्म प्रमाणपत्रे रिजवान यांच्या मोबाईलवर पाठवून जन्म प्रमाणपत्रावर मुख्याधिकारी व पालिकेचा गोल शिक्का मारून खोट्या कागदपत्रांच्या आधारे जन्म मृत्यूचे दाखले तयार करीत त्यांच्या कामकाजाशी शासनाचे आर्थिक नुकसान झाले असून नागरिकांची दिशाभूल करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात जन्म मृत्यू नोंद विभागाचे प्रभारी प्रमुख सुभाष पवार यांच्या फिर्यादीवरून संशयित अनिल कोळी व रिजवान सुभान खान यांच्याविरोधात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस निरीक्षक निलेश देसले करीत आहेत.

### चौकशीसाठी पालिकेच्या दोघांना घेतले ताब्यात

बनावट शिक्क्यांचा वापर करून गेल्या सहा ते सात वर्षांपासून सायबर कॅफेच्या माध्यमातून जन्म-मृत्यू दाखले बनविण्याचा धोकादायक प्रकार झाल्याचे उघड झाले असून संशयित अनिल कोळी व रिजवान सुभान खान या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. यातून त्यांनी नेमके किती दाखले तयार केले, आणखी कोणत्या प्रकारांसाठी त्यांनी वापर केला आहे, आणखी इतर शिक्क्यांचा वापर केला आहे का? असा एक-ना-अनेक प्रश्नांची उत्तरं पोलिस तपासात होणार आहे. दरम्यान, पालिकेच्या आणखी दोन कर्मचाऱ्यांनाही अधिक चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.